# श्रीराम-समर्थ

★

लेखक

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

मूल्य पाच रुपये

# श्रीराम-समर्थ

★

लेखक

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

★

मूल्य पाच रुपये

प्रकाशक :

रा. ना. गोडबोले,
मॅनेजिंग ट्रस्टी,
श्रीराम देवस्थान ट्रस्ट, चाफळ
६९ शनिवार पेठ, सातारा

© श्रीराम देवस्थान ट्रस्ट, चाफळ

प्रकाशन : ११ एप्रिल १९७३

मुद्रक :

अ. कृ. कुलकर्णी,
आनंद मुद्रणालय,
१८२, सोमवार पेठ,
सातारा शहर

# प्रारंभीच सांगावयास हवे ते!

" समर्थे समर्थ करावे । तरीच समर्थ म्हणवावे ।
त्रैलोक्यासी पडले ठावे । सामर्थ्य ज्याचे ।। "

हा श्रीरामप्रसादाचा अनुभव नारायण सूर्याजी ठोसर ऊर्फ रामदासांनी घेतला आणि तोच प्रसाद जनतेतील कर्तबगारांना लाभावा म्हणून प्रयत्न-पुरुषार्थ उभारला. त्याचे सारसर्वस्व श्रीराम-समर्थ या शब्दात आहे हे उघड आहे.

" मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो ज्या मती सापडला । तयासि तेचि श्रेष्ठ ।। "

अशी स्थिति दैनंदिन जीवनाच्या हरएक प्रश्न-समस्यासंबंधी आजकाल सर्वत्र आढळते. अंजनगाव (वऱ्हाड) च्या उद्धवसुतापासून दे. अप्पासाहेब अळतेकरापर्यंत श्रीसमर्थ रामदासांचे एकापेक्षा एक सरस व चिकित्सक चरित्रकार रामदासांविषयी प्रबोधन करून बसले असताही स्वत: समर्थासंबंधीच मतामतांचा गलबला कायमच आहे.

साधुसन्त झाले लोकी, तयांची न वाण ।
मात्र रामदासा साजे " समर्थ " अभिधान ।।

हे राष्ट्रीय कवि विनायकांचे वचन आणि समर्थांनी दिलेली विवेक-वैराग्य-संपन्न जीवनाची शिकवण याबाबत मात्र मतामतांचा गलबला कालवा करीत नाही. अगदी अलिकडच्या भाषेत सांगावयाचे तर " The world is a comedy to those who think and a tragedy to those who feel " हे सर्वप्रथम परमार्थाच्या स्तरावरूनही लोकांच्या मेंदूवर ठसविणारा रामदास हाच संत होय. याबद्दल कोणीच वाद घालीत नाही. मतामतांचा गलबला आहे तो समर्थ रामदासांच्या चरित्र-चारित्र्यातील काही पैलूंच्या कमी अधिक तेजाबद्दल व समर्थांच्या काही मताबद्दल. अत्याधुनिक काळातील तारीखतागायत मतप्रणालींच्या छायेत भूत काळातील इतिहाससिद्ध गोष्टी विश्लेषणास घेतल्यामुळे तो मतामतांचा गलबला जसा उठतो तसाच समर्थांचे कार्य, कर्तृत्व आणि विवेकवर्धिनी जीवनयात्रा यांचा एकजिनसी अभ्यास नसल्यामुळेही तो मतामतांचा गलबला उठतो, असा अनुभव आहे.

तेव्हा समर्थांच्या कर्तृत्वाचा, सांप्रदायाचा व प्रबोधनाचा एकजिनसी आढावा, थोडक्यात का होईना, लोकापुढे येईल तर मतामतांची पुष्कळ वादळे शमतील

अशी "अंतरी कल्पना केली । एकांती बोलिलो बहु ।।" तेव्हा खात्री पटली. चाफळ श्रीराम–देवस्थान–विश्वस्तांशी विचार–विनिमय करता, माझ्या खात्रीला दुजोरा मिळाला. म्हणून श्रीसमर्थांची रामोपासना, समर्थ सांप्रदाय, समर्थांचे जीवनकार्य व राष्ट्रीय प्रबोधन यांचे एकजिनसी चित्रण करणारा लघुसंदर्भ लिहून काढला. तोच आता चाफळ श्रीराम देवस्थान विश्वस्तातर्फे प्रसिद्ध होत आहे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास माझे शब्दभांडार अपुरेच अपुरे आहे.

आपल्या राज्याचा त्याग करून गंधमादन पर्वतावर अरिष्टनेमि राजा तपश्चर्या करीत होता. इंद्राने त्यास स्वर्गात बोलावले. पण तेथेही उच्चनीचता आहे व "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।" असा शिरस्ता आहे. म्हणून अरिष्ट–नेमीने स्वर्ग नाकारला. मग त्या वैराग्यसंपन्न राजाला आत्मज्ञानाचा बोध व्हावा म्हणून ब्रह्मनिष्ठ वाल्मीकीच्या आश्रमात वाल्मीकीने समग्र रामायण सांगितले व जीवन्मुक्त होशील असे आश्वासन दिले. (यो. वा. १–११) या कथेतील प्रबोधन साकार व्हावे हाच श्रीरामदासांचा व्याप–आटोप होता. त्यांना ऐहिक व आध्यात्मिक जीवनात "देवा सोडवित्या" रामाचे राज्य लोकांना लाभत रहावे अशी आस्था होती. अश्वपति केकयाप्रमाणे "न मे स्तेनो जनपदे, न कदर्यो, न मद्यपी । नानाहिताग्निर्नाविद्वान्, ना स्वैरी स्वैरिणी कुतः ।।" असे म्हणणाऱ्यांचे महाराष्ट्र हवे होते. त्यासाठीच "रामकथा ब्रह्मांड भेदून पैल्याड न्यावी ।" अशी समर्थांची तळमळ होती. म्हणून त्यांनी जो प्रयत्न–पुरुषार्थ उभारला, त्यानेच ते लोकमानसात "समर्थ" म्हणून अजरामर झाले. त्यांना लाभलेले हे "देणे ईश्वराचे" या पुस्तकात शब्दांकित करून वाचकांचे सेवेसी सादर केले आहे. तथापि हे सर्व "समर्थ कृपेचे लेणे" आहे. "सकल करणे जगदीशाचे ।" म्हणजे "आत्मा यत्नो धृतिर्बुद्धिः स्वभावो ब्रह्मवर्ष्मच ।।" त्याचे. तेथे माझे काय आहे ? समर्थ–पंचायतनातील केशवस्वामी हैदराबादकरांनी म्हटल्याप्रमाणे–

सागराच्या अंगावरी । सागर क्रीडा करी ।
नेणोनी तया लहरी । म्हणिजे कैसे? ।।
वन्हीचिया ज्वाळा । वन्हीवरी सोज्ज्वळा ।
तैसे भेदासी वेगळा । ठाव कैसा? ।।

कराड
चैत्र शु।। १ शके १८९५

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

# प्रकाशकाचे नम्र निवेदन

श्री सद्गुरु समर्थ रामदासांनी अत्यंत बिकट परिस्थितीत महाराष्ट्राच्या धर्मसंस्थापनेसाठी आपले संपूर्ण जीवन चंदनाप्रमाणे झिजविले. देशाच्या उद्धारात धर्माचा, संस्कृतीचा व लोकसंग्रही भक्तिमार्गाचा तरणोपाय आहे याची ज्वलंत जाणीव स्वामींनी आबालवृद्धास दिली. प्रपंच-परमार्थाचे समन्वयात्मक मार्गदर्शन स्वामींनी केले. राष्ट्राची अस्मिता जिवंत केली. प्रथम लोकजागृति, लोकसंग्रह आणि रामोपासनेने लोककल्याणाचे कार्य स्वामींनी केले. म्हणूनच समर्थांचे विस्मरण म्हणजे महाराष्ट्राचे मरण असे समर्थ-वाग्देवता-मंदिराचे संस्थापक कै. शंकर श्रीकृष्ण देव म्हणत असत. "श्री समर्थांचे स्मरण हेच राष्ट्राचे जीवन." "सांगण्यापेक्षा केले बरे व मागण्यापेक्षा मेले बरे" अशी शिकवण देणाऱ्या श्री समर्थ रामदासांचे साकल्याने स्मरण व्हावयास समर्थांचे जीवनकार्य, त्यांनी संस्थापिलेला धारकरी सांप्रदाय, त्याचे ऐतिहासिक, ऐहिक आणि आध्यात्मिक महत्त्व, त्यासाठी लागणारी पात्रतासिद्धी यांचा एकजिनसी सम्यग् आदर्श तरुण मंडळींच्या पुढे ठेवणाऱ्या एका सुटसुटित ग्रंथाची निकड आज कित्येक वर्षे भासत आहे. म्हणून समर्थ सांप्रदायाच्या सूत्रावलीप्रमाणे–

"पहिले ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।१।। चवथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।।"

असा ग्रंथ तयार व्हावा आणि त्या समर्थांच्या वागीश्वरीचाही उद्बोधक पाठ वाचकाना घडावा म्हणून महाराष्ट्रात व दिल्ली-मद्रास सारख्याही ठिकाणी समर्थ साहित्याच्या प्रबोधक प्रवचनानी समर्थ हृदय उकलून दाखविणारे कऱ्हाडचे पद्मश्री श्री. पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांस समर्थ-सम्यग् दर्शनाचे पुस्तक तयार करण्यास सांगितले. ते त्यांनी "श्रीराम-समर्थ" या सुटसुटित पण अर्थसंपन्न अभिधानाने तयार केले. त्याचे प्रकाशन करण्याचे चाफळ श्रीराम देवस्थान विश्वस्त मंडळाने ठरवून जनताजनार्दनाच्या सेवेस सादर केले आहे.

या प्रकाशनाच्या कामी सातारा आनंद मुद्रणालयाचे संचालक श्री. अनंतराव कुलकर्णी व त्यांचा कर्मचारी वर्ग, समर्थ-सेवा-मंडळ, सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे कलाकार शिक्षक, मावळा वितरक इ. अनेक संस्थांचे व व्यक्तींचे सहकार, सहानुभूति आणि सहाय्य लाभले आहे. त्याच्याबद्दल हार्दिक आभार मानतो. पण लेखकाप्रमाणेच त्यांचे व स्वत: प्रकाशक चाफळ श्रीराम देवस्थान विश्वस्त मंडळ यांचे समाधान या अल्पमोली, सुटसुटित पण प्रबोधनप्रेरक पुस्तकाचा अभ्यास नवोदितानी करण्यात व स्फूर्ति घेऊन उत्कट- भव्य कर्तृत्वाची वाटचाल केलेली पाहण्यातच आहे.

सातारा
चैत्र शुद्ध ९ शके १८९५

रा. ना. गोडबोले
मॅनेजिंग ट्रस्टी

# अंतरंग

श्रीसमर्थ रामदास आणि त्यांची रामोपासना ही समाजाच्या रसरशीत जीवनासाठीच होती. नेटका संसार करावा आणि रोकडा मोक्ष साधावा असा समर्थसंप्रदायाचा तेजस्वी उपदेश असून प्रयत्नपुरुषार्थ हा त्याचा कस आहे. त्या समर्थ संप्रदायातील श्रीराम–आत्माराम–कसा आकळावा त्यासाठी स्वतः समर्थ–रामदासानी काय काय साधना केल्या, अवघड होउ न घालता, प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ करण्यासाठी, कोणती दीक्षा समर्थांनी समाजास दिली, समर्थांचे ब्राह्मण्यरक्षण आणि सत्ताचे राजकारण काय होते, "कैपक्षी परमार्थी राजा" हवा म्हणून श्री छत्रपति शिवरायाचे रामराज्य व्हावे अशी आकांक्षा समर्थांनी कशी धरली आणि शिवराज्याभिषेक होताच समर्थांच्या संप्रदायाचे व जीवनाचे आनंद–वनभुवन कसे झाले, आणि हे सर्व होत असता समर्थ व त्यांचा संप्रदाय "रामकथा ब्रह्मांड भेदून पैल्याड न्यावी" यात कसा रममाण होता, याचा हा संदर्भ–ग्रंथ.

**श्रीराम** पृ. १ ते ५

श्रीविष्णूचा सातवा अवतार "देवा सोडविता दाशरथी राम" १; राम म्हणजे ब्रह्म १; शान्ति प्रवृत्ति २; छांदोग्याची सांगी ३; श्रीरामतत्त्व सगुण–निर्गुणोपासनेचा सहकार–समन्वय ४; राम सर्वांगे सुंदर ५.

**समर्थ** पृ. ६ ते ४०

पूर्वज ६; बालपण १०; नवरा पळाला १२; रामकृपेचा साक्षात्कार १३; तीर्थाटण १५; सर्वाभूतांचे हृदय नाथ त्याचे रामराय १७; तीर्थयात्रेतील आढळ १९; संचार २२; यावनी सत्तेची फांदी तोडली २५; रक्षिता देव देवांचा । त्याचा उत्साव मांडला २६; शिवकल्याण राजा ३१; चढतीवाढती पदवी ३३; अखेर ३८.

**संप्रदायाची तीर्थे** पृ. ४१ ते ५७

जांब ४१; चाफळ ४४; शिंगणवाडी, शिवथरघळ ५०; परळी ( सज्जन–गड ) ५१; अकरा मारुति ५७.

**समर्थपंचक** पृ. ५८ ते ६०

मराठा म्हणजे जो स्वधर्म व स्वदेश यास ओळखतो व त्याची एकनिष्ठपणाने सेवा करतो ५८; विचारवंताच्या जिव्हाळ्याने लोकसंग्रहकर्त्यास पाळावे लागते

५९; जयरामस्वामी वडगावकर व केशवस्वामी भागानगरकर, ब्रह्मनाळचे आनंद-मूर्ति, निगडीचे रंगनाथस्वामी ५९-६०.

**समर्थसंप्रदाय** पृ. ६१ ते ९९

समर्थ संप्रदायाचा शब्दार्थ ६१; संप्रदायाचे नाम रहस्य ६२; समर्थांचे कार्य ६३; संप्रदायाच्या उदयाची पार्श्वभूमि ६४; समर्थांचे परिस्थिति-परीक्षण ६७; समर्थांचे लक्ष्य-रामराज्य ६९; भागवतधर्मान्तर्गत स्वरूपसंप्रदाय ७३; आदिमठ आणि गुरुपरंपरा ७५; रामोपासनेतील पुरोगामी ७६; संप्रदायाच्या सिद्धान्ताची बैठक ७८; सिद्धान्त आणि साधना ८३; रोकडचा सामर्थ्याचा प्रभावी प्रत्यय ९२; समर्थांचे सहगामी आणि अनुगामी ९७.

**समर्थांचे ठळक शिष्य** पृ. १०० ते १०२

कल्याणस्वामी, वासुदेवस्वामी, दिनकरस्वामी, भोळाराम, आण्णाप्पा १००; आक्काबाई, वेणाबाई, अंबिकाबाई, आत्माराम महाराज, नरसोबा १०१.

**समर्थसाहित्याचे स्वरूप** पृ. १०३ ते १२३

ग्रंथसंख्या ( २६३४९ ) १२३; दासबोध १०६; मनोबोध ११३; आत्माराम ११४; आनंदवनभुवनी ११५; सोलीव सुख ११९.

**संप्रदायाची नित्यनैमित्तिके** पृ. १२४ ते १४१

वर्तायाची सूत्रचाळिशी १२४; उपासकासि सूचना। उपासना उपासना १३१; दासबोध पारायण १३२; चाफळ व सज्जनगडावरील दैनिक उपासना १३४; सायंकाळी १३७.

**ब्राह्मण्य रक्षावे आदरे** पृ. १४२ ते १४८

रामाची महति १४२; देशातील लोकांचे एकसंस्कृतीकरण १४४; ब्राह्मण्य रक्षणे येरागबाळाचे काम नव्हे १४५; तोच खरा ब्राह्मण १४६; जो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ॥ १४८.

**रामदासांचे राजकारण** पृ. १४९ ते १७७

राजा कालस्य कारणम् १४९; म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिवसांचे माजले बंड १५०; इतिहास असा घडला १५१; शिवाजी व रामजी १५३; परमार्थी कैपक्षी राजा निर्माण करावयाचा १५५; "घालूनि अकलेचा पवाड। व्हावे ब्रह्मांडाहून जाड ॥" १५६; सामर्थ्य आहे चळवळीचे । १५९; तुझा तू वाढवी राजा १६०; महीमंडळी लोक नाना मुशीचे १६२; महाराष्ट्रधर्म राहिला काही । शिवाजी-करता ॥ १६३; अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संहार ॥ १६५; समया-सारखा समयो ये ना । १६७; विजयादशमीस चाफळ देवालयास सनद १६७;

संभाजी राजाना पत्र १६८; स्वप्नी जे देखिले रात्री। ते ते तैसेचि होतसे ॥ १७०; समर्थांपाशी बहुत जन। राहिले पाहिजे साभिमान ॥ १७३; कोठेच पडेना दृष्टी। ठायी ठायी त्याच्या गोष्टी १७५; रामदासांचे अपेक्षित रामराज्य १७६; युद्ध करावे खणखणाटें। सीमा सांडोनिया ॥ १७७.

**समर्थ व शिवाजी महाराज** पृ. १७८ ते १८२

आदिलशाहीच्या सत्ताविहारात अकरा मारुतींची स्थापना १७८; कुबडीतीर्थ १७९; तटलेले राजकारण मोकळे केले १७९; "पुढील भविष्यार्थी मन रहाटोचि नये ॥" १८०; उदंड करावे परी गुप्तरूपे १८१; विद्येच्या प्रगतिसाठी परितोष १८१; "देवद्रोहियांचा नाशचि आहे। समुद्रतीरस्थांचा नाशचि आहे॥" १८२

**प्रबोधन** पृ. १८३ ते १९०

विश्व उद्धरीन हेळामात्रे १८३; स्वतःच्या जीवनाचे रामदासांनी केलेले समालोचन १८४; षड्विकारांचाही सदुपयोग १८५; बडा राष्ट्रीय संघटक १८५; जाणोनि पाहिजेत सर्व १८७; देवा बोले। भक्ता लागे १८८; रामाच्या नावाने प्रत्येक उद्योग करणे, सर्व यशापयश रामाला अर्पण करणे १९०.

**प्रार्थना** पृ. १९०–१९२

श्रीरामाची १९०; श्री मारुतीची १९०; श्रीसमर्थांचा धावा १९१; रे. डेमिंगोचे दृष्टिकोनातून १९२.

# श्रीराम

हा विष्णूचा सातवा अवतार अयोध्येचा राजा सूर्यवंशीय दशरथ राजा व राणी कौसल्या यांच्या पोटी आलेला पहिला सुपुत्र जो राम, त्या ऐतिहासिक पुरुषाला मानतात. रावणाच्या बंदीखान्यात पडलेल्या देवाना सोडविण्यात रामाने यश मिळवून रावणाचे जिंकलेले लंका राज्य रामाने रावणाचा सात्विक भाऊ बिभीषण यांच्या स्वाधीन केले, हा इतिहास आहे. रामाची ऐतिहासिक कामगिरी एवढी मोठी झाली की लोक रामाला प्रत्यक्ष देव मानू लागले. त्याचबरोबर वरील इतिहास घडण्यापूर्वीही राम हा शब्द परमेश्वर म्हणून प्रचलित होताच.

" आद्यो रा तत्पदार्थः स्वान्मकारस्त्वं पदार्थवान् ।
तयोः संयोजनमसीत्यात्मतत्त्वविदो विदुः ।। "

आनंद रामायण ५।१२–१३

अर्थात् 'राम' शब्द तू ते म्हणजे ब्रह्म, आत्मा, परमात्मा आहेस, या महावाक्याचा द्योतक आहे. भारतातील सर्व दिशांच्या महाभागानी श्रीरामचरित्राचा आदर्श आपल्यापुढे व जगापुढे ठेवला आहे. उत्तरेत गुरुगोविन्दसिंगानी रामकथा गायिली; पूर्वेकडे 'कृत्तिवास' रामायण लोकप्रिय आहे; महाराष्ट्रात भावार्थ–रामायण लोकप्रिय आहे तर हिंदीत गोस्वामींचे कम्बरामायण भक्तिरसाने ओथंबलेले आहे. रामाचा कर्तृत्वपुरुषार्थ सगळ्या भारताच्या एकजिनसीपणाचा दिमाख आहे.

" रमन्ते योगिनो ऽ नन्ते नित्यानन्दे चिदात्मनि ।
इति रामपदेनासौ एवं ब्रह्माभिधीयते ।। "

रामपूर्वतापिनी उपनिषद १।६

रघुकुलात अवतीर्ण झालेल्या भारतीय महापुरुषाला राम म्हणतात. राम शब्दाने परब्रह्माचेच उद्बोधन होते. कारण योगीजन ज्या अनंत, चिन्मय, नित्यानंदमय तत्त्वात दंग होऊन जातात, तोच राम होय. भारतीय संस्कृति त्यागमय आहे. जीवनाचे प्रत्येक पाऊल गति तर आहेच पण यात्राही आहे. जीवनात वाटचास आलेला भोग हा त्यागाची एक पायरी आहे. त्यातूनच आत्मसमर्पणाची तयारी

होते. कारण गतिमान जीवनात समाजसन्मुख होऊन भोग भोगावयाचे तरी त्याच्या अधिकारातूनच कर्तव्य आणि कर्तव्याच्या पालनातूनच अधिकार प्राप्त होत असतो. दाशरथी रामाचे शुद्ध संस्कारातून विकासलेले जीवन हे कर्तव्याधिकारांचे मर्यादा–पुरुषोत्तम तत्त्वच आहे आणि ते भारताच्या इतिहासाचा आदर्श आहे. ऋग्वेदात अनेक देवतांचे उल्लेख असले तरी अग्नि, सूर्य आणि इंद्र या तीन देवतांची महती फार आहे. या तीनही देवता परब्रह्माची तीन प्रतीके आहेत. श्रीरामचरितमानसा–मध्ये तुलसीदासानी श्रीरामाला परब्रह्म म्हणून कितीतरी ठिकाणी संबोधिलेले आहे. महर्षि कृष्णद्वैपायन वेदव्यासानी म्हटले आहे की जेथे तत्त्व, जीवन आणि तत्त्वप्रचार अपूर्व गोडीने समरस आहेत, तेथेच 'पुरुषोत्तम' प्रतीत होतो. पुरुषोत्तम स्वतःच्या जीवनातील गोडीत रममाण तर असतोच, पण वर ती गोडी लोकानाही चाखवितो. "अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।" असे गीतेचे वचन आहे. वैदिक ब्रह्म ऐहिक जीवनात भरून उरले आहे आणि आपल्या लीलेने व्यक्तिमात्राला आपले जीवन विकसित करण्याची संधि देते व स्वतःत व्यक्तिमात्रास सामावून जाण्याची संधि उत्पन्न करते. तसेच जो मनुष्य समाजाच्या ऐहिक जीवनात आपले चरित्र करीत असतो, तोच त्या ब्रह्माधिष्ठाना–मुळे, (परमेश्वराधिष्ठानामुळे) पुरुषोत्तम ठरत असतो. कारण ती जीवनकला एरागबाळाचे काम नव्हेच ! रामायणाचा यशोधर श्रीराम त्या कसानेच पुरुषोत्तम आहे.

श्रीरामाच्या स्वभावातील स्थायी भाव "शान्ति–प्रवृत्ति" हा होता. अनन्य–साधारण आत्मसंयमन व धैर्य हे त्या शान्तिप्रवृत्तीचे प्राणापान होते. "सर्वेषामेव शौचानामर्थशौचं परमं स्मृतम् ।" म्हणजे आपल्या ध्येयातील, पैशांच्या व्यवहारातील किंवा कोणतीही गोष्ट बोलण्या करण्याच्या मागील हेतूतील निर्मळतेबद्दल जागरूक-पणे दक्षता घेतली जाई. कारण या तीनही गोष्टीतील शुद्धता संशयातीत असणे आवश्यकपणे सर्वांत मोठी शुद्धता हे राम कधीच विसरला नव्हता. या शुद्धतेमुळेच दाशरथी रामाला ईश्वरावतारच मानतात. ईश्वराचे सर्वमान्य स्वरूप प्रणव ऊर्फ ॐ आहे. सामवेदीय छान्दोग्योपनिषदात प्रणवाची उद्‌गीथ उपासना अशी आहे–

ॐ अथ खलु य उद्‌गीथः स प्रणवो, यः प्रणवः स उद्‌गीथ इत्यसौ वा आदित्य उद्‌गीथ एष प्रणव ओमिति ह्येष स्वरन्नेति। (प्र. १, ख. ५, मं. १)

आता, खात्रीने जो उद्‌गीथ आहे, तो प्रणव आहे; जो प्रणव आहे तो उद्‌गीथ आहे; किंवा उद्‌गीथच आदित्य आहे वा प्रणव आहे. त्याचा उच्चार ॐ रूपानेच होतो. ॐकारालाच प्रणव म्हणतात, कारण ब्रह्मोपासना ॐकाराच्या उच्चारानेच होत असते. सामवेदात उपासनेचा क्रम गायनाने होतो. त्यालाच उद्‌गीथ म्हणतात.

उपनिषदात प्रणवाच्या चार तर व्यवहारात सात मात्रा मानतात. अकार, उकार, मकार, अनुस्वार, ध्वनि, नाद, शान्ति अशी त्यांची नावे होत. पहिल्या तीन मात्रानी प्रणवाचे स्थूल रूप तयार होते. तो वैखरी वाणीचा विषय आहे.

अनुस्वार आणि ध्वनि प्रणवाचे सूक्ष्म रूप प्रगट करतात. तो मध्यमा वाणीचा विषय आहे. नाद प्रणवाचे कारण अथवा अध्यात्मरूप आहे. तो पश्यंती वाणीचा विषय आहे. शान्ति निराकार, निर्गुण अर्थात् तत्त्वस्वरूप आहे. तो परा वाणीचा विषय आहे. वाणी चार स्वरूपांची असते. वाग्रूपा वैखरी, संकल्परूपा मध्यमा, ज्ञानरूपा पश्यन्ती व चिच्छक्तिरूपा परा. या सातही मात्रा क्रमानुसार अर्थात् भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्यम् या सात लोकाशी संबंध राखत असतात. अकाराने स्थूल स्वरूपाचा आरंभ, उकाराने त्याचा विकास आणि मकाराने पूर्णत्व प्रगट होते.


प्रथम शब्द तयार होतो व त्याचे स्वरूप ॐकारासारखेच असते. शब्द बंद झाला की अनुस्वार आणि त्याच अनुसंधानात ध्वनि तसाच नाद यांचे ज्ञान होते. जसजसा शब्दाचा लय होत जातो, तसतसा सातही मात्रांचा अनुभव आल्याशिवाय रहात नाही. शेवटी शब्दाचा लय होता होताच शान्ति होते. तीच सप्तम मात्रेचे रूप होय. 'काशा' ची घंटा वाजवताना हा अनुभव जसा येत असतो, तसाच प्रकार मुमुक्षूच्या शान्तिसाठी ॐ कार योजनेत करणे जरूर आहे. जेथे शब्दाचा लय व्हावयाचा, तेथेच परब्रह्म असते. अशा प्रकारे ब्रह्मवाचक प्रणवाची योजना म्हणजेच त्याची उद्गीथ उपासना होय. ( ब्रह्मविद्योपनिषद् १२, १३ पहा )

छांदोग्य ( प्र. १ खं. ३ मं. ६ ) सांगते की अढळ निश्चयाने उद्गीथाच्या अक्षरांची उपासना करावयास हवी. प्राण म्हणजे उत्. कारण प्राणामुळेच ध्वनि आणि नाद उठत असतात. गी म्हणजे वाणी. त्यामुळेच वाणीला गिरा हा दुसरा प्रतिशब्द तयार झाला. थ म्हणजे अन्न. कारण "अन्नात् भवन्ति भूतानि।" अस्तित्वात येणाऱ्या सर्व चिजा अन्नापासूनच होतात. उघडच प्रणवाचे गायन प्राण, वाणी व अन्न यांच्या सहकार-समन्वयानेच होते. अन्नाने शरीरात सामर्थ्य येते. सामर्थ्याने वाणी उमटते आणि प्राणाच्या सामर्थ्यावर गायन होत असते. छांदोग्य ( प्र. १ खं. मं. ७) सांगून टाकते की वरील प्रकारानेच (अ) द्यौ हे उत् आहे, अंतरिक्ष गी आहे व थ पृथ्वी आहे. (आ) आदित्य उत् आहे. वायु गी आहे आणि अग्नि थ आहे. (इ) सामवेद उत् आहे, यजुर्वेद गी आहे व ऋग्वेद थ होय. वाणीस्वरूप गाईची जपस्वरूप धार काढून, ब्रह्मज्ञानस्वरूप जे दूध मिळते त्यालाच उद्गीथ मधील अक्षरांची उपासना विद्वान् लोक म्हणत असतात. आता तत्त्वानुसार "राम" मधील र् अग्नितत्वाचे अक्षर आहे ते "उद्गीथ" मधील थ होय; "राम" मधील आ वायुस्वरूप अक्षर आहे, ते "उद्गीथ" मधील गी होय; आणि "राम" मधील म सूर्य आहे, तो 'उद्गीथ' मधील उत् होय. म्हणून राम हाच ॐकार होय. वेदातील ऋक्-साम हे प्रणवाचेच रूप आहे. म्हणून उच्चारशास्त्राप्रमाणे ॐकाराच्या सात मात्राप्रमाणेच "राम" शब्दाचा जप 'उद्गीथ' च्या उपासनेप्रमाणेच भेदान्तर आहे.

नामरूपात्मक अशा आपण रहात असलेल्या दृश्यमान् जगताच्या अंतःस्थित आपली आनंदशक्ति, ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति यांच्या जोमावर जे चैतन्य

'रमण' होऊन राहिले आहे, त्यालाच सन्त–महात्म्यानी "राम" शब्दाने संबोधिले आहे. व्याकरणशास्त्रात 'रमु क्रीडायाम्' या धातूपासून राम शब्दाची निष्पत्ति झाली आहे. वैदिक वाङ्मयात त्यास परब्रह्म म्हणतात. त्याचे प्रबोधन राम शब्दाने होते हे वर येऊन गेलेच आहे. वैदिक धर्माच्या आणि तदुद्भूत धर्मशाखांच्या सांप्रदायात रामनामजपाचा एकमेव उपाय सार्वमताने संचलित आहे. "समुद्रे सर्व तीर्थे" जशी असतात, तशीच परमात्म्याच्या नामजपात सर्वसाधनांचे बीज आहे याबद्दल कोठेही कोण्या विद्वानाचे दुमत नाही. कबीर, दादू, नानक, प्रभृति संतानी श्रीराम तत्त्वाचे स्वरूप निर्गुण, निराकार प्रतिपादिले आहे. नादबिन्दु–कलातील परमतत्त्व श्रीरामाच्या प्राप्तीचे साधनही त्यानी प्राधान्येकरून योगसाधना हेच ठसविले आहे. कुंडलिनीशक्तीच्या उत्थानाने षट्चक्र–भेदन झाल्यावर गुरुतत्त्वाच्या सहाय्याने रामतत्त्वाची प्राप्ती करून घेतो तेव्हाच जीव कृतकृत्य होतो, असे ते अनुभवाने आग्रहपूर्वक सांगतात.


परमतत्त्व म्हणजेच श्रीरामतत्त्व सगुण आहे की निर्गुण आहे या वादाच्या खोलात येथे शिरण्याचे कारण नाही. समर्थ रामदास म्हणून महाराष्ट्रात जे थोर प्रपंचपरमार्थाच्या सहकार–समन्वयाने जीवनिकेचा उपदेश करणारे आणि "मरावे परी कीर्तिरूपे उरावे।" असा व्यवहारशुद्ध मार्ग दाखविणारे चैतन्योपासक होऊन गेले, ते सगुण–निर्गुणोपासनांचे सहकार–समन्वयी होते आणि त्या आपल्या विवेकी पंथाच्या जोरावरच त्यानी महाराष्ट्रातील व भारतातील जनसामान्याला रसरशीत जीवनाची दीक्षा दिली. समर्थ रामदासासारखे सगुणोपासक मृत्यूवर मात करून निर्गुण उपासनेने अमृत अथवा मोक्ष प्राप्त करीत असतात, इतिहास घडवितात आणि परंपरा निर्माण करून इतिहासाला सातत्य आणतात. यासाठीच सगुण–निर्गुणोपासनांचा समन्वय हाच सर्वांच्या आटोक्यातील ठरेल, ठरतो व ठरला. वैष्णव–भावावर भर देऊन अत्यंत प्रेमास्पद सगुणस्वरूप राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न अशा चतुर्विध मूर्तीत परब्रह्म अवतरले आणि रामायणाचा इतिहास घडला. ज्ञानशक्ति तशीच क्रियाशक्ति याना प्राधान्य देऊन श्रीराम–तत्त्वाचा अवतार झाला, त्याचाच आविष्कार वाल्मीकिने रामायणात सविस्तर केला. दैनंदिन व्यवहारात मनुष्याने कसे वागावे हे रामानिमित्ताने बिनचूक सांगून टाकण्यात वाल्मीकिने काही कसूर ठेवली नाही. माता, पिता, गुरु, आचार्य, स्नेही, शत्रु, सेवक, अंकित, प्रजानन यांच्याशी रामाची वागणूक वर्णन करण्यात वाल्मीकिने आपले सगळे काव्य–कौशल्य खर्ची घातले आहे. साधूंचे परित्राण आणि दुष्कृतांचा विनाश करून माणुसकीचा धर्म आणि लोकांचे स्वास्थ्य निर्धास्त झाल्यावर जिंकलेली राज्यलक्ष्मी सात्विक सांभाळणाराकडे सोपविण्याचे औदार्य दाशरथी रामाने दाखविले. तसेच वानरादि वन्य जनातदेखील स्वताबद्दल जिव्हाळा निर्माण करून मारुतिसारखे साहसी, बुद्धिमंत, सेवासमर्पक सत्पुरुष आपले अनुचरही ऐतिहासिक अयोध्यानाथ रामचंद्राने संग्रहित केले. "प्रजानां विनयाधानाद् रक्षणाद् भरणादपि।" त्यांचा वत्सल पिता होऊन "आराधनाय लोकानां जानकीमपि मुञ्चतो नास्ति मे व्यथा।।" म्हणणारा रामराजा




श्रीसमर्थ रामदास



श्रीराम-चाफळ



श्रीराम-सज्जनगड



श्रीसमर्थ-समाधि सज्जनगड

समर्थ रामदासांच्या डोळ्यापुढे श्रीराम परमात्म्या-इतकाच, ( राम हे कुलदैवत व वीस पिढ्यांची रामोपासना कुटुंबात चालल्यामुळे,) खास असेल. म्हणूनच सगुण-निर्गुणोपासनांच्या समन्वय-सहकारा-प्रमाणेच प्रपंच-परमार्थाचाही सहकार-समन्वय घालून स्वताचा सांप्रदाय समर्थांनी उभारला. "रामो द्विभिर्न भाषते।" असे प्रभु रामचंद्राच्या प्रतिज्ञेने रामायण भरून राहिले. तेच मांगल्याचे प्रदान वाल्मीकीची दिव्य प्रतिभा शतकानुशतके भारताला करीत राहिली. त्यानंतर उत्तरेत तुलसीदासानी "राम-चरितमानस" लिहून "रघुकुलरीति सदा चलि आई। प्राण जाय पर वचन नहिं जाई" ही ललकार दिली. "समस्तामधे श्रेष्ट " असलेली "राघवाची कथा" समर्थांनी महाराष्ट्राला सांगून पुनरुत्थानाचा संदेश दिला आणि "रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी।" असा आग्रह धरला. त्याच्या अगोदर महाराष्ट्र महोदयाचे अग्रदूत एकनाथ यानी भावार्थ-रामायण लिहून "बया दार उघड।" अशी हाक जगन्मातेला आपल्या भारुडात दिलीच होती. आपले कुलदैवत म्हणून समर्थांची रामभक्ती सुरू होऊन भावस्पर्शी कोमलतेने -

निमासुर सुहास्यवदन । माणिक्यकीळा झळकती दर्शन ।।
अधर सुरंग बोलता निडन्य । उपमा प्रवाळाची ।।
चरणी वाकी तोडर गर्जती । पाउल मांडीवरी पैक क्षिती
तेथे रामदासाची वसती । कदा वियोग न साहे ।। २ ।।

सांगणारे रामदास-

राम सर्वांगे सुंदरू । राम करुणेचा सागरू ।
दीन अनाथांचा उद्धारू । येक श्रीराम कर्ता ।। ३ ।।

अशी ग्वाही देतात आणि आश्वासितात की-

"श्रीराम जयराम जयजयराम । ऐसा काही एक धरुनी नेम ।
जप कीजे तेणे आत्माराम । जोडेल नेमे ।। ४ ।।

हे भक्तांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारे, आश्वासन देणारे श्री समर्थरामदास स्वामी महाराष्ट्रात इसवीच्या सतराव्या शतकात महाराष्ट्राचा इतिहास करून गेले. त्या इतिहासाचा वारसा महाराष्ट्राला, भारताला आणि मान-वजातीला एवढा मोलाचा वाटतो की उत्तर भारतात गोस्वामी रामाला गुसाई म्हणत असता लोक जसे गोस्वामीनाच गुसाई म्हणू लागले, तसेच श्रीराम प्रभूला रामदास "समर्थ" म्हणत तर तेच गौरवपद लोकमताने रामदास्वामींच्या नावाशी कायमचे निगडित करून ठेवले आहे. म्हणून समर्थ रामदासांच्या चरित्रतीर्थाचा लोभ अपारच होतो.

• • •

# समर्थ

## पूर्वज

नवव्या शतकाच्या अखेरीस राज्यक्रांति व दुष्काळ यांच्या त्रासामुळे बेदर प्रांतातील कृष्णाजीपंत ठोसर हे शके ८८४ दुंदुभिनाम संवत्सरी गोदातीरी हिवरे तर्फ प्रांत तालुके खेड, ( बीड ) येथे कुटुंबासुद्धा येऊन राहिले. ते ऋग्वेदी, देशस्थ ब्राह्मण. त्यांचे गोत्र जमदग्नि, सूत्र आश्वलायन असून, ईश्वरभक्तित ते काळ घालवीत. पुढे एकवीस पिढचा ही त्यांची परंपरा चालू राहिली. कृष्णाजीपंतांना कच, राघव, हरि, आत्माराम हे चार पुत्र बेदर प्रांतीच झाले होते. पाचवा पुत्र दशरथ ते गोदातीरी आल्याबर झाला. पहिल्या चार पुत्रानी राक्षसभुवन, हिवरे वगैरे ४८ गावी वसाहत केली व तेथील हिस्सा ते दशरथ प्रौढ झाल्यावर त्यास देत होते. पण दशरथाने तो न घेता, "असुदे अन्न सेवू नये। वडिलांचेही" या बाण्याने वडगाव ऊर्फ पांढरी गावास मुक्काम केला व तेथील लखमाजी गवळचास पाटीलकी देऊन कुलकर्ण व जोसकी तो स्वतः चालवू लागला. कसबे जांब, पोरवरी, हतगाव, निंब, साकळगाव, सुरमेगाव, मारगड-गव्हान, पाटोदे, सोडगाव, अंतरवेल, आसनगाव, गिरगव्हाण अशी बारा गावे आपल्या वैष्णवी ब्रीदाने त्याने स्थापन केली. शके ९१० सर्वधारी नामसंवत्सरे मध्ये पांढरी गावाचे नाव जाम्ब असे पडले व तेथेच दशरथपंत येऊन राहिले. दशरथपंतापासून जांब येथे कुळाचार पाळून अतिथि-अभ्यागतांचा व दीनदुबळयांचा परामर्श घेण्यात आपल्या मनाची श्रीमंती व निस्पृहवृत्तीची प्रतिष्ठा यावनी सत्तेच्या धुमाफुळीचे कठीण काळातही सांभाळणारी ठोसरांची वंशावळ अशी :- कृष्णाजीपंत, २ दशरथपंत ३ रामाजीपंत ४ हरिपंत ५ निरंजन ऊर्फ निराजीपंत ६ शिवाजीपंत ७ विष्णुपंत ८ बामणाजी ऊर्फ ब्रह्माजी ९ गणेशपंत १० धोंडोपंत ११ आत्माराम ऊर्फ अलक्षपंत १२ गुंडोपंत १३ निराजीपंत १४ आत्मारामपंत १५ शिवाजीपंत १६ विष्णुपंत १७ केशवपंत, १८ रामाजीपंत १९ भवानजीपंत २० सूर्याजीपंत २१ त्र्यंबकपंत २२ सूर्याजीपंत. यापैकी बारावे पुरुष गुंडोपंत यानी दक्षिण प्रांतात मुसलमानी रियासतीत आंबड प्रांती पाच गावी कुलकर्ण संपादिले होते.

त्याचप्रमाणे १४ वे पुरुष आत्मारामपंत यानी पाच गावची वृत्ति संपादून आपल्या उपाध्यायास दिली होती ५ वे पुरुष निरंजन, ८ वे बामणाजीपंत व ११ वे अलक्षपंत हे तिघे ब्रह्मनिष्ठ व ब्रह्मवेत्ते होते.

२२ वे पुरुष सूर्याजीपंत यांचा जन्म जांब येथे शके १४९० साली झाला. लहानपणीच वडिल वारले. तरी पूर्व पद्धतीप्रमाणे त्यांचे शिक्षण झाले- बाराव्या वर्षापासून ते सूर्योपासना करू लागले; बाराशे नमस्कार घालीत; कुलदैवत श्रीरामाची पूजाअर्चा करीत; रामनवमीचा उत्सव करीत. उदरनिर्वाहाच्या बृत्तीचे काम रात्रौ फुरसतीने सारीत आणि जनकाप्रमाणे निष्कामवृत्तीने नेटका प्रपंच करीत. त्याना साजेशीच त्यांची धर्मपत्नी राणूबाई होती. मुसलमानी रियासतीत

"कितेक अनाचारी पडली । कितेक यातिभ्रष्ट झाली ।
कितेक ते आक्रंदली । मुलेबाळे ।।१।।
कितेकी विषे घेतली । कितेक जळी बुडाली ।
जाळली ना पुरली । किती एक ।।२।।
प्राणिमात्र झाले दुःखी । पाहता कोणी नाही सुखी ।
कठीण काळी ओळखी । धरीना कोणी ।।३।। "

किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीति । पिछाडेचि बांधोनि हिरोनि नेती ।।
कितीएक धाडविरी धाडी येती । तया सैनिकांचेनि संहार होती ।।१।।
किती एक ते धान्य लूटोनि नेती । कितीयेक ते पूरिले अर्थ नेती ।।
किती पूरिली सर्व पात्रेचि नेती । किती एक ते प्राण-कर्णेचि घेती ।।२।।

अशी कठीण सुलतानी झाली तरी ठोसरदम्पतीची देवाराधना अखंडपणे चालूच होती. अखेर शके १५२५ शोभकृन्नाम संवत्सरी माघ शुद्ध सप्तमीस, त्यांची तपश्चर्या सफल झाली. त्यांना एका सूर्यासारख्या तेजस्वी ब्राह्मणाने आशीर्वाद दिला की "तुम्हाला दोन पुत्र होतील. एक वंशधर व दुसरा जगदुद्धारक"

शके १५२६ क्रोधीनाम संवत्सरी जांब येथे श्रीराम-उत्सव सुरू असता, अष्टमीचे रात्रौ सूर्याजोपंत कीर्तनास बसले असता, वेसकर चावडीवर बोलवावयास आला. तेव्हा ताबेदारीची वृत्तिच नको, म्हणून त्यानी रामचरणी लेखणी वाहिली. आणि ? श्रीराम-जयराम-जयजयराम या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप सुरू केला. आपली गुरुपरंपरा तुकाराम महाराजांना सांगत असता, सूर्याजीपंतांचे द्वितीय पुत्र नारोबा ऊर्फ सन्त रामदास यानो त्या गोष्टीचा उल्लेख केला. त्याचे वर्णन असे-

नमो अधिष्ठाता विष्णु मुख्य साधु । तेयूनिया बोधू विधीलागी ।। १ ।।
विधिपासूनिया ज्ञान विधिसुतां । तेचि ज्ञान प्राप्त वशिष्ठासी ।। २ ।।
वशिष्ठे उपदेश केला रामचंद्रा । तोचि महारुद्रा हनुमन्ता ।। ३ ।।
हनुमन्त कलीमाजी चिरंजीव । झाले सर्व देव बौद्धरूप ।।४।।

बौद्ध नारायण होवोनि बैसला । उपाव बोलिला व्यासमुनी ॥ ५ ॥
व्यासमुनी बोले भविष्यपुराण । जग उद्धरणे कलीमाजी ॥ ६ ॥
कलीमाजी गोदातीरी पुण्यक्षेत्र । तेथे वातपुत्र अवतरे ॥ ७ ॥
अवतरे अभिधानी रामदास । कृष्णातीरी वास जगदुद्धारा ॥ ८ ॥
जगदुद्धारासाठी श्रीरामा साकडे । केले वाडेकोडे भक्तिपंथे ॥ ९ ॥
भक्तिपंथ केला मोठा श्रीरामाने । जंबू अभिधाने ग्राम तेथे ॥१०॥
तेथे ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण । सूर्य नामा जाण द्विजवर्य ॥११॥
द्विजवर्य सूर्य जैसा तपोधन । अद्‌भूत विधान झाले तेथे ॥१२॥
झाली रामनौमी मध्य अष्टमीसी । अर्ध रात्री त्यासी दूत आले ॥१३॥
दूत आले पुढे घालोनि चालिले । महाद्वारा आले भीम जेथे ॥१४॥
भीमदेवालयी नेउनी तयासी । तेथे उभयतासी देखियेले ॥१५॥
देखियेले राजपुत्र सूर्यवंशी । झांपड नेत्रासी पडे तेव्हा ॥१६॥
पडे तेव्हा जैसा दंडवत भूमी । मग अंतर्यामी बोलाविले ॥१७॥
बोलवूनि माथा ठेवी सव्य पाणी । मंत्र सांगे कर्णी रामनाम ॥१८॥
नाम सांगुनिया ताम्रमूर्ति रम्य । पट्टाभिश्रीराम दिधला तया ॥१९॥
तया दिधला वर तुज पुत्र होतील । ध्वज उभारतील रामदास्ये ॥२०॥
रामदास्य झाले धन्य वंशोद्धार । बोलोनी सत्वर गैब झाले ॥२१॥
झाला रामनौमी महोत्सव थोर । मध्यान्ही सत्वर जन्म झाला ॥२२॥
राघवाची भक्ति सुखाची विश्रांति । पितयाची शान्ति झाली पुढे ॥२३॥
पुढे ज्येष्ठ बन्धु न सांगेचि काही । सुखे देवालयी निद्रा केली ॥२४॥
निद्रा केली तेथे श्रीरामे उठवूनी । तोचि मंत्र कानी सांगितला ॥२५॥

सूर्याजीपंतानी रामचरणी अर्पण केलेले कलमदान सज्जनगडावर पहावयास सापडते.

शके १५२७ विश्वावसुसंवत्सरी मार्गशीर्ष शु॥१३ स सूर्याजीपंत ठोसरांना पहिला मुलगा झाला. राणूबाईनी त्याचे नाव गंगाधर ठेवले. त्या त्याच्याकडे सूर्योपासनेचा प्रसाद म्हणून पहात. पुढे शके १५३० मध्ये चैत्र शु॥ नवमीस राणूबाईना दुसरे पुत्ररत्न झाले. तो प्रभु रामचंद्राचा प्रसाद असे त्या मानीत. या दुसऱ्या मुलाचे नाव नारायण ऊर्फ नारोबा. हीच दोन भावंडे पुढे श्रेष्ठ ऊर्फ रामीरामदास आणि समर्थ रामदास स्वामी या नावानी जगाला परिचित झाली.

गंगाधर सूर्याजी ठोसर ऊर्फ श्रेष्ठ यांची मुज शके १५३२ त झाली. त्यांचा विवाहही शके १५३४ त झाला. त्यांची पत्नी आंबेडकर देशमुखांची कन्या. तिचे नाव पार्वतीबाई. श्रेष्ठाना प्रभु रामचंद्रांचा अनुग्रह शके १५३६ साली फाल्गुन

एकादशीस झाला. श. १५३७ सवत्सनामसंवत्सरी मार्गशीर्ष शु॥ ९मीला सूर्याजीपंत ठोसरांचा काळ झाला. त्यायोगे श्रेष्ठावर कुटुंबाची जबाबदारी अल्पवयातच पडली. ती त्यानी मातोश्री राणूबाईच्या सांगीने यथायोग्य पार पाडली. सत्वशील व सदाचारसंपन्न गृहस्थाश्रमातील या संतांची योग्यता त्यांचे धाकटे बन्धु समर्थ रामदास जाणून होते. ते आपल्या पत्रात श्रेष्ठाना लिहितात–

सकळ तीर्थांचे माहेर। सकळ गुणांचे भांडार।
सकळ विद्येचा सागर। स्वरूप तुमचे ॥१॥

तुह्मी धीरपणे मेरु। उदारपणे जलधरु।
गंभीरपणे सागरू। पीयुषाचा ॥२॥

पवित्रपणे वैश्वानरु। समर्थपणे ईश्वरू।
प्रतापाचा दिनकरू। धगधगायमान ॥३॥

विमल ब्रह्मपरायण। सकल भक्तिसंरक्षण।
विशेष वैराग्य–लक्षण। तुमचे ठायी ॥४॥

दक्षता आणि चातुर्यता। व्युत्पन्नता आणि लीनता।
उत्तम गुण सर्वज्ञता। तुमचे ठायी ॥५॥

श्रेष्ठांचे 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' हे दोन सुप्रसिद्ध ग्रंथ असून पहिल्यात नामस्मरणाचा महिमा उत्कटत्वाने आढळतो.

"निरंतर अवर्षण। क्षुधाभये पीडी जन।
तस्करभये कंपायमान। नीतिसंरक्षण तै कैचे? ॥७३–४८॥
श्रीराम जयराम, जयजयराम। अखंड स्मरे जो सप्रेम।
तो स्वयेचि असे पुरुषोत्तम। ह्मणोनि राम न विसरावा ॥११–८८॥"

असे त्यांचे वास्तववादी वर्णन व सुगमोपाय आहे. श्रेष्ठ भाविकाना अनुग्रह देत. त्यांच्या अनुग्रहितापैकी शेवली प्रांतातील एका अधिकाऱ्याकडे आग्रहावरून लग्नसमारंभाकरता श्रेष्ठ गेले होते. तेथून परत येताना वाटेत दहिफळ बुद्रुक येथे प्रकृति बिघडून श्रेष्ठानी श. १५९९ पिंगल–नाम संवत्सरात फाल्गुन कृ. १३स देह ठेवला.

दहिफळ जांब पासून उत्तर दिशेस अदमासे वीस कोस आहे. श्रेष्ठांच्या अंत–काळी त्यांचे चिरंजीव रामचंद्रबुवा जवळ होते.त्यानी पत्र पाठवून आपल्या मातोश्री पार्वतीबाई व बन्धु शामजी याना बोलवून घेतले. पार्वतीबाई अमावास्येदिवशी सती गेल्या. दहिफळ गावाबाहेर एक मैलावर खंदारे पाटलांच्या शेतात श्रेष्ठांचे समाधि-वृंदावन आहे. समाधीस निजामसंस्थानातून ८० रुपयांचे वर्षासन असे.

## बालपण

शके १५३० साली कीलकनाम संवत्सरी चैत्र शुद्ध नवमीदिवशी श्रीराम-जन्माचेवेळी राणूबाईना दुसरा पुत्र झाला.


" (सूर्याजी) पंत परम हरुषले । आजि द्वितीयपुत्र- सौख्य देखिले ।
याचकाहाती निज कोठार लुटविले । सुखी केले दरिद्रचा ।। "

(श्रीरामदास-कथा-सारामृत)

नंतर विद्वान ज्योतिषाकडून या पुत्राची म्हणजे नारायणाची कुंडली तयार झाली ती अशी-

चैत्र शुद्ध नवम्यां तिथौ इंदुवासरे सूर्योदयात् गतघटी
१५ पळे ७, सौ. राणूबाई पुत्रं प्रासूत ।. शुभंभवतु. ।

**जन्मकुंडली**




नारायण आजानुबाहु होता. त्याची कुंडली मांडून ज्योतिषि हर्षभराने म्हणाला "आत्माराम महर्दशेत ६६ वर्षे हनुमान अंतर्दशा लागली आहे."

नारायणाचा जन्म झाला त्यावेळी गिरीधर म्हणतात-

" जांबुवंती नामे रामराजधानी । आरामे शोभती चक्रध्वनि ।
उभय सरिता जेवी जनस्थानी । पंचवाटिका विराजे ।।
नगरीत श्रीमंत चारी वर्ण । विद्या- तपशौच्यादि गुणे ब्राह्मणवर्ण ।
ग्रामस्थ वर्तती प्रसंगमाने । पर्जन्य वर्षति यथाकाळी ।। "

अशी समाजस्थिति होती. मातबर ग्रामव्यवस्थेच्या या गावी रामोत्सवात राणूबाईचे बंधु भानाजीपंत गोसावी आसनगावकर कीर्तन करीत. ते सन्त एकनाथाचे

शिष्य. नारायणाच्या जन्मसाली फाल्गुन वद्य षष्ठीस जनार्दनस्वामींच्या पुण्यतिथीस भानाजीपंतानी सूर्याजीपंताना सहकुटुंब सहपरिवार पैठणास नेले. नारायणास शके १५२१ साली समाधिस्थ झालेल्या एकनाथांच्या पादस्थळी ठेवण्यात आल्यावर पुजारी उद्गारला–"नाथांचे कार्य हा शेवटास नेईल." एकनाथांनी आपल्या उतारवयात "भावार्थ–रामायण" लिहावयास घेतले होते. ते 'सुंदर कांड' व 'युद्धकांड' लिहून नारायणाने म्हणजे समर्थ रामदासानी पूर्ण–हेतू केले, असा इतिहास आहे.

नारायणाची प्रकृति निरोगी व सशक्त होती. तो मोठा होऊ लागला. तो कधी रडत नसे. चपळपणे उड्या मारीत जाई. त्याच्या खोड्या वाढू लागल्या. अवघड झाडाच्या शेंड्यावर जाऊन बाळ बसू लागले! जेवणाची गोडी बेताचीच, पण दुधाचा चटका. चिंचा, बोरे, जांभळे, आंबे वगैरे फळावर प्रेम फार. त्याच्या वयाला पाच वर्षे पूर्ण होताच सूर्याजीपंतानी त्याची मुंज केली व शाळेत घातले. जांबेतील पंतोजीचे भांडवल त्याने लवकरच संपविले.

"अकरा धड्यात केले धुळाक्षर । अकरा प्रहरात वळिले अक्षर ।
अकरा दिवसे केला जमाखर्च सुंदर । ब्रह्मांड कुलकर्ण चालवावया ।।"

त्याचबरोबर पुरुषसूक्त, रुद्र, वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ, रूपावली, समासचक्र यांचाही अभ्यास नारायणाने केला. "जिभेत शारदा हृदयी गणेंद्र । वाटे वस्तीस घातले ।" एवढेच नव्हे तर गोट्या खेळण्यात तो पटाईत होता. आणि तालीम केल्याने धान्याची मोटच्या मोट उचलू शके.

सूर्याजीपंतांच्या निधनानंतर गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ घर–कारभार पहात. नारा–यण त्यात मुळीच लक्ष घालीत नसे. तेव्हा एकदा राणूबाई म्हणाल्या– "गंगाधर संसार चालवतो, लोक त्याला श्रेष्ठ म्हणतात. तू काही काळजी घे" त्यावर होकार देऊन नारायणाची स्वारी जी गेली ती रात्र झाली तरी कोणास दिसली नाही. राणूबाई काही जिन्नस हुडकावयास अडगळीच्या खोलीत गेल्या. तर तेथे नारायण! आईने विचारले "काय करतोस रे नारोबा येथे?" उत्तर आले– "चिंता करतो विश्वाची।"

अशी ही विलक्षण मूर्ति एक दिवशी श्रेष्ठाकडे जाऊन अनुग्रह मागू लागली. "अजून अवकाश आहे." असे श्रेष्ठानी म्हणताच, नारायण त्यावेळच्या श्रावणझडीत गावातील मारुतीचे देवळात जाऊन त्याला कौल लावून बसला. त्यातच त्याची तंद्री लागली. तंद्रीने श्रीरामप्रभूचे दर्शन होऊन त्यानी त्रयोदशाक्षरी मंत्र नारायणास दिला आणि त्याचे नाव "रामदास" ठेवले. श. १५३८ नवलनाम संवत्सरी श्रावण शुद्ध अष्टमीस रात्रौ हे घडले. रुसून गेलेल्या नारायणाला हुडकत श्रेष्ठ व राणूबाई आल्या, तेव्हा मारुतिच्या प्रदक्षिणेचे वाटेवर त्यास नारायण सापडला! तेव्हा श्रीरामाच्या अनुग्रहाची हकीकत ऐकून सर्वांनाच आचंबा वाटला, यात नवल काय?

## नवरा पळाला

नारोबाचे चित्त घरी लागण्याचा एक उपाय राणूबाईना सुचला. तो म्हणजे त्याच्या लग्नाचा. या भानगडीत पडण्यात अर्थ नाही, असे श्रेष्ठानी आईस परो–परीने सांगितले. कारण नारोबांची ऊर्फ रामदासाची मनोमन साक्ष श्रेष्ठाना पटली होती. पण आईला ते पटेना. ती वधू–संशोधन करू लागली. नारोबांच्या मित्राना तो एक चेष्टेचा विषय झाला. प्रथम प्रथम वर-वधू-संशोधनाच्या कटकटी टाळण्या-साठी नारायणराव झाडावर चढून बसू लागले. वाड्यातील लोक बोलवावयास आले असता, एकदा नारायणरावानी झाडावरून नदीत उडी झोकली. कपाळास टेंगूळ आले. तरी स्वारी खबदाडात दडून बसली. शेवटी श्रेष्ठानी येऊन हाक मारली तेव्हा नारायणराव बाहेर आले. घरी आणताच आई म्हणाली– "चिंता करतो विश्वाची" म्हणतोस त्या तुझ्या विश्वात आई नाही वसत, होय रे ?" मग नारायणरावांनी नवीनच युक्ति काढली. कोणी त्याना पहावयास आले, तर नारायणराव गप्प बसत. ती मंडळी परत जात असता, त्याना निरोप देताना, दारात त्याना निक्षून सांगत की "आम्हास आश्रम करणे नाही।" राणुबाईनी मग एकदा नारायणरावाना एकटे गाठले. म्हणाल्या– "नारोबा, मी सांगेन ते तू ऐकणार नाहीस का ? 'न मातुः परदैवतम्।' हे तुला ठाऊक आहे ना ?"

"आज्ञा प्रमाण." नारायणराव म्हणाले.

"लग्नाच्या गोष्टी निघाल्यावर चाळे करू नको. अंतःपट धरीपर्यंत तरी मी सांगेन तसा वाग." नारायणरावानी कबूली दिली.

मग आसनगावच्या भानाजीपंत बोधलेकरांची कन्या वधू ठरली. नारायण–रावासारखा एकनाथांचे कार्य पुरे करणारा जावई आपणास लाभतो हा भानाजीबोवांचा आनंद होता.

शके १५४२ च्या ( सन १६२० ) "फाल्गुन मासी शुद्ध अष्टमी। एकादश घटका द्वितीय यामी। सुमुहूर्त काळ नेमून धामी । घटिका स्थापिली जळात।।" आणि ?

"द्विज 'सावधान' ऐसे सर्वत्र विवाह–मंगली म्हणती। ते एक रामदासे आयकिले, त्या सदा असो प्रणती।।" रामदास म्हणजे नारायणराव "सारासार विचारून। तेचि संधि साधुन। फडकले तेथून। विप्र म्हणती ॐ।।" आणि उपनिषदातील नचिकेतसप्रमाणे नारायणास श्रद्धा उत्पन्न झाली. नारायणरावानी सूंबाल्या केला तो आसनगावाहून सहा मैलावरील गोदा–तटाकी एका अश्वत्थाचे झाडावर निबिड व अवघड जागेत ते दबा धरून बसले. इकडे वधूचे लग्न दुसऱ्याच वराशी लावून, आप्त मंडळी नारायणरावाच्या शोधास लागली. राणूबाईना रडता

डोळे थोडे झाले. पण तीन दिवस शोध करूनही पत्ता नाही. नारायणराव गोदावरीत उडी टाकून पैलपार झाले होते. ते नाशिक पंचवटीच्या मार्गास लागले ते अकरा दिवसानी तेथे पोहोचले

" गोडी लागली रामी, न गुंतत कामी हो ।। धृ ।।
कनकमंदिरे सांडुनि सुंदरे विजन सेवियले ।
त्यजुनि सुंदरी, बसविली दरी चरण भावियले ।।१।।
शुक–सनकादिक, नारद, तुंबर, आर्यभादि मुनिराज ।
दास उदासिन होऊनि विचरति सांडुनि राजसमाज ।।२।। "

पंचवटीस पोहोचेपर्यंत नारायणरावाचे हाल काय विचारावे ? नेसूचे धोतर व उपरणे यांच्याशिवाय अंगावर फक्त जानवे ! तरीही मारुतिस्मरण करीत करीत पंचवटीस गेल्यावर, रामनवमीच्या उत्सवाची गर्दी व धांदल चाललेली त्याना आढळली. त्यातून वाट काढून,

" दृढत्वे मिठी घातली श्रीचरण–कमळी ।
एक मुहूर्त मानसपूजा संपूर्ण केली ।
उठोनी सप्रेमे डोळां जव देखिली ।
तव ब्रह्मगोळी परिपूर्ण श्रीराम पूजिला ।। "

आणि आळवले की–

" उदासीन हे वृत्ति जीवी धरावी । अती आदरे सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गाता । रघूनायका मागणे हेचि आता ।। "

## रामकृपेचा साक्षात्कार

नाशकापासून पूर्वेस टाकळी हे गाव असून तेथे गोदावरी व नंदिनी यांचा संगम आहे. तेथे नारायणराव ऊर्फ रामदास गेले व एका गुहेत राहू लागले. संगमावर स्नान करून तेरा कोटी त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करावयाचा संकल्प रामदासानी माघ शु।। ७ शके १५४२ रौद्र नाम संवत्सरी केला होता. तो त्यानी नित्य कर्मे सूर्योदयापूर्वीच आटोपून, दोन प्रहरपर्यंत कमरेइतक्या पाण्यात उभे राहून तडीस नेण्यास सुरवात केली. पायास, कमरेस मासे डसत तरी ते आपल्या निश्चयावर ध्रुव होते. जपानंतर ब्रह्मयज्ञ करून ते पंचवटीत मधुकरी मागत. रघुपतीस नैवेद्य अर्पण केल्यावर गुहेत भोजन करीत. तिसरे प्रहरी पंचवटीत पुराण–श्रवणास जात, व सायंकाळचे आन्हिक आटोपल्यावर रात्रौ गुहेत विश्रांती घेत. हा नित्यक्रम बारा वर्षे चालला. या अवधीत त्यानी वेदवेदांत, रामायण–महाभारत, गीता–भागवतादि ग्रंथांचा कसून अभ्यास केला. शके १५४४ मध्ये तर वाल्मीकि

रामायण त्यानी स्वहस्ते लिहून काढले. पुढे पुढे रामोत्सवात पंचवटीमध्ये ते प्रवचनेही करू लागले.

रामदासांच्या अल्पवयातील अशा जीवनावर लोकांची टीका कमी होत नसे. रामदासच सांगतात–

" विषयाची सोयरी प्रपंचाची सखी। मिळोनी एकमेकी करिती मात ॥१॥
यासी काय झाले धडचि का बिघडले ?। बयेवीण लागले देवपिसे ॥२॥
देव काय आम्हा सकलापासी नसे ? । जनावेगळे कैसे भजन याचे ?॥ ३॥
हे आधीचि विषय-संसारा उबगले। पुरुषार्थे सांडवले अहंतेच्या ॥४॥
यासी कोणी मोहाचे वडिलधारे नाही। म्हणवुनी हा हे छंद करी ॥५॥
न करवे म्हणुनी त्यजिला विषयधंदा। जल्पतसे सदा रामनाम ॥६॥
रामी रामदास पिसळले माय। म्हणूनी मोकळी धाय विषयजनु ॥७॥

लोककुचेष्टांचे हे टोलनाके जीवनाच्या प्रारंभकाळात कोणत्या महापुरुषाला भरावे लागले नाही ?

रामदासांच्या तप:साधनेला तीन वर्षे झाली. श. १५४५ च्या रुधिरोद्गार संवत्सरी वैशाख शु॥ १० ला रामदासांना रामाचा साक्षात्कार अगदी अनपेक्षित–पणे झाला. नित्यक्रमाप्रमाणे रामदास संगमावर जप संपवून ब्रह्मयज्ञ करीत बसले होते. तेथे एका तरुण सुवासिनीने येऊन नमस्कार केला. रामदासानी 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला. तेव्हा अन्नपूर्णाबाईनी पृच्छा केली की "या जन्मी की पुढच्या ?" रामदास चमकले. तेव्हा अन्नपूर्णाबाईंच्या बरोबर आलेल्या मंडळीनी सांगितले– "टाकळीच्या उत्तरेस दोन मैलावर दशपंचक म्हणून गाव आहे. तेथील तरुण व संपन्न अग्निहोत्री गिरिधरपंत कुलकर्णी क्षयाने पछाडले. औषधोपचारांची शिकस्त करूनही उपयोग झाला नाही. तेव्हा त्यांच्या स्मशान–यात्रेस आम्ही आलो असून सती जाण्यास आलेल्या अन्नपूर्णाबाईनी आपणास वंदना केली आहे."

रामदासानी गिरिधरपंताचा देह जवळ आणण्यास सांगितले. रामप्रभूचे स्मरण करून त्यानी प्रेतावर गंगोदक शिंपडले. लागलीच राम राम म्हणत गिरी–धरपंत झोपेतून उठल्यासारखे उठले. तेव्हा रामदास म्हणाले "बाई, रामकृपेने आणखी दोन पुत्र होतील. तुम्ही दशपुत्रे व्हाल." रामदासांचा आशीर्वाद पुढल्या वर्षापासूनच खरा ठरू लागला. अन्नापर्णाबाईनी पहिला मुलगा होताच, तो राम–दासांच्या चरणी घातला. रामदासानी त्याचे नाव उद्धव ठेवले आणि संगोपनासाठी त्यास आईच्याच स्वाधीन केले.

तेव्हापासून "पराधिकपणे मत्सरू" जो रामदासाविषयी होता तो लोपला. उद्धवाची मुंजही रामदासाकडूनच लावण्यात आली. आपले संकल्पित जप व पुर–श्चरण झाल्यावर रामदासानी तीर्थयात्रेस जाण्याचे ठरविले. तेव्हा त्यांच्या बरोबर

जाण्याचा हट्ट उद्धव करू लागला. तेव्हा त्याच्यासाठी एक गोमयाचा मारुती टाकळीस स्थापून रामदासानी त्याची आराधना करीत बसण्याची आज्ञा उद्धवास केली व तीर्थयात्रेनंतर त्याच्याकडे परत येण्याचे आश्वासन त्यास दिले.

" वैराग्य ज्ञान भरले असता अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्तिकन्या ।।
चौथी तयात वरिली, उरल्या न पाहे ।
तो आमुचा सुसमर्थ, समर्थ आहे ।। "

या रघुनाथ पंडितांच्या वचनाची सार्थकता वरील प्रकारे होत असताच, श. १५५३ साली शहाजी राजे भोसले ंची छावणी नाशकास होती. रामदासांची कीर्ति त्यांच्या कानावर गेल्यामुळे, त्यांची व रामदासांची भेट झाली आणि बाल-शिवाजीच्या लोकविलक्षण वृत्तिकृतींची तोंडओळख रामदासाना झाली. तीर्थ-यात्रेचा बेत करण्यास ती एक प्रेरणा होती.

## तीर्थाटण

नाशिक पंचवटीस राहिलेल्या रामदासानी तीन गायत्रीपुरश्चरणे, तेरा कोटी जप, रामसेवा आणि रामभक्तांचा मित्रसंग्रह केला आणि उद्धवास उपासने-साठी एक प्रतापमारुती स्थापून देऊन रामदास तीर्थाटनास निघाले. उत्तरेकडे हरिद्वार, पूर्वेस जगन्नाथपुरी, पश्चिमेस द्वारका, दक्षिणेस रामेश्वर ही चार धामे तर त्यानी केलीच; अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची अवंतिका या मोक्षदायिका पुरीही त्यानी केल्या. नाशिकहून रामदास प्रथम काशीस गेले व त्रिस्थळी करून येऊन काशीसच काही दिवस राहिले. तेथे हनुमंतघाटावर त्यानी मारुतीची स्थापना केली. " रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी ।। " म्हणून ती कर्तबगारी करणाऱ्या मारुतिरायाचा आदर्श जनसामान्यापुढे ठेवून " शक्ति-युक्ति जये ठायी। तेथे श्रीमंत धावती ।। " हे मारुतिसारखे साध्य करण्याची महत्त्वाकांक्षा जनतेत रुजावी, हा मारुतिस्थापनेत रामदासांचा उद्देश होता.

" पुरी वाहिली सर्व जेणे विमानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी । "

असा नितान्त विश्वास रामदासाना असल्यामुळे अयोध्येस त्यानी अकरा महिने वास्तव्य केले, हे साहजिकच आहे. दशरथाच्या वाड्यातील रामजन्माच्या ठिकाणी राममंदिर होते, ते औरंगझेबाने उध्वस्त करून त्याची मशीद करून टाकली. काशीच्या विश्वेश्वराच्याही देवळाची तीच वाट लावली ( सन १६६९ सप्टेंबर नंतर ) वगैरे इतिहास औरंगझेब बादशहा झाल्यानंतरचा आहे. समर्थ रामदासांच्या यात्रेच्या वेळी तशी त्या क्रूरकर्म्याची करणी झाली नव्हती. म्हणून अयोध्येस मनमुराद राहून समर्थ रामदास यमुनातीरी असलेल्या गोकुळ, वृंदावन,

मथुरा या क्षेत्री आले. तेथून ते प्रभासपट्टणास व द्वारकेस गेले. काशी, द्वारका, मथुरा इत्यादि ठिकणी समर्थांनी आपले मठ स्थापले. कारण वाटेत आणि क्षेत्रा–क्षेत्रात समर्थांना घरठाव सुटलेले लोक आढळत होते. त्याना मार्गी लावण्याची जबाबदारी, "उणे पडू देऊ नये। कोणी एकाचे ॥" हे व्रत घेतलेल्या साधूने नाही घ्यावयाची तर कोणी घ्यावयाची? त्यांच्यासाठी समर्थ रामास प्रार्थ–नाही करीत की–

"बहुतचि सुकुमारा स्वस्थ नाही शरीरा।
निशिदिनी जनि चिंता लागलीसे उदारा।
सकल जन सुखावे तो कसा काळ फावे।
भजन जन उकावे, सर्व आनंद पावे ॥१॥"

ज्या ज्या क्षेत्री समर्थ जात तेथील देवदर्शन घेऊन ते लोकांची स्थिति समजावून घेत. मथुरेस गोकुळअष्टमीस उत्सवाच्या घालमेलीत धोतर नेसून व कपाळावर गंधाचा टिळा लावून मुसलमान अंमलदार मुर्शीदबुद्दीन याने झडप घालून एक सुंदर हिंदु स्त्री पळविली व तिला होडीत घालून तो यमुनापार झाला. त्याने थेट आग्रा गाठला. समर्थांना हे कळल्यावर त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला, व ती घटना अविरोध घडल्याने समाजाला उत्थान कसे दिले पाहिजे, याचा विचार त्यांच्या मनी धर धरू लागला. मने मेलेली, शरीरे दुबळी, प्रतिकार करण्यास मृत्यू येईल म्हणून निराधार जीवन लाचारीने चाललेले, ही समाजातील "असुनि जिवंतहि मेल्याची अवस्था" ऊर्फ (गीतातृतीय अध्यायातील कृष्णसंमत) संकर समर्थांना सहनच होत नव्हता. तो थांबण्यासाठीही त्यानी ठिकठिकाणी मठ–स्थापना सुरू केली.

द्वारकेहून समर्थ श्रीनगरास गेले. तेथे त्यांची व गुरु गोविंदसिंगाची भेट झाली. गुरु गोविंदसिंग घोड्यावर बसून स्वसंरक्षणार्थ व स्वधर्म–संरक्षणार्थ हाती तलवार घेऊन हिंडतात, हे समर्थांना समजल्यावर आपण निदान गुप्तरूपे तसे करावयास हरकत नाही, असे समर्थांनी मनाशी ठरवून "गुप्ती" जवळ बाळग–ण्यास सुरवात केली.

श्रीनगरहून समर्थ बदरीकेदार व केदारेश्वर येथे गेले. तेथून पर्वतेश्वरी ध्यानस्थ बसलेल्या श्वेतमारुतीपर्यंत त्यानी मजल मारली. तेव्हा समर्थांना शैत्य झाले. मारुतिरायाने त्याना टोप, मेखला, वल्कलें, हुर्मुजी वस्त्रे, जपमाळ, खडावा, कुबडी अशा वस्तु दिल्या. श्वेतमारुतिच्या सान्निध्यात समर्थांनी चातुर्मास काढला. मग उत्तरमानसास जाऊन ते पूर्वकडे जगन्नाथपुरीस उतरले. तेथे मठ स्थापून पूर्व समुद्राच्या रोखाने फिरत फिरत समर्थ दक्षिण समुद्रतीरी रामेश्वरास पोहोचले. उत्तरेतील या तीर्थाटणात समर्थांनी स्थापलेले प्रमुख मठ आणि त्यांचे मठाधिपति असे– काशीत रामचंद्र, प्रयागात वेणिमाधव, अंतर्वेदीत हरिश्चंद्र, मथुरेत हरिकृष्ण, अयोध्येत रामकृष्ण, द्वारकेत हरि, बद्रिकेदारात दयाळ, उज्जयनीत गंगाधर,

जगन्नाथपुरीत पद्मनाथ. या सगळ्या मठाधिपतींना समर्थांनी बजावले होते की " सुफी मुसलमान हिंदूना बाटवीत असतात, तर त्यांचा कटोरा जेथे जेथे फिरतो, तेथे तेथे समर्थ शिष्यांनी ' जय जय रघुवीर समर्थ ' हा घोष गर्जविला पाहिजे."

श्रीरामेश्वराचे दर्शन घेऊन समर्थ सेतुबंधास व लंकेस गेले. तेथून आदिरंग मध्यरंग, अंतरंग, भद्रसेन, जनार्दन यांचे दर्शन करून समर्थ गोकर्ण महाबळेश्वरास आले. काही दिवसांच्या मुक्कामानंतर शेषाचलास जाऊन समर्थांनी श्रीव्यंकटेश–दर्शन घेतले. नंतर श्रीशैलमल्लिकार्जुन, महाबळ नरसिह, पानक नरसिह, राचोटी वीरभद्र, पंचमहालिंगे इत्यादी क्षेत्रे समर्थांनी केली. किष्किंधानगरी व पंपासरोवर या ठिकाणी जाऊन ऋष्यमूक पर्वतावरून समर्थ दक्षिण भागातील क्षेत्रे पहात पहात, कार्तिक स्वामींचे दर्शन समर्थांनी केले. त्यानंतर ते दक्षिण काशीस म्हणजे करवीर क्षेत्री उतरले. महालक्ष्मीचा प्रसाद घेऊन परशुराम क्षेत्राचा परामर्श समर्थांनी घेतला. त्यानंतर पश्चिम–मानस क्षेत्रे करून ते महाबळेश्वरावरून पंढरीस हजर झाले. श्री विठ्ठलापुढे उभे राहून समर्थ उद्‌गारले–

येथे उभा का श्रीरामा? । मनमोहन मेघश्यामा ।।१।।
काय केले धनुष्यबाण? । कर कटावरी ठेवुन ।।२।।
काय केली सीतामाई । येथे राही–रखमाई ।।३।।
काय केले वानरदळ? । येथे जमविले गोपाळ ।।४।।
काय केली अयोध्यापुरी? । येथे वसविली पंढरी ।।५।।
काय केली शरयूगंगा? । येथे आणिली चंद्रभागा ।।६।।

"देवा बोले, भक्ता लागे ।।" असे संतांचे बोल असतात. तेव्हा समर्थांच्या या अभंगाचा अर्थ आर्तत्रापपरायण साधूंना चांगलाच समजला. पंढरपुरा–नंतर आदिभीमाशंकर आणि त्र्यंबकेश्वर करून समर्थ पंचवटीस आले व रामदर्शन घेऊन "एकान्ती बोलले बहु ।।."

## सर्वा भूतांचे हृदय । नाम त्याचे रामराय

समर्थांनी तीर्थयात्रेची पूर्ति गोदाप्रदक्षिणेनें करावयाचें ठरविलें. प्रदक्षिणेच्या वाटेवर ते पैठणास आले. त्यांच्याजवळ तिरकामठा पाहून, तो शोभेचा की काय ? असा प्रश्न तेथील ब्राह्मणानी बहुधा कुचाळकीनेच केला. तो चालविता येतो, असे समर्थ म्हणाले. तेव्हा आकाशात उडणाऱ्या घारीकडे बोट करून "पाहू तरी तुमची करामत!" अशी मिष्किली झाली. समर्थांनी घार पाडली. तोच ब्राह्मण म्हणाले "वाहवा रे साधु! छान!! रामदास म्हणविता आणि हत्या करता?"

समर्थांनी मग ब्राम्हणांच्या म्हणण्याप्रमाणे प्रायश्चित्त घेतले. पण विचारले, "घार का उठली नाही? वेदाज्ञा प्रायश्चित घेण्यापुरतीच आहे, हे आश्चर्य आश्चर्यच

आहे!" समर्थांनी मग पडलेली घार हाती घेतली आणि रामाचे नाव घेऊन आकाशात उडविली.

एके रात्रौ पैठणात समर्थांचे कीर्तन चालू असता "कित्येक स्वामीकडे पाहती । ओळखीचा दिसतो म्हणती । भाळीचें आवाळू देखती । म्हणती नारायणच हा ।।१।। गावचा जोशी पहात । तेणे ओळखिले असे म्हणत । हा नारायण सत्य सत्य । पुत्र सूर्याजीपंताचा ।। " आणि कीर्तन संपताच तो समर्थांना भेटून म्हणाला– "तुमच्याबद्दल शोक करून तुमच्या आईचे डोळे गेले. इतक्याजवळ आल्यासारखे तिला भेटा तरी!!" समर्थांनी मान्यता दिली.

समर्थ जांबेस गेले. मारुतीचे दर्शन घेऊन ते श्रेष्ठांच्या अंगणात "जयजय रघुवीर समर्थ" अशी आरोळी देऊन उभे राहिले. तेव्हा गोसाव्याला भिक्षा घाला अशी राणुबाईंची आज्ञा झाली. पार्वतीवहिनी भिक्षा घालण्यास आल्या. समर्थ म्हणाले– 'भिक्षा घेणारा हा गोसावी नव्हे!' आता राणूबाईंनी समर्थांचा आवाज ओळखला. त्या उत्स्फूर्त उद्गारल्या– "कोण? माझा नारोबा का?" "हो." म्हणून समर्थांनी आईच्या चरणी दंडवत केले. माय–लेकरांची कडकडून भेट झाली. दोघांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहिल्या. राणूबाईंनी समर्थांच्या मस्तकाचे अव–ग्रहण केले; तोंडावरून हात फिरवला; समर्थांनीही आईच्या डोळ्यावरून हात फिरवला. आईने मुलाला जीव भरून पाहिले. त्या मुलाला म्हणाल्या–"देशान्तरी फिरून भूतचेष्टा शिकलास होय?" समर्थ हसले, म्हणाले–"मला पछाडणारे भूत सांगू?

होते वैकुंठीच्या कोनी । शिरले अयोध्याभुवनी ।
लागे कौसल्येच्या स्तनी । तेंचि भूत गे माय ।।१।।
जाता कौशिक–रावळी । अवलोभिता भयकाळी ।
ताटिका ते छळोनि मेली । तेंचि भूत गे माय ।।२।।
मार्गी जाता वनांतरी । पाय पडला दगडावरी ।
पाषाणाची झाली नारी । तेंच भूत गे माय ।।३।।
जनकाचे अंगणि गेले । धनु शिवाचे भंगले ।
वैदेही–अंगी संचरले । तेंचि भूत गे माय ।।४।।
जेणे सहस्रार्जुन वधिला । तो ही तत्काळचि भ्याला ।
धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि. ।।५।।
पित्याचे भाकेशी । कैकेयीचें वचनाशी ।
मानुनि गेले वनवासासी । तेंचि. ।।६।।
चौदा संवत्सरे तपासी । अखंड हिंडे वनवासी ।
सांगाते भुजंग पोशी । तेंचि ।।७।।
सुग्रीवाचे पालन । वालीचे निर्दाळण ।
तारि पाण्यावरि पाषाण । तेंचि. ।।८।।

रक्षी मरणी बिभीषण । मारी रावण–कुंभकर्ण ।
तोडी अमरांचे बंधन । तेचि. ॥९॥
वामांगीं स्त्रियेला धरले । धावुनि शरयूतीरा आले ।
तेथे भरतासी भेटले । तेचि. ॥१०॥
सर्व भूतांचे हृदय । नाम त्याचे रामराय ।
रामदास नित्य गाय ॥ तेचि भूत गे माय ॥११॥ ”

देव–घरात श्रेष्ठ पूजा करीत होते. त्यानी मायलेकरांचा संवाद ऐकला. ते बाहेर आले. त्याना समर्थांनी नमस्कार घातला. चोवीस वर्षांचा आपला इतिहास समर्थांनी आईभावास सांगितला. आईला कपिल–गीता समजावली.

मग गोदाप्रदक्षिणा त्यानी पुरी केली व परत टाकळीस आले. तेथे महिना–भर राहिले. “अंतरी कल्पना केली । एकान्ती बोललो बहु ॥ ”. असे त्यानीच सांगितले आहे.

## तीर्थयात्रेतील आढळ

इ. स. ११९३ म्हणजे शके १११५ मध्ये पृथ्वीराजाचा पराभव झाला आणि नंतर काही दशकांच्या कालावधीतच यावनी सत्तेने अप्रतिहत वेगाने सर्वत्र विजय संपादन केले. सर्व हिंदुस्थानभर पारतंत्र्याचा गहन अंधःकार पसरला. तोडरमल–सारखी राजकार्य धुरंधर बुद्धि, राजा मानसिंगासारखे दुर्दमनीय शौर्य, तानसेना–सारखे स्वर्गीय गायन आणि पंडित जगन्नाथरायासारखी अलोट विद्वत्ता आणि मोहक कविता, अशी हिंदूंची सर्व सद्‌गुणमालिका परकीयांची बटीक बनली. उत्तरेत असे चालले होते तरी दक्षिणेकडे ते वारे बरेच दिवस फिरकले नव्हते. तथापि ती सर्व वादळापूर्वीची शान्तता होती, असेच अखेर ठरले.

ज्ञानेश्वरीच्या समाप्तिकाली यदुकुलभूषण श्रीरामचंद्रराव राज्य करीत होता. त्याचा उल्लेख ज्ञानेश्वरानी मोठ्या अभिमानाने ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायाच्या शेवटी केला आहे. परंतु ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर थोड्याच वर्षांनी देवगिरीच्या यादवांचे महाराष्ट्र–साम्राज्य लयास गेले. दिल्लीचा बादशहा जलालुद्दीन खिलजी याचा पुतण्या अल्लाउद्दीन याने श. १२२८ मध्ये देवगिरीवर स्वारी केली व रामरावास कैद करून दिल्लीस नेले. खंडणी व मुलूख देण्याचे रामदेवरावाने कबूल केल्यावर सहा महिन्यांनी रामराव श. १२३१ त आला व वारला. त्यानंतर श. १२३४ पर्यंत चिरंजीव शंकरदेव आणि जावई हरपालदेव यांनी श. १२४० पर्यंत महाराष्ट्रराज्य राखण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने देवगिरीचे राजघराणे व त्यांचे मांडलीक यांच्यामध्ये एकजूट नसल्याने व हेमाद्री–सारखा राजकारणपटु सचिव मरण पावल्याने श. १२४० मध्ये यादवांचे राज्य

लयास गेले. यावर्षी दिल्लीचा सरदार मलककाफूर याने हरपालदेवाचा पराभव करून त्यास हालहाल करून ठार मारले.

परंतु दिल्लीचेही राज्य देवगिरीस फार काल टिकले नाही. तीस वर्षांच्या आतच जाफरखान याच्या महत्त्वाकांक्षी गुलामाने श. १२६९ ( सन १३४७ ) त दक्षिणेत गुलबर्गा येथे स्वतंत्र मुसलमानी राज्याची स्थापना केली. एका ब्राह्मणाने केलेल्या भविष्याप्रमाणे तो राजा झाल्याकारणाने त्याने आपल्या राज्यास " बहामनी " असे नाव दिले. ते राज्य श. १४४८ ( स. १५२६ ) पर्यंत चालले. बहामनी राज्य स्थापन होण्यापूर्वी बारा वर्षे ( श. १२५७, स. १३३५ ) साली राज्यधुरंधर माधवाचार्य यांच्या प्रयत्नाने त्यांचे शिष्य राजपुत्रद्वय हरिहर व बुक यानी विजयानगर येथे स्वतंत्र हिंदु साम्राज्याची स्थापना केली होती. ते श. १४८७ ( स. १५६५ ) पर्यंत टिकले.

बहामनी राज्यात आणि पंधराव्या शतकाच्या शेवटी त्याचे तुकडे होऊन पाच शाह्या झाल्या तरी त्यांच्याही जमान्यात हिंदु देवतांच्या मूर्ति फोडणे, हिंदु स्त्रियांना भ्रष्ट करणे, हिंदूंना जबरीने मुसलमान करणे, ही कृत्ये राजरोस चालू होतीच. महाराष्ट्राचे दुर्दैव असे की, राजस्थानात ज्याप्रमाणे हस्तिनापूरचे स्वराज्य करण्याची राणा संगाने आणून दिलेली संधि पुढील रजपुतानी वाया दवडली, त्याचप्रमाणे कृष्णराव व रामराजा यानी स्वपराक्रमाने आर्य संस्कृतीच्या सर्व दाक्षिणात्याना एक होण्याची व हिंदुसाम्राज्य अनुभविण्याची आणून दिलेली संधि ( स. १५५१ त ) रामराजाचा आदिलशाहीने कपटाने खून केल्यावर त्यांनी वाया दवडली. उत्तरेत जयपूरकरादि रजपूत तसेच दक्षिणेत निंबाळकरादि क्षत्रीय स. १५६० च्या सुमारास मुसलमानी रियासतीत सरदारी मिळविण्याच्या छंदी लागले.

केप ऑफ गुड होपला वळसा घालून आलेले युरोपियनही भारतात कमी धुमाकूळ घालीत नव्हते. पोर्तुगीजानी भारतात मिरची आणली आणि भारतीयांच्या रोजच्या जेवणातील मिरपूड बंद केली, एवढेच नव्हे तर त्यांनी " किती सुंदरा जाहजी फाकविल्या ! " व्यापाराच्या मिषाने आलेल्या या तागडी तुकाप्पानी वखारीसाठी सवलती मिळवून वखारीच्या संरक्षणार्थ तलवार हाती धरली व चालविली आणि मुलूखगिरी करून तख्तेही स्थापन केली. तख्तांच्या आणि तलवारीच्या जोरावर भारताचे ख्रितीकरण करण्याचा व्यूहही त्यांनी रचला. गोव्यामध्ये पोर्तुगीजांची सत्ता स्थापन होताच त्यांनी मिशनऱ्यांच्याकडून पावाचे तुकडे विहिरीतून टाकून गावेच्या गावे तर बाटविलीच ! भरीला असेही हुकूम काढले की–

( 1 ) March 1496, to the Governor of Goa:-

Destroy Idolatory in Goa, pull down temples of Hindoos, prohibit festivals of Hindoos, deport Brahmanas, punish whoso-

ever makes idols of wood, stone or metal and do not give a single post of authority to Hindoos.

( 2 ) 25 th March 1559 order:-

Temples in the city of Goa or nearby should be reduced to ashes, all idols be broken; no private or public festivals ( उत्सव ) be allowed to Hindoos. Hindoos who worship idols in spite of these orders, will be branded traitors.

( 3 ) 4th December 1567

Hindoos should not keep their sacred books in their houses. Those who will not attend Christian sermons, should pay so much fine. Those who cannot pay fine should be whipped on the back.

( 4 ) 25th February 1581

If a Hindoo dies, his estate should go to his convert christian son or some relative who will become christian.

– ( See Os Induse a Republic Portuguese by Antonis de Narosha, High Court Judge in Nova Goa. )

असल्या राजवटीचे जनतेवर झालेल्या परिणामांचा परिचय समर्थ रामदासाना आपल्या तीर्थयात्रेच्या भटकन्तीत फार जवळून झाला आणि त्यांचे चित्त अस्वस्थ झाले, भावना खळबळल्या, मेंदू तापला आणि हात शिवशिवू लागले. पण उतावीळपणे काही करावयास जाऊन डाव अंगावर घ्यावयाचा नव्हता. म्हणून समर्थ रामदास विचारमग्न झाले. आणि ? डॉ. शं. दा. पेंडसे यानी आपल्या ' भागवतोत्तम संत एकनाथ " या ग्रंथाच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे " ज्ञानेश्वरानंतर महाराष्ट्रावर झालेले भयानक परकी आक्रमण केवळ राजकीयच होते ही समजूत बरोबर नाही. ते त्यापेक्षाही भयानक असे धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक आक्रमण होते. ते केवळ बळानेच नव्हे, तर छळाने म्हणजे कपटाने व युक्तीनेही चालले होते. " हे समर्थांच्या मनी रुजून, ते शल्य काढून टाकलेच पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले. कारण, त्यांची श्रुति जागी झाली व इतिहास डोळ्यापुढे चमकू लागला की– इ. स. १३०० मध्ये दिल्लीहून निझामुद्दीन अवलियाच्या सव्वासातशे शिष्यांचा पहिला तांडा दक्षिणेत आला. त्यानंतर १३०९ व १३२४ मध्येही असेच तांडे आले. वेरूळजवळ खुल्दाबाद येथे त्याचे मुख्य ठाणे होते. तेथून सूफीपंथीय मुसलमान पेण–पुणे ते गुलबर्गा–गोवळकोंड्यापर्यंत पसरत गेले. त्यांनी हजारो बावळट हिंदूंना बाटवून मुसलमान केले. कित्येक सूफी साधूंनी देवळांचा, मठांचा व समाधींचा ताबा घेतला, तेथे दर्गे उभारले, तेथे उरूस सुरू झाले. त्यामुळे अवघ्या पन्नास वर्षात लोक यादवांची राजवट विसरून गेले. पुणे, पुरंदर, पैठण, वैजापूर, गंगापूर, कंधार, मंगरूळ, उस्मानाबाद येथील दर्ग्यांचे प्रस्थ अतोनात माजले. तुकोबांचे आजेगुरु राघवचैतन्य यांची आळंद येथील समाधि

लाडले मशायकाचा दर्गा होऊन बसली. गुलबर्गा येथील रेवणसिद्धाचे मंदीर बंदे-नपाझचा दर्गा म्हणून मिरवू लागले. ते मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आक्रमण-धोरणात संपूर्ण सहकारी होते. म्हणूनच समर्थांना "मोडली देवळे बांधावी।" असे स्फुरण झाले व ते "धर्मस्थापनेचे नर" झाले.

## संचार

तीर्थयात्रेतील बारा वर्षांच्या सूक्ष्मनिरीक्षणाने लोकस्थिती सुधारण्याकरता मठ स्थापून संघटना करण्याची व धर्मसंस्थापना करण्याची समर्थांना आवश्यकता वाटली. धर्मस्थापनेसाठी स्वराज्य होण्याची निकड समर्थांना वाटली. शके १५६२ पर्यंत शिवाजी राजे शहाजीराजांच्याकडे कर्नाटकातच होते. तीर्थयात्रेत बंगलोरला गेल्यावर शहाजी राजांची भेट समर्थांनी घेऊन एकान्ती बोलणे केले असेलही ! त्यामुळेच कृष्णातीरी शहाजी राजांच्या देशमुखीचे गावीच जाऊन आपले कार्यक्षेत्र उभारावे, असे समर्थांनी ठरविले. देशातील प्रजेची दुःस्थिति कर्तव्याबद्दलची अनास्था, परसत्तेखाली होणारा अमानुष छळ, त्यामुळे जीवनाला आलेली अवकळा, जनतेला भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, मानखंडना, स्त्रीत्वाची विटंबना, हे सारे पाहून तीर्थयात्रेतच "तळमळ, तळमळ होतचि आहे। हे जन हाति धरी।।" अशी प्रार्थना ते नित्य रामचरणी करीतच होते. राष्ट्राचा घटक म्हणून आपल्यालाही आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे म्हणूनही ते प्रार्थना करीत की- "तू भक्तव-त्सला रामा। बुद्धि दे रघुनायका।।" तेव्हा देवबंधविमोचक रघुनाथाकडूनच त्यांना लोकोद्धाराची प्रेरणा मिळाली. स्वराज्याचे अवशेष कोठे कोठे दऱ्याखोऱ्या-तून व दुर्घट पठारावर दबून होते. प्रकट आचाराचे धैर्य लोपले होते. महाराष्ट्रा-तील सह्याद्रिलगतच्या भागात वारकरी सांप्रदायाने वैदिक संस्कृति धगधगित ठेवली होती. तेव्हा इतर ठिकाणापेक्षा आपले कार्य येथे अधिक फलद्रुप होईल, असे समर्थांच्या मनाने घेतले. आणि "यत्न तो देव जाणावा" ही खंबीर भावना त्यांची झाली. तेव्हा शके १५६६ च्या वैशाखमासी समर्थ कृष्णातीरी आले.

येण्यापूर्वी टाकळीस आपली परंपरा निष्ठेने चालविल्याबद्दल उद्धवास धन्य-वाद त्यांनी दिले आणि योग्यवेळी आपण आपल्या कार्यक्षेत्री तुला बोलावू, असे आश्वासनही समर्थांनी उद्धवास दिले. समर्थ प्रथम महाबळेश्वरी थंड व दाट झाडीच्या ठिकाणी आले. समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उंचीवरील कृष्णेच्या उगमाजवळील प्राचीन स्वयंभू शंकराचे दर्शन घेऊन तेथे चार महिने राहिले. त्या अवधीत तेथे मारुतीची स्थापना करून त्यानी आपला मठही सुरू केला. चातुर्मास्य संपताच त्वरेने समर्थ वाईस उतरले. तेथे पिटके, थिटे, चित्राव वगैरे मंडळींना अनुग्रह देऊन त्यांनी "रोकडोबाचा मारुति" स्थापन केला. वाईहून समर्थ माहुलीस गेले व कृष्णावेण्णा-संगमात स्नान करून त्यानी प्रार्थना केली की-

" जय देवी जय देवी जय माये कृष्णे ।
आलो तुझिया उदरी निरसी मम तृष्णे ।। "

माहुलीहून समर्थ जरंडचास गेले. तेथील पुरातन मारुतीच्या देवळात ते राहिले. या मुक्कामातही ते माहुलीस स्नानास जात. तेव्हा देहूचे तुकाराम, चिंचवडचे देव, वडगावचे जयराम, निगडीचे रंगनाथ, भागापूरचे केशव, ब्रह्मनाळचे आनंदमूर्ती अशी संत मंडळी त्यांना भेटली. त्यातूनच शेवटच्या चार संतासह महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध समर्थपंचक संघटित झाले.

नाशिकपंचवटीतील रामभक्तांच्या जिव्हाळ्यापासून आपण दुरावलो असे समर्थांना वाटू लागले, म्हणून त्यांनी पंचवटीच्या रामोपासकांना पत्र लिहिले की—

" जनस्थान गोदातटी । परमपावन पंचवटी ।
तेथे पडली कृपादृष्टी । रघूत्तमा रामाची ।।१।।
तेथील राम—उपासक । त्यांच्या सेवकांचा सेवक ।
तुम्हामध्ये मी एक रंक । सरते करावे ।।२।।
तुम्ही निकट देवापाशी । आणि मी पडलो दूर देशी ।
कृपाळुपणे रघुनाथासी । माझी करुणा भाकावी ।।३।।
म्हणावे ते अनाथ । समर्था तू दीना नाथ ।
म्हणावे ते पतित । तू पतित—पावनु ।।४।।
म्हणावे ते परम किंकर । देवा तू करुणाकर ।
म्हणावे ते निराधार । आधार इच्छी ।।५।।
सत्य, मिथ्या तुझा म्हणवी । त्याची चिंता असो द्यावी ।
ऐसी करुणा करावी । नाना प्रकारी ।। ६ ।।
तुम्हा दासामध्ये मी हीन । माझे कोटचावधि अवगुण ।
परंतु आहे अनन्य । सेवक रघुनाथाचा ।। ७ ।।
पुढे म्यां ऐसेचि असावे । माझे मत न पालटावे ।
इतुके देवासी मागावे । तुम्ही बन्धुवर्गी ।। ८ ।।
प्रत्यही माझा नमस्कार । देवासि करावा निरंतर ।
मजकारणे शरीर । इतुके कष्टवावें ।। ९ ।।
बालवृद्ध नरनारी । सकळ भक्त कुमार कुमारी ।
समस्तासि नमस्कारी । कृष्णातीरवासी ।। १० ।।
शुद्ध उपासना, विमल ज्ञान । वीतराग आणि ब्राह्मणरक्षण ।
गुरुपरंपरेचे लक्षण । शुद्धमार्ग ।। ११ ।।
ऐसे पंचविधा बोलले । इतुके पाहिजे यत्ने केले ।
म्हणजे सकळही पावले । म्हणे दासानुदास ।। १२ ।। "

माहूलीहून समर्थ कऱ्हाडच्या कृष्णा–कोयनासंगमावर आले. कऱ्हाडपासून पाच मैलावर शहापूरनजीक डोंगर आहे. तेथे समर्थ रहात. संगमावर स्नानसंध्यादि आन्हिक करण्यास येत. दोन प्रहरी मसूर अगर शहापूर येथे कोरडी भिक्षा मागत. वानगे करून श्रीस नैवेद्य केल्यावर जेवत.

समर्थांची भव्य शरीरयष्टि,त्यांच्या चर्येवरील अनुपम तेज,त्यांची वैराग्यशील वृत्ति, भगवी वस्त्रे, "काही ना मागावे कोणासी ।" हा बाणा, स्पष्ट खणखणीत आवेशयुक्त आवाज, "फड नासोचि नेदावा" असे बोलणे, इत्यादि गुणामुळे समर्थांच्या कीर्तनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत. त्यांच्या मनावर ईश्वर–भक्तीचा ठसा उमटवून आपली हीनदीन दशा आपणच सुधारली पाहिजे, अशी प्रेरणा ते लोकास देत. परकीय व परधर्मीय राज्यसत्तेमुळे दुर्दशा उत्पन्न झाल्याचे ते लोकमानसात भरवीत. दक्षिणेत बहामनी राज्याच्या पाच शाखा नांदत होत्या. महाराष्ट्रातील क्षत्रिय सरदार मुसलमानी पातशाह्यांच्या नोकरीत रमले होते. तेथील प्रतिष्ठेसाठी ते आपआपसात झगडत होते. मुसलमानी जुलमाने लोक जिकीरीला आले होते. पण त्यातून बाहेर कसे पडावे याचा मार्गच लोकाना दिसत नव्हता. त्याना कोणाचा तरी आधार हवा होता. शूर–वीर तरुण गावोगावी आढळत होते, त्याना स्वधर्माकरता, देवाकरता, देशाकरता एकत्र व्हावयाचे ते प्राणपणाने व्हावयाचे, हे शिकविणारा कोणीतरी हवा होता. म्हणून समर्थांनी त्यांना जाणीव करून दिली की–

"देवमात्र उच्छेदिला । आपुला स्वधर्म बुडविला ।
जित्यापरीस मृत्यु भला । ऐसे समजावे ॥१॥"

आणि

"देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा का बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठी ॥२॥"

असा ठाम संदेश समर्थांनी घरोघर "भिक्षामिषे लहानथोर परीक्षून" पोहोचविला. कारण समर्थांच्या ठाशीव, अर्थवाही, प्रेरक नि स्फूर्तिप्रद वाणीतच तसे तेज होते. त्यामुळेच

"लोकी लोक वाढविले । तेणे ते अमर्याद जाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ॥"

समर्थांच्या याच क्रमात शहापुराला एक दिवस ते बाजीपंत कुलकर्ण्यांच्या येथे भिक्षेस गेले. "जय जय रघुवीर समर्थ" या त्यांच्या घोषाला साद मिळाली की "भरल्या घरात असे काही अभद्र बोलू नका." समर्थ व साद देणाऱ्या सईबाई यांचा हा क्रम चालूच राहिला. पण एक दिवस बाजीपंताचे घरी वातावरण फारच चिंताग्रस्त दिसले. समर्थांनी चौकशी केली. गावकीच्या हिशोबाकरता बाजीपंतास यावनी सत्तेने विजापुरास धरून नेल्याचे कळले. बाजीपंत सुटल्यास रामोपासनेला लागण्याचे वचन सईबाईकडून मिळताच समर्थांनी अकरा दिवसात

काम होईल, असा निर्वाळा दिला. समर्थांनी विजापूरचा हिशोब भागवून बाजीपंतास ठरल्या दिवशी सोडवून आणले. घरी येताच बाजीपंतानी चौकशी केली,– "कोणाला हिशोब पुरा करण्यास विजापुरास पाठविले होते ?" सईबाईंनी समर्थांच्या आश्वासनाची हकीगत सांगितली. तेव्हा त्यांचे दर्शन झाल्याशिवाय आपण अन्न घेणार नाही, असे म्हणून बाजीपंतांनी तीन दिवस निर्धाराने काढले. चवथे दिवशी समर्थ भिक्षेस आले. त्यांना बाजीपंताकडील सर्व मंडळींनी नमस्कार घातला. सईबाईची निष्ठा पाहून समर्थांनी त्यांना शहापुरास चुन्याचा मारुती स्थापून दिला (शके १५६७). या प्रताप–मारुतीच्या डाव्या बाजूकडील गुहेत समर्थ पुष्कळ वेळा जपानुष्ठानास बसत. जवळच असलेल्या चरेगावचे डोंगरातही समर्थ केव्हा केव्हा मुक्काम ठेवीत. या डोंगरावरून कृष्णा–कोयनांच्या काठचा रम्य प्रदेश निरीक्षिता येतो.

शहापूर–चरेगावकडून समर्थ चाफळ खोऱ्यात उतरले. तेथेही ते डोंगरात असत. डेरवणचे डोंगरघळीत, वाद्यापूरचे सडचावर, भैरवगडचे घळीत, चंद्रगिरीचे डोंगरावर किंवा कळंब्याचे घळीत असे ते रहात. त्यावेळी चाफळखोऱ्यात शिवाजी महाराजातर्फे नरसोमलनाथ अंबरखाने हे मामलेदार होते. त्यानी व चाफळचे आनंदराव देशपांडे आणि भानजी जोशी यांनी समर्थांचा अनुग्रह घेतला. समर्थांनी चाफळास मठ केला.

चाफळहून समर्थ कऱ्हाडास आले. तेथील रुद्राजीपंत देशपांड्याकडे त्यांचे कीर्तन झाल्यावर देशपांड्यांची विधवा कन्या चिमणाबाई उर्फ आक्का हिने समर्थांचा अनुग्रह घेतला. समर्थ पुढे मिरजेस फिरकले. तेथेही देशपांडे–कन्या वेणाबाई समर्थांची शिष्या झाली. त्यानंतर समर्थांनी कोल्हापूर गाठले व महा–लक्ष्मीच्या देवळात कीर्तन केले. कोल्हापूरचे सुभेदार गंगातीरस्थ पाराजीपंत बर्वे यांनी समर्थांस घरी बोलावून त्यांचा अनुग्रह घेतला.

त्यावेळी अंबाजी कृष्णाजी बाभूळगावकर हा एक दहा वर्षांचा मुलगा सम–र्थांच्या नजरेत भरला. झटपट आणि व्यवस्थित, टापटीपीच्या कामाचा तो मुलगा समर्थांनी पाराजीपंतास मागितला. "हा योगभ्रष्ट प्राणी । जन्मोजन्मीचा ।। हा तुझे नाही कामाचा । उपयोगी पडेल आमुच्या । अखंडित ।।" समर्थांचे ते विलक्षण मागणे ऐकून पाराजीपंतांनी आपल्या बहिणीकडे बोट दाखविले. तेव्हा ती म्हणाली "मायलेकरांची तूट का करता ? अंबाजी व दत्ता या दोनही मुलासकट मला पावन करून घ्या." समर्थांनी ते मान्य केले. मग रुक्मिणीबाई आपल्या चिरंजीव दत्तात्रयासह शिरगाव मठात राहिल्या व अंबाजी समर्थांबरोबर हिंडू लागला.

## यावनी सत्तेची फांदी तोडली

शिरगाव येथे मठ स्थापून तेथे दत्तात्रय कृष्णाजी बाभूळगावकर व त्याची आई रखमाबाई यास ठेवल्यावर, समर्थांनी टाकळीस पत्र पाठवून उद्धवास बोलवून

घेतले. त्यास ते अंबाजीप्रमाणेच बरोबर घेऊन हिंडू लागले. शिष्य संप्रदाय वाढत चालला. तेव्हा "देवा सोडवित्या" श्रीरामाच्या सार्वजनिक उत्सवाची आवश्यकता समर्थांना लोकशिक्षणाकरता व संघटनेकरता वाटू लागली. म्हणून मसूरातील ब्रह्मपुरी हा भाग त्यांनी उत्सवासाठी पसंत केला व तेथील कुलकर्णी घराण्यास अनुग्रह देऊन ब्रह्मपुरीत एक मारुती स्थापन केला. शिष्य-मंडळी जमली, उत्सव सुरू झाला. शके १५६७ च्या या पहिल्या सार्वजनिक उत्सवात आनंद व उत्साह ओसंडत होता. पण श्रीची उत्सवमूर्ती रथात बसवून छबिना काढावयाचा तर रथातील सिंहासनाच्या उंच निशाण-काठ्याना वाटेतील यावनी सत्तेच्या आंब्याची एक फांदी आडवी येऊन सरळ अडथळा करणार हे स्पष्ट दिसू लागले. तेव्हा समर्थ सायंसध्येसाठी ओढयावर गेले, ते दुसरे दिवशी सकाळी शहाजी राजांच्या कऱ्हाड येथील कामगाराकडून आदिलशहाची फांदी तोडण्यास हुकूम घेऊन आले!

समर्थांनी अंबाजीस कुऱ्हाड घेऊन फांदी तोडण्यास सांगितले. फांदीच्या शेंड्यावर बसून बुडख्याकडून ती तोडावयाची निश्चित आज्ञा समर्थांनी केली. गुरुची आज्ञा प्रमाण मानून अंबाजीने ती फांदी तोडली. बुंध्यापासून फांदी निसटली ती अंबाजीसह खालच्या विहिरीत पडली! मग सगळे घाबरले, धावाधाव करू लागले. अंबाजीचा मागमूस लागेना, तेव्हा सगळे गोरेमोरे होऊन एकमेकाकडे पाहू लागले. दोन घटका झाल्या तरी अंबाजी वर येत नाही, हे पाहून चिमणा-आक्कांनी समर्थांच्या कानावर सर्व घातले. समर्थ विहिरीजवळ आले. विहिरीत डोकावून म्हणाले- "अंबाजी, कल्याण आहे ना?" त्याबरोबर विहिरीतून उत्तर आले-"सर्व कल्याण आहे." कसाला लागलेल्या अंबाजीच्या गुरुनिष्ठेमुळे येथून पुढे अंबाजीचे नाव कल्याणच रूढ झाले. फांदी तुटल्यानंतर रथाची मिरवणूक निर्विघ्न होऊन उत्सव यथासांग झाला. शहापूरच्या सईबाई मसूरास दर्शनास येत. त्यांच्याबरोबर भिकू नावाचा एक मुलगा येई. तो सईबाईंच्या चुलतभावाचा मुलगा. त्यालाही एक दिवशी समर्थांनी विहिरीत उडी मारण्यास सांगितले. त्याने मारली. तेव्हा त्यास वर काढून समर्थांनी अनुग्रह दिला. हाच पुढे तंजावर मठाधिपति धीमस्वामी झाला.

## रक्षिता देव देवांचा त्याचा उत्साव मांडला

शके १५६६ ते १५७२ चे दरम्यान समर्थांनी शहापूर, मसूर, चाफळ, उंब्रज, माजगाव, शिराळे, बहे बोरगाव, पारगाव व मनपडळे या गावी अकरा मारुती स्थापले. आदिलशाहीच्या ऐन गुहातून समर्थांची ही भीमगर्जना त्या शाहीची आयाळ हाती धरण्यास संधी साधण्याचा पिंजराच होता. (समर्थ-गाथाकार अनंतदास यांचा ग्रंथ पहा.) हिरोजी फर्जंद याने पन्हाळा किल्ला घेतल्यावर

पारगाव येथे रायगडावरून शिवाजी महाराज आले असता पोलादपुरास असलेले समर्थ तेथे एकान्त भेटीसाठी आलेच होते ना?

आता समर्थांच्या मनात पंचवटीतील रामप्रभु कृष्णाखोऱ्यात साक्षात उभा असावा अशी हुरहुर लागून राहिली.

"म्हणे दास हा राम तात्काळ पावे ।
करी संकटी सेवकाचे कुडावे ।
प्रतापेचि ब्रह्मादिका सोडविले ।
महामंडळालागि आनंदविले ॥१॥
बहू जाण उपासना वाढ कीर्ति ।
प्रतापे बळे आगळा धर्ममूर्ति ।
तयाच्या गुणे हे जिणे धन्य झाले ।
बहु सेवकालागि ते येश आले ॥२॥"

म्हणून समर्थ लोकांना आर्जवून सांगत की– "तुझी चिंता हो मानसी । राम शरयूतीरवासी ॥" त्यासाठी रामाचे देवालय उभारून राममूर्ति स्थापण्याचा व तो आदर्श लोकांच्या समोर ठेवण्याचा उद्योग समर्थांनी आरंभला. देवालयासाठी ते जागा शोधू लागले. एकान्ती बोलण्यासारखीही त्या देवालयाची जागा समर्थांना हवी होती. शहापूर व मसूर ही गावे मैदानावरची. तेव्हा चंद्रगिरीवरून निरीक्षण करून ते चाफळास आले.

मांड नदीच्या काठी चाफळवाडी तर्फे नाणेघोळ गाव! लहान गाव, लहान नदी, सभोवती सुंदर वनश्रीने प्रफुल्ल असा डोंगरांचा फेर, तारळखोरे, आणि महाबळेश्वराकडे जाण्यास सोयीस्कर वाटा; दासगड, रामघळ, वाघदरा ही गुह्य ठिकाणे अगदी जवळ. दक्षिणेस पन्हाळा, पश्चिमेस कोयनाखोरे आणि पूर्वबाजूला शिंगणापूर–शिखर एवढा विस्तीर्ण टापू नजरेत येण्याची सोय! म्हणून समर्थ सांप्रदायाच्या मुख्य मठास चाफळचे क्षेत्र योग्य असे समर्थांनी ठरविले.

चाफळच्या चहूबाजूनी सह्याद्रीचा वेढा आहे.

"सभोवती गिरीवर । नाना जाती तरूवर ।
पुष्पवाटिका अपार । मन निवे पाहता ॥
स्थळ पाहता सबळ । नाम साजिरे चाफळ ।
होता कामना सफळ । जिये ठायी राहता ॥
मूळ स्थापना यथार्थ । रामदास कृतार्थ ।
राजा राम तो समर्थ । स्वामी तेथे नांदतो ॥
हा हृदयी केवळ । ऐसे भासती सकळ ।
निरूपमेय महास्थळ । शोक सर्व भंगतो ॥"

चाफळकराना समर्थांनी देवालयासाठी जागा मागितली. त्यानी मांड नदीच्या कुंभार–डोहापलिकडे दक्षिण दिशेस दाट झाडीत असलेली स्मशानाची जागा दिली. समर्थ कामाला लागले. शिष्य जमले. जागा स्वच्छ झाली. स्मशानातील सगळ्या दगडागोटयाना त्यांच्यावरील शेंदरासह समर्थांनी जलसमाधि दिली. पण शेंदूर फासलेला एक भला म्हसोबाचा दगड तसाच टेकडीखाली दक्षिणेस जांभळीच्या झाडाखाली ठेवला जागेचा राखणदार म्हणून! त्याला रामरथाच्या पूर्वदिवशी एक मापटे तांदूळ व एक नारळ व रथाच्या दिवशी श्री परत आलेवर श्रीवरून ओवाळलेला दहीभात देत जाऊ, असा समर्थांनी संकेत ठरवला. तो चालूच आहे. जागा स्वच्छ झाल्यावर बोलता बोलता पाया भरला, चौथरा उभारला, सुतारकाम–गवंडीकाम सुरू झाले. गाभारा झाला, सभामंडप उभारला. रामाच्या देवालयाच्या घुमटाखाली योग–विवरिका व देवालयाखाली तळघर तयार झाले. या दोनही ठिकाणी समर्थ ध्यानास बसत. देवालयामागील प्रताप–मारुती जवळही ते रमत. देवालयाच्या दक्षिणेस समर्थांची पर्णकुटी होती. तेथेच मठ बांधण्यात आला. समर्थांची भिक्षा चालूच होती. नरसोमलनाथ अंबरखाने, आनंदराव देशपांडे, गिरी गोसावी वगैरेकडून द्रव्य–सहाय्य आले. गिरी गोसाव्यानी पुण्यास सुचविल्यावरून शिवाजी महाराजानीही तीनशे होन पावते केले. दादाजी म्हणून सातार्‍यास हुजूरकडे एक कारकून होता, त्याच्या आईने होते नव्हते ते स्त्रीधन कल्याणाच्या स्वाधीन केले. समर्थांच्या हातानी मंदिराच्या विटा रचल्या गेल्या. दिवसा काम, रात्रौ रामनाम अशी या बांधकामाच्या काळात शिस्त होती. पण रामराया मंदिरात केव्हा येणार ?

रंगनाथ स्वामी निगडीकरानी आपल्या वडिलांच्या पुण्यतिथिनिमित्त समर्थांना बोलावले. समर्थ चाफळहून निघाले ते कऱ्हाडमार्गे निगडीस आले. निजानंदस्वामींची पुण्यतिथी झाल्यावर चाफळास परत येताना समर्थांनी रहिमतपूर–नजीक अंगापुरास मुक्काम केला तेथील शिवनाथाचे देवालयात बसून त्यानी रामाचा धावा केला–

"श्रीरामचंद्रा करुणा–समुद्रा। ध्यातो तुझी राजस योगमुद्रा। नेत्री न ये रे तुजवीण निद्रा। कैं भेटसी बा मजला समुद्रा ॥१॥ जया यत्न फावेल तेणे करावा। महोत्सव या राघवाचा भरावा॥ महायत्न देखोनिया काळ धाके। प्रतापे बळे गाजवावे तडाखे ॥२॥ लवे नेत्रपाते स्फुरे आणि बाहे। दिनानाथ हा राम येणार आहे॥ जयाचेनि योगे सुखानंद लोटे। तया देखता अंतरी बाष्प दाटे ॥ ३ ॥

"राघोबा उदारा, ये माझ्या मंदिरा। जानकीच्या वरा। देवराया ॥ १ ॥
प्रेमे स्फुंदताहे उभारुनी बाहे। वाट तुझी पाहे। रामदास ॥ २ ॥

दुसरे दिवशी स्नानास गेले असता, त्याना समजले की अंगापूरच्या कृष्णा–डोहात श्रीराम–मूर्ति आहे. त्यांच्या मनात आले " लळे पाळितो राम आम्हा दिनांचे। कृपासागरु भाव जाणे मनीचे। " आणि त्यानी डोहात बुडी मारली. श्रीरामाची व महिषासुर–मर्दिनीची अशा दोन मूर्ति हाताशी लागल्या. समर्थांनी

त्या झोळीत घातल्या व चाफळचा रस्ता धरला. अंगापूरकराना ते कळले. त्यानी समर्थांची गाठ घेतली. त्याना चरेगावच्या रानात सुखठाण्याच्या खिडीमध्ये गाठले. आपल्या मूर्ति परत मागितल्या. समर्थांनी मूर्ति खाली ठेवल्या. अंगापूरकराना त्यानी सांगितले की आपण मूर्ति गावातून आणलेल्या नाहीत. डोहातून आणलेल्या आहेत. त्या तुम्ही का मागता ? "

गावकरी म्हणाले–" मूर्ति गावात गणपतीच्या देवळात होत्या. मोंगलाई आहे. मूर्ति फुटतील या भीतीने डोहात ठेवल्या होत्या. "

" फिरून देवळात त्या मूर्ति ठेवा. 'देव मस्तकी धरावा ।' तुमच्या मूर्ति तुम्ही खुशाल घेऊन जा " समर्थ ठासून बोलले. सुखठाण्यावर मूर्ति सोडून समर्थ चाफळास गेले सुद्धा. चरेगांवाहून दोन गाडे आणून अंगापूरकरानी मूर्ति उचलण्याचा प्रयत्न केला. पण त्या हालेनात. अंगापूरकरानी आपल्या गावात मूर्ति कोठे ठेवावयाच्या आणि त्यांचे संरक्षण कोणी व कसे करावयाचे याची " भवति न–भवति " केली. एकमत होईना, निर्णय लागेना. यापेक्षा मग समर्थांकडेच त्या मूर्तीची प्रतिष्ठापना व प्रतिष्ठा सोपविलेली काय वाईट ? अशा निर्णयाला येऊन अंगापूरकरानी समर्थांची गाठ घेतली आणि सर्व हकीकत सांगून अंगापूरकराना श्रीराम सेवेत काही कायमची आत्मीयता मिळावी अशी विनंती केली. दरवर्षी रामनवमीच्या उत्सवात बिनीचा मान अंगापूरकराकडे ठेवल्याचे समर्थांनी सांगून भानजी गोसाव्या–हाती सुखठाण्याहून समर्थांनी अंगापूरच्या मूर्ति चाफळास आणवल्या.

देवळात श्रीरामाची मूर्ति यथाशास्त्र स्थापन झाली. शके १५७० सर्वधारी–नाम संवत्सरी रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा झाला.

" भोवती डोंगराचे फेर । मध्ये देवाचे शिखर ।
पुढे मंडप सुंदर । नवखणांचा ।।१।।
चहू खांबावरी रचना । वर त्या चोवीस कमाना ।
कम कटाऊ नयना । समाधाना ।।२।।
नाना तरु, आंबेवने । दोहीकडे वृंदावने ।
वृंदावनी जगज्जीवने । वस्ती केली ।।३।।
पुढे उभा कपी वीर । पूर्वेकडे लंबोदर ।
खाली दाटले तरुवर । ठायी ठायी ।।४।।
दमामे चौघडे वाजती । धडाके भांडयांचे होती ।
फौजा भक्तांच्या साजती । ठायी ठायी ।।५।।
माही मरातबे निशाणे । मेघडंबरे सूर्यपाने ।
पताका, छत्र्या, सुखासने । दिंडया, विंझणे कुंचे ।।६।।
काहळे, कर्णे, बुरुंग बाके । नाना ध्वनि गगन झाके ।
बहु वाद्यांचे धबके । परोपरी ।।७।।

टाळ–मृदंग उपांग । ब्रह्मविणे, चुटक्या, चांग ।
ताने, माने, माजे रंग । हरिकथेसी ॥८॥

घंटा, घांटा, शंख, भेरी । उफडी, पांवे, वाजंतरी ।
भाट गर्जंती नागरी । परोपरी ॥९॥

उदंड यात्रेकरू आले । रंगी हरिदास मिळाले ।
श्रोतेवनो कथा चाले । भगवंताची ॥१०॥

नाना पुष्पमाळा, तुरे । पाहो जाता भडस पूरे ।
रंग स्वर्गीचा उतरे । ठायी ठायी ॥११॥

गंध, सुगंध, केशरे । उदंड उधळिती धूशरे ।
जगदंतरे हरिहरे । वस्ती केली ॥१२॥

दिवटया, हिलाल, चंद्रज्योति । नळे आरडत ऊठती ।
बाण हवया, सरकती । गगनामध्ये ॥ १३ ॥

उदंड मनुष्याचे थाटे । दिसताती लखलखाटे ।
एकमेकासी बोभाटे । बोलाविती ॥ १४ ॥

उदंड उजळिल्या दीपिका । नामघोष करतालिका ।
कित्येक म्हणती ऐका ऐका । ऐसे शब्द होती ॥ १५ ॥

खिरापतीची वाटणी । तेथे झालीसे दाटणी ।
पैस नाही राजांगणी । दाटी जाहली ॥ १६ ॥

रंगमाळा नीरांजने । तेथे वस्ती केली मने ।
दिवस उबावला सुमने । कोमाहली ॥ १७ ॥

रथ देवाचा ओढिला । यात्रेकरा निरोप झाला ।
पुढे जावयाचा गल्बला । ठायी ठायी ॥ १८ ॥

भक्त–जन म्हणती देवा । आता लोभ असो द्यावा ।
धन्य सुकृताचा ठेवा । भक्ती तुझी ॥ १९ ॥

दास डोंगरी राहतो । यात्रा देवाची पाहतो ।
देव भक्तासवे जातो । ध्यानरूप ॥ २० ॥

चाफळच्या पहिल्या उत्सवाच्या या डफगाण्यात चाफळच्या देवालयाचे वर्णन आहे, राम–यात्रेतील लोकस्वभावांचे वर्णन आहे. " उत्सव सतत उत्तम प्रकारे चालावा म्हणून नरसिंगराव अंबरखानी मुद्राधारी, परांजी देशमुख, नागोजीपंत देशकुलकर्णी, नागोजी भावे नाईकवाडी व नाना घोलकर या पांचजणाकडून श्रीचे पुष्पावर हात ठेवून, या अधिष्ठानाची भक्ति–परंपरा करावी, सर्वस्वेसी साहय असावी, कानू–कातुनाती यात्रेत होऊ द्यावी " म्हणून शपथ घेवविली व आपणही घेतली.

शके १५७० सालीच विजापूरचे दिवाण व्यानतेराव यांनी उंब्रज व कोरटी येथील काही जमीन व घोरपडे बाजी राजे यानी चरेगाव, माजगाव येथील काही जमीन चाफळच्या उत्सवास इनाम दिली. चाफळच्या रामाची कीर्ति विजापूर येथील बडे हिंदु अधिकारी व मराठे सरदार यांच्यापर्यंत गेली होती.

## शिवकल्याण राजा

ज्या काळात समर्थ लोकांची मने धर्मरक्षणाकडे वळवित होते, त्याच काळात शहाजी राजे भोसल्यांचे चिरंजीव स्वराज्य स्थापण्याच्या प्रयत्नात होते. ज्या चाफळ खोऱ्यात समर्थ रहात त्या खोऱ्यावर शिवाजी महाराजांचा अंमल होता. शहाजी राजांच्या वतनवाडीतच ते खोरे होते. समर्थ लोकसंग्रही. माणसे गोळा करण्याचा त्याना भारी हव्यास. माणसांची परीक्षा घेऊन त्याना योग्य कामी लावण्याचा छंदच समर्थांना ! त्यांची उपदेशाची पद्धत खणखणित.

“ देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाही ।। ”

शिवाजी राजांच्या कानावर समर्थांच्या धर्मकार्याची व लोकसंग्रहाची कीर्ति नाशिकच्या गिरिधर गोसाव्यामार्फतसुद्धा गेल्याकारणाने समर्थांचे राममंदिर बांधणीस राजानी तीनशे होन पाठविले होतेच. प्रतापगडावर शके १५७१ त असता, राजाना समर्थांची भेट घेण्याची इच्छा झाली व ते चाफळास आले. अंबरखाने यानी राममंदिर वगैरे दाखवल्यावर राजानी ७०० होन अंबरखाने यांच्या सुपूर्त करून देवालयास मांड नदी व हणमंत ओढा यांच्या उपद्रवाचे निवारणार्थ बंधारा घालण्यास सांगितले. कोंडवळीच्या घळीपासून समर्थांचा सगळीकडे शोध केला. पण तपास लागला नाही. तेव्हा प्रतापगडास परतून राजे आपली कामकाजे वाई–महाबळेश्वरापासून पहात पहात माहुली मुक्कामास आले.

इकडे समर्थांनाही शिवाजी राजाना भेटण्याची तळमळ होती. ज्यांच्या वतनवाडीच्या मुलखात आपण आपले जीवित–कार्य चालविले आहे व जो स्वराज्य–स्थापनेचा प्रयत्न करीत आहे, त्या “ मालिका ” ची गाठ घडली नाही तर आपण आपल्या कर्तव्यास चुकलो असे होईल. हे जाणून राजाचा मुक्काम माहुलीस येण्याचा वास लागताच, समर्थांनी राजाना स्वच्छ पत्रच लिहिले.

“ निश्चयाचा महामेरू । बहुत जनास आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।१।।
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयाशी ।
तयाचे गुणमहत्त्वाशी तुळणा कैची ? ।।२।।

नरपति, हयपति । गजपति, गडपति ।
पुरंदर आणि शक्ति । पृष्ठभागी ।।३।।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ।।४।।
आचारशील, विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणे सुशील । सर्वाठायी ।।५।।
धीर उदार सुंदर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणेसी नृपवर । तुच्छ केले ।।६।।
तीर्थक्षेत्रे ती मोडिली । ब्राह्मणस्थाने बिघडली ।
सकल पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।। ७ ।।
देव धर्म गो–ब्राह्मण । करावयासी रक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।। ८ ।।
उदंड पंडित–पुराणिक । कवीश्वर, याज्ञिक, वैदिक ।
धूर्त, तार्किक, सभानायक । तुमचे ठायी ।। ९ ।।
या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र–धर्म राहिला काही । तुम्हाकरिता ।। १० ।।
आणखी काही धर्म चालती । श्रीमंत होवोनि कित्येक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विस्तारली ।। ११ ।।
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले ।
कित्येकासी आश्रय झाले । शिवकल्याण राजा ।। १२ ।।
तुमचे देशी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंधे विस्मरण जाहले । बा काय नेणूं ।। १३ ।।
सर्वज्ञ मंडळी धर्म–मूर्ति । सांगणे काय तुम्हाप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ।। १४ ।।
उदंड राजकारण तटले । तेथे चित्त विभागले ।
प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ।। १५ ।। ”

समर्थांच्या या पत्रास राजांचे उत्तर आले की–“ स्वामी मी बहुत अपराधी आहे. आपण क्षमावंत आहा. सांप्रत कृपा करून आशीर्वाद पत्र पाठविले. ते पाहून परम आनंदाते पावलो. दर्शनाची इच्छा धरून येत आहे. त्यास कृपा करून दर्शन दिले पाहिजे. ही विज्ञप्ति ”

दुसरे दिवशी म्हणजे गुरवारी वैशाख शु।। ९ मीस राजे स्वारीसह माज–गावापर्यंत आले. तेथून निळो सोनदेव मुजुमदार, बाळाजी आवजी चिटणीस प्रभृति निवडक मंडळीसह चाफळास जाऊन त्यानी रामदर्शन केले. समर्थ शिंगणवाडीस आहेत असे कळताच, दिवाकर गोसाव्याना घेऊन तेथे गेले. समर्थ उंबराखाली बसले होते. त्याना राजानी नमस्कार घातला. आणि अनुग्रह करण्याविषयी विनंति केली.

समर्थांनी संमति दिली. राजे स्नान करून आल्यावर समर्थांनी त्याना त्रयोदशाक्षरी मंत्र सांगून अनुग्रह दिला व आत्मानात्म-विचार सांगितला. तो "लघुबोध" म्हणून प्रसिद्ध आहे. (दासबोध द. १३ स. ६ पहा ) नंतर श्रीफळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे समर्थांनी राजांच्या पदरी घातले. "तुम्ही क्षत्रिय आहा, राज्याचे रक्षण करून प्रजापालन करणे तुमचा धर्म आहे. पृथ्वी म्लेंछमय झाली आहे. तिचे रक्षण तुमचे हातून व्हावे, अशी रघुपतीची इच्छा आहे" असे सांगून--

"बहुता दिवसांचे हे बंड । म्लेंछ माजले उदंड ।
त्यांचे करूनि दुखंड । राज्य करावे ।।"

नंतर समर्थांनी राजांना राजधर्म व क्षात्रधर्म सांगितला. निळो सोनदेव व बाळाजी आवजी यांच्या विनंतिवरून त्यांनाही समर्थांनी अनुग्रह करून सेवक-धर्म सांगितला. राजांनी अनुग्रहकाली पुतळ्या, पोवळी, मोती यांचा समर्थांवर वर्षाव केला. ते द्रव्य समर्थांनी उधळले व गुराखी पोरास घ्यावयास सांगितले.

अनुग्रहानंतर राजे चाफळास गेले. तेथील श्रींचा प्रसाद घेऊन ते पुढे प्रताप-गडी गेले. मातोश्रींना व त्रिवर्ग राण्यांना राजांनी चाफळचा प्रसाद दिला. प्रसादाचे रहस्यही राजांनी उलगडून सांगितले. "नारळ हे श्रीफळ माझ्या कल्याणार्थ दिले. माती दिली त्यायोगे पृथ्वी प्राप्त होईल, खडे दिले त्यायोगे किल्ले ताब्यात राहतील व लीद दिली त्यायोगे घोडदळ हाती राहील, असे समर्थांनी सुचविले आहे."

## चढती वाढती पदवी

काही दिवसांनी चाफळ भागातील सर्व कारभार दिवाकर गोसाव्याकडे सोपवून व आपल्याबरोबर कल्याण, आक्का व अनंतस्वामी याना बरोबर घेऊन समर्थ शिवथरघळीत गेले. तेथे सुंदरमठाच्या निरामय एकान्तात दासबोध ते लिहू लागले. परंतु ती बैठक त्या वेळच्या राजकारणाचे आणि उच्छृंखल समाज-विध्वंसनाचे कालखंडात ठाम होणेच कठीण होते. समर्थांचा यापुढील सर्व हयात-भरीचा म्हणजे एकतीस वर्षांपैकी शेवटच्या सहा वर्षांखेरीज पंचवीस वर्षांचा संचार "जाते स्थळ सांगेना । सांगितले तेथे जायेना । आपुली स्थिति अनुमाना । येवोचि नेदी ।। त्यागी ओळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन । लोक शोधून पाहती मन । परी इच्छा दिसेना ।। उदंड करी गुप्तरूपे । भिकाऱ्यासारखा स्वरूपे । तेथे यश-कीर्ति-प्रतापे । सीमा सांडिली ।।" या शब्दांनीच समजाऊन घेण्यासारखा आहे.

शके १५७१ साली समर्थ पंढरीस आषाढीस गेले. तेथे जांबेकडील काही मंडळी भेटली. त्यांचे हाती त्यानी एक मातोश्रीस व एक श्रेष्ठास पत्र देऊन क्षेमसमाचार कळविला. पंढरपूरहून परत येताना वाटेत अंताजीबुवा मेथवडेकर याना समर्थांनी

अनुग्रह दिला नंतर ते शिवथर घळीत गेले. शिवथर रामगडापासून पाच कोस आहे. शिवथरला समर्थांनी सुंदरमठ स्थापन केला. पुढे शके १५९७ मध्ये शिवथरास शिवाजी राजानी रामनगर पेठही वसविली. शके १५७२ कार्तिकात समर्थांनी परळी किल्ल्यावर तळ दिला. पारगाव व मनपाडळे हा पन्हाळचाजवळील भाग आदिलशाहीच्या दाबात असताना जसे समर्थांनी तेथे मारुति स्थापले होते तसेच परळीवरील तळाचेही आहे. परळीहून एका बाजूने चाफळ व रामघळ या भागाकडे जाण्यास गुप्त पाऊल वाटा होत्या. शिवथर चंद्रराव मोऱ्यांच्या करडचा अमलाखाली होते. शहाजी राजांच्या १५७१ चे ज्येष्ठ पौर्णिमेस झालेल्या सुटकेनंतर ते शके १५७३ मध्ये सज्जनगडावर समर्थांना सहकुटुंब येऊन भेटले. तत्कालीन परिस्थितीचा विचार करून शिवाजी राजानी विजापूरकराविरुद्ध काही दिवस हात उचलू नये, असे ठरून तसे झाल्याचे दिसते. नंदननाम संवत्सरी म्हणजे शके १५७४ साली श्रेष्ठांच्या बोलावण्यावरून समर्थ जांब येथे रामनवमीच्या उत्सवास गेले. उत्सवानंतर ते मातापुरास दत्तदर्शनास गेले. शके १५७५ त समर्थ तेलंगण प्रांती इंदुरबोधनाम उतरले. अनावृष्टीमुळे तेथे ब्राह्मण काही साधना करीत असलेले पाहून, समर्थांनी एका दगडावर कोळशाने हनुमंताची मूर्ति रेखाटली व त्यावर आपली छाटी टाकली ब्राह्मणाकडून त्या मूर्तिवर अभिषेक करवला. आणि काय आश्चर्य ! पर्जन्यवृष्टि झाली. समर्थांनी मग तेथे राममंदिर उभे केले, मठ स्थापला आणि तो टाकळी मठाप्रमाणेच उद्धवांच्या हवाली केला. मग चाफळास परत येताना तिसगावी वृद्धेश्वराचे दर्शनास समर्थ गेले असता, गुरुप्राप्तीसाठी तिष्टत असलेल्या भिंगारच्या बहिणाजी ऊर्फ दिनकर पाठक याना समर्थांनी अनुग्रह दिला. तिसगावहून सहा मैलावरील भातवाडीच्या श्रीनृसिंहाचे दर्शन करून समर्थ वडगावास गेले व चाफळास परतले. चाफळास येतात तोच उडपीचे श्रीमध्वाचार्यांकडून एक ब्राह्मण समर्थांचे भेटीस आला, पैठणचे कोणी एकनाथपंत दर्शनास आले, तर राजापूरचे साठ ब्राह्मण समर्थ–कृपेसाठी आले. त्या सर्वांस समर्थांचे " भयचकित नमावे " असे सामर्थ्य प्रत्ययास आले. शके १५७७ त कर्नाटकात जाऊन तेथील बंडे मोडण्यास गेलेल्या शहाजी राजांची परवानगी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील उत्साहाचा कोंडमारा दूर करण्यास समर्थांनी आणण्याची जबाबदारी पतकरली. पण मातोश्री जांबेस अत्यवस्थ असल्याचे समजल्यावरून समर्थांना मातोश्रीच्या अंत्यदर्शनास जाणे आले. राणूबाई आपल्या नारोबाची वाटच पहात होत्या. त्यानी पुत्र भेटताच त्यांच्या अंगावर हात फिरवून " तुम्ही उभय पुत्रांनी कुळाचा उद्धार केला " असे समाधान व्यक्त करून " जय राम " म्हणत मन्मथनाम संवत्सरी (श. १५७७) ज्येष्ठ शु॥ ३ स इहलोक सोडला. मातृभक्त समर्थांनी आईचे और्ध्वदेहिक आटोपल्यावर सज्जनगडची वाट धरली व तेथून ते कर्नाटकाला गेले.

कर्नाटकच्या वाटेवर मिरजेस मठस्थापना करून तेथे वेणाबाईना समर्थांनी महंत केले. चिकोडीस तिमाजीपंत देशपांडे यांना अनुग्रह देऊन कार्तिक महिन्यात

समर्थ तंजावरास पोहोचले. तेथून विश्वासू माणसावरोबर शहाजी राजांचे मन व आपला कार्यक्रम शिवाजी महाराजास कळवून व्यंकोजी राजे भोसले यानाही समर्थांनी अनुग्रह दिला नि तंजावरास मठ स्थापना केली. त्या मठावर शहापूरकर भीमस्वामीची योजना करून समर्थ रामेश्वरास गेले. तेथून पांचाळ, उडपी, तोरगल या मार्गाने समर्थ चाफळास येऊन दाखल झाले.

शके १५७८च्या श्रावणात समर्थांनी पाटणच्या चांदजीराव साळुंख्याना अनुग्रह दिला. यासाठी टाकळीहून उद्धव गोसाव्यांचे समर्थांना पत्र आले ते "महाराजया सद्‌गुरु रामदासा" हे अष्टक म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात "मला वाटते अंतरी त्वा वसावे । तुझ्या दासबोधासि त्वा बोधवावे ।।" अशी विनंती आहे. त्यास समर्थांनी उत्तर लिहिले की–

"आत्मारामी आत्मा पहा । जाणुनिया सुखी रहा ।
स्वानंदामृत सेवुनि पहा । निखिल निजरूप ।।"

समर्थांचे पत्र गेल्यावर इंदुरबोधन–मठात महादेव गोसावी यांची नियुक्ति करून उद्धव समर्थ–दर्शनास आले ते इकडेच राहिले.

शके १५८१ मध्ये ब्रह्मपिसा होऊन समर्थांनी शिष्यांची परीक्षा केली व तीत कल्याणस्वामी सर्व कसौटीस उतरले.

समर्थांची फिरती चालूच होती. भागानगर, चिंचवड, निगडी, बत्तीस–शिराळे, खंडोबाची पाली, पारगाव येथे त्यांच्या भेटी होत होत्याच. शके १५९४ मध्ये पारगावलाच समर्थांनी रामनवमीचा उत्सव केला. याच साली कऱ्हाडच्या निरंजन जोशाला आशीर्वाद देऊन गणपतिदर्शन करवले व तो "देव" या नावे प्रसिद्ध झाला. शके १५९५ मध्ये पन्हाळा हस्तगत झाल्याची शुभ वार्ता आल्यावर समर्थांनी शिवाजी महाराजास "पूर्ण साम्राज्य मिळो" असा आशीर्वाद दिला. शके १५९६ साली शिवाजी महाराजांना रायगडावर राज्याभिषेक झाला. त्यापूर्वी समर्थांचे दर्शन घेऊन जसे शिवाजी महाराज गेले होते तसेच राज्याभिषेकानंतरही सज्जनगडावर येऊन राहिले होते.

महाराज रायगडावर गेल्यावर समर्थ चातुर्मासात हेळवाकचे घळीत राहण्यास गेले. तेथे कर्कश शीतलाई असते. चातुर्मास्यानंतर समर्थ घोडयावरून चाफळास आले. आपले शिष्य दिवाकर गोसावी यांचे व्याही रघुनाथभट गोसावी यास समर्थांनी स्वहस्ते मोडीत पत्र लिहिले ते–

"श्री रामसमर्थ

उत्तमगुणालंकृत रघुनाथभक्ति–परायेण परोपकार राजमान्य राजश्री रघुनाथभट गोसावी यासी स्नेहपूर्वक सूचना. तुमचा निरोप घेऊन हेळवाकीहून स्वार झालो ते सुखरूप चाफळास पावलो. संकलपाची समाराधनाही झाली. पुढे शरीराचा उपचारही हळूहळू होतो. तुमचे मन मजपाशी बहुत आहे. ते तुमच्या आवडीच्या

गुणे कल्याण होईल असे नेमस्त चिन्ह दिसते. आपणे जे कर्कश सीतलाईमध्ये बहुतचि श्रम पावलो तो माझा सकळ श्रम घेऊन मज निरोप दिधला तो उपकार देव जाणे. येविसी चित्त चमत्कारले. ते पत्री किती म्हणोन लिहावे ? माझे आरिष्ट तुम्ही घेऊन मजला उष्ण देशाशी पाठविले हा उपकार श्रीरघुनाथजीस जाला. मज रघुनाथजीवेगळे कोणी जिवलग नाही. आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला. याउपरी माझे ठायी तुम्ही आहा. रघुनाथकृपेचा प्रत्यये तुम्हास आलियावरी प्रचीतीसी कळो येईल. बहुत काय लेहावे ? वेदमूर्ति दिवाकरभट गोसावी तेथे आलियावरी तुम्ही माझा समाचार घेण्यासी ये प्रांती आले पाहिजे. स्नेह बहुत असो दीजे. हा पत्रार्थ. हे इतुके म्या आवडीच्या कळवळचाने लिहिले आहे. मनोमन साक्ष असेल. परंतु तुम्हास उपचारसा वाटोन रंजीस होत तरी न होणे. जैसा दिवाकरभट तैसे तुम्ही हा इत्यर्थ आहे. बरे कळले पाहिजे. तुमचा आमचा एकांत प्रसंग जालियावरी मग ऐसे लिहिता नये म्हणौनी ये संधीमध्ये प्रसंग फावला, पुढे फावेना, म्हणौनि लांबेकरून लिहिले. वरकड इतरभाव मनामध्ये असेल तरी रघुनाथ साक्ष असे. तुम्ही रंजीस न होणे आणि जे आहे ते लिहिले. यामध्ये मिथ्या स्तुति नाही. तुम्ही सर्वज्ञ आहा. तुमचे जे काही आहे ते सकलचि माझे आहे. म्या मज माझ्या मनास येईल तैसे लिहिले. येथे तुमचे काय गेले ? काही चिंता न कीजे. तुम्ही आमचेचि आहा. तुम्ही आम्ही सकल देवाचे आहो. शरीरभेदावरी न जाणे. अंतरस्थिति पाहिल्यावर कळो येईल. ''

याच वर्षी कपिला षष्ठीचा योग होता म्हणून समर्थ माहुलीस स्नानास गेले होते. तेथे त्यानी ब्राह्मणास खड्याने दक्षिणा दिली. तिचे सोने झाले. शके १५९८ चे माघात शिवाजी महाराज कर्नाटकी जाऊन व्यंकोजी राजाकडून वाटणी घेण्याची व्यवस्था करून कार्तिकात तोरगळ प्रांती आले. तिकडून गडइंग्लज जवळ सामानगड बांधण्याचे काम अण्णाजी दत्तो करीत होते, ते पाहण्यास महाराज आले. समर्थही त्या दिवशी तेथे होते. उभयता बोलत चालले असता, एक दगड घडविण्यासाठी समर्थांनी तो कारागीरास फोडण्यास सांगितले. तेव्हा मध्ये एक भोक, त्याखाली एक खळगा, खळग्यात पाणी व पाण्यात बेडकी असल्याचा चमत्कार सर्वांनाच दिसला. त्यावेळी समर्थ म्हणाले–

" आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो ।। धृ ।।
बांधिले घुमट किल्ल्याचे तट । तयाला फुटती पिंपळवट ।
तेथे कोण लावितो मोट ? । वृक्षाला पाणि घालतो ।। १ ।।
खडक फोडता सजिव रोडकी । पाहिली सर्वांनी बेडकी ।
सिंधु नसता तियेचे मुखी । पाणी कोण घालितो ? ।। २ ।।
पहा रे पहा मातेचिया स्तनी । चिंतिता रक्तमास मलखाणी ।
तेथे विमल दुग्ध घालोनी । कोण पोशितो ? ।। ३ ।।
नसता पाण्याचे बुडबुडे । सदा सर्वदा गगन कोरडे ।
दास म्हणे जीवन चहुकडे । पाडुनि सडे पीक उगवितो ।। ४ ।।

पुढे किल्ला पहात असता समर्थांनी इमारती–प्रकरण सांगितले. त्यात मुख्य सूत्र असे :–

" ऐका विटांचा प्रसंग । लांबी रुंदी यथासांग ।
चौक नेमस्त, व्यंग । असोच नये ।।१।।

वीट लांब नऊ तसू । आणि रुंदी सात तसू ।
उंची जाणिजे तीन तसू । पोटपाट नेमस्त ।।२।।

द्रव्य पारपत्य खबरदारी । सत्ता सामर्थ्य वेठ बेगारी ।
गवंडी पाथरवट लोणारी । बेलदार कोळी ।।३।।

लोहार, सुतार, कुंभार । कामगार लहान थोर ।
मांग, महार, चांभार । नाना याती ।।२।।

घन कुदळी संभळ । कुसळी पाटा गुटी गोल ।
टाक्या, हातोडे, लोळ । लोहपोलादाचे ।।३।।

गुप्तद्वारे, अंतर शिड्या । छत्र्या लादण्याच्या तबकड्या ।
गड, कोट, महाल मठ्या । नाना भुयारी विवरे ।।४।।

धन धान्य, रसखाने । दारुखाने, जामदारखाने ।
नाना अठरा कारखाने । घुमट, मशीदी, मनोहरे ।।५।।

चित्रशाळा, नाटकशाळा । भोजनशाळा, होमशाळा ।
पाठशाळा, धर्मशाळा । नाना इमारती ।।६।। "

या इमारत–प्रकरणी किल्ल्यावर मशीदी असाव्यात व लहानथोर कामगारात महार मांग चांभारही असावेत अशी जी सूचना आहे, त्यावरून समर्थांना महाराष्ट्र राज्य हवे होते ते मुसलमानासुद्धा सर्वांसाठी हवे होते, हे उघड होते.

शके १५९९ पिंगलनाम संवत्सरी फाल्गुन कृ १३स दहिफळ येथे समर्थांच्या श्रेष्ठ बंधूंचे निर्वाण झालेवर शके १६००च्या चैत्र शु।। १३ स उद्धव गोसाव्यास पाठवून श्रेष्ठांचे चिरंजीव रामजी व शामजी यास समर्थांनी जांबेहून वैशाखात आणवले त्यांचा समाचार विचारून त्यास समर्थांनी जीवन–बोधही केला.

याच वर्षात व्यंकोजीराजे भोसले यांच्या विनंतिवरून समर्थ श्रावणमासी चंदावरास गेले ते भाद्रपदात परत आले ! चंदावरी अरणीकर कारागीरास श्रीराम लक्ष्मण, सीता व मारुति अशा चार मूर्ति घडविण्यास समर्थांनी सांगितल्या. डोळे गेलेल्या कारागीराकडून मनपसंत धनुर्धारी रामाच्या मूर्ति तयार झाल्यावर सज्जनगडी त्या व्यंकोजीराजानी पाठवाव्यात असे ठरले.

याच वर्षी शिवाजी महाराजानी समर्थांच्या श्री चाफळ संस्थानास एक सनदही करून दिली व उत्सवादिकांची कायम व्यवस्था लावली.

# अखेर ! ! !

सिद्धार्थी नाम संवत्सरी ( शके १६०१ ) पौष शु ।। ९ मी पासून माघी पौर्णिमेपर्यंत शिवाजी महाराज सज्जनगडी राहून गेलेवर शके १६०२ च्या ( रौद्रनाम संवत्सरी ) चैत्र पौर्णिमेस रविवारी शिवाजी महाराजानी रायगडावर इह–लोकाचा निरोप घेतला. समर्थांना वार्ता कळताच "श्रींची इच्छा !" एवढेच उद्‌गार त्यांचे तोंडून आले ! ! ! तेंव्हापासून समर्थांनी अन्न वर्ज्य केले. दुधावर असत. बाहेरची फिरतीही समर्थांनी बंद केली. शके १६०३ त समर्थांनी चाफ–ळच्या रामनवमी उत्सवात भाग घेतला. तेथून निघताना श्रीरामदर्शन समर्थांनी केले व सज्जनगड गाठला. सहा सात महिने गेल्यावर मार्गशीर्ष महिन्यात डोम–गावाहून कल्याणस्वामी सज्जनगडावर आले. दासबोधाची समास–दशक–जुळणी होऊन तीवर समर्थांनी अखेरचा हात फिरवला.

शिवछत्रपतींच्या निधनानंतर त्यांचे थोरले चिरंजीव संभाजीराजे गादीवर आले. त्यानी पूर्वायुष्यातील अनुभवावरून उच्छाद मांडला. स्वराज्याचे एकनिष्ठ–सेवक बाळाजी आवजी, आण्णाजी दत्तो, विठोजी फर्जंद याना परलोकीचे प्रयाण घडले. अनेकाना शत्रू म्हणून हाकलून देण्यात आले. सापत्नमाता सोयराबाई कैद झाल्या. समर्थांच्या कानी या बातम्या आल्या. शिवरायांच्या निधनाने उदासच उदास झालेल्या समर्थांना अगदी बेचैन झाले. शेवटी त्यानी संभाजीराजास पत्र पाठविले–

"अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।
तजवीजा करीत बसावे । एकांतस्थळी ।।१।।

काही उग्र स्थिती सांडावी । काही सौम्यता धरावी ।
चिंता परावी लागावी । अंतर्यामी ।।२।।

मागील अपराध क्षमा करावे । कारभारी हाती धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ।।३।।

श्रेष्ठी जे जे मेळविले । त्यासाठी भांडत बैसले ।
तरी मग जाणावे फावले । गलीमासी ।।४।।

सकल लोक एक करावे । गलीम निपटोनि काढावे ।
येणे करता कीर्ति धावे । दिगंतरी ।।५।।

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मिळवावे ।
महाराष्ट्रराज्य करावे । जिकडे तिकडे ।।६।।

शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ।।७।।

शिवरायाचे कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे ।
शिवरायाचे सलगी देणे । कैसे असे ।।८।।
त्याहूनि करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष ।
याउपरी आता विशेष । काय लिहावे? ।।९।। "

संभाजीराजानी पत्र सादर स्वीकारले, "आज्ञा प्रमाण" म्हणून निरोप पाठविला व जमाना बदलला. पुढे स्वता छत्रपति संभाजी शके १६०३ च्या पौष महिन्यात समर्थांच्या दर्शनास सज्जनगडावर आले. समाचार घेऊन आणि देऊन संभाजी राजे परतल्यावर, समर्थांचे शरीर भलता थकवा दाखवू लागल्याचे शिष्यांच्या व जनतेच्या लक्ष्यात आले. दोनप्रहरी समर्थ वामकुक्षी करून उठत तरी आपले तोंड फारच थोडे उघडत. समर्थ आता शिवाजी महाराजांनी दिलेल्या पितळी खुरांच्या पलंगावर बसून असत. शिष्य मंडळींनी काही सेवेची आज्ञा मागितल्यास समर्थ म्हणत– "आमुची प्रतिज्ञा ऐसी । काही न मागावे शिष्यासी । आमच्या मागे जगदीशासी । भजत जावे ।। "

माघ शु।। ६ स शिष्य मंडळीत बसून समर्थ म्हणाले–

"रघुकुल टिळकाचा वेध सन्नीध आला ।
तदुपरि भजनाशी पाहिजे सांग केला ।।

तेंव्हा उद्धव गोसावी उद्गारले –

"अनुदिनी नवमी हे मानसी आठवावी ।
बहुत लगबगीनें कार्यसिद्धि करावी ।। "

त्यानंतर माघ कृष्ण ५ मीस व्यंकोजी राजाकडून चंदावर येथे करावयास सांगितलेल्या श्रीरामप्रभृति मूर्ति आल्या. मल्हारराव लिंबदेव थेऊरकर व केशव गोसावी यांच्या बरोबर त्या आल्या. समर्थांनी निरीक्षण केले व समाधानच समाधान व्यक्त केले. मग आपल्या खोलीत मूर्तीची स्थापना करून समर्थांनी त्यांची यथासांग पूजा करवली. माघ व।। ६ स समर्थांचे शारीर स्वास्थ्य घरगळल्याचे लोकांचे लक्ष्यात आले. दुसरे दिवसाचे दुपारपासून दर्शनाची रीघ लागली. माघ कृ. ९ मीस समर्थ सकाळी उठले. श्रीराममूर्तीस साष्टांग नमस्कार घालून दिगंबरावस्थेत सन्मुख बसले. श्री. जोशी, काटकर, हवालदार, शिष्य मंडळी आणि जनसामान्य दाराशी दर्शनार्थ दाटून उभे होते. नऊ दिवसांचे अन्न–पाणी–वर्ज्य प्रायोपवेशन समर्थांनी शिष्यांच्या इच्छेवरुन वाटीभर साखरपाणी घेऊन समाप्त केले.

समर्थांच्या आज्ञेवरून आता सर्व बाजूस सरले. श्रीराम मूर्तीकडे ध्यान लावून समर्थ बसले. समर्थ पलंगावरून पादुकावर उत्तरेस तोंड करून बसले. आक्का, उद्धवादि शिष्यगण बावरले. तेंव्हा समर्थ म्हणाले "माझी काया गेली खरे । परी मी आहे जगदाकारे । ऐका स्वहित उत्तरे । सांगेन ती ।। १ ।। नका करू खटपट । पहा माझा

ग्रंथ नीट । तेणे सायुज्याची वाट । ठायी पडे ।।२।। राहा देहाच्या विसरे । वर्तू नका वाईट बरे । तेणे मुक्तीची ही द्वारे । चोजविली ।। ३ ।। रामी–रामदास म्हणे । स्वरूपी सदा अनुसंधान । करा श्रीरामाचे ध्यान । निरंतर ।।४।। आत्माराम, दास–बोध । माझे रूप स्वतःसिद्ध । असता न करावा खेद । भक्तजनी ।। ५ ।।"

समर्थांनी एकवीस वेळा ' हर हर ' शब्द करून ' श्रीराम ' असे म्हणून मूर्तीकडे अवलोकन केले. तुळशीच्या माळा घालून समर्थांनी पद्मासन घातले व अभंग म्हटला की–

जन्मोनिया तुज भजो याच बुद्धि । प्राणत्याग–संधि सांभाळिसी ।।१।।
उचित न चुके अचित्य श्रीरामा । स्वस्वरूपी आह्मा ठाव देई ।।२।।
जन्मभरी तुज धरिले हृदयी । अंती या समयी पावे बा गा ।।३।।
निष्काम तो तुज सेवायाची आशा । अंती रामदासा सांभाळावे ।।४।।

अभंग म्हणून झाल्यावर " जय जय रघुवीर समर्थ " अशी गर्जना करून समर्थ रामरूपी विलीन झाले. (२२ जानेवारी १६८२)

मठाच्या उत्तरेस एक खळगा होता. तो उपयोगी पडेल म्हणून समर्थांनी शिवाजी महाराजाना तो भरू दिला नव्हता. या गोष्टीची आठवण होऊन, तेथेच सर्वांनी समर्थांच्या देहदहनासाठी स्थलशुद्धि केली. तुलसीकाष्टे, बिल्वकाष्टे यानी समर्थांचा देह भस्मीभूत झाला. समर्थांचे उत्तरकार्य समर्थांचे मानसपुत्र व प्रथम शिष्य उद्धव गोसावी यानीच केले.

छत्रपति संभाजी राजानी रामचंद्रपंत अमात्याकरवी राजगुरु व राष्ट्रगुरुच्या प्रतिष्ठेस शोभेल अशी दानधर्माची व्यवस्था केली. नंतर दहनस्थळी समाधि बांधून चंदनाचा ओटा समर्थशिष्य तारळेकर गोसावी यांचेकडून करवून त्यावर पादुकांची स्थापना केली. अस्थि श्री भागीरथीत समर्पिण्यासाठी चाफळ मठासमोर वृंदावन करून ठेवण्यात आल्या. त्या केशवस्वामी शके १६३६ मध्ये काशीस नेत असता, त्या कल्याण स्वामींच्या अस्थिबरोबरच गंगेत समर्पण झाल्या.

शिष्यमंडळीनी समर्थसमाधिवर लहानसे देऊळ बांधले. त्याच देवळात समाधीच्या वरील बाजूस श्रीरामाच्या मूर्ति स्थापण्यात आल्या. एक दिवस संभाजी महाराज दर्शनासाठी आले. महाराजानी दीड महिन्यात मोठे देऊळ तयार करविले. त्या देवळाचा व चाफळ मठाचा योगक्षेम बंदोबस्त संभाजी महाराजांनी चालू करून दिला.

• • •

# संप्रदायाची तीर्थे

समर्थांचे जीवन आरंभापासून अखेरपर्यंत राममय होते. समर्थांच्या अंग–प्रत्यंगात भरून राहिलेल्या रामरूप बुद्धिभावनांचा आविष्कार म्हणजे चाफळ व सज्जनगड येथील श्रीराम. रामभक्ताची धामे जशी अयोध्या, नाशिक, रामेश्वर किष्किंधा तशीच समर्थ सांप्रदायिकांची धामे म्हणजे जांब, चाफळ, सज्जनगड व शिवथरघळ होत.

## जांब

हे गाव औरंगाबाद जिल्ह्यातील आंबड तालुक्यात ( पूर्वीच्या निजामशाही राज्यात ) गोदावरीच्या काठी एक लहान खेडे आहे. मनमाड हैदराबाद रेल्वेने परतूर स्टेशनापासून चौदा मैलावर तर हमरस्त्यापासून वीस मैलावर. बैलगाडी–शिवाय दळणवळण अशक्य. पावसाळ्यात त्याही साधनाचा काही उपयोग नाही. तालुक्याचे गाव. अंबड जांबपासून बत्तीस मैलावर दूर. दिवसाढवळ्या गुंडगिरीसही भरपूर वाव ! येथे शके १५३० च्या रामनवमीस नारायण सूर्याजी ठोसर तथा समर्थ रामदास यांचा जन्म झाला. बालनारायणाचा देह धरणीने झेलला त्याचबरोबर जागेवर शके १८५४ च्या चैत्र शु॥ ९स (ता. १५ एप्रिल १९३२ रोजी) समर्थांच्या पुण्य–मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होऊन मंदिराचा सोन्याचा कळस श्री शंकर श्रीकृष्ण देवांच्या प्रयत्नपुरुषार्थाने दृष्टीस पडला. जांबेस भगवान श्रीधर स्वामींच्या नेतृत्वाखाली शके १८८० ( सन १९५८)त समर्थांचा ३५०वा जन्मोत्सवही पार पडला. समर्थ रामदासांना ज्या मारुतीच्या देवळात परमार्थाची जाग आली ते देऊळ जांबेत शिरताना गावालगतच आजही पहावयास सापडते. मात्र ज्या झाडावरून समर्थांनी डोहात उडी मारली असे लोक सांगतात, तेथे आता वाळवंटच असून समर्थांचे पुतणे रामजी–श्यामजी यांच्या तेथे समाधी आहेत. ठोसरमळा पूर्वी ज्याला म्हणत तो हल्ली देवमळा म्हणून ओळखला जातो. कुलकर्ण्यांची विहीर तेथे असून, तेथून पाणी भरून तेच तूप म्हणून वाढण्याचा चमत्कार समर्थांनी एकदा लहानपणीच केला होता, असे परंपरेने सांगण्यात येते; ती तुपाची

बागर जांबमठात आजही आहे. ठोसरांचे कुलदैवत एक हिवरे येथील मुंजाबा असून त्याची आराधना ठोसर घराण्यात आजकालही होत असते. समर्थ रामदासांचे एकविसावे पूर्वज दशरथपंत ठोसर यांनी कसबे जांब नवीनच वसविले होते. हिवरे गावापासून तीन कोसावर वडगाव या गावची पांदर पड पडलेली होती. त्या ठिकाणी फक्त काही गवळी रहात. त्यातील लखमाजीच्या मदतीने शके ९१० ( सन ९८८ ) मध्ये दशरथपंतांची ती कामगिरी झाली. हिवऱ्याहून बरोबर आणलेल्या ' झाबऱ्या ' महारास जांबेची वतनदारीही दशरथपंतानी दिली. जांबेला चौफेर तटबंदीही करण्यात आली होतीच. गावात हातमाग कापडाचा धंदाही चांगला चालू झाला. समर्थप्रतापात जांबचे वर्णन चतुरपणे केले आहे.

"जांबुवंती नामे राम-राजधानी । आरामे शोभती चक्रध्वनि ।
उभय(आनंदी व अन्य)सरिता जेवी जन्मस्थानी । पंचवाटिका विराजे ॥१॥

ग्रामवासी भले लोक । ग्रामपालक पुण्यश्लोक ।
इहलोकी साधिती परलोक । नीतिन्याये वर्तती ॥२॥

ब्राह्मणांची रक्षिती प्रतिष्ठा । संतसज्जनी केवळ निष्ठा ।
परदार-परद्रव्य मानिती वमन, विष्टा । स्वप्नीही प्रतिष्ठा नातळती ॥३॥

ग्रामसेवक जाति-विजाति फिरती । आल्याची आतिथ्ये करिती ।
कष्टल्या-भागल्याचे श्रम हरिती । क्षुधिस्थ कोणी राहिना ॥४॥

देशकालवर्तमाने । ग्रामस्थ वर्तती प्रसंगमाने ।
पिके पिकती अतिमाने । पर्जन्य वर्षती यथाकाळी ॥५॥

सदर जांबेत संस्थापक दशरथ (कृष्णाजी) ठोसर राहिलेच. त्यांचे पुढेही २ रामजी, ३ हरि, ४ नीराजी, ५ शिवाजी, ६ विष्णू, ७ बाहणाजी, ८ आत्माराम, ९ गणेश १० धोंडो, ११ आत्माराम, १२ गुंडो, १३ भीराजी, १४ आत्माराम, १५ शिवाजी, १६ विष्णू, १७ केसो (केशव) १८ रामाजी, १९ भानजी, २० सूर्याजी, २१ त्रिंबक अशी ठोसर घराण्याची वंशपरंपरेने नांदणूक झाली. त्रिंबक सूर्याजीचे कारकीर्दीत मात्र जुनी वस्ती मोडून हल्लीची नवी झाली. कारण दौलताबादेचा रस्ता, सरकारी खजिन्याची ये-जा, यामुळे तंटा जांबेसच पडला. म्हणून भेंडाळे, वीरेगव्हाण, आसनगाव, कोठाळे व घाणगाव अशा पाच गावांचे मध्यभागी निपल (निव्वळ मऊ) जागा पाहून वस्ती केली. हे शके १४९९ (सन १५७७) त घडले. त्यापूर्वीच शके १४९० (सन १५६८) त समर्थांचे वडील सूर्याजीपंताचा जन्म हल्लीचे गावठाणापासून मैलावरील पांढरीवर झाला होता. त्रिंबकपंत शके १५०० त दिवंगत झाले. लहानपणीच सूर्याजीपंत गाव-कारभार पाहू लागले. त्यांच्या पोटीच गंगाधर (श्रेष्ठ) शके १५२७ त व नारायण (समर्थ) शके १५३० त हे कुलदिपक जन्मास आले.

समर्थांच्या जन्मस्थानी धुळयाच्या शंकर श्रीकृष्ण देवानी उभारलेल्या समर्थ-मंदिराचे बांधणीच्या वेळी देवाना समर्थांच्या खेळातील एक 'गोटी' गवसली तीही देवानी समर्थ-मंदिरात ठेवली आहे. समर्थ-मंदिराच्या आवारास लागून पूर्वेस पाटलांचा वाडा होता तेथे यात्रेकरूसाठी "दासविश्रामधाम" हे निवासस्थान झाले असून मंदिराचे पश्चिमेस पुरातन श्रीराम मंदिरही आहे. या समर्थ-मंदिरासाठी क्वेटयापासून कलकत्त्यापर्यंत आणि केदारेश्वरापासून रामेश्वरापर्यंत हिंडून देवानी पैसा जमविला. समर्थ मंदिराच्या उभारणीस निजामसरकारची परवानगी काढली व मंदिराचा योगक्षेम, नित्य नैमित्तिक आणि सांप्रदायिक परंपरा नित्य चालावी म्हणून एक सार्वजनिक ट्रस्ट केला आहे. त्याचे सध्याचे ~~अध्यक्ष~~ औरंगाबादचे श्री. वैष्णव वकील आहेत. कार्यकारी विश्वस्त

**पंचवटी-** नाशिक येथील जुन्या देवळापैकी पंचवटीतील काळाराम व कपालेश्वर वगैरे पंचवीस देवळे औरंगजेबाने १६८० साली पाडल्याचा उल्लेख इतिहासात आहे. पंचवटीतील काळचाराम मंदिरातच समर्थांनी आपली आराधना आरंभली होती. तेथेच ते पुराणश्रवणादिक व कीर्तनेही करीत. कृष्णातीरावर आल्यावरही रामदासाना पंचवटीच्या रामाची ओढ होती. म्हणून तेथील उपासकाना ते लिहितात-

तुझी निकट देवापाशी । आणि मी पडलो दूर देशी ।
कृपाळूपणे रघुनाथाशी । करुणा भाकावी ॥१॥
तुह्मा दासामध्ये मी हीण । माझे कोटयावधि अवगुण ।
परंतु आहे अनन्य । सेवक रघुनाथाचा ॥२॥
प्रत्यही माझा नमस्कार । देवासि करावा निरंतर ।
म्हणावे सांभाळावे पोर । लडिवाळपणे ॥३॥
बालवृद्ध नर नारी । सकल भक्त कुमार कुमारी ।
समस्तासी नमस्कारी । कृष्णातीरवासी ॥४॥
शुद्ध उपासना विमलज्ञान । वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण ।
गुरुपरंपरेचे लक्षण । शुद्धमार्ग ॥५॥
ऐसे पंचधा बोलिले । इतुके पाहिजे यत्ने केले ।
म्हणजे सकळही पावले । म्हणे दासानुदास ॥६॥

**टाकळी-** ह्या नाशिक जिल्ह्यातील गोदावरीच्या काठी नाशिकापासून सुमारे एक कोसावर असलेल्या गावी नंदिनी-गोदावरीचे संगमात उभे राहून समर्थ रामदासानी बारा वर्षे पुरश्चरण केले होते. समर्थांचा पहिला शिष्य उद्धव गोसावी यास समर्थांनी मारुति स्थापून दिला होता. तेथेच उद्धवाचा मठ झाला. टाकळीसच उद्धवाची समाधि आहे. टाकळीप्रमाणेच उद्धवाचा मठ तेलंगणातील इंदुरबोधन येथेही आहे.

# चाफळ

ता. पाटण जि. सातारा; १७′ २०′ उ. ७४′ ००′ पू. आगगाडीचे स्टेशन मसूर ११ मै. पूर्वेस. उंब्रजच्या पश्चिमेस ६ मैलावरील मांड नदीच्या काठी सह्याद्रीच्या खोऱ्यात अरुंद वसलेले हे गाव. ही मांड पुढे उंब्रजेसच कृष्णेस मिळते. चरेगाव–पडलोशी रस्त्यावर चाफळ वसले असून तो रस्ता बार–माही मोटार–वाहतुकीचा आता झाला आहे, चाफळ आपल्या खोऱ्याच्या निमुळत्या भागात मांड मांडून बसले असले तरी त्याच्या भोवतीच्या शेतजमीनी भरघोस पिके देणाऱ्या आहेत. त्याच्या काळीभोवती सागवानाची झाडे वाहणाऱ्या टेकट्या असून पिण्याचे पाणी आणि बागायतीला लागणारे पाणी तेथे विपुल आहे. या गावचे अधिपति सुप्रसिद्ध रामदास स्वामीचे वंशज असून १८५७ साली इनामकमिशन पुढे लक्ष्मण रामचंद्र ठोसर स्वामी यानी 'रामदासानी स्थापलेल्या' श्रीराम–मारुति–देवस्थानास शिवाजी महाराजानी दिलेल्या सनदा सादर करून व समर्थसांप्रदायाची वैशिष्ठ्ये निवेदन करून ब्रिटिश सरकारकडूनही शिवाजी महा–राजाच्या त्या सनदा कायम करवून घेतल्या. ब्रिटिश सरकारने पंतप्रतिनिधि व पंतसचीव आणि फलटणचे संस्थानिक यांच्यापेक्षा श्रेष्ठ स्थान स्वामीना जिल्ह्यातील सरदारात दिले होते. रामदास हे छत्रपति शिवाजी महाराजाचे नुसते समकालीन संत नव्हते. त्याचे ते अध्यात्म–मार्गदर्शकही होते. (सातारा जिल्हा गॅझीटिअर पृष्ठ ७९६ पहा) रामदासाच्या सांप्रदायाचा मुख्य मठ चाफळासच असून रामनवमीच्या उत्सवात त्यांच्या देशभर पसरलेल्या अकराशे मठाधिपतींना आपआपल्या महंतीची झडती तेथे द्यावी लागे आणि अध्यात्मादिंचे आदेश तेथूनच घ्यावे लागत. रामदासाना समर्थ असे लोक म्हणत. त्यानी पंचवटीहून राम–पादुका आणून चाफळास संस्थापिल्याकारणाने ( सातारा जिल्हा गॅझीटिअर पृ. ७९६ पहा ) चाफळ येथे तीर्थक्षेत्र झाले व तेथे यात्रा लोटू लागली. कमीतकमी पाच हजार तरी यात्रेकरू लोटत असत. रामदास आणि त्यांचे वारस कधी चाफळास तर कधी सज्जनगड ( परळी ता. सातारा ) येथे रहात व राहतात. परळी खोऱ्यातील व चाफळ खोऱ्यातील कित्येक गावे समर्थांच्या देवताना समर्पिलेली असून तेथील वसूल देवतार्चनासाठीच कारणी याव–याचा असतो. मांड नदीच्या दोन्ही बाजूस चाफळ वसले असून, नदीच्या डाव्या किनाऱ्यावरून गावात जाणाऱ्या पेठ रस्त्यावर एकेकाळी संपन्न व्यापारी व सावकार रहात असत. चाफळचा आठवडा बाजार दर गुरुवारी भरत आला आहे. गावभाग नदीवरील पायउताराचा एका छोटेखानी लकडी पूलाने राममंदिराकडील नंदीच्या उजवीकडील भागास जोडलेला होता व आहे. देवाचा गाभारा. चौखांबी व घाटी मंडप संपूर्ण दगडी करून चुन्यात बांधलेल्या त्या राममंदिराच्या बाजूसच प्राथमिक शाळा, स्वामींचा मठ आणि रामाच्या सेवेकऱ्यांची वगैरे घरे असून, हा सर्व भाग एका उंचवटयावर आहे. राममंदिरात जावयास

पन्नास पायऱ्या चढून जावे लागते. प्रवेशद्वारात नगारखाना असे. राममंदिरासमोर दासमारुतिचे व राममंदिराच्या नि मठाच्या पाठीमागे प्रताप-मारुतिचे देवालय समर्थ रामदासांनीच बांधले असून, सभामंडपासुद्धा राममंदिराची ठाकठीक सुसज्जता एक लाख रुपये खर्चून सन १७७६ मध्ये बाळाजी मांडवगणे या लक्ष्मीपुत्रानी केली होती. राम-मंदिर पूर्वाभिमुख असून त्याची उत्तरबाजू नदीकिनाऱ्याचेवर साठएक फूट तरी आहे. चाफळगावचे क्षेत्र सुमारे ५·३ चौरस मैल असून लोक-संख्येतील पंचाहत्तर टक्के लोक शेतकी करतात.

भोवती डोंगराचा फेर, पायथ्याशी नदी, गलबल्यापासून दूर असे एकांतस्थळ, सभोवती अरण्यशोभा, डोंगरात अनेक गुहा व गुप्त स्थळे! अशा प्रकारचे आपल्या कार्याला अनुकूल असे ठिकाण पाहून राममंदिर उभारण्यास चाफळकराना राम-दासानी जागा मागितली. गावकऱ्यांनी गावापासून दूर स्मशानाची जागा दाखवली. 'रघुपतीची इच्छा!' म्हणून समर्थांनी मान्य केली. आपण स्वता कल्याण, उद्धव, दिवाकर, आक्का वगैरे शिष्य मंडळींसह कष्ट करून मंदिर उभारले. समर्थांनी आपल्या कार्याचे ते मुख्य केंद्र केले. चाफळ येथे श्रीरामाच्या मूर्तींची स्थापना शके १५७० ( सन १६४८ ) मध्ये झाली. निगडीकर रंगनाथस्वामींच्याकडून परत येत असताना अंगापूर येथे मुक्काम पडला असता, समर्थ रामदासाना कृष्णेच्या डोहात ही मूर्ति सापडली. मुसलमानी राजवटीत हिंदु देवताचे विध्वंसन राजरोस होत असल्याने व जवळचे गाव चक्क "रहिमत"पूर होऊन गेल्यामुळे, अंगापूरकरांनी अनुकूल काळ येईपर्यंत देवमूर्ति सुखरूप रहाव्या म्हणून डोहात ठेवल्या होत्या.

चाफळ हा समर्थांचा मठ व सांप्रदायिकांचे आदिपीठ. चाफळच्या परिसरात नवीन हिंदु मंदिर जनतेच्या श्रमातून कल्याणादि शिष्यांच्या सहकाराने सार्वजनिक उपयोगार्थ उभारणे ही सतराव्या शतकाच्या मध्यकाळी अद्भूत नवलाई होती. म्लेंच्छ सत्तेचा नंगा नाच त्या काळी सर्वत्र सुरू होता. समर्थांचे नवीन राममंदिर हे महाराष्ट्र धर्मप्रवर्तनाचे प्रतीक भासले. छत्रपति शिवाजी महाराजांचे चित्त या मंदिराने वेधून घेतले. त्याच्या उभारणीसाठी छत्रपतीनी दोनशे होनांचे सहाय्य दिले व नंतर मठ आणि मंदिर यांच्या खर्चासाठी जावळीच्या खजिन्यातून नेमणूक करून दिली. राज्याभिषेकानंतर तर छत्रपतींनी देवस्थानासाठी सनदच करून दिली. समर्थ शिवरायांच्या हयातीतच श्रीरामाचा उत्सव महाराष्ट्राचा मानबिंदु मानला जाऊ लागला.

समर्थांची श्रीराममूर्ति सुमारे दोन फूट उंचीची प्रवाळवर्णी शाळिग्राम पाषाणाची आहे. श्रीराममूर्तीच्या दोन उभ्या हातात दोन अर्धविकसित कमळे आहेत कमरेपासून खाली डाव्या बाजूस सीता व उजव्या बाजूस लक्ष्मण यांच्या दहा इंचांच्या मूर्ति आहेत. पायाजवळ सात घोडयांची तोंडे अर्धवर्तुळाकार व छोटी मारुतीची मूर्ति चरणतळी कोरली आहे. श्रीराममूर्तिच्या डोकीवर जटा, मुकुट,

आणि चंद्रकोर असलेली अलंकारयुक्त, हास्यवदन व तेज:पुंज अशी ही मूर्ति एकाच पाषाणावरील कोरीव शिल्पकलेचा नमुना आहे.

ही मूर्ति चाफळास आली असता समर्थ उद्गारले

झाला राजा महीचा दिनकरकुळिचा ख्यातवंशावळीचा ।
झाला आत्मा जगाचा ऋषिजनमुनिचा प्राण त्या साधकांचा ।।
झाला दाता दिनांचा जप पशुपतिचा ध्यास त्या वाल्मीकीचा ।
झाला सिंधू सुखाचा सुरवर म्हणती काळ हा राक्षसांचा ।।

आणि समर्थांनी ध्यान केले की-

ध्याये दूर्वादलाभं करधृतकमलं जानकीलक्ष्मणाभ्यां ।
वामे दक्षणेच भागे शरदिजविलसच्यामरैर्वीज्यमानम् ।।
संवज्रांगप्रसूते सितहिमहययुक् स्यंदने तिष्टमानम् ।
रामक्षेत्रं सुपूर्णं दशवदनमुखात्कर्षयन्तं सुतेजः ।।

पहिल्या उत्सवापासूनच रामाची यात्रा "कानु कानुनाती" वर्गणीने करावी असा शिरस्ता समर्थांनी पाडला. श्रीरामाचा उत्सव चैत्र शु. १ पासून चैत्र शु।। ११ पर्यंत चालावयाचा. स्वत: समर्थ उत्सवास नियमितपणे हजर (सन १६०२ सालचा तेवढा अपवाद सोडून ) असत. उत्सवाची कामे रेखीवपणे वाटून दिलेली असत. प्रतिपदेस शहापूरकरांचा, द्वितीयेस वडगावकरांचा, तृतीयेस महागावकरांचा, चतुर्थीस पंचमीस श्री गावकरींचा, षष्ठीस नृसिंहराव अधिकारींचा, सप्तमीस पारगावकरांचा, अष्टमीस बाहेकरांचा, नवमीस समर्थांचा मान असून दशमीस चाफळ दीपाराधना व रथोत्सव व्हावयाचा.

अंगापूर डोहातून आणलेली श्रीरामाची मूर्ती सूर्यवंशीय इक्ष्वाकुकुलावतंस श्रीरामाची असून नंदीग्रामास भरतभेट झाल्यावर राम अयोध्येत प्रवेश करीत असताना, स्वास्थ्य–समृद्धि–विकसनाचे आश्वासन प्रजेला कमल–संकेताने देणाऱ्या शासन–सामर्थ्याची ती प्रतीक आहे. अशी मूर्ति स्मरणार्करिता आली हे समर्थांच्या इच्छित ध्येयास अनुसरून होते. म्हणूनच ती कोणाही सांप्रदायिकाला आणि रामराज्याच्या चाहत्याला, स्फूर्ति होत असते की–

पाहुया चाफळचा श्रीराम ।
रामदास श्रीसमर्थ सद्‌गुरु यांचा निज विश्राम ।।ध्रृ।।

सदा अश्व जोडिल्या रथावर । करद्वयी शुभ कमले सुंदर ।
सुस्मित विलसे मुखचंद्रावर । प्रकटला भक्तास्तव श्रीराम ।।१।।

मांडवि–तटिनीच्या तीरावर । स्मशानभूमी भीतीचे घर ।
तिथे उभविले सुरेख मंदिर । लावुनि भक्ताचे श्रमदाम ।।२।।

ध्यान विराजत गोल शिलेवर । सीता–लक्ष्मण वाम-सव्यवर ।
पुढे मारुती उभा जुळुनि कर । वायति जेथे भक्त विराम ।।३।।

परसत्ताविष दग्ध भूमिवर । महाराष्ट्रिच्या मृत हृदयावर ।
शिंपुनि चैतन्याचे जलधर । गाती वीर रसाचे साम ।।४।।

तृणांकुरे गज मस्त रोधिले । कपिवीरानी राक्षस वधिले ।
जीवेभावे वीर झुंजले । ये तैं स्वातंत्र्याचा राम ।।५।।

**डॉ. ल. शं. भावे, पुणे**

समर्थानी उभारलेल्या चाफळच्या राममंदिराला १९६७ च्या डिसेंबर मधील कोयनेकडील भूकंपाने प्रचंड आघात झाला. मोठमोठे तडे पायापासून शिखरापर्यंत मोठमोठ्या भेगानी धोकादायक ठरले. त्यावेळचे सातारा जिल्हाधिकारी श्री. पद्मनाभन यांचे समवेत मार्च १९६८ मध्ये श्रीमान् अरविंदभाई मफतलाल प्रथम चाफळ येथे आले. चाफळच्या मंदिराचे अनन्य साधारण महत्त्व त्यांनी मनोमन जाणले, व ते मंदिर संपूर्णच नवीन बांधून देण्याचे ठरविले. सज्जनगडच्या श्री–समर्थ–सेवा–मंडळा मार्फत ते काम करावयाचे ठरले. त्यानी सर्व स्वामी, देवस्थानचे १९६० पासून न्यायमंदिराने नेमलेले विश्वस्तमंडळ व समर्थ–सेवा–मंडळ या सर्वांचे संमतीने नवीन मंदिराचा आराखडा निश्चित केला. १९६८ च्या मे पासून मंदिर बांधणीची कार्यवाही सुरू झाली. मठाच्या सोप्यात श्रीराममूर्तीचे तात्पुरते सिंहासन तयार झाले. जुन्या मंदिराचे विसर्जन आणि नव्या मंदिराचे भूमिपूजन झाल्यावर १३ डिसेंबर १९६८ रोजी नव्या मंदिराचा पायाभरणी–समारंभ साजरा झाला. त्यावेळी महाराष्ट्रातील चोखंदळ प्रसिद्धिक समाज हजर होता. नवीन मंदिराचा तळचा सहा फुटांचा चौथरा जुन्या मंदिराच्या काळ्या दगडांचा व वरचे बांधकाम धांगध्रा व पोरबंदर येथून शंभर शंभर टन आणलेल्या पांढऱ्या दगडाचे झाले आहे. मंदिराचे तीन विभाग आहेत:– गाभारा, मधला मोठा मंडप व पुढील छोटा मंडप. गाभाऱ्यावर सुमारे ७५ फूट उंचीचे शिखर व पुढील मंडपावर डेऱ्याच्या आकाराची दोन लहान शिखरे आहेत. मधल्या मंडपाच्या दक्षिणोत्तर दोन्ही बाजूस लहान चौक्या आहेत व त्यावरही लहान शिखरे आहेत. या शिखरांच्या आतील व बाहेरील बाजूवर अप्रतिम कोरीव काम केले आहे. मधल्या मंडपाच्या खांबावर अष्ट विद्याधर व नवग्रहाच्या प्रेक्षणीय मूर्ति कोरल्या असून बाहेरील मंडपाच्या खांबावर दशावतारापैकी विरामकृष्ण आठ अवतार आणि सप्तमातृका व गणेश यांच्या मूर्तींचे सुंदर शिल्पकाम प्रथम दर्शनीच पहावयास सापडते. मंदिराच्या भिंतीवर बाहेरील बाजूस अघोरेश्वर, गजा[illegible]न, अष्ट दिक्पाल, ब्रह्मा, विश्वकर्मा, सूर्य, राम व कृष्ण यांच्या उठावदार मो[illegible]ठ्या मूर्ती प्रदक्षिणा करताना पहावयास सापडतात. या खेरीज सहा दरवाज्याच्या [illegible]र्शनी बाजूस जय, विजय, चंड प्रचंड, धाता, विधाता, यांच्याही मूर्ती कोरून दर–

वाजाची शोभा वाढविली आहे. या सर्व कामासाठी चाळीस गुजराती व राजस्थानी कारागीर व पन्नास स्थानिक कर्मचारी तीन वर्षे अखंड परिश्रमसेवा करीत होते. गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र यांचे सेवाभावी ऐक्य राममंदिराच्या शिल्पात साकार झाले आहे. मंदिराच्या शिल्पाची जबाबदारी श्री. प्रभा-शंकरभाई सोनपुरा या अखिल भारतीय कीर्तीच्या शिल्पज्ञावर सोपविली होती. मंदिराच्या आतून संगमरवर केले आहे. समर्थ-सेवा-मंडळातर्फे खजिनदार मामा काणे व सेक्रेटरी शंकरराव जोशी यांनी पंधरा लाख रुपये खर्चाची हिशोबी आर्थिक जबाबदारी सांभाळली. या मंदिराची व्यवस्था पाहण्यासाठी "श्रीराम देवस्थान ट्रस्ट चाफळ" ही संस्था रजिस्टर झाली असून तिच्या अध्यक्ष साताऱ्च्या राजमाता सुमित्राराणी साहेब आहेत. श्रीमान अरविंदशेठ उपाध्यक्ष आहेत. इतर सदस्यात श्री योगींद्रभाई, समर्थ सेवा मंडळाचे आण्णाबुवा कालगावकर, साताऱ्याचे जिल्हाधिकारी, अधिकारी स्वामी व मॅनेजिंग ट्रस्टी बन्याबापू गोडबोले आहेत. मंदिराच्या दक्षिण बाजूने मांड नदी वाहते तिला समर्थांनी घाट बांधला होता.त्यालगत आता मंदिरास दीडशे फूट लांब व पंचेचाळीस फूट उंच एवढा तट बांधला आहे.तसाच तट उत्तर बाजूनेही आहे. दक्षिण तटाजवळ भव्य सभागृह, स्वामी, साधक, पुजारी, अतिथी यांची निवासस्थाने यांची योजना आहे.

मंदिर परिपूर्ण होत आले. औद्योगिक विकासाची योजना जाहीर झाली. १९७१ सालचा पावसाळा सुरू झाला. श्रीसमर्थस्थापित मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याचे ठरले. त्याबरोबरच लोकाना अन्य देवळातून जसे देवताबोध होऊन दर्शन होते, तसे राम-सीता-लक्ष्मणाचे दर्शन होण्याची सोय व्हावी अशा लोक-सूचना आल्यामुळे कै. आबासाहेब स्वामी व प. प. भ. श्रीधरस्वामी महाराज यांच्या संमतीने व सर्व विश्वस्तांच्यासंमतीने नवीन मंदिरात नव्या संगमरवरी मूर्ती स्थापित करण्याचे ठरले. त्यामुळे श्रीसमर्थांना धोका आहे. चाफळचे श्रीराम रहात नाहीत अशी आरोळी मारावयास कोणी गोरे यानी सुरवात केली. काही विद्वान व्यक्तींची दिशाभूल करून एका पत्रकावर त्यांच्या सह्या घेऊन त्यानी ते पत्रक प्रकाशित केले. अशा विद्वान व्यक्तीमध्ये सांगलीचे पं. ईश्वरशास्त्री दीक्षित होते. श्रीमान अरविन्दभाई मफतलाल यांचेशीही त्यांनी पत्रव्यवहार सुरू केला.सौजन्यमूर्ती श्रीमान अरविन्दभाईनी समर्थ-सेवा-मंडळाला श्री.गोरे यांना भेटून त्यांचेशी बोलणी करण्याचा सल्ला दिला.त्याप्रमाणे सर्वश्री अण्णाबुवा कालगावकर,दिनकरबुवा बिवलकर,अण्णा गाडगीळ व वसंत वैद्य हे प्रथम सांगलीस पं. ईश्वरशास्त्री दीक्षित यांना भेटले. चर्चेमध्ये असे दिसून आले की गोरे प्रभृतीनी निव्वळ खोटया गोष्टी सांगून त्यांची दिशाभूल केली आहे. श्रीसमर्थ स्थापित श्रीराम मूर्तीची प्रतिष्ठापना नव्या मंदिरात होणारच नाही असे धडधडीत खोटे विधान पं. दीक्षितांना त्यांनी ऐकवले होते. सत्यकथन सविस्तरपणे केल्यानंतर त्यांचे समाधान झाले व आपला गैरसमज दूर होऊन मूर्तिप्रतिष्ठापनेच्या या नव्या योजनेशी आपण सहमत आहोत असे स्वहस्ते

लिहिलेले पत्र त्यांनी समर्थ सेवकांचे स्वाधीन केले. दुसरेच दिवशी २१ सप्टेंबर १९७१ ला मिरजेचे माजी नगराध्यक्ष श्री. स. भा. जोशी यांचेसह मंडळी मिरजेस सर्वश्री साठे, करमरकर, गोरे इ. ना भेटली. श्री. साठे यांचे पूर्ण समाधान झाले. श्री. करमरकर यांनी तसे वरवर दाखविले व श्री. गोरे यांनी आपला विरोध कायम राखला. तरीही श्रीमान् अरविन्दभाई चाफळ येथे आले. त्यांनी श्री. गोरे यांचेशी पंधरा वीस मिनिटे चर्चा करून त्यांना आपली भूमिका समजावून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तथापि समर्थांचे हृद्गत केवळ आपणासच गवसले आहे व समर्थ निष्ठेचे आपणच रखवालदार आहोत या भ्रमात श्री. गोरे फिरत राहिले. चाफळहून मिरजेस परत गेल्यानंतर श्री. गोरे यांनी मूर्तिस्थापनेच्या योजनेविरुद्ध मोहीमच उघडली. त्यांना रामेश्वराचे श्री. पांडे यांची उघड व चाफळच्या एका स्वामींची छुपी साथ मिळाली व गोऱ्यांची धिटाई वाढली.

श्री. गोरे यांच्या या अरण्यरुदनाचा चाफळ येथील चालू असलेल्या सत्कार्यावर काहीच प्रभाव पडू शकला नाही. इथे येणारा प्रत्येक भाविक श्रीमान अरविंदभाईना अंतःकरणापासून धन्यवादच देऊ लागल्याचे पाहून सातारा जिल्हा न्यायालयात श्री. गोरे व करमरकर यांनी दिवाणी दावा दाखल करून अशी मागणी केली की नव्या मंदिरात श्रीसमर्थस्थापित मूर्ति खेरीज अन्य कोणत्याही मूर्ती बसवू नयेत; मे १९७२ रोजी होणाऱ्या प्रतिष्ठापनेच्या समारंभास मनाई हुकूम द्यावा. अशा तऱ्हेचा दावा दाखल झाला आहे हे वृत्त समजताच चाफळच्या परिसरातील सर्व खेड्यातील सात्विक संताप उफाळून आला व २५ एप्रिल १९७२ ला चाफळ येथील श्रीराममंदिरात चाफळ भागातील सर्व खेडूतांची प्रचंड जाहीर सभा झाली. अनेक गावच्या पुढाऱ्यांनी व सरपंचांनी गोरे प्रभृतींचा तीव्र शब्दात धिःकार केला व श्रीमान् अरविंदभाईंच्या सर्व योजनाना मनापासून पाठिंबा जाहीर केला. नंतर ३० एप्रिल रोजी श्रीमान् अरविंदभाई यांचा चाफळ भागातील सर्व ग्रामस्थातर्फे प्रचंड जाहीर सत्कार झाला. सर्व भागातून चार पाच हजार लोक हजर होते. श्रीमान् अरविंदभाईंचे हृदय या सत्काराने हेलावून गेले. त्यांनी याप्रसंगी संयमपूर्ण व हृदयस्पर्शी भाषण करून रामकृपेने सर्व व्यवस्थित होईल असा विश्वास प्रगट केला.

२६ एप्रिल रोजी सातारा जिल्हा न्यायालयात न्या. श्रीमती कुसुमताई वेल्हाळ यांचेपुढे दाव्याची सुनावणी झाली. त्यानंतर ५ मे रोजी पुढे कामकाज सुरू झाले. कऱ्हाडचे श्री. दादासाहेब अळतेकर व पद्मश्री बाबूराव गोखले यांचेसह चाफळ भागातील दहा समर्थभक्तानी प्रतिज्ञेवर जबाब दिला की जुन्या मूर्तीबरोबर नव्या मूर्ती बसवल्याने समर्थभक्तांच्या भावना दुखवल्या जाण्याचे काहीच कारण नाही. सांप्रदायाची शिकवण न आचरल्यानेच ती दुखावली जाते.

१५ मे रोजी वादींचे वकील श्री. का. म. देशपांडे व प्रतिवादीचे वकील श्री. भागवत व श्री. दाते यांची भाषणे झाली. श्रीराम-देवस्थानचे कार्यकारी

विश्वस्त श्री. रा. ना. गोडबोले यानी आपले लेखी निवेदन सर्व विश्वस्तांच्यावतीने सादर केलेच होते. अखेर १८ मे रोजी कोर्टाने आपला निकाल दिला. त्यात वादींनी केवळ आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी हा दावा केला असा निःसंदिग्ध कौल दिला. असा दावा लावण्याचा कोणताच अधिकार वादींना नाही व भावना दुखविण्याचा प्रश्न या कोर्टाच्या कक्षेत येत नाही असे स्पष्ट शब्दात सांगून गोरे यांच्या वृत्तीवर विदारक प्रकाश पाडला. या निकालावर मुंबई हायकोर्टात अपील झाले पण दि. २० डिसेंबर १९७२ रोजी खर्चासह फेटाळले गेले. सर्व समर्थभक्तांना व चाफळ परिसरातील जनतेला संपूर्ण समाधान लाभले आहे. त्यांच्या मूक भावनांना शब्दरूप मिळाले आहे.

**शिंगणवाडीस** चिंचेखाली सन (१६४९) शके १५७१ मध्ये समर्थांचा अनुग्रह शिवाजीराजाना झाला. तेथे श्रीसमर्थांचा मारुती असून चाफळच्या प्रताप-मारुतीपासून त्याचे ओझरते दर्शन घेता येते. येथे समर्थांनी उधळलेली गुरुदक्षिणेची नाणी परवापरवापर्यंत सापडत.

# शिवथर घळ

श्रीसमर्थ रामदास शिवथरघळ ऊर्फ सुंदर मठ येथे " दासबोध " लिहिण्यासाठी दहावर्षे मुक्काम करण्याच्या इराद्याने गेले होते. त्या श्रीशिवथर मठाचे सौंदर्य मुकुंद बुवा रामदासी ( गोरे ) असे करतात-

सुंदर गिरिवर शिवथर सुंदर मठ हा जेथे ॥
सुंदर नरवर सुंदर गुरूवर सुंदर रघुविर तेथे ॥१॥
सुंदर वन हें सुंदर जल हें सुंदर वेलीवृक्ष ॥
सुंदर जन तें सुंदर मन तें सुंदर चरणीं दक्ष ॥२॥
सुंदर माया सुंदर काया सुंदर वाया सारे ॥
सुंदर छाया सुंदर राया सुंदर ध्याया यारे ॥३॥
सुंदर धार्मिक सुंदर सात्विक सुंदर भक्तजनांचा ॥
सुंदर पालक सुंदर चालक सुंदर गुरुवर त्यांचा ॥४॥
सुंदर सद्गुरु सुंदर शिष्यही सुंदर स्वानंद ॥
सुंदर सज्जन सुंदर निर्जन सुंदर सुखकंद ॥५॥

सुंदरमठ महाड तालुक्यात वरंध घाटात महाडपासून १५ मैलावर आहे. हे लेणे शिवथर गावाजवळच्या डोंगराच्या पायथ्याशी आहे. घळ लेण्याप्रमाणे खडकात कोरली असून आत खोल्या आहेत. घळीच्या शेजारी वरून पाण्याचा झोत पडत असतो. वर डोंगरावर चंद्रराव मोऱ्यांच्या वाड्याचे

अवशेष आहेत. या घळीतल्या सुंदर मठात रामदासानी आपल्या सांप्रदायाचा ग्रंथराज जन्मास घातला. १९३० साली ही घळ उकरून साफ करण्यात आली. शिवथर येथे जाण्यास भोरकडून हिरडोशी, मांझिरी, पारमाची यामार्गे तरी जाता येते किंवा महाडहून बीरवाडी, वरंबा, पारमाची यामार्गे जाता येते. शके १५७६ ते १५९८ त समर्थांचा मुक्काम या घळीत वरचेवर होई. कारण चाफळ मठाच्या खालोखाल सुंदर मठाला समर्थ महत्त्व देत होते. चौफेर डोंगराचा घेर असून मध्ये कुंभे आंबे–कसबे अशी तीन शिवथर गावे आहेत. कसबे शिवथरच्या पाठीमागील डोंगराचे रांगेत घळ आहे. सुमारे सव्वाशे फूट लांब व पाऊणशे फूट रुंद ती घळ आहे. घळीपासून सुमारे फर्लांगावर चंद्रराव मोरे यांचा वाडा आहे. समर्थ घळीत गेले तेव्हा सर्व जावळी प्रांत मोरे यांच्या हुकमतीत होता. कोकणपट्टी ताब्यात घ्यावयाची तर शिवथर खोरे ताब्यात आले पाहिजे! त्यास मोरे याना अनुकूल करून घेतले पाहिजे; नाही तर त्यांचा काटा तरी दूर केला पाहिजे, अशी राजकीय परिस्थिती होती. समर्थ शके १५७६ त शिवथर घळीत जाऊन राहिले आणि शके १५७८ त शिवरायानी मोरे याना उडविले, हा इतिहास आहे. समर्थ शिवथर घळीत गेले त्यावेळी " कडे कपारे दुर्कुटे। पाहो जाता भयाचे वाटे। ऐसे स्थळी वैभव दाटे। देणे रघुनाथाचे ।। १ ।। अंतर्निष्ठ अखंड ध्यानी । सन्निध रामवरदायिनी। विश्वमाता त्रैलोक्यजननी । मूळमाया ।।" असा त्यांचा निर्धार होता. म्हणूनच " सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण । सुंदर मठी देव आपण । वास केला ।। १ ।। गिरीकंदरी सुंदर वन । सुंदर वाहाती जीवन । त्यामध्ये सुंदर भुवन । रघुपतीचे ।। २ ।। होऊ शकले. येथे शके १५९७ सन १६७५ मध्ये शिवरायांनी रामनगर वसवून बारा वर्षे जकातीची माफी दिली होती.

**दहिफळ** ता. परतुर जि. परभणी येथे श्रेष्ठ उर्फ रामी रामदास म्हणजेच समर्थांचे थोरले बंधु गंगाधरपंत यांची समाधी असून तिचा जीर्णोद्धार साताऱ्याच्या समर्थ सेवामंडळाने १९७१त समाधि–संरक्षक मंडपी उभारून केला आहे. श्रेष्ठांच्या समाधि–वृंदावनास निजामशाहीतून ऐंशी रुपयांचे वार्षिक वतन असे.

## परळी

सज्जनगड तालुके सातारा १७', ३५" उ. ७३'–००" पूर्व लोकसंख्या १२००; पठारापासून १०४५ फूट उंच साताऱ्याचे नैऋत्येस सहा एक मैलावर असून किनाऱ्याच्या भोवती व आसमंतात यवतेश्वर, नानका वगैरे सह्याद्रिच्या टेकड्या आहेत. सातारा ते परळी गावापर्यंत रस्ता पक्का डांबरी असून बारामहिने वाहतूक चालते. गावातून परळी किल्ल्यावर चढावयाचा रस्ता समर्थ भक्तानी रुंद व सुमारे साडे आठशे पायऱ्यांचा बनविला आहे. किल्ल्याच्या नैऋत्येस असलेल्या दोन प्रवेशद्वारातूनच किल्ल्यात शिरण्याचा मार्ग असून, किल्ले परळी

अशीच त्याची इतिहासात ख्याती होती. सन १६६२ मध्ये अफझुलखानाचा पुत्र फाजलखान येथे किल्लेदार होता. पण छत्रपति शिवाजी महाराजानी २ एप्रिल १६७३ त त्याचा कबजा केल्यावर समर्थ रामदासांचा तेथे कायम रहिवास झाला व तेथे साधुसंत येऊन मक्काम करू लागल्यापासून तो सज्जनगड म्हणूनच पुढे लोकस्मरणात व लोकभाषेत प्रचलित झाला. सदर किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार खडकाच्या उभाराने झाकले असून तेथे होणाऱ्या हालचालीची देखभाल वरचे बाजूचे प्रवेशद्वारातून नेटकेपणाने करता येते. किल्ल्यावर एक मशीद असून काळाच्या ओघात ती पंथास लागली असली तरी "कैपक्षी परमार्थी" असलेल्या शिवसमर्थांनी अगर त्यांच्या अनुयायानी तिला चुकूनही "ढका" लावला नाही. परळी किल्ल्याच्या मध्यभागी श्रीरामाचे रेखीव बांधणीचे देवालय असून सुरक्षित वसाहती आहे. किल्ल्याचा पाणीपुरवठा तेथील खडकातून असलेल्या तळ्यातून शिलाहार आमदानीपासून होत असतो. राममंदिराचे उत्तरेस असलेल्या तळ्याचे पाणी उत्तमच असून किल्ल्यावरील लोकवस्तीची घरेही नीटनेटकी आहेत. किल्ल्यावर रामनवमीचा उत्सव व समर्थ–पुण्यतिथि म्हणजे दासनवमीचा उत्सव होत असतो. त्यावेळी कमीत कमी सहा हजार यात्रेकरूंची सोय देवळाभोवतालच्या ओवऱ्यातून व मुद्दाम बांधलेल्या धर्मशाळेतून होत असते. महाशिवरात्रीलाही किल्ल्यावर यात्रा जमते. किल्ल्याजवळ व पायथ्याच्या परळी गावच्या उत्तरेस उरमोडी नदी वहात असून किल्ला उभा असलेल्या डोंगरकपारीच्या भोवती काही काही वसाहती तर चार चार घरांच्याही आहेत. किल्ल्यावरील राममंदिराच्या खालील तळघरातच समर्थ रामदासांची समाधि असून समर्थांच्या पाठीमागे त्यांची शिष्या आक्काबाई व दिवाकर गोसावी कारभार करीत असता छत्रपति संभाजी महाराजानी राममंदिराची सभामंडपासुद्धा उभारणी नि बांधणी रामचंद्रपंत अमात्याकरवी सन १६८१ मध्ये केली. सदर मंदिराची दुरुस्ती १८०० व १८३० साली वाई तालुक्यातील शिरगावच्या परशुरामभाऊनी केल्याचा दाखला असून यवतेश्वराच्या वैजनाथ भागवतानी मंदिराच्या ओवऱ्या बांधून दिल्या, असाही इतिहास आहे. पूर्व इतिहासात नमूद आहे की–

१६९९ मध्ये सातारा किल्ला औरंगझेब लढवित असता त्या किल्ल्याला परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी परळीवरून रसद पुरवी. १७०० च्या २१ एप्रिल रोजी औरंगझेबाने सातारा सर केल्यावर त्याची वक्रदृष्टी परळीवर वळली. ३०।४।१७०० रोजी औरंगझेबाने सज्जनगडावर सुलतानदवा ( निकराचा हल्ला ) केला. तो भिकाजी जाधव व गोविंद महादेव गोडबोले यानी परतविला. प्रारंभापासून दीडमहिन्याच्या वर औरंगझेबाला परळीत परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीशी सामना करावा लागला. १५।६।१७०० रोजी किल्ला तंग होता. औरंगझेबाने परळीचा कबजा केला त्यास नौरस तारा असे नाव दिले. राममंदिर त्याने उध्वस्त केले. पण समर्थांच्या राममूर्ति अगोदरच वासोट्यावर सुखरूप पोचविल्या असल्या कारणाने व समर्थांची

समाधी शिळेने बंदिस्त करून ठेवली असल्या कारणाने ती शाबूत राहिली. औरंगजेब भूषणगडास जाण्यासाठी परळीहून उरमोडीत उतरला असता परशुराम त्र्यंबकने त्याला त्राहीभगवान केले. १७९० मध्ये नहिम दुर्ग सरकाराचा एक परगणा म्हणून परळीची नोंद असून वसूल २२५०० रु. चा होता. १८१८ मध्ये ब्रिटिशानी कबजा केल्यावर काही काळ एक सैन्याची भारतीय तुकडी येथे "पक्का बंदोबस्त" राखण्यासाठी ठेवली होती. १८५७ साली परळीला लूट आणि गडबडही झाली पण इराणच्या लढाईवरून परतलेल्या गोऱ्या सैन्यापैकी एक तुकडी तेथे येताच, सर्वत्र सामसूम झाले. रंगो बापूजी गुप्ते त्यावेळी सहामहिने परळीवर राहिले होते आणि भोरकडून येणाऱ्या उठाव-वाल्यांचा आणि सातारा येथील आपल्या साथीदारांचा मेळ घालून इंग्रजांची जिरवण्याचा त्यांचा बेत होता. १९०६ साली लो. टिळकांचे सज्जनगडावर स्वदेशीसंबंधी व्याख्यान झाले हेही प्रसिद्ध आहे.

परळी ऊर्फ सज्जनगड हा किल्ला समुद्रसपाटीपासून तीस हजार फूट उंचावर असून तो शंखाकृति आहे व त्याचा घेर अठराशे चोवीस यार्ड आहे. सन १६७६ पासून तरी यास अतिशय लष्करी महत्त्व आले होते. याचे प्राचीन नाव आश्वलायनगड असून त्याचाच अपभ्रंश म्हणून अगर तेथे पुष्कळ अस्वलांची वसती असे म्हणून लोकभाषेत तो अस्वलगड म्हणूनही उल्लेखला जात असे. पश्चिमेकडून खेड-चिपळूणकडे, उत्तरेकडून महाबळेश्वर, प्रतापगड, रायगडकडे, दक्षिणेकडून कळंब्याचे घळीकडे व चाफळकडे, ईशान्येकडून सातारच्या किल्ल्याकडे व नैऋत्येकडून चार हजार माणसे बसतील अशा मोरघळीकडे लष्करी दृष्टयामुद्धा सज्जनगडावरून देखभाल ठेवता येत असे.

अशा या सज्जनगडावर समर्थरामदासानी सन १६५० पासूनच ठाण मांडले होते. तेथे त्यांनी तटाच्या सान्निध्यात आणि मशीदीच्या सामने अंगापूरहून आणलेल्या भवानी देवीची ( अंग्लाईची ) स्थापना केली. आणि तेव्हापासून शिवछत्रपतींच्या भेटीगाठी त्यांना कितीतरी सुलभ करता आल्या आणि संतसज्जनांच्या ये-जा सुरू झाल्या. म्हणूनच त्याचे वर्णन आढळते की-

"सह्याद्रीगिरीचा विभाग विलसे मंदारशृंगापरी ।
नामे सज्जन तो नृपे वसविला श्री ऊर्वशीचे तिरी ।।
साकेलाधिपती, कपी, भगवती हे देव ज्याचे शिरी ।
तेथे जागृत रामदास विलसे लोकास जो उद्धरी ।। "

रामदास स्वामींच्या समाधीला हिंदु लोक देवाप्रमाणेच पूज्य समजून समर्पण बुद्धीने तिची पूजा करीत आले आहेत.

"अनन्य राहे समुदाय । इतर जनास उपजे भाव ।
ऐसा आहे अभिप्राय । उपासनेचा ।।"

ते आपल्याही प्रत्ययास यावे अशी पूजकांची मनीषा असते. समाधीवरील राममंदिराच्या दक्षिणेस समर्थांचे शेजघर असून किल्ल्याच्या नैऋत्येस मारुती आहे.

किल्ल्यात प्रवेश करण्याच्या दोन महाद्वारावर शिलालेख आहेत, ते आदिल-शाही रेहान याच्या नावाचे आहेत. त्याजवर सन नाहीत. महंमद आदिलशहा (१६२७ ते १६५६) याचे कालात एक मलिक रेहान व दुसरा सिद्धी रेहान होते. दोघेही पराक्रमी असून मलिक रेहान यास मदार-उल्-महास ही पदवी होती. आतील दरवाजाचे कोपऱ्यात असलेल्या शिलालेखाचा अर्थ इतिहाससंशोधक ग. ह. खरे यानी असा दिला आहे की-"ऐश्वर्य तुझ्या दारातून तोंड दाखवीत आहे. हिंमत त्याच्या (रेहानच्या) कामामुळे सर्व फुलाना प्रफुल्लित करीत आहे. तू विवंचना दूर होण्याचे स्थान आहेस, परंतु पुन्हा विवंचनायुक्त आहेस. तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात" किती अर्थपूर्ण आहे हा शिलालेख! सन १६७३ ते १६८२ व नंतर १७०० पर्यंत ऐश्वर्य किल्ल्याचे दारातून सर्वांना तोंड दाखवित होते. या स्फूर्तिकेंद्रातून शौर्य, वीर्य, कर्तृत्व दाखविणारास उल्हासच उल्हास मिळे. समर्थ सर्व विश्वाची चिंता वहात असल्यामुळे त्यांच्या अखंड विश्वविवंचनेचे हे स्थान होते. रेहानचे शब्दास सार्थकता आली! म्हटलेच आहे की-

"जेथे राजा तेथे कटक । जेथ सौजन्य तेथ सोयरिक ।
अग्नि तेथे दाह निःशंक । ठेविलाचि असे ।।१।।

दया तेथे धर्म । धर्म तेथे सुखाचे धाम ।
सुख तेथे पुरुषोत्तम । अखंड जैसा ।।२ ।।

वसंत तेथे वन । वन तेथे सुमन ।
सुमन तेथे संचारण । अमर वर्गाचे ।।३।।

जेथे समर्थ तेथे ज्ञान । ज्ञान तेथे आत्मदर्शन ।
आत्मदर्शनी समाधान । आहेच आहे ।।४।।

भाग्य तेथे विलास । सुख तेथे उल्हास ।
जेथे सूर्य तेथे प्रकाश । स्वाभाविकच वसे ।।५।।

तैसे चारही पुरुषार्थ । ज्याच्या योगे झाले सनाथ ।
तो परमात्मा जेथ । तेथ नांदते श्रीलक्ष्मी ।।६।।

तो हा सज्जनगड परमपवित्र । समर्थकृपे झाला विख्यात ।
येथील मृत्तिका- पाषाणही समस्त । पवित्र असती ।।७।।

जैसा राजसूय यज्ञी मुंगुस लोळला । तो सर्व सुवर्णमय झाला ।
तैसा श्रीसमर्थचरणी जो लीन झाला । तो सद्गतीस पावे निःसंदेह ।।८।।"

सज्जनगडच्या आग्नेय कोनातील पिसा बुर्जावर शिवसमर्थांची खलबते होत. आंग्लाईचे समोर आग्नेय कोपऱ्यात समर्थ जपास बसत. ही स्थाने जशी मंगल, तशाच तंजावरचे कारागीराने तयार केलेल्या मुख्य मंदिरातील श्रीराम,

लक्ष्मण, सीता या मूर्तिही डोळ्यात भरणाऱ्या. शके १५२६ ( स. १६०४ ) मध्ये श्रीसमर्थांच्या वडिलांनी कुलकर्णीपणाची रजा घेऊन जे श्रीरामचरणी वाहिले ते पितळी कलमदान श्रीरामसिंहासनावर रामचरणाजवळ आढळते व बाणेदारपणा शिकवते. समर्थ–समाधिपाठीमागे पितळी पेटीत श्रीसमर्थांच्या पादुका, बाजूस समर्थहातीची काठी, कुबडी व बुद्धिबळाची पितळी मोहरी आहेत. मठातील शेजघराचे मध्यभागी धुनि, तिचे पूर्व बाजूस ज्यावर माघ व॥ ५ मी श. १६०३ रोजी समर्थांनी तंजावरच्या राममूर्ति पूजिल्या ते सिंहासन, शिवछत्रपतीनी समर्थांस अर्पण केलेला पितळी खुरांचा पलंग, समर्थांचे व्याघ्रांबर, वल्कल, शिरोभूषण, कुबडी, पिकदाणी आहे, कल्याणस्वामी उरमोडीहून भरून आणीत तो हंडाही येथे आढळतो.

मंदिराचे पाठीमागील ओवरीत नारायणमहाराज सासवडकर, आणि वायव्य कोपऱ्यात वेणाबाई (निर्वाण चैत्र शु. १४ शके १६३० ) यांचे समाधी–वृंदावन आहे. मंदिरापुढील बागेचे उत्तर अंगास आक्का यांची मठी असून तेथेच त्यांची समाधी (कार्तिक शु. १ शके १६४३) आहे. किल्ल्याचे नैऋत्य कोपऱ्यात या धाब्याचे मारुतीचे शेजारी दक्षिण बाजूस तटाखाली अवघड कड्यात एक गुंफा आहे. धाब्याचे मारुतीचे मागील एक फर्लांगावर समर्थांनी ब्रह्मपिसे पांघरून शिष्यांची परीक्षा घेतली व उडी टाकली ते स्थान पश्चिम तटावर आहे. समर्थांची उडालेली छाटी आणण्याकरिता कल्याणानी जेथून उडी घेतली ते स्थान पूर्व तटावर आहे. छत्रपति शिवाजी महाराजांच्या अवतारसमाप्तीनंतर समर्थांनी ज्या घळीत सहा महिने वसती केली ती पूर्वेकडील तटाचे खाली आहे. सज्जनगड पाहताना, या सर्व स्थानाला भेटी देऊन स्फूर्ति घेतल्याशिवाय कोणाही सांप्रदायिकाला अगर इतिहास–भक्ताला समाधानच नसते.

चाफळ- सज्जनगड संस्थान म्हणजे समर्थसांप्रदायाची चाफळ येथील राम– मारुति व परळी (सज्जनगड) येथील राम–मारुति–भवानी ( आंग्लाई ) देव, रामदासांची समाधि त्यांचे उत्सव, नित्य–नैमित्तिक उपासना आणि महाराष्ट्रधर्म ( म्हणजे सांसारिक जीवनातील कर्तव्ये पार पाडतानाही अध्यात्म राखावयाचा ) यांच्या प्रचारासाठी सर्वत्र संचार करून शिष्यपरंपरा वाढविणारी संस्था. या संस्थेचे मूळ उत्पादक श्री समर्थ रामदास स्वामी ( जांब येथील नारायण सूर्याजी ठोसर ) हे संस्थापक असून त्याना त्या संस्थेच्या कार्यासाठी छत्रपति शिवाजी महाराजानी सनद देऊन काही इनाम दिले. ते ब्रिटिश रियासतीतही इनाम कमिशनने कायम केले. समर्थांच्या पाठीमागे या सर्व संस्थानाची व्यवस्था त्यांची शिष्या आक्काबाई (चिमणाबाई)देशपांडे कऱ्हाडकर पहात होत्या.एकूणचाळीस वर्षे व्यवस्था पाहिल्या वर, त्यानी जांबहून समर्थ रामदासांचे थोरले बन्धु ( गंगाधर सूर्याजी ठोसर) रामीरामदास यांच्या वंशातील त्यांचे नातू गंगाधरपंत रामसांप्रदायी असले कारणाने

आणला व त्यांच्याकडे सांप्रदायाचे मुख्यपद ऊर्फ स्वामीत्व सोपविले. समर्थ सांप्रदाय हा शिष्यपरंपरेनेचालणारा सांप्रदाय असून त्यातील चाफळ सज्जनगडसंस्थान हे प्रमुख संचालक आहे. येथील संचालकपद समर्थशिष्या आक्काबाईंनी रामीरामदासांच्या वंशजापैकी तत्कालीन वडील मुलाकडे सोपविल्यापासून, त्याच वंशातील मंडळी-कडे वंशपरंपरेने चालत आले आहे याचे कारण समर्थरामदासांच्या स्वत:च्या शिष्य आक्काबाई यानी समर्थ आणि त्यांचे बंधु यांच्या चरित्राबद्दल व चारित्र्याबद्दल जो कृतज्ञतापूर्वक आदर दाखवला त्याच आदराची परंपरा पुढे चालू ( राजघराण्यांच्या धर्तीवर) राहिली. इतकी की चाफळ सज्जनगड संस्थानचे (अधिपतित्व) स्वामित्व ज्याच्याकडे असेल तो सांप्रदायिकाकडून रामदासस्वामीइतकाच परमपूज्य मानला जाऊ लागला. [ फर्स्ट क्लास सब ज्यु. डि. सातारा सिव्हिलसूट नं. १५२२।३२ मधील नि. ४२२, ( चाफळचे विष्णू रामचंद्र ऊर्फ आण्णासाहेब देशपांडे साक्ष ) नि. ४२३ ( चाफळचे गणेश रामचंद्र ढवळे साक्ष ), नि ४२४ ( साताराचे विनायक पर्शुराम साक्ष ), नि. ४२५ ( साताराचे श्रीधर विष्णु ऊर्फ तात्यासाहेब जोशी साक्ष ), नि. ४३३ ( कऱ्हाडचे आमदार लक्ष्मण महादेव देशपांडे साक्ष ) पहा. ]

ठोसरांच्या घराण्यात हे स्वामीत्व वंशपरंपरेने चालू राहिले तरी समर्थ-सांप्रदाय हा शिष्यपरंपरेचा सांप्रदाय असल्याकारणाने, स्वामीपदावर आरुढ होणाऱ्या व्यक्तिला स्वता समर्थरामदासांच्या परळी येथील समाधिजवळ जाऊन समाधिवर कोरलेल्या असलेल्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करावाच लागतो. तो समर्थसमाधीची यथासांग पूजा करून वाचावयाचा व जपावयाचा असतो. तो जप पूर्ण झाल्यावर, जप करणारा ठोसरवंशीय शिष्यदीक्षा पावला असे समजण्यात येते. मग तो भगवी-वस्त्रे परिधान करून समर्थरामदासांच्या पारंपरीक अधिष्ठानास ऊर्फ गादीला नम-स्कार करतो आणि त्यावर आरूढ होतो. मग तो अधिकृत स्वामी ऊर्फ चाफळ-सज्जनगडसंस्थानचा म्हणजे समर्थसांप्रदायाच्या मुख्य मठाचा अधिपति होतो. सर्व सांप्रदायिक व सांप्रदायाचे सहानुभूतिक आणि जनतेसह शासन मग त्यास त्याच प्रतिष्ठेने मानते.

शके १६०३ च्या माघ व. ९ मीस (२२ जानेवारी १६८२) समर्थ अनंतात लीन झाल्यावर चाफळ सज्जनगड देवस्थानाचा कारभार समर्थ शिष्या आक्का यांनी चालविला. सव्वा दोन तपानंतर त्यानी समर्थाचे पुतणे रामजींचे सुपुत्र गंगाधर यांच्याकडे ती देवस्थाने सुपूर्त केली. तेथपासून त्यांचेच वंशजाकडोन त्या संस्थानाचा योगक्षेम पाहिला गेला. पण १९२८ साली (गंगाधर) बापूसाहेब स्वामी यांच्या पुत्रामधील कलहामुळे व संस्थानाला खूप कर्ज झाल्यामुळे सर्व कारभार सातारा जिल्हा 'कोर्ट ऑफ वॉर्डसकडे' सोपविला. वादामुळे उत्सव मंदिरे, मठचा सर्वांना अवकळा आली. वादांचा अखेर निकाल १९५७ मध्ये मुंबई हायकोर्टाने

सर्वांच्या संमतीने केला. त्याप्रमाणे संस्थानची सर्व मालमत्ता धार्मिक, सार्वजनिक विश्वस्त-निधीच्या ताब्यात असावी; उत्पन्नाचा ⅓ कर्जफेडीसाठी, ⅓ देवस्थान खर्चासाठी, ⅓ स्वामींच्या खर्चासाठी असावा; अधिकारी स्वामीपणाचा उपभोग चार बंधूना दोन दोन वर्षांचे पाळीने मिळावा, असे ठरले. सातारा जिल्हा न्यायालयाने १९६० मध्ये विश्वस्त-मंडळ नेमले. कर्जफेड झाल्यावर उत्पन्नाचे वसूलीचा खर्च वजा जाता, राहिलेल्या शिलकेच्या ६० टक्के देवस्थानच्या खर्चासाठी व ४० टक्के स्वामींचे खर्चासाठी अशी योजना झाली.

**अकरा मारुति**– समर्थांनी स्थापलेले अकरा मारुति हेही सांप्रदायिक तीर्थ-स्थाने मानतात. ते शहापूर, मसूर, चाफळ, उंब्रज, माजगाव, शिराळे, बहे-बोरगाव, पारगाव व मनपडळे येथे आहेत.

पृ. १४१

• • •

# समर्थ-पंचक

इतिहासाच्या वाचनाप्रमाणेच उघडचा डोळयानी केलेल्या देशपर्यटणाने स्वदेश आणि स्वदेशबांधव यावर प्रेम जडते. समर्थ रामदासाना आपल्या तपश्चर्येनंतरच्या तीर्थयात्रा करताना त्याचा प्रत्ययच आला. त्यामुळेच आपल्या देशापुढे ठाकलेल्या व अंत:करण पिळवटून टाकणाऱ्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी त्यानी चिंतना सुरू केली. त्या चिंतनिकेमुळेच समर्थांनी "अंतरी कल्पना केली। एकान्ती बोलले बहु । रक्षिता देव देवांचा । त्याचा उत्साव मांडला ।। " एवढेच नव्हे तर लोकांना त्यांनी आदेश दिला की "मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।"

या आदेशातील "मराठा" म्हणजे जो स्वधर्म आणि स्वदेश यास ओळखतो व त्यांची एकनिष्ठपणाने सेवा करतो, तो! दासबोधाच्या ११।५।४, ११।६।४ व १२।२।२९ या ओव्यातून समर्थांनी आळवून सांगितले आहे की हरिकथा निरुपण, राजकारण आणि "प्रसंग पाहिल्यावीण सकळ खोटे ।। " असल्याकारणाने "वर्तायाचे लक्षण" जे सावधपण ते, "मराठा" म्हणविणाराच्या जवळ जय्यत हवेच हवे. हरिकथानिरूपणातील प्राचीन विद्या, नीति वगैरेंचा संशोधनपूर्वक वारसा नेमकेपणाने समजला पाहिजे व आचरणशुद्ध राखता आला पाहिजे. त्यातून स्वावलंबनाने, स्वाभिमानाने वर्तायाची रीत लागली पाहिजे; आणि त्या दोन्हीतून स्वदेशसेवेचा व तदनुषंगिक राजकारणाचा आवाका आलाच पाहिजे. हेच महाराष्ट्रधर्माचे व समर्थ सांप्रदायाचे चैतन्यरसायन आहे.

कळकळ, प्रेम, निष्ठा, भाव, भूतदया इत्यादि सद्‌गुण वारकरी सांप्रदायाने मराठी मनात रुजविले होतेच. त्या गुणात विवेक, यत्न, नेटकेपणाने संसार करुन तो फिका करुन टाकण्याचे कौशल्य, कीर्तिची चाड, वैराग्य, परोपकारबुद्धि, लोकसंग्रह आणि निस्पृहता यांच्या धारा संवर्धून साहसप्रियता, धैर्य, राष्ट्रहितैकपरता अशा वृत्ती सहजस्वभावी टीकण्यावर भर देऊन समर्थांना आपला धारकरी सांप्रदाय प्रस्थापावयाचा होता. तो प्रस्थापताना, वैदिक संस्कृति उखडून टाकावयास

सजलेल्या राजकर्त्यांच्या जुलूमशाहीला तोंड देऊन ते कार्य करावयाचे होते. सिंहाच्या गुहेत शिरून त्याची आयाळ हलविण्याच्या उद्योगाप्रमाणे, समर्थांनी जसे सत्ताकेंद्राच्या आवती-भोवतीच आपले अकरा मारुती स्थापले होते किंवा कल्याणासारखे कुवतीचे व कर्तृत्वाचे शिष्य उस्मानाबाद जिल्ह्याच्या परांडे-डोमगाव-भागातून पेरले होते, तसेच हे सर्व करण्यापूर्वी, "अंतरी कल्पना केल्यावर" समर्थ जे "एकांती बोलले बहु," ते आपल्या स्वतःच्या विवेक-विवेचक बुद्धिशी, हे तर खरेच! पण आपल्या विचारांची हुंडी लोकांच्या अंतःकरणाचे पेढीवर पटावी म्हणून समर्थांनी किती तरी लोकाना एकेकटे भेटून त्यांच्याशी विचारविनिमय केला आणि "सर्वेषामविरोध" निर्माण केला.

"बहुतांचे बहुत ऐकावे।" पण शेवटी विचारवंताच्या जिव्हाळ्याने लोक-संग्रहकर्त्यांस चालावे लागते. समर्थांनी असे जिव्हाळ्याचे जे विचारवन्त आपलेसे केले होते, त्यात ब्रह्मनाळचे आनंदमूर्ती (जोशी) गोसावी, रहिमतपूरकडील निगडीचे राजयोगी रंगनाथस्वामी, खटाव तालुक्यातील वडगावचे जयरामस्वामी आणि ऐन निजामशाहीच्या हैदराबादचे केशवस्वामी असे चौघेजण होते. हे चौघे-जण समर्थांना वडील-बंधुसमान मानीत आणि त्यांच्या धारकरीपंथाला जीवेभावे संचारस्वातंत्र्य मिळेल असे दक्षतेने पहात.

जयरामस्वामी वडगावकर आणि केशवस्वामी भागानगरकर (हैद्राबादकर) हे पंढरपूरच्या विठ्ठल सांप्रदायाचे वारकरीपंथाचे असून ब्रह्मनाळचे आनंदमूर्ति व दत्त-विठ्ठल कृष्णभक्त असले तरी निगडीचे रंगनाथस्वामी हे "रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी ।।" या पंथाचे होते. समर्थांना आपला धारकरी सांप्रदाय वारकरी सांप्रदायाच्या परंपरेतूनच विकासावयाचा असल्याकारणाने आपल्या जिव्हाळ्याच्या विवेकसाथ्यामध्ये विठ्ठल-रामसांप्रदायाचे निष्णात अध्वर्यु समर्थांनी जवळ करावेत हे अगदीच साहजिक होते. "जुन्यातुनी जे नवे विकसते। तेच सदाचे रुजते फुलते ।।" याची जाणीव समर्थांना असल्यामुळेच समर्थांनी विठ्ठल-रामसांप्र-दायींचा आपल्या विवेकसाथ्यात सहकार-समन्वय साधला होता. एवढेच नव्हे तर समर्थ स्वताच कित्येक वर्षे त्याच प्रेरणेने पंढरीच्या आषाढी-कार्तिकी वाऱ्या करीत असत; पुढे पुढे स्वतःच्या वाढलेल्या व्यापामुळे पंढरीची वारी आपले हातून नियमित होण्यास वाव सापडेनासा होतो आहे असे आढळल्यावर, आपल्या धार-करी सांप्रदायाचा वारकरी सांप्रदायापाशी जिव्हाळ्याचा संपर्क अविच्छिन्न चालावा म्हणून समर्थांनी आपले शिष्य मेथवड-मठाचे अंतोबा गोसावी यांच्याकडे व परंपरेने त्या मठाकडे पंढरीची वारी करीत राहण्याचे प्रतिनिधीत्व सोपविले.

जुन्यातून नवा इतिहास निर्माण करण्यासाठी विठ्ठल-रामसांप्रदायांचे सहकार-समन्वय साधण्याचे धोरण जसे आपले विवेकसाथी जवळिकीने निवडण्यात स्पष्ट होते, तसेच दुसरेही एक लक्ष्य त्या धोरणात प्रतीत

झाल्याशिवाय रहात नाही. ते असे की निजामी जमान्यात केशवस्वामीसारखा आपल्या पूर्ववयातील (भागानगरच्या) तानशा कुत्बशहाचे हाताखालील अधिकाराची नोकरी सोडून काशीराजस्वामीचे शिष्यत्व पत्करणारा लोकसंपर्क-संपन्न साथी समर्थांना जवळ करता आला, तसाच परधर्मीय सत्ता-धार्जिण्या खटाव तालुक्यातील सरंजामशाहीच्या जबडयात वडगावच्या जयरामस्वामीसारखा सहकारी समर्थांना आपुलकीने सांभाळता आला. शहाजीराजांचेही पूर्वीपासून गावागावाचे इस्लामीकरण घडलेल्या रहिमतपूर विभागात शस्त्रसंपन्न राजयोगी रंगनाथस्वामी निगडीकर असा समर्थास शत्रुघ्नासारखा निष्ठावंत परमार्थबंधु आपल्या पाठिशी उभा करता आला, तसाच वारणा-कृष्णांच्या बेचक्यातून केव्हाही आदिलशाहीच्या मिरज-कऱ्हाड येथील सत्ता-केंद्राना सैन्यरसद पोचवू शकणाऱ्या ब्रह्मनाळ-परिसरात, नाशिकच्या पूर्वपरिचित रघुनाथस्वामींचे पट्टशिष्य आनंदमूर्ति समर्थांना आपला जीवश्च-कंठश्च स्नेहांकित म्हणून संपादिता आला.


समाजहितचिंतनात "अंतरी कल्पना केल्यावर" आणि "आपल्याशीच" एकान्ती बहु बोलल्यावर म्हणजे प्रश्नांच्या व समस्यांच्या उलटसुलट बाजूंचा तात्त्विक आणि व्यवहारशुद्ध विचार केल्यावर, आपण जो "रक्षिता देव देवांचा। त्याचा उत्सव मांडण्याचा" विचार ठाम केला तो घरोघर पोचविण्यासाठी आणि "भिक्षामिषे लहानथोरे परीक्षून सोडण्यासाठी" समर्थांनी जसे मनाचे श्लोक जनांना उद्देशून जाहीरपणे उघड रस्त्यावर म्हटले व प्रचारिले, तसेच समाजातील सामान्यामधून जी असामान्य माणसे आढळली, त्यांच्याशीही समर्थ "एकान्ती बोलले बहु ।।" आणि असा "सर्वेषामविरोध" निर्माण करण्यापूर्वी ज्यांच्यापाशी समर्थांनी आपल्या विचारधारा, प्रथम प्रगट केल्या व ज्यांच्या परिस्थिति-सापेक्ष अभ्यासानुभवाच्या भट्टीतून कसौटी लावून घेतल्या, ते समर्थांचे सहकारी संत म्हणजे समर्थांची विवेकवर्धिनी यंत्रणाच होती. ते चौफेर दृष्टीचे व कार्यक्षेत्राचे चार संत व स्वतः समर्थ मिळून इतिहासाने समर्थपंचक म्हणून शिरोधार्य गणले आहे. उत्तरेतील गुरु गोविंदसिंगाचे जसे "पंची प्यारे" जीवास जीव देणारे होते तसेच महाराष्ट्रात हे समर्थ-पंचक किंवा समर्थ-पंचायतन होते.

• • •

## समर्थ स्थापित–आकरा मारुती



श्रीमारुती बत्तीस शिराळे



श्रीमारुती बहे (नृसिंहपूर)




श्रीमारुती पारगांव




श्रीमारुती मनपाडळे


## समर्थ स्थापित
## आकरा मारुती




श्रीमारुती माजगाव



प्रताप मारुती चाफळ



दासमारुती चाफळ



खडीचा मारुती चाफळ


समर्थ स्थापित
आकरा मारुती



श्रीमारुती शहापूर



श्रीमारुती मसूर



श्रीमारुती उंब्रज



श्रीआंग्लाई सज्जनगड

# समर्थ-संप्रदाय

## समर्थ संप्रदायाचा शब्दार्थ

समर्थ–संप्रदाय हा समर्थ + संप्रदाय असा सामासिक शब्द आहे. पैंकी ( सम् + अर्थ ) म्हणजे चांगल्या ध्येयाचा, योग्य तोलामोलाचा, "कां समर्थीचि विकणें। महर्घी वस्तु। ( ज्ञानेश्वरी १८–८८१ ). समर्थ शब्दाला समानार्थ, सारख्या मोलाचा, सशक्त, कार्यक्षम, लायक, पात्र, श्रीमंत, ऐश्वर्यवंत, धनवान्, ऐश्वर्यवान् असेही दुसरे अर्थ आहेत. संस्कृतमध्ये समर्थ ह्या धातूचा अर्थ मानणे, विचार करणे, प्रत्यय पाहणे, अनुभव देऊन व घेऊन खरे करणे, तयार राखणे, अमलात आणणे असा असून त्यापासून समर्थ असे जे विशेषण वा नाम होते, त्याला शक्तिमान, कार्यक्षम, पात्रता–सिद्ध, नजरेत भरणारे, निश्चित ध्येयाचे, नीटस स्वरूपाचे, नेटाचे, कार्य वा माणूस असे अर्थ आहेत.

आता, संप्रदाय म्हणजे चाल, रीत, वहिवाट, शिरस्ता, प्रघात, परंपरागत, किंवा प्रमाणभूत तत्वे, संप्रदाय हा शब्द सम् + प्र + दा अशा संप्रदा या धातूपासून झाला असून त्या धातूचे अर्थ देणे, वितरणे, परंपरेने वाटणे, वारसा म्हणून ठेवणे, अर्पण करणे असे असून त्या धातूला "य" हा विध्यर्थी प्रत्यय लागून संप्रदाय हे नाम झाल्याचे संस्कृत व्याकरण सांगते. वर दिलेल्या अर्थाशिवाय संप्रदायाचा अर्थ धार्मिक शिकवणीचा विशेष ओघ, विशेष देवतेच्या पूजा–प्रार्थनेचा वा आराधनेचा ठराविक आराखडा असाही करण्यात येतो.

यावरून समर्थ–संप्रदाय या सामासिक शब्दाचा अर्थ स्पष्टपणे असा आहे की, तोलाने मोल पावणारा प्रभावी अशा शिरस्त्याचा आणि विशेष देवतेची आराधना करण्याचा आराखडा. तथापि ऐतिहासिक ओघात जनमनात घर करून राहिलेला समर्थ संप्रदायाचा अर्थ असा आहे की, रामदास व समर्थ या दोनही नावानी प्रसिद्ध असलेल्या व इसवी सनाच्या सतराव्या शतकात होऊन गेलेल्या मूळ जांब ( जिल्हा बीड ) गावच्या पण सातारा जिल्ह्यातील कृष्णाखोऱ्यास आपली कर्मभूमी म्हणून

निवडणाऱ्या नारायण सूर्याजी ठोसर (कुळकर्णी) या कर्मयोगी संताचा रामोपासक संप्रदाय तो समर्थ संप्रदाय. श्री रामप्रभूनाच रामदास नारायण ठोसर समर्थ म्हणून संबोधीत. 'समर्थांचाही समर्थ देवा सोडविता । असे त्या संताने आपल्या ग्रंथामधून रामदर्शन वाचकांना घडविले आहे.

## संप्रदायाचे नाम-रहस्य

मराठी भक्ति-परंपरेच्या (ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या) पंचगंगांपैकी समर्थ संप्रदाय हा एक प्रमुख प्रवाह आहे. सतराव्या शतकात समर्थ रामदासांनी या संप्रदायाची उभारणी केली आणि आपल्या जीवित-कार्याच्या पूर्तीचे सातत्य या संप्रदायाच्या द्वारा राखले जावे, अशा दृष्टीने संप्रदायाची जडण-घडणहि केली. हा संप्रदाय 'समर्थ संप्रदाय,' 'दास संप्रदाय,' 'रामदासी संप्रदाय,' 'महाराष्ट्र-धर्म,' 'राघवाचा धर्म,' इत्यादि नांवानी ओळखला जातो.

रामदासस्वामी 'समर्थ' हे बिरूद श्रीरामाला लावीत असत. 'समर्थ' म्हणजे रामदासांचा सामर्थ्यसंपन्न रघुनाथ हाच होय. ते स्वत: केवळ 'समर्थांचे सेवक' होते. या 'समर्था' च्या सेवेमुळेच रामदासांच्या अंगीहि त्याच सामर्थ्याचा संचार झालेला होता.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥

असे आव्हान देण्याची शक्ति त्यांच्या ठायी आविर्भूत झाली होती. आपला दासबोध हा ग्रंथहि श्रीरामाच्या कृपादृष्टीतून अवतरला आहे, हे स्पष्ट करताना "समर्थकृपेची वचने । तो हा ग्रंथ ॥" असेच रामदास म्हणतात. 'समर्थ' म्हणजे श्रीराम. या रामाचा दासहि त्याच्या कृपेने 'समर्थ' होतो, असा समर्थांचा स्वानु-भूत भाव आहे.

बहुत जनासि चाळवी । नाना मंडळी हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥

असे समर्थ-पद-प्राप्तीचे रहस्य रामदासांनी विशद केले आहे. यावरून हे स्पष्ट होईल की, 'समर्थ' रामाच्या कृपेने 'समर्थ' बनलेल्या त्याच्या 'दासा' ने म्हणजेच 'रामदासां' नी प्रवर्तित केलेला जो संप्रदाय, तो हा 'समर्थ संप्रदाय' होय. 'दास संप्रदाय' आणि 'रामदासी संप्रदाय' या नावाचे प्रयोजनहि यावरून उघड होत आहे. 'राघवाचा धर्म' हे नावहि 'समर्थ संप्रदाया' चेच पर्यायनाम आहे, हे मुद्दाम स्पष्ट करण्याची आवश्यकता नाही.

राघवाचा धर्म जागो । कीर्ति अद्भुत माजो ।
ठाई ठाई देवाळये । भक्तमंडळी साजो ।

शक्ति आहे, तोचि पावे । दोन्ही लोक साधावे ।
यह लोक परलोक । शत्रु सर्व रोधावे ।।

या रामदासांच्या उद्गारात त्यांच्या समर्थ-दृष्टीचे स्पष्ट प्रत्यंतर येते. 'महाराष्ट्र-धर्म ' हा त्या ' राघवाच्या धर्मा ' चा प्रदेशविशिष्ट आविष्कार आहे. श्री. चक्रधरस्वामींच्या भाषेत "महंतराष्ट्र म्हणोनि महाराष्ट्रात" असलेल्या.

या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांही । तुम्हांकारणे ।।

हे रामदासांचे शिवप्रभूंना उद्देशून काढलेले उद्गार जणु असे सुचवितात की रामदासांचा ' समर्थ ' रामच धर्मरक्षणासाठी शिवप्रभूंच्या रूपाने अवतरला होता.

असा हा समर्थ संप्रदाय ' समर्थ ' राम आणि ' समर्थ ' रामदास या दोघाशी संबद्ध आहे आणि राम व रामदास हे दृश्यतः भिन्न असले तरी तत्त्वतः अभिन्न असल्यामुळे ' समर्थ संप्रदाय ' या संज्ञेची एकात्म यथार्थताहि उघडच आहे.

## समर्थांचे कार्य :

आपल्या प्रबोधशक्तीचा उपयोग " भिक्षामिषे लहानथोरे परीक्षून सोडताना" समर्थांनी जसा केला, तसा कीर्तन-प्रसंगानीहि केला. शिवाय समाजाला जीवनात अध्यात्माची जाग रहावी व अध्यात्म व्यवहारशुद्ध सांभाळता यावे, म्हणून ' अन्वय-व्यतिरेक, ' ' आत्माराम, ' ' किष्किंधाकाण्ड, ' ' चतुर्थमान, ' ' एकवीससमासी , ' व बीस दशकी ' दासबोध, ' 'नित्यनैमित्तिक प्रथा, ' ' पंचमान , ' ' पंचीकरणयोग, ' ' प्रासंगिक कविता, ' ' भीमरूपी स्तोत्रे, ' ' मनाचे श्लोक, ' ' मानपंचक, ' ' रामायण ( युद्धकांड व सुंदरकांड ), ' श्रीवनभुवनी, ' ' षड्रिपुविवेचन, ' ' सुक्तयोग, ' ' स्फुट अभंग, ' ' स्फुट श्लोक, ' असे कितीतरी वाङमय समर्थांनी निर्माण केले. समर्थांचा स्वभाव पराकाष्ठेचा निःस्पृह असल्याकारणाने पहिल्या पंचविशीतच त्याना तपःसंपन्नता, वैराग्य व ज्ञान प्राप्त करून घेता आले. केवळ स्वतःचा उद्धार करून न घेता सर्व समाजाला संघटनेचे सूत्र त्यांनी दिले. महाराष्ट्रमहोदयाच्या पूर्वरंगाशी झालेल्या समर्थांच्या तादात्म्याचे प्रतिबिंब त्यांच्या दासबोधात स्पष्ट दिसते. समर्थांना संस्कृत, मराठी, हिंदी व दुसऱ्या अनेक भाषा येत असून ते देशकालज्ञ होते. " आधी करावे। मग बोलावे । " असा त्यांचा बाणा होता. सर्व पंथाचे, आचारांचे व धर्मांचे रहस्य त्याना कळले होते. अनेक कला परिपूर्णतेने येत असल्यामुळे, त्यांचा कार्यभाग लवकर होई. मूळ स्वभाव चळवळ्या व हूड. कपाळावर आलेले टेंगूळ त्यामुळेच होते. पोहण्याची व जलस्तंभनाची विद्या हातखंडा, घोड्यावरील स्वारी पटाईत, सशक्त नि काटक शरीराबरोबर दुसऱ्यावर छाप पाडणारा चेहरा, भाषण बहुश्रुत व विनोदी अंतर्ज्ञान नि स्वप्नसाक्षात्कारामुळे दीर्घसूचनेचे. ते चित्रकला व शिल्पकलेचे जाणते.

(इंदूरचा मारुती, शहापूरचा चुन्याचा मारुती, टाकळी येथील शेणाचा मारुती, तंजावरच्या आंधळ्या कारागीराकडून करवून घेतलेल्या व परळीस स्थापन केलेल्या रामपंचायतनाच्या मूर्ति व समर्थांचे अकरा मारुती पहा!) असे समर्थ रामदास होते. त्यांनी आपले सर्व आयुष्य प्रयत्न, प्रचीति व प्रबोध यासाठी वेचले.

सन्त तुकाराम, जयरामस्वामी वडगांवकर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर, केशवस्वामी हैदराबादकर, रंगनाथस्वामी निगडीकर, रघुनाथस्वामी, मोरयादेव, धरणीधर, वामनपंडित हे मातबर सन्तपंडित जसे समर्थांचे समकालीन होते, तसेच गिरिधर, दिवाकर, दिनकर गोसावी, कण्हेरीचे वासुदेवबुवा, टाकळीचे उद्धव, शिरगांवचे कल्याणस्वामी व त्यांचे बन्धु दत्तात्रयस्वामी, देवदास व भोळाराम वऱ्हाडचे महारुद्र, राजापूरचे त्र्यंबक बाळकराम, रामटेकचे श्रीधर, गोकर्णाचे भैरव, सुरतेचे जनार्दन, तेलंगणचे शिवराम, रामपूरचे सदाशिव, कऱ्हाडच्या अक्का, मिरजेच्या वेण्णा, अशी समर्थांची शिष्यमंडळी होती. संसार क्षणभंगूर आहे, केव्हातरी मरण येणारच, तर तेच लोकसेवेत आल्यास जन्मसाफल्य होते, रामाची सेवा तीच, ही समर्थांची शिकवण त्यांचे शिष्यहि प्रचारित. "जगतः स्थितिकारणं साक्षादभ्युदय–निःश्रेयसहेतुर्यः स धर्मः" या न्यायाने "सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचें । परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥" असे आश्वासून "आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावे परमार्थ–विवेका ।" अशी शिकवण देणारा समर्थांचा महाराष्ट्र–धर्म म्हणजे सतराव्या शतकाचा स्मृतिग्रंथ आहे व होता. 'खटनटाशी खटनट' घालूनसुद्धा अगोदर जगणे आणि तेहि चांगल्या तऱ्हेने जगणे कसे जगावे व तद्द्वारा समाजाची प्रगतिपर धारणा कशी साधावी, हे अनुभवसिद्ध सांगणारा समर्थांचा विशद भक्तिमार्ग व त्यातून निर्माण झालेला समर्थसंप्रदाय हे मराठी इतिहासातील अध्यात्माच्या आणि अस्मितेच्या अभ्यासाचे स्वतंत्र विषय असून अमरपणे उद्बोधक व कार्यप्रेरक आहेत.

## संप्रदायाच्या उदयाची पार्श्वभूमि :

समर्थांच्या चरित्राचे आणि चारित्र्याचे स्वरूप स्थूलतया हे असे आहे. त्यांच्या उदयापूर्वीच्या भारताची आणि महाराष्ट्राची स्थिति काय होती, हे समजून घेतल्यावाचून समर्थांनी प्रवर्तिलेल्या समर्थ–सांप्रदायाचे ऐतिहासिक आणि सार्वकालिक महत्त्व ध्यानी येऊ शकणार नाही.

ज्ञानेश्वरानंतर समर्थांच्या कालखंडापर्यंत, नर्मदेपासून कृष्णेपर्यंतच्या महाराष्ट्रात निराकांक्षा नांदत होती. शतकानुशतके भारत यावनी सत्तेच्याच वरवंट्याखाली भरडला जात होता. वैदिक कालात व तदनंतर काही शतके भारताची स्थिति हरएक बाबतीत अनेक दृष्टींनी स्पृहणीय होती. वर्धिष्णुतेचा व जयिष्णुतेचा तो काळ संपल्यावर अनेक पाखंडे जन्मास येऊन समाजाचा वैदिक संस्कृतीवरील विश्वास खिळखिळा झाला! संसार निःसार असल्याची शिकवण

हटातटाने पसरू लागली. या व अशा आत्मघातकी प्रवृत्तीचा कडेलोट इसवी सनाच्या आठव्या ते सतराव्या शतकापर्यंत घडून आला. त्यापूर्वी भारतावर कित्येक परचक्रे कोसळली होती, तरी ती कायमची ठाणी देऊन न बसल्याकारणाने नासधुस झाली पण नष्टचर्य ओढवले नव्हते. नवव्या शतकापासून मात्र भारताच्या उत्तर व वायव्य सरहद्दीपलीकडील टोळधाडी कायमचे हादरे देऊ लागल्या! सन ६४५ पर्यंत कनोजच्या शिलादित्याच्या ताब्यात (महाराष्ट्र वगळून)सर्व भारत होता, तरी अखंड भारत दोन भारतीयांच्याच ताब्यात होता. पण ७१२चे सुमारास बगदादच्या वालीद नामक खलीफाच्या आज्ञेने व इराणच्या सुभेदाराच्या मदतीने महमंद काशीमने सिंध काबीज केला, हजारो पुरुषांची कत्तल करून व्यापक प्रमाणावर धर्मांतर घडविले, शेकडो कुलीन स्त्रियांना दासी बनवून इराणात पाठविले, भव्य देवालये उद्ध्वस्त करून त्यांच्या मशिदी केल्या, व अलोट संपत्ती लुटून सिंधचे ब्राम्हण राजघराणे निर्मूल केले.

त्यानंतर अडीचशे वर्षे ही स्वाऱ्या–मोहिमांची टांगती तलवार डोक्यावर घेऊन भारत नांदत असताच, पंजाबातील जयपालावर गझनीच्या सबक्तगिनाने स्वारी केली. उत्तरेकडील प्रमुख हिंदू राज्यांच्या एकजुटीनेही उपयोग न होता सबक्तगिनाने सिंधु गाठलीच! सन १००१ ते १०२७ या काळात गझनीच्या महंमदाने भारतावर सतरा स्वाऱ्या केल्या. एका स्वारीत त्याने हिमालयाच्या एका अलिकडच्या रांगेतील नगरकोटचे तटबंदी देवालय लुटून, दुसरीत ठाणेश्वर येथील असंख्य स्त्रीपुरुष कैद करून, तिसरीत मथुरेतील देवमूर्ति फोडून, चवथीत सोमनाथावर घण मारून सोनेमोती आणि कलाकुसरीच्या वस्तू मोटा मोटा भरून स्वदेशी नेल्या. घरे जाळून, अत्याचार–अनाचारांची परमावधि करून व खून–कत्तली घडवून उच्छेद मांडण्याचा हा क्रम सन १२०० मध्ये महंमद घोरीच्या नेतृत्वाखाली अफगाणानी पुढे चालविला. बाबर (१५२६–३०) हुमायून (१५३०–१५५६), अकबर (१५५६–१६०५), जहांगीर (१६०५–२७) शहाजहान (१६२७–५८), औरंगझेब (१६५८–१७०७) यांच्या कारकीर्दीतील आणि त्याचबरोबर दक्षिणेकडील खुद्द महाराष्ट्रात बहामनी राज्याच्या पाच शाखांतील सत्ताधाऱ्यामार्फतचे व सत्तोत्तेजित अनाचार–अत्याचार शाळकरी पोरांच्याही परिचयाचे आहेत. विजापूरच्या आदिलशाही तक्तावर असलेल्या सुलतान महंमदाच्या अमदानीत हिंदूना दिवाळी-दसरा वगैरे प्रसंगाचे उत्सव-समारंभ करण्याची बंदी होती. (इतिहास संग्रह, वर्ष २ पहा.) एवढेच नव्हे तर १६३१ ते ते १६६८ या सदतीस वर्षांच्या कालखंडात सहा वेळा हिंदुस्थानात आलेला हिरेमाणकांचा फ्रेंच व्यापारी टॅव्हरनिअर, १६३८ ते १६४० त इकडे आलेला जर्मन प्रवासी मँडेल स्लो, १६५३ ते १७०८ पर्यंत व्हेनिसहून हिंदुस्थानात येऊन दारा-मुअज्जम–औरंगझेब यांची नोकरी करणारा इतालियन मनूची व १६५६ ते ५८ त भारतात भटकणारा फ्रेंच प्रवासी बर्निअर, इतिहासकारांपैकी महंमद कासीम

फेरिस्ता, रॉस, एस. आर. शर्मा, इलियट अँड डौसन, जदुनाथ सरकार, कैर, प्राईस, टेरी इत्यादींनी केलेली व स्वत: जहांगीरसारख्या बादशहाच्या रोजनिशीतील वर्णने अंगावर शहारे आणणारी आहेत. धार्मिक म्हणून अनेकांच्या नित्यपाठात असलेल्या गुरुचरित्राच्या (१३८० ते १४४०) एकोणिसाव्या अध्यायातहि यवन राक्षसाची प्रौढी वाचली म्हणजे त्या इतिहासकारांच्या म्हणण्याला स्वत: रंजल्या गांजलेल्या उच्छ्वासाचा दुजोराच मिळतो.

~~वानगीही आहे~~. पोर्तुगालहून १४९८ त वॉस्को ड गामा हिंदुस्थानात आला. १५०३ मध्ये पोर्तुगीजांनी कोचीन येथे पहिला किल्ला बांधला. १५१० त त्यांनी आदिलशाहीकडून गोवा घेतला. १६०० पासून अर्धे शतक डच, इंग्रज, फ्रेंच, डेन्स व क्वचित जर्मन यांच्याही धाडी हिंदुस्थानावर आल्या. त्या सर्वांना विषप्रयोग, खून, लूट, यापैकी वा यासारखा कोणताच अत्याचार वा अनाचार वर्ज्य नव्हता. १६४६ ते १६६० मध्ये गोवा खून व लूट यांनी गांजला होता, असे मनूची सांगतो. "पोर्तुगीजांनी हिंदुस्थानात येताना आपल्या बायका आणल्या नव्हत्या, असे असता त्यांची प्रजा मात्र इकडे वाढली, कारण ज्या स्त्रिया लूटमारीत वा मुलूखगिरीत पकडल्या जात, त्यांचा उपयोग पोर्तुगीज करीत." असे ख्रिस्ती करणाच्या पोर्तुगीज मोहिमेचे वर्णन करताना श्री. के. एम. पण्णीकर सांगतात. "कित्येक फिरंगणात आटले!" (दा: १५-२-३) ते असे.

दैवाचा कोप जसा शाह्याशाह्यांच्या लढायांनी व परकियांच्या स्वाऱ्या-शिबंद्यांनी जनसामान्यांना सोसावा लागे, तसाच तो वारंवार पडणाऱ्या-अवर्षण दुष्काळानीही सोसावा लागे. १६३०-३१ मध्ये गुजराथ, खानदेश दौलताबाद, बालाघाट यासारख्या एरवी सुपीक असलेल्या प्रदेशातही भयंकर दुष्काळ पडला! त्यातच लष्करशाहींनी गोरगरिबांच्या लंगोटयाही लुटण्याच्या त्या काळात लोकांची लाचारी म्हणजे ट्रॅव्हर्नरसारख्याला गुलामगिरीची शिकस्त वाटली. सर टॉमस रोचेही मत १६१५-१९ मध्ये वरीलप्रमाणे झाले होते. "दु:खदारिद्र्य उद्वेगे लोक सर्वत्र पीडिले!"

या सर्वांचा व्हायचा तोच परिणाम झाला होता! रजपूत व मराठे इस्लामी तक्तांचे सेवेकरी झाले; पंढरीच्या विठोबास पळवून चालविले असता, बेदरच्या बादशहाला कोणी प्रतिबंध केला नाही; दुष्काळाने मरणाऱ्या प्रजेला बादशहाने अन्न देणे कर्तव्य म्हणून दामाजीपंताने गादीच्या इज्जतीसाठी कोठार मोकळे केले तर बादशाहाच्या खजीन्यात दामाजीतर्फे विठू महाराला मोबदला भरावा लागला; आपापसातील दुहीमुळे व राष्ट्रीय स्वाभिमानाच्या अभावामळे मूठभर परकीयांच्या सत्तेपुढे मोठमोठे हिंदु सरदार केवळ ताटाखालची मांजरे बनले होते. "वरच्या, लाथा झेलित माथा। सवेचि खाली झाडी लाथा।" हा शिष्टसंमत जीवनक्रम झाला होता आणि हिंदुधर्माला वनवास व अज्ञातवास आला होता. अधून मधून कोणी डोके

वर काढलेच, तर त्या उठाव करणाऱ्या देश-देव-धर्मभक्ताच्या वाट्यास मरणच, येत होते. शिखांचा नववा गुरु तेजबहादुर अगर त्याचा पुत्र गुरु गोविंदसिंग ही त्याबाबतची ठळक उदाहरणे होत. " सकळ पृथ्वी आंदोळली, धर्म गेला । " अशी दीनता येऊन " या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।। " अशी निर्वाणाची परिस्थिति प्राप्त झाली होती.

## समर्थांचे परिस्थिति परीक्षण :

आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पळून गेले, तेव्हा समर्थांच्या मनात तपश्चर्या करून श्रीराम प्रसन्न करून घ्यावा, एवढीच कल्पना होती. बारा वर्षे तपश्चर्या केल्यावर समर्थांनी तीर्थयात्रा सुरु केली तेव्हाही संप्रदाय सुरू करावा, अशी कल्पना असल्याचा आढळ होत नाही.

तीर्थयात्रेत समर्थांनी उघड्या डोळ्याने भारताच्या परिस्थितीचे निरीक्षण केले आणि परिक्षणहि केले. समाजाची वर्तमान विपन्नावस्था, त्या अवस्थेला कारणीभूत असलेले समाजाचे जुनाट दोष आणि परकीय व स्वकीय समाजकंटकाचा धिंगाणा या सर्वांचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले आणि ही विपन्नावस्था दूर करण्याच्या उपाययोजनेचेहि चिंतन केले. त्यांना निरीक्षणांती दिसून आले की–

बहूसाल कल्पान्त लोकांसि आला । महर्गे बहू धाडि केली जनांला ।।
कितीयेक मृत्यूस ते योग्य झाले । कितीयेक ते देश त्यागून गेले ।। १ ।।
कितीयेक ग्रामेंचि ते ओस झालीं । पिकें, सर्व धान्येंचि नाना बुडालीं ।।
कितीयेक धाडीवरी धाडि येती । द्विधा सैनिकांचेनि संहार होती ।। २ ।।
कितीयेक ते धान्य लूटोनि नेती । कितीयेक ते पेव खाणून नेती ।
कितीयेक ते पूरले अर्थ नेती । किती पूरिलीं सर्व पात्रेंचि नेती ।। ३ ।।
किती गुज्रिणी, ब्राह्मणी भ्रष्टविल्या । किती शांमुखी जाहजी फांकवील्या ।।
कितीयेक देशांतरी त्या विकील्या । किती सुंदरा हाल होवोनि मेल्या ।। ४ ।।
कितीयेक ते घ्राण कर्णेचि घेती । किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती ।।
किती पोट बांधोनि ते बुडताती । पिछाडेचि बांधोनि घेरोनि नेती ।। ५ ।।

अस्मानी-सुलतानी, प्रबंध १

२ ) " देश नासला नासला, उठी तोचि कुटी । पिके होतांचि होतांचि होते लुटा लुटी ।। १ ।। काला करितां जीवलगां, झाली ताटातुटी । अवघ्या कुटुंबा कुटुंबा होते फुटाफुटी ।। २ ।। कैचा आधार आधार, नाहीं सौदागर । कांही चालेना चालेना उदीम व्यापार ।। ३ ।। सर्व सारिखे सारिखे, झाला एकंकार । काळ कठीण कठीण, कैसा पावे पार ।। ४ ।। नदी भरतां भरतां, घालोनियां जाती । मोठी फजिती फजिती सांगावे ते किती ? ।। ५ ।। वीष घेऊनी घेऊनी, उदंड मरती । अग्नि लावुनी लावुनी, जळोनिया जाती ।। ६ ।। उदंड चाकरी चाकरी,

मिळेना भाकरी । लोक नीलंड नीलंड, काढुनी नेती पोरी ॥ ७ ॥ न्याय बुडाला बुडाला, जाहाली शिर्जोरी । पैक्या कारणें कारणें, होते मारामारी ॥ ८ ॥"

( अ. सु. प्रबंध २ रा )

३ ) " गुरें विकलीं सर्व वस्त्रेंहि पात्रें । भटें वीकलीं सोवळीं ओलि धोत्रें । कधीं देव पावेल हें तो कळेना ॥ १ ॥ किती विकलीं जेन, झोरें चवाळी । किती धाबळचा, माल, चंबू, गवाळी ॥ कधीं देव. ॥ २ ॥ किती एक जाती, किती खल बत्ते । तरी ते नव्हे काम काहीच फत्ते ॥ कधीं देव० ॥ ३ ॥ स्त्रियांचे अलंकार-नाना परींचे । किती थोर थोरांचिया सुंदरींचे ॥ कधीं देव० ॥ ४ ॥"

( अ सु. प्रबंध ३ रा )

४) " अकस्मात धाडी आली । कान्ता बंदी करून नेली । वस्त भावही गेली । प्राणियांची ॥२८॥ तंव तिची वार्ता आली । तुमची कान्ता भ्रष्टली । ऐकूनिया अंग घाली । पृथ्विवरी ॥२९॥ " ( दासबोध द. ३ स. ५ )

५) " परचक्री धरून नेले । नीच यातीस दिधले । दुर्दशा होऊन मेले ॥२९॥"

( दा. द. ३ स. ७ )

६) " प्राणी राजदंड पावत । जेरबंद, चाबूक, वेत । दरेमार तळवेमार होत ॥६३॥ कोरडे, पारंब्या, फोक । बहुताडिती ॥६४॥ मीघरीमार बुधल-मार । चौखरून डंगारणेमार । बुक्क्या गचांड्या, गुडघेमार ॥६५॥ लाथा, चपराखा, शेणमार । कामखेड दगडमार ॥६६॥ टांगणे टिपण्या, पिछेडे । बेडी, बुधनाक, कोलदांडे । रक्षण-विग्रह चहूकडे ॥६७॥ नाकवणी, चुनवणी । मीठवणी, रायवणी । गुळवण्याची जांचणी ॥६८॥ जवामधे बुचकळती । हस्तीपुढे बांधोन टाकिती । हां किती छळती वातावाती ॥६९॥ कर्णच्छेद, घ्राणच्छेद । हस्तच्छेद, पायच्छेद । जिव्हाच्छेद अधरच्छेद ॥७०॥ तीरमार, सुळी देती । नेत्र वृषण काढिती । नखोनखी सुया मारिती ॥७१॥ पारंड्यामध्ये घालणे । का कडेलोटें करणे । का भांड्यामुखे उडविणे ॥७२॥ कानी खुंटचा आदळती । अपानी मेखा मारिती । साल काढोनि टाकिती ॥७३॥ भोत आणिक बोटबोटी । अथवा गळ घालणें कंठी । सांडस वावून आटाटी ॥७४॥ सिये पाजणे, वीष देणे । अथवा शिरच्छेद करणे । का पायतळी घालणे ॥७५॥ सरड, मांजरे भरिती । अथवा फासी नेऊन देती ॥७६॥ "

( दा. द. ३ स. ७ )

७) " रायास न भेटता त्याचे नगरी । राहता धरतील बेगारी । तेथे न करता चोरी अंगी लागे ॥ " ( दा. द. ६ स. १ )

अशा प्रकारे समाजाचे जीवित, वित्त आणि शील सर्व प्रकारांनी धोक्यात आले होते आणि समाजाचे नेतृत्व परंपरेने करणारे ब्राह्मण-क्षत्रिय आपल्या कर्तव्यापासून च्युत झाले होते. ' ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । '

अशी ब्राह्मणांची अवस्था झाली होती, तर ' कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती । कित्येक तुरक होती । आपुले इच्छेने ॥ ' अशी सर्वसाधारणांची भ्रष्टावस्था कळसास पोचली होती.

## समर्थांचे लक्ष्य : रामराज्य

या पार्श्वभूमीवर समर्थांच्या मनात समाजस्थितीचे जे आदर्श चित्र उभे राहिले, ते होते रामराज्याचे. समाजाचे दैन्य-दुःख दूर करून रामराज्याची उभारणी करणे आणि सर्व समाजाला रामोन्मुख बनविणे हे त्यांचे अंतिम लक्ष्य होते. या समर्थ-प्रणीत रामराज्याचे स्वरूप त्यांच्या शब्दात असे होतेः–

निजसुख जनीं, नाहीं वृद्धपण । कोणाही मरण तेही नाहीं ॥९१॥
नाहीं नाहीं जनीं बंधनाचे पाप । सुखी सुखरूप रामराज्य ॥९२॥
रामराज्य नाही जन्मासी ताडण । धर्मसंरक्षण राम एक ॥९२॥
राम एकबाण, एकचि वचन । साधूचें पाळण राम एक ॥९४॥
भक्ती करी राम गाई ब्राह्मणांची । सीमा मर्यादेची उल्लंघीना ॥९५॥

–रामचरित ( शत तेरावे )

आणखी एके ठिकाणी समर्थांनी या रामराज्याचे अत्यंत हृदयंगम चित्र रेखाटले आहे–

बहूवृष्टी, अनावृष्टी । हें कदा न घडे जनी ॥७॥
उद्वेग पाहतां नाहीं । चिंतामात्र नसे जनीं ॥
व्याधि नाहीं, रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥८॥
युद्ध नाहींच, अयोध्या । राग ना मत्सरू नसे ॥
बंध, निर्बंधही नाहीं । दंड, दोष कदा नसे ॥९॥
कुरूपीं पाहतां नाहीं । जरा–मृत्यु असेचि ना ॥
आदरू सकळै लोकां । सख्य–प्रीती परस्परें ॥१०॥
बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे ॥
अनेक वर्तती काया । येक जीव परस्परें ॥११॥
दरिद्री धुंडिता नाहीं । मूर्ख हा तो असेचि ना ॥
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रही ॥१२॥
अद्भुत पिकती भूमि । वृक्ष देती सदा फळे ॥
आखंड दुभती धेनू । आरोग्ये वाहती जळे ॥ १३ ॥
जळजें, श्वापदें, पक्षी । नाना जीव भूमंडळीं ॥
आनंदरूप बोभाती । नाना सार परस्परें ॥ १४ ॥
नद्या, सरोवरें, बावी । डोलतीं नूतनें वनें ॥
प्रफुल्ल फळतीं झाडें । सुगंध वनवाटिका ॥ १५ ॥

उदंड वसती ग्रामें । नगरें, पुरें नि पट्टणें ॥
तीर्थे, क्षेत्रें, नाना स्नानें । शिवालयें, गोपुरें बरीं ॥ १६ ॥
मठ-मठचा-पर्णशाळा । ऋषी आश्रम साजिरे ॥
वेद-शास्त्र-धर्म-चर्चा । स्नानसंध्या तपोनिधी ॥ १७ ॥
चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे ॥
संतोष समस्तै लोकां । रामराज्य भूमंडळीं ॥ १८॥

--मानपंचक

निदान पक्षी हे तरी समर्थांना हवे होते. पसायदान:-

१) तुला वर्णितो भाट मी देवराया । सदासर्वदा गाय ब्रीदें सवाया ॥
महाराज हें अंगिचें वस्त्रजातां । बहूजीर्ण झाली देहेबुद्धीकथा ॥
तुझा भिक्षकू दासया रामचंद्रा । सदा स्वस्ति चितीतसे गा महेंद्रा ॥
नृपाधीस, देशा, उरी पूर्ण घ्यावें । भवी दैन्य हे देशधाडी करावें ॥
तुझा भृत्य मी भार्गवादर्पजीता । असें अर्पिला जीव हा तूज आतां ॥
भवा जिंकितां जीव देईन पां हे । तुवा सन्मुखा पाठिसी धीर राहे ॥
रघूनायका सन्निधी दास तूझा । तुला वाहिलासे स्वयें देह माझा ॥
सदा सर्वभावें करी दास्य तूझें । देई अपुले वेश-वेतन माझें ॥
तुझे मारुतीसारखे दास देवा । मला मानवा किंकरा कोण केवा ॥१॥
दिनानाथ विख्यात हें ब्रीद गाजे । तेणें मानसी थोर आनंद माजे ॥

करुणाष्टक १९

२) "रघूनाथदासास कल्याण व्हावें । अती सौख्य व्हावेंच आनंदवावें ॥
उदवेग नासो, वर शत्रू नासो । नानाविलासे मग तो विलासो ॥३॥
कोडें नको रे कलहो नको रे । कापटच कर्मी सहसा नको रे ॥
निर्वाण-चिंता निरसी अनंता । शरणांगता दे वर धातमाता ॥४॥
अजयो न हो रे, जयवंत हो रे । अपदा नको रे, बहूभाग्य हो रे ॥
श्रीमंतकारी जनहीतकारी । परउपकारी हरिदास तारी ॥

समर्थांनी मग आपल्या या मनोधारणेला धरूनच आपला संप्रदाय मांडला. समाजाची ऐहिक व पारमार्थिक उन्नति ऊर्फ प्रवृत्ति-निवृत्तींचा सुरेख संगम हे या संप्रदायाचे वैशिष्टच आहे. असुरमारक व देवतारक अशा धनुर्धारी रामाची उपासना, भीम अथवा प्रतापमारुतीचा सेवाधर्म आणि आत्मज्ञान ही या संप्रदायाची बिरुदावली आहे.

आपला संप्रदाय विकसविताना आपल्या पूर्वीच्या संतांची परंपरा समर्थांनी राखली आहे. "उठोनि वाटेचि लागावें । दिगंताप्रति ॥" सायुज्यमुक्तीचे वर्म ठायी पडावे, ज्ञानप्राप्ति होऊन वैराग्य अंगी बाणावे, विवेकेंसहित चातुर्य कळावे, वगैरे ज्ञानदेव-एकनाथ प्रभृतींच्या ग्रंथनिर्मितीचे जे प्रयोजन, तेच समर्थ-वाङ्मयाचे

मुख्य प्रयोजन आहे. जनसामान्य निश्चयशक्तिहीन व कामक्रोधादि युक्त असतात. त्यांना वरील गोष्टी मानत मानत सांगाव्या लागतात. तेव्हा अधिकारपरत्वे कार्य सांगणे व प्रत्येकाची उन्नति करणे हा समर्थांचा दण्डक असे. प्रपंच साधून परमार्थ करावा, दोन्ही ठिकाणी सावधानता ठेवावी, प्रपंच नेटका करता करताच तो फिका होत जातो, म्हणून दीर्घसूचनेने व दक्षतेने वागावे, " सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाउं नेदी क्षण । "आचरणात रहावे, यास्तव झाडून कष्ट करावे, कठीण प्रंसगासाठी संचय करावा, " कांही मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकास उगवी । शरीर कारणी लावी । कांही तरी ।। " हे व्रत पाळावे, नित्यानित्यविवेक जागृत ठेवून सत्कीर्तीला पात्र व्हावे, "अचूक येत्न तो देवो जाणावा ।"एवढेच नव्हे, तर प्रसंगी "बरे वोखटे सर्व साहोनि जावे ।"आणि हे सर्व साधण्यासाठी प्रयत्नवादी सज्जनाच्या संगतीत सदैव असावे म्हणजे भलेपनाने जीवन सार्थ होईल, अशी लोकांच्या बोलीने बोलून व लोकांच्या चालीने चालून समर्थ शिकवण देत. जनसामान्य नेटस, नीट व नीतिमान झाला पाहिजे हा कटाक्ष होता.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष अथवा समर्थांच्या भाषेत प्रपंच-परमार्थ, अरत्र-परत्र वा अभ्युदय-निःश्रेयस या ध्येयाची सिद्धि ज्याला प्रयत्नांती झाली, त्याला समर्थ 'उत्तम पुरुष' म्हणत. आपण स्वता ज्ञानाने तृप्त व्हावे, ते ज्ञान दुसऱ्यास द्यावे, कोणतीहि गोष्ट स्वता करावी व मग दुसऱ्यास सांगावी, हरिकथादि भक्तिमार्ग सोडू नये, शरीर चंदनाप्रमाणे परोपकारी झिजवून कीर्तिरूपे उरवावे, वाणी मृदु व रसाळ असावी, मोठे मन करून दुसऱ्याचे लहान अथवा थोर अन्याय क्षमा करीत जावे, नेमकेपणाने प्रत्येक गोष्ट करीत जावी, आणि " राजी राखावे सकळ लोक।" अशा निग्रहनियमानी वागणारा मनुष्य 'उत्तम पुरुष' होईल, असे समर्थांचे सांगणे आहे. ही साधना ' केल्याने होत आहे रे ' असा समर्थांचा कळवळा आहे. भगवद्-गीतेचा ज्ञानी, भक्त, योगारुढ, गुणातीत, स्थितप्रज्ञ, तसाच समर्थांचा महंत निःस्पृह, सिद्ध, सदैव सद्विद्यावान् उत्तम पुरुष. हा होण्यासाठी समर्थांचा प्रत्ययावर भर !

पुष्कळ वेळा शास्त्र म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी व प्रत्यक्ष प्रत्यय ( प्रचीति ) यामधील विरोध अगर परिपाठी ( रुढी, वहिवाट ) व प्रचीति यातील विरोध, अडचण निर्माण करतात. तेव्हा समर्थ सांगतात की, " प्रचीत पाहतां निकट । उडोनि जाती परिपाठ । " कारण परमार्थाचे वर्म आहे की " तुरंग, शस्त्र दमून पाहिले । बरे पाहतां प्रचीतीस आले । तरी मग पाहिजे घेतले । जाणते पुरुषीं ।। " (दा. १०-८-३). म्हणून " माझे उपासनेचा बडिवार। ज्ञान सांगावे साचार। " असल्याचे समर्थ ठसवितात. जिवाची शिवाजवळ बैठक ( उप = जवळ + आसन = बैठक ) व्हावयास " आधी तें करावे कर्म । कर्मयोगे उपासना " आणि " उपासका सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षचि पावणे ।। " उपासना म्हणजे भक्ति हा व्यवहारात अर्थ करतात. खरा आहे. समर्थ तर सांगतात की, " भक्ति म्हणजे विभक्ती नव्हे । " ईश्वराच्या ठिकाणी पराप्रीति हीच भक्ति, म्हणूनच " भक्ति-

चेनि योगे देव। निश्चये पावती मानव।" म्हणजेच "जयांचा ईश्वरी जिव्हाळा। ते भोगिती स्वानंदसोहळा।" उघडच उपासनेस धरून "नाना देवांच्या नाना प्रतिमा। लोक पूजिती धरुनी प्रेमा। ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा। कैसा आहे?॥" (दा. ११-९-६) "ऐसे वोळखिले पाहिजे। वोळखीन भजन कीजे।" असे समर्थ सांगतात. तो परमात्मा एकच असून निर्गुण, निराकार, अनंत, अपार, नित्य, निरंतर, सर्वव्यापक व कर्ता-करविता आहे. (दा. १०-८-११) पण "नातुडे मुख्य परमात्मा। म्हणोनि करावी लागे प्रतिमा।" आणि प्रतिमा केली तरी नुसते "प्रतिमापूजन। मूर्खाचे लक्षण।" असून प्रतिमारूपाने पुढे ठाकणारा देव "विमल हस्ती पूजावा" लागतो. समर्थांचे कुलदैवत राम होते. म्हणूनच "रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी।" असे समर्थांनी सांगितले, असे म्हणण्यात मात्र स्वारस्य नाही. कारण जितक्या प्रेमाने त्यानी रामकथा गायिली, तितक्याच तल्लीनतेने त्यांनी दुसऱ्याहि देवांची चरित्रे वर्णिली आहेत. बालक्रीडेत श्रीकृष्णलीला त्यांनी रसभरित सांगितल्या आहेत, वैराग्यशतकात दत्तात्रेयचरित्र वर्णिले आहे, "सर्वज्ञान म्हणजे शिव" आणि "अन्न देणार श्रीहरि" हे त्यांचे अभंग हरिहर अभेदात्मक मानण्याच्याच प्रवृत्तीचे आहेत. कोठीलहि पावित्र्य हे पावित्र्यच म्हणून आदरण्याची भारतीय परंपरा ज्ञात वाङ्मयाला शंकराचार्यापासून तरी सर्वपरिचित आहे. अध्यात्मक्षेत्रातील हे 'सर्वपंथी समानत्व' समर्थांनीहि सांभाळले आहे. साधु 'वेगळाले दिसत' असले, तरी 'स्वरूपी मिळालेले' असल्यामुळे सर्वांच्या पूजाप्रतिमा वेगळ्या असल्या तरी त्या सर्वात्मक परमेश्वराच्याच प्रतीक असतात. त्यायोगे वारकरी पंथाने महाराष्ट्राची जी संघटनसेवा केली, तिचे विठोबा हे दैवत समर्थांना रामस्वरूपच भासले.

धनुष्य-बाण काय केले ? । कां कर कटावरी ठेविले ? ॥
हा का धरिला अबोला ? । दिसे वेष पालटिला ॥
किलकिलाट वानरांचे । थवे दिसती ना तयांचे ॥
पंढरीस जाहले येणे । एकटचा हनुमंताकारणे ।
दिसे हनुमंत एकला । सैन्यामधुनी फुटला ॥
रामी रामदासा भाव । तैसा होय पंढरीराव ॥

आणि काळओळख करून घेतलेल्या समर्थांना वाटत होते की, जनतेनेदेखील सर्वव्यापी परमेश्वराची पूजाप्रतिमा म्हणून आपल्यासारखे रामध्यासी व्हावे. 'रघुकुळटिळक' या करुणाष्टकात ते सांगतात की, "बहुविध भजनाची दैवते पाहिली हो। सकळ त्यजुनि रामी वृत्ति हे राहिली हो॥ विमलगुणशिळाची लागली प्रीति मोठी। विमळ हृदय होता, उद्धरे कूळकोटी॥" एवढेच नव्हे, तर "जेणे फेडिला पांग ब्रह्मादिकांचा। बळे तोडिला बंद त्या त्रीदशांचा॥ म्हणोनी कथा थोर या राघवाची। जनी ऐकतां शांत होते भवाची॥" आणि म्हणूनच रामराज्य होण्यास त्या धनुर्धारी रामाचे दैवत समर्थांनी महाराष्ट्रास दिले.

वास्तवातून विकास करून स्वतःची चैतन्यशक्ति जगाच्या चैतन्यशक्तीशी एकरूप करणे म्हणजेच मोक्ष असल्याकारणाने त्या चिच्छक्तीलाच प्रतीकरूपाने राम म्हणण्यास समर्थांनी सुरवात केली आणि "म्लेंछांचे बहुता दिसांचे माजले बंड" मोडल्याशिवाय व घरोघरींचा संसार स्वस्थतेने मार्गी लागल्याशिवाय परमार्थातील अध्यात्महि व्यवहारशुद्ध होणार नाही, या प्रखर तळमळीनेच समर्थांनी आपला संप्रदाय श्रीराम दैवत पुढे करून उभा केला. "रिता ठाव या राघवावीण नाही" असे प्रतिपादून "ब्रह्मांडनायक चोजवेना। हे बरे नव्हे।।" (दा. ६-१-१३) असे बजावून "जगी थोरला देव तो चोरिलासे।" त्याला रामस्वरूपात पहाण्याचा धडा समर्थांनी घालून दिला.

## भागवतधर्मान्तर्गत 'स्वरूप संप्रदाय':

श्रीमत् शंकराचार्यानंतर दत्त संप्रदायाचे प्रवर्तक श्रीनरसिंह सरस्वती व विजयानगर-साम्राज्याचे संस्थापक श्रीविद्यारण्यस्वामी यांनी वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न केला, पण त्याला यावयास हवे तसे तेजस्वी यश न येता, अखिल भरतखंडभर इस्लामी धर्म पसरणार की काय, अशी भीति उत्पन्न झाली. प्रलोभन आणि जुलूम असे दुहेरी जाळे जनतेला जखडून टाकीत होते. अशा स्थितीत ज्ञानेश्वरांची परंपरा चालवून नामदेव-एकनाथ-तुकारामादि संतांनी 'धर्मत्यागापेक्षा प्राणत्यागहि श्रेयस्कर' हे पटवून साध्या विठ्ठलनामाच्या गजरावर चंद्रभागेच्या काठी मोक्ष हाती येतो अशी खात्री देऊन जातिभेदातीत असा एकमेळ हिंदुसमाज उभा केला. शांतिब्रह्माची संयमशील उपासना म्हणजे विठ्ठलभक्ति ती समाजाच्या अंगी मुरवणारा वारकरी संप्रदाय म्हणजेच भागवत संप्रदाय. अखिल जगाचे अभिन्न निमित्तोपादानकारण जो परमात्मा त्याचे ध्यान व त्याचेच नाम एकनिष्ठेने गाणे हे या संप्रदायाचे मुख्य ध्येय. मायिक पदार्थांची मागणी हे मात्र त्याचे फळ नव्हे. वारकरी संप्रदायाची भक्ति निष्काम असते. "हेचि थोर भक्ति आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची।।" असे तुकारामच सांगतात. "आपुला तो एक देव करुनी घ्यावा। तेणेवीण जीवा सुख नसे।" देव आपुलासा करून घेताना, देवाची दोन स्वरूपे हा पथ मानतो. तटस्थ व स्वरूप, निर्गुण व सगुण, अगर निरुपाधिक व सोपाधिक अशी त्या स्वरूपांची नावे आहेत. "दिसे सगुण हा स्वरूपसुंदर। परी व्यापुनिया ठेला चराचर।।" असेच निळोबारायांनी देवाचे वर्णन केले असून एकनाथांनी हरिपाठात "सगुणी भजता निर्गुणी पावले।" असे आश्वासिले आहे. मूर्तीतून अमूर्त परमेश्वरदर्शन करणे हे तर वैदिक परंपरेचे व्यावहारिक लक्षण असल्याकारणाने वारकरी पंथातील विठ्ठल असा आहे:—

> सत्य ज्ञानवंत गगनाचे प्रावर्ण। नाहीं रूप-गुण-वर्ण जेथें।।१।।
> तो वो श्रीहरी पाहिला डोळेभरी। पाहतां पाहणें दूरी सारुनिया।।२।।
> ज्ञानदेव म्हणे ज्योतिची निजज्योति। ती ही उभी मूर्ती विटेवरी।।३।।

उघडच, या पंथाचे पाईक आपले साध्य अगर ध्येय, कल्याण, मोक्ष, मुक्ति, निःश्रेयस, पुरुषार्थ, चरमस्थिति अशा कोणत्याहि शब्दाने संबोधीत असले, तरी कर्म, उपासना व ज्ञान याच साधनांनी वाटचाल करतात. ज्ञानेश्वरीत असलेली जागोजागची औपनिषदिक विचारांची छाया, भागवतात अंगीकारिलेले भक्तीचे तत्त्वज्ञान आणि " वेदान्तीचा अर्थ अह्मांसीच ठावा । इतरांनीं वहावा भार माथां।।" हा तुकारामांनी प्रगट केलेला प्रत्ययबोध ही वरील विधानाची प्रमाणे आहेत. भक्तिप्रधान अद्वैतवाद वारकरी या भागवत संप्रदायाचा पाठकणा आहे. " कायावाचामनें सर्वस्वें उदार । बाप रखमादेवीवर विठ्ठलाचा वारीकर ।। " असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. त्यामुळे 'गळा तुळसीमाळ' घालून विठ्ठलचरणी लीन होण्यासाठी (आषाढी-कार्तिकी एकादशींना तरी पंढरपुरीं) फिरून फिरून जाणारा तो वारीकर (वारकरी). विठ्ठल किंवा पांडुरंग म्हणून परमेश्वरप्रतीक असलेले रूप हे श्रीकृष्णाचे बालरूप आहे. पुंडलीकापासून अस्तित्वात असलेल्या या विठ्ठलचरणरत माळकरी वा वारकरी पंथाने, १२९६ मध्ये देवगिरीचे राज्य नष्ट होऊन महाराष्ट्रात मुसलमानी अंमल सुरू झाल्यामुळे त्या अमलाने सुरू केलेल्या परधर्माशी साक्षात् तोंड देण्यास समाज समर्थ केला. भक्तिरसाने ओथंबलेला व कर्मयोगाने चैतन्यमय झालेला ज्ञानयोग ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला दिला; नामदेवांनी कीर्तनरंगी नाचून व भक्तिस्नेहपरिपूर्ण असा ज्ञानदीप लावून धर्माची लोकशाही स्थापली; एकनाथांनी प्रपंच-परमार्थाचा सुंदर मिलाफ घालून एक नवीन आदर्श निर्माण केला; तुकारामांनी साधारण प्रापंचिकाच्या भूमिकेतून सुरवात करून आध्यात्मिक अनुभवाचा अत्युच्च कळस भक्तिमंदिरावर चढविला; असा हा समाजाची आध्यात्मिक भूमिकेतून संघटना साधणारा सतराव्या शतकापर्यंतचा सारभूत इतिहास आहे. तो उभारणाऱ्या भागवतधर्माचे चैतन्य, स्वरूप, आनंद व प्रकाश असे चार संप्रदाय असून, चार वेद, सांख्य आणि योग यांचा समावेश पांचरात्र धर्मात होतो असे जे महाभारताचे शांतिपर्व सांगते, तोच मूळ भागवतधर्म होय. निष्कामकर्मपर पण भक्तिला प्राधान्य देणाऱ्या या धर्मात जगाचा कर्ता-करविता वासुदेव परब्रह्म असून त्याच्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हालत नाही, अशी श्रद्धा दृढ आहे.

भागवतधर्मातील स्वरूप संप्रदायाचा त्रयोदशाक्षरी मंत्र " श्रीराम, जय राम, जय जय राम " हा असून त्याचे रामानुजीय ( कपाळावर तांबडी रेषा लावणारे ) आणि रामानन्दी ( कपाळावर पांढरी रेषा लावणारे ) असे दोन पोटभेद आहेत. भूतकाळातून वर्तमान व वर्तमानातून भविष्य विकसविला पाहिजे, या व्यावहारिक दृष्टीच्या समर्थ रामदासांनी स्वरूप-संप्रदायाचाच अंगीकार केला. भक्तिमार्गात " जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवन्त ।। " असे व्रत असते. त्यास अनुसरून सर्वांस समान मानणे वर्तनशुद्ध. उघडच, आपल्यासारखाच लोकांच्याही सुखदुःखांचा कळवळा कर्तव्य. ओघानेच, लोकसेवा व लोककल्याण या दोघांचाहि समावेश धार्मिक जीवनक्रमात होऊन त्याच्या योगाने एकजिनसीपणाचे ( एकराष्ट्रीयत्वाच्या जिव्हाळ्याने ) संवर्धन हीच साहजिक परिणति. सांसारिक यातायातीतून शक्य

तेवढे दूर राहून व ध्यानतपादि साधनांचा उपयोग करून मनुष्यांनी "आत्म-अनुभवी चोखाळाव्या वाटा।" आणि स्वता मोक्षाला जावे, याच ध्येयाचा पुरस्कार बहुतेक साधुसन्तांच्या चरित्रावरून होत आला आहे व होता. जग हे मायिक इंद्रजाल आहे, आत्म्याला देहाशी जखडून टाकणाऱ्या व पुनर्जन्मफलदायी कामनांना जन्म देणाऱ्या ऐहिक गोष्टीमध्ये मुमुक्षूने गुंतून जाऊ नये, अशी त्या ध्येयवाद्यांची परंपरागत शिकवण होती. त्या शिकवणीला मुरड घालून, "तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी ।।" फक्त "तुझे सोडू ना चरण।" ही चिकाटी साधल्यावर जन्म-मरण या बाबी मामुली आहेत. भक्तीने करावयाच्या कर्तव्यासाठी मरायलाहि भ्यावयाचे नाही व जगावयालाहि भ्यावयाचे नाही. (नाभिनन्देत मरणं। नाभिनन्देत जीवितम् ।।) "डर तो पीछे रही।" तुकारामांचा हाच धागा पुढे ओढून व्यक्तीला (अगर व्यक्तीने) मुक्ति मिळवण्यापेक्षा समाजाला, राष्ट्राला, मानवजातीला मुक्ति मिळवून देण्यामध्येच पुरुषार्थ आहे. "यो वैभूया तत्सुख' पुरुषार्थ वा "पौरुष नृषु" हे परमेश्वराचे प्रतीक आहे. त्याचा मार्ग "जे कां रंजले, गांजले त्यासी आपुले" म्हणण्यात आहे. रंजल्यागांजलेल्यांना आपुले म्हणणारा साधु आहे व त्या साधूकडून त्या रंजल्यागांजलेल्यांची उणीव भरून निघताच, निसर्गदत्त शक्तींना पूर्ण वाव मिळून त्याच्या पौरुषाला जो आविष्कार मिळतो, तोच तेथे देव होय. म्हणूनच गरीब, पंगु, रोगी, निराश्रित, दीन, दुबळे यांची उणीव जिव्हाळ्याने भरून काढण्यात परमेश्वराची सेवा होत असते. या सेवेला मानून "देव मस्तकी घेणारा" स्वरूप संप्रदायापैकी जो रामानंदी पंथ तो समर्थांनी आत्मसात् केला होता.

## आदिमठ आणि गुरुपरंपरा :

समर्थ-सांप्रदायिक आपली गुरुपरंपरा पुढीलप्रमाणे सांगतात :

आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वसिष्ठकम् ।
श्रीरामं मारुतिं वंदे रामदासं जगद्गुरुम् ।।

स्वतः समर्थ रामदासांनीहि एका स्फुटात आपल्या परंपरेचे स्पष्ट निवेदन केले आहे :

आदिनारायणा सद्गुरु आमुचा । शिष्य झाला त्याचा महाविष्णू ।।१।।
तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तेणे ब्रह्मयास उपदेशिले ।।२।।
ब्रह्मदेवें केलें उपदेश वसिष्ठा । तेथें धरा निष्ठा शुद्ध भावो ।।३।।
वसिष्ठं उपदेशी श्रीराम रामाशी । रामें रामदासीं उपदेशिले ।।४।।

ही समर्थ-कथित परंपरा आदिनारायण-महाविष्णु-हंस-ब्रह्मा-वसिष्ठ-श्रीराम-रामदास अशी ठरते.

समर्थ रामदासांचे आराध्य दैवत श्रीराम आणि त्यांचा सद्गुरुही श्रीरामच. त्यांच्या स्वरूप-संप्रदायाचा आदिमठ 'अयोध्या मठ' असून हनुमंत हा त्यांच्या

रामोपासनेचा परमादर्श आहे. तोच त्यांचा आणि त्यांच्या परंपरेतील साधकांचा परमार्थ-पथावरील मार्गदर्शक आहे. श्रीरामाची प्राप्ति करून घ्यावयाची असेल, तर तो ज्याच्या हृदयात नांदत आहे, त्या हनुमंताचाही आश्रय अपरिहार्य आहे. समर्थ म्हणतात :

उपदेश देवोनि दिधला मारुती । स्वय रघुपती निरवीतां ।।१।।
निरवितां तेणें झालों रामदास । संसारीं उदास म्हणोनियां ।। २ ।।
म्हणोनि आमुचे कुळीं कुळदैवत । राम हनुमंत आत्मरूपीं ।। ३ ।।

राम आणि हनुमंत हे एकात्मच आहेत. समर्थ रामदासांच्या दृष्टीने रामदास्याचा परमादर्श हनुमंत असल्यामुळे रामदासी परंपरेत या 'आद्य रामदासा'ला, हनुमंताला मूळपुरुषाची प्रतिष्ठा प्राप्त होणे स्वाभाविक आहे. समर्थांनी हाच भाव पुढील शब्दात व्यक्त केला आहे :

हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपा वेली गेली ।
श्रीरामभक्तीने फुलली । रामदास बोले या नांवें ।। १ ।।
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें मुख्य दैवत ।।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धितें न पवे कीं ।। २ ।।
साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ ।
सद्गुरु श्रीराम समर्थ । काय उणें दासासी ? ।। ३ ।।
दाता येक रघुनंदन । वरकड लंडी देईल कोण ? ।
तया सोडोन आम्ही जन । कोणाप्रती मागावें ? ।। ४ ।।
म्हणोन आम्ही रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोन पडों रे आकाश । आणिकांची वास न पाहूं ।। ५ ।।
स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी श्रीरघुनाथ दैवत ।
मारुती उपासना मार्ग नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ।। ६ ।।

यावरून हे स्पष्ट होईल की, समर्थ संप्रदाय हा पुरातन स्वरूप संप्रदायाचाच एक युगसापेक्ष समर्थ आविष्कार आहे.

### रामोपासनेतील 'पुरोगामी' :

उत्तर भारतात रामानंदांनी पेटवलेली रामोपासनेची ज्योत कबीर-दादू-तुळसीदासांच्या प्रभावामुळे कशी तेजस्वितेने लोकांना समाधानाचा प्रकाश पुरवीत होती, याचा अनुभव समर्थांना तीर्थयात्रेत प्रत्यक्ष येणे स्वाभाविक होते. रामानंद कृष्णभक्तीतून रामभक्तीकडे वळले होते, हेहि समर्थांना समजलेले असणारच. कालानुक्रमाने जवळची (शकपूर्व ११७३ श्रीकृष्ण-कालखंड) असलेली कृष्णभक्ति सर्वत्र प्रचलित असता, जुन्या

झालेल्या ( शकपूर्व २४८० श्रीराम–कालखंड ) रामभक्तीकडे रामानंद का झुकले, याचाहि विचार ( "सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख" म्हणणाऱ्या) समर्थांना सुचलाच असेल ! " गुरुपरसादि जैदेव नामा । प्रगतिके प्रेम इन्हहि जाना ।। " या कबीरवचनावरून ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, नामदेव यांच्या रचनेतील 'निर्गुनिया'-कडेहि समर्थांचे लक्ष गेले असेल. ( नागरी प्रचारिणी पत्रिका, वर्ष १०, ग्वाल्हेरचे भालेराव यांचा लेख पहा. ) दक्षिण भारतातील यात्रेत, महाराष्ट्र व कर्नाटकामध्ये मध्वाचार्यांनी रामोपासनेचा केलेला प्रसारही समर्थांच्या मनावर ठसला नसेल काय ? विजापूरकडील तोरवे येथील कानडी कवि नरहरि ऊर्फ कुमार वाल्मीकि ( १५००च्या सुमाराचा ) याच्या रामायणाची व त्यातील महिरावणाच्या युद्धा-संबंधीची वर्णनोत्कट कीर्ति समर्थांच्या कानावर गेलीच असणार. तंजावरच्या रघुनाथ नायका (१६१४–६२ ) ने लिहिलेल्या तेलंगी रामायणाचा संस्कृत अनुवाद त्यांच्याच पदरच्या शीघ्र कवयित्री मधुरवाणीने केल्याचे समर्थांना ऐकून तरी ठाऊक असणार. नेमाडातील खांडव्यास जन्मलेला मुकुंद बागलाणात जैतापुरी गेल्यावर १६०८ साली स्वप्नी प्रेरणा झाल्याप्रमाणे रामायणातील सुंदरकांड (१६२३) लिहून लोकप्रिय झाला होता, हे समर्थांच्या नजरेतून कसे सुटले असेल ? रामनामाचा पुरस्कार निवृत्तिनाथ, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी केलेला जसा समर्थांना माहीत, तसाच ज्ञानेश्वरी ( अ. ११, ओ. २५२ ते २५४ ) मधील धनु-र्धारी रामाचे जीवन आणि अमृतानुभवाच्या प्रारंभावर रघुवंशाच्या प्रास्ताविकाचे पडलेले प्रतिबिंब, त्याचप्रमाणे एकनाथांचा पैठणकर नातू मुक्तेश्वर चिंतामणि (१५९९–१६४९) याचे भावरेखीव रामायण समर्थांच्या वेचक निरीक्षणातून कोठले सुटावयाला ? कृष्णदास मुद्गलाचे 'युद्धकांड रामायण' समर्थपूर्व रामो-पासनेच्या क्षेत्रात महत्त्वाचे आहे. नाथांच्या भावार्थ रामायणाने तर समर्थांची सहजात रामभक्ति सर्वांगानी फुलविली. सन १६३२ ते १६४४ या तपात समर्थांनी केलेल्या देशाटनातील अशा प्रचीतिपरिचयाने त्याना स्वतःचा समर्थ संप्रदाय उभारण्याची बुद्धि, " जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळूहळू शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळ जन । " म्हणून झाली, हे उघड आहे. आणि ते गरजले " जय जय रघुवीर समर्थ ! "

समर्थपूर्व सन्त बहुधा ( संसार ) कर्मसंन्यासी, भक्तिमार्गी व लोकोपकारी असत. कसल्याही प्रसंगी स्वताची शांति ढळू न देता अन्यायकाला स्वतःच्या अप-कृत्याची आज ना उद्या लाज वाटेल, अगर दुष्टांच्या निर्दालनाकरिता अवतार घेणारा परमेश्वर अन्यायकाला शासन करून सज्जनांचे रक्षण करील, अशा भरव-शाने आपण आपली भक्ति–तल्लीनता अखंड राखावी, असे ते प्रल्हादाच्या निष्ठेने समजत. त्यामुळे अन्यायकाच्या विरुद्ध उठाव वा त्याची अडवणूक हे त्यांच्या सत्व-शीलतेत वसतच नसे. एकाने गाय मारली म्हणून आपण त्यालाच का मारावे ? हत्याच होईल ती ! तेव्हा त्यांच्या नेतृत्वाने जनतेत दया, क्षमा, शान्ति, सोशिकपणा

इत्यादि गुण वृद्धिगत झाले. "नाठाळाचे माथा काठी घालण्याची भाषा।" तुकारामानी केली. कारण अन्यायाने व छळवादाने जनतेच्या अंतःकरणाला पडलेला पीळ सोशिकपणाची कमाल होऊनही सैल झाला नव्हता. समर्थांना तर स्पष्टपणे दिसले होते की, "कीति एक अनाचारी पडली। किती एक यातिभ्रष्ट झाली। कित्येक ते आक्रंदिली। मुळेबाळे ॥१॥ कित्येके विषे घेतली। कित्येक जळी बुडाली। जाळिली ना पुरलीं। कितीयेक ॥२॥ प्राणीमात्र झाले दुःखी। पाहतां कोणी नाहीं सुखी ॥ कठीण काळी ओळखी। धरीनात कोणी ॥३॥ आणि स्वधर्माचा लोप झाला। अधर्मी जन प्रवर्तला। स्वइच्छा गोंधळ घातला। कळीने सावकाश ॥४॥" अशा दुरवस्थेतही उत्तर हिंदुस्थानातील रामोपासक सन्तांना कैपक्षी राजा भेटला नाही. १६३४ साली हरि गोविंदसिंगाला स्वतः समर्थांनी उत्तेजित करूनही नानकाचे शिखांचा आत्मयज्ञ तळपला पण प्रल्हादभक्तिचा भुकेला नरसिंह प्रकटला नाही. हे समर्थांच्या लक्षात आलेच आले. याउलट आपण तीर्थयात्रेला निघण्यापूर्वीच पंचवटीकडे परिचित झालेल्या शहाजी राजांचे चिरंजीव शिवाजी राजे यांचे नवे उद्योगातून धर्माला कैपक्षी राजा भेटण्याचा संभव वाटल्यामुळेच दक्षिणेतील शासन-केंद्रातून एकदम दडपशाही होण्याचा संभव कमी असलेल्या कृष्णाखोऱ्यात आपले धर्म-संस्थापनेचे कार्य सुरू करावे अशी प्रेरणा समर्थांना झाली. त्यांच्या अंतःकरणाची उर्मीच अशी उसळली की "हुजूर दम निघेना। अंतरी कोड नाना। तिळभर स्थळ कोठे पाहताही दिसेना ॥ बहुत विषम काळे दाटनी फार झाली। म्हणवुनि चरणी ही वृत्ति गुंगोनि गेली ॥" प्रभुचरणीच्या या निवेदनाबरोबरच "धीर्धरा धीर्धरा तकवा, हडबडू गडबडू नका। काळ देखोनी वर्तावें सांडावे भय पोटीचे," असा जनतेला दिलासा देऊन समर्थ गरजले "जयजय रघुवीर समर्थ"

या गर्जनेत "जय" शब्दाच्या द्विरुक्तीने यश व अभ्युदय याची सूचक अशी आत्मविश्वासपूर्ण सद्भावना व्यक्त झाली असून रघुवीर हा शब्द सत्वशील पराक्रमाचे प्रतीक आहे. "बहुत प्रेत्न पाहिले। परंतु सर्व राहिले। विबुधपक्षरक्षणा। रामराम हे म्हणा॥" अशी 'सल्ला' जनतेला देऊन रामाचे ठायी उत्साह, तेज, साहस, मर्यादाशीलता, तप आणि अनासक्ति हे गुण असल्यामुळेच परोपकारी रामाने शक्ति-मंत्रांचा शक्तीमंत, बुद्धिमंतांचा बुद्धिमंत आणि मूर्तिमंत सेवाधर्म असा हनुमंत आपला प्रताप-पाठीराखा म्हणून मिळवला व "प्राणि मात्र आनंदविले" या इतिहासाची जाग देवून "रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी" अशी समर्थांनी जनतेस प्रेरणा केली.

## संप्रदायाच्या सिद्धान्तांची बैठक :

"पिंडी तेंच ब्रह्मांडी।" या न्यायाने परमेश्वर अथवा राम कोठे आहे म्हणून मनुष्य शोधूच लागला तर त्याला प्रत्यय येईल की, "जितुकी शरिरें तितुकीं

देवमंदिरे ।" अर्थात् "पूजितां सर्व देवाल्यें । तेणें तो तृप्त होतसे ।।" असं समर्थांनी लोकसंग्रही सिद्धांत सांगितला आहे. "जनीं जनार्दन, म्हणोनि जनां । संतुष्ट करावे ।।" (दा. १८–४–३५). हे सर्व पाहणे, ओळखणे व अनुभवणे जमावे कसे? समर्थ सांगतात, "अनंतकोटि देवाल्यें । त्यामधें एकला प्रभु ।। दीपानें दिसेनां कांही । त्याने त्यासचि पाहणें ।। दिसेना लोचनाला रे । घाला रे मन त्यामधें ।। " सर्वत्र मन घालून ज्याला देवाची याद घ्यावयाची संवय होते, त्याच्या चित्तात एकनाथांच्या म्हणण्याप्रमाणे दया येते. "दया तिचे नांव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकांचें ।।" अशी तुकारामांची व्याख्या आहे. ज्यांच्याजवळ ही "सर्वांभूतीं दया ।। संत म्हणावे ऐसिया ।।" असे तुकारामच सांगतात. महाराष्ट्रीय संतांची ही समर्थपूर्व परंपरा तैत्तिरीय व छांदोग्य या उपनिषदांना आणि आचार्यकृत आत्मबोधाला धरूनच आहे. तथापि विचाराच्या तपाचा हा ज्ञानमार्ग जनसामान्यास भक्तीनेच साध्य होणारा आहे. ऐहिक लाभार्थ देवतांची उपासना करणाऱ्यांना प्रतीके पुढे ठेवून श्रद्धेने आराधना करण्याची जी संवय असते, तीमधून "भक्तांचा देव लोभाळू । भक्तांचे मनिचें करी ।।" हे त्यांना पटलेले असते. "मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें । कृपा केलिया रघुनाथें । प्रत्यया येतें ।।" असे समर्थांचेही सांगणे आहे. असा तो "देवांचाही देव पाहावया कारणें ।" लोकांस सांगावे लागते की, "देहसंगें विषय भोगिलें । देहसंगें प्राणी मिरविले । देहधर्त्यास चुकले । नवल मोठे ।। (दा. ११ ८–१५) याकारणें जो शहाणा । तेणें प्रभूस भेटावें जाणा । ऐसें न करता दैण्यवाणा । संसार त्याचा ।।" (दा. ६–१–७) या सांगीने जनसामान्य विचार करू लागला म्हणजे त्यास पटत जाते की, "दृष्टिमध्यें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो । रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यय आतां ।।५।। घ्राणामध्ये वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो । वाचेमध्यें बोलवितो । जाणोनि शब्द ।। ६ ।। ( दा. १३–१ ) " अशा तऱ्हेने " पांचा विषयांचा नैवेद्य । जेव्हां पाहिजे तेव्हां सिद्ध । ( दा. १७–१–९ ) " याचा एकांती विचार झाला म्हणजे प्रत्यय येत जातो की, बाहेर अनेक देवळात व देवतांमूर्तीत आपण ज्या देवाच्या पाठीमागे लागतो, तो आपल्याच ठिकाणी रात्रंदिवस वास करीत आहे. जडदेहबुद्धीने तो जो आपणास 'चोरल्या' सारखा झाला होता, तो विवेकाने देहबुद्धि नष्ट होताच आपल्याला उघड झाला. हीच अवस्था कोणत्याहि प्राणिमात्राबाबत व कालौघाने घडलेल्या नि घडणाऱ्या इतिहासाबाबत ! तात्पर्य, " जुनें ठेवणें । मीपणें तें कळेना । " या जाणिवेने एकदा का आपल्यावरून दुसऱ्याची परीक्षा मनुष्य करू लागला की, " ते मुंगीसमान शरीरें । उदंड असतीं लहानथोरें । समस्तांमध्ये जीवेश्वरें । वस्ती कीजे ।। ( दा. १५–८–५ ) " अशी त्याची आत्मौपम्यबुद्धि वाढत जाते व तो म्हणू लागतो की, " विसरलों मज मी ममतागुणें । बहुतकाळ बरी दुःख भोगणें । अवचिता सुखसागर भेटला । " ( करुणाष्टक ९०–१ ) सगुण

व प्रतीकात्मक उपासनेच्या अंतिम सीमेला पोचलेल्या या भक्ताला "वासुदेवः सर्वमिति" वाटते ते हे असे.

सारांश, "संसार कळतो तुम्हां । सत्यासत्यहि तो कसा । पावतां सच्चिदा-नंद । निजानंदांत रंगुनी ।।" हाच "सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार ।।" हा "विवेक पाहिल्यावीण । जो जो उपाय तो तो शीण । विवेक पाहतां आपण । आत्माच आहों ।। आत्मयाच्या ठायीं कांहीं । बन्ध-मोक्ष दोनी नाहीं । जन्म-मृत्यू हे सर्वही । आत्मत्वीं न घडे ।।"; म्हणजेच "जीवो ब्रह्मैव नापरः ।" या वैदिक सिद्धान्ताचें प्रत्ययज्ञान. हे प्रत्ययज्ञान मनुष्याने संसारात ऊर्फ गृहव्यवस्थेत राहूनच घेत जावे. एकदम संसारविषयापासून निवृत्त होणे जन-सामान्याला साधणारे नाही. हठयोगाचा आश्रय करून विषयनिवृत्त होण्याचा कोणी प्रयत्न करील तर शृंगी, पराशर, विश्वामित्र यांच्याप्रमाणे तो वाहण्याचा संभव आहे. या करिताच समर्थांनी "पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ।" असे सांगून आत्मज्ञानाने "पिंडीं तेंच ब्रह्मांडी" पाहण्याच्या संवयीने ज्ञानाचे विज्ञान करण्याचा व त्यायोगे समाधानाचा मार्ग आंखून दिला. त्यामुळेच समर्थ संप्रदायाला 'स्वरूप संप्रदाय' असेही नांव मिळाले.

समर्थ संप्रदायाचा प्राण अध्यात्म आहे. ज्ञानेश्वरादि महाराष्ट्रीय साधुवर्य अद्वैतमतानुयायी आहेत, त्यांचपैकी समर्थ होत. अणूप्रमाणे अत्यंत सूक्ष्म व सूर्यमा-लिकेप्रमाणे अत्यंत प्रचंड असे पदार्थ विश्वात दिसतात, तशीच काही डोळ्याला दिसणारी तर काही न दिसणारी परंतु अनुमानगम्य अशी अनेक रूपे आढळतात. या सर्वांचा व विश्वाचा आरंभ, मध्य, शेवट कोठे हे समजत नाही; अशी ही सृष्टि प्रवाहरूपाने जरी सतत चालणारी असली तरी तिजमध्ये अनेक रूपांचे, अनेक नांवांचे, कित्येक गुणांचे कितीतरी पदार्थ आहेत; त्यात काही क्षणभंगुर, काही युगभंगुर, तर काही युगानुयोगोत्तरभंगुर आहेत; काळ, काम वेग, लांबी, रुंदी, उंची, रूप, रस, गंध, यांच्या मर्यादांनी ते आंखले असल्यामुळे त्या सर्वांनी ते मोजता येण्यासारखे (मीयते इति) म्हणजे माया आहेत; अशा मोजकेपणामुळेच त्या सर्वांना 'अ-सत्' म्हणतात; या सर्व वस्तुमात्रांच्या प्राथमिक निर्मितीपासून मर्यादादि रूपभेदापर्यंत त्यात जो चंचलपणा असतो, येतो, घडतो, त्यातील जीवनशक्तीवर चैतन्यतत्त्व हे सदासर्वदाच एकजिनसी असल्याकारणाने त्यास 'सत्' तर म्हणतातच, पण त्याच्या "स्थिरचर व्यापुनि दशांगुळें उरण्याच्या" व्यापकपणातील मोठेपणामुळे त्यास 'ब्रह्म' ही संज्ञा माणसांनी दिली आहे. "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म।" या ब्रह्माशीं एकरूप होऊन राहणे हाच मनुष्याचा परमार्थ.

हा परमार्थ सांगणारा समर्थकृत "वेदान्तसंमतीचा काव्यसिंधु भरला" असा 'दासबोध' वेद मानला तर 'आत्माराम' हा समर्थ-वाङ्मयातील उपनिषद् मानावा लागेल. यातील मुकुंदराजाच्या विवेकसिन्धूप्रमाणे गुरुशिष्य-संवादरूपाने

प्रगट झालेल्या आणि जनसामान्यासाठी असलेल्या दासबोधातहि वरील तऱ्हेचेच "बहुधा अध्यात्म–निरूपण" निरोपिले आहे. "आत्माराम दासबोध। माझे रूप स्वत: सिद्ध।" असे समर्थांनीच आपल्या शिष्यांना माघ व॥ ९ शके १६०३ ( सन १६८१ ) रोजी आपल्या निर्वाणकाळी सांगितले आहे. प्रचीतीचे बोलणे करणाऱ्या समर्थांनी दासबोधात परमार्थाचा जो प्रपंच केला आहे, तो "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ" होण्यासाठीच आहे. कारण कोणतेहि तत्त्वज्ञान आणि विशेषत: अध्यात्म आचरण–शुद्ध असेल तरच ते मोलाचे. म्हणून "उदास दास राहतो। प्रचीत सत्य पाहतो।" आणि जगाला सांगतो की, "जे जे जये प्रसंगी जाले। ते ते काळाचे नाव पडिले।" असा इतिहास असतो.

आपल्या स्वताच्यापूर्वी होऊन गेलेल्या काळातील ज्ञानाच्या अभ्यासानंतर स्वत: मिळविलेल्या ज्ञानाची त्यात भर घालून मनुष्य चालतो व राष्ट्रातील ज्ञान–वृद्धि होते. समर्थांनी "आधी प्रपंच करावा नेटका।" म्हणून सांगितले, तसेच "प्रपंचो पाहिजे सुवर्ण। परमार्थी पंचीकरण।" असेहि सांगितले. "मेळवोनी धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी॥" या तुकारामोक्तीचेच प्रतिबिम्ब समर्थांच्या 'सुवर्ण' या शब्दात आहे. सुवर्णसुलभतेसाठी समर्थांना भौतिक, शास्त्रांच्या अभ्यासाची आवश्यकता वाटत होती. त्यांनी त्याचा समावेश 'श्रवण–भक्ती' त केला आहे तो असा :

"नानापिंडांची रचना। नाना भूगोळरचना। नाना सृष्टीची रचना। कैसी ती पहावी ॥१५॥ धातु, रसायण, बुद्धी। नाडिज्ञाने ऐकावी ॥२२॥ कोण्या दोषे कोण रोग। कोण्या रोगास कोण प्रयोग। कोण्या प्रयोगास कोण योग। साधे तो तो ऐकावा ॥२३॥" ( दा. ४–१५ ) सृष्टीच्या गूढ शक्तीच्या आकलनाने शास्त्रज्ञाला ईश्वरी साक्षात्कार होतो. सृष्टीच्या प्रत्येक घडामोडीच्या मागे असलेले आदितत्त्व जड सृष्टीच्या अभ्यासाने शोधून काढता काढता ते तत्त्व सर्वशक्तिमान आहे, अशी त्याची दृढ समजूत झाली की, परमार्थ त्याच्या आटोक्यात येतो. "पूर्वपक्षेसि सिद्धान्त। पहावा प्रकृतीचा अंत। मग पावावा निवान्त। निश्चय देवाचा॥" ( दा. ५–१०–३४ )

शास्त्रीय विचार किंवा विज्ञान यांचा उद्देश मनुष्याच्या सुखात भर घालणे हा असल्याने, शास्त्रीय प्रयोगाची मांडणी साधारणपणे सामुग्री, साधने, निरीक्षण, प्रयोगवर्णनरीति, त्यावरून निघणारी अनुमाने व सिद्धांत अशी क्रमशील असते. जीवनात प्रत्ययासाठी तिचाच अवलंब करण्याचा सल्ला समर्थांनी दिला असून आपल्या दासबोधादि ग्रंथात स्वता अवलंब तसा केला आहे. पूर्वपरंपरे–प्रमाणे ज्ञानार्जनाला गुरुची आवश्यकता समर्थांनी प्रतिपादिली असून गुरुमहिमाही गाईला आहे. पण "प्रत्ययो शोध घ्यावा। सावधान चहूंकड।" (स्फुटप्रकरण २–२०) एवढेच नव्हे, तर "आत्मशास्त्र, गुरुवाक्य। प्रचीत पाहणें वरी।" असे समर्थांनी बुद्धिप्रामाण्य ठसविले आहे. (दा. द. ५ स. १०, ओ. १५ ते २७)

येथें प्रचीत हें प्रमाण । न लगे शास्त्राचा अनुमान ।
अथवा शास्त्री तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ।।१४।।
प्रचीतीवीण जें बोलणे । तें अवघेंचि कंटाळवाणें ।
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ।।१५।। (दा. ९-५)

प्रत्यय-ज्ञानाची योग्यता प्रपंचांत व परमार्थात अनन्य साधारणच राहते. समर्थ सांगतात :

तिरस्कार तो चिरडला । द्वेष खिरडून सांडिला ।
विषाद अविषादें घातला । पायांतळीं ।।४९।।
कोणावरी घालणें घातलें । कापटय अंतरीं कुटिलें ।
सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ।।५०।।
अभ्यासाचा संग धरिला । साक्षेपासरिसा निघाला ।
प्रयत्न सांगाती भला । साधनपंथें ।।५४।।
थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिले ।
महत्त्वासि झिजाडिलें । विरक्तिबळें ।।५८।। (दा. ५-९)

शास्त्रपूत प्रवृत्ति ही अशी असते. म्हणून ती सत्यावर अधिष्ठित असते. भौतिक ज्ञानाच्या क्षेत्रात व्यक्तीपेक्षा गुणावर आणि गुणांमधून प्रतीत होणाऱ्या सत्यदर्शनावर खरा भर असतो. या मनोवृत्तीने "जो जो जयाचा व्यापार । तेथे असावें खबरदार ।" असे समर्थ सांगतात. नीतिविषयक किंवा इतर आदर्श तत्त्वे नुसत्या शब्दसृष्टीत सजवावयाची नसून ती आचारशुद्ध राखावयाची असल्याकारणाने प्रत्येक व्यापार-व्यवहार तत्तच्छास्त्र-पूत करण्यावर कटाक्ष ठेवला तरच प्रपंचातून परमार्थसाधना होणारी आहे. "प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।" समर्थ "जनीजनार्दन विमलहस्ती, पूजावा" असे सांगतात तो असा. कारण निर्मळ सत्यदर्शन व त्याचे शास्त्रपूत आचरण हा सरतेशेवटी परमात्मपूजनाचा गाभा होय.

एकदा का माणसाने शास्त्रपूत व निर्मळ सत्यावरील निष्ठेने वागावयाचे ठरविले की विवेकाने त्याला स्पष्ट होत जाते की, "उगेंचि पाहतां मीपण दिसे । शोध घेतां कांहींच नसे !" अशा तऱ्हेच्या अद्वैताचे तात्त्विक निरुपण नाना दृष्टान्त व व्यावहारिक दाखले देऊन समर्थांनी इतक्या प्रसादाने जागोजाग केले आहे की, शासनपंडितहि थक्क झाले. तथापि तात्त्विक चर्चेचा अथवा मायाब्रह्मनिरूपणाचा टप्पा ओलांडून समर्थ जेव्हा भौतिक विद्याशी व ऐहिक कर्तव्याशी आपल्या तत्त्व-ज्ञानाची सांगड घालून समन्वय साधतात, तेव्हा द्वैतवाद्यांशी ते जहाल जात नाहीत. ( दासबोध द. ६. स. ७, ८ व ९ पहा ) परमार्थात काय किंवा प्रपंचव्यवहारात काय, "सृष्टि आहे रें शाश्वत।" असे द्वैतवाद गृहीत धरतो. उलट-

देखणें तें सत्य मानावें। हें ज्ञात्याचें देखणें नव्हे।
जड, मूढ, अज्ञान जीवें। हें सत्य मानिजे ॥
दृष्टीसि दिसे मनासि भासे। तितुकें काळान्तरीं नासे।
म्हणोनि दृश्यातीत असे। परब्रह्म तें ॥
परब्रह्म तें शाश्वत। माया तेचि अशाश्वत ॥ ( दा. ६-१० )

असे समर्थांनी नानाशास्त्रांचा आधार घेऊन प्रतिपादिले आहे. समर्थांच्या मते द्वैतवाद भागशः सत् संग्रह करतो तर अद्वैतवाद सर्वव्यापी असल्यामुळे एकजिनसी सत् आहेच. सृष्टयुत्पत्तीची कल्पना ( दा. द. ६ मायोद्भव व दा. द. १३ उभारणी पहा ) द्वैतवादी मांडतात त्यापेक्षा समर्थांनी निराळी मांडली आहे काय ? पण तिची परिणति मात्र त्यांनी अद्वैतवादानुसार उत्पत्तीचा ( मोजकेपणामुळे ) असत्पणा ऊर्फ मायिकपणा सिद्ध करण्यात केली आहे. " स्वप्नीं स्वप्नाचा विचार। तो तूं जाण हा संसार।" या सूत्रबद्ध व्याख्येत समर्थांनी सर्व उपनिषदांचे सार ओतले आहे.

आणि तरीहि " न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्।" या भगवन्तांच्या प्रबोधनव्यवहारासाठी समर्थांनी भौतिक व्यवहारांचा अधिक्षेप केला नाही. साक्षात्कार व महानुभव यादृष्टीने समर्थांच्या मनोवृत्तीचा टप्पा कितीहि जरी उच्च असला तरी " चिंता करतो विश्वाची।" म्हणताना प्रत्यक्ष पृथ्वीवरचे आपले पाय पृथ्वीवरच ठेवणे त्याना भाग होते. अद्वैतवादी झाला तरी त्याला संसार व प्रपंच कोठे सोडतात ? म्हणून—

संसार-त्याग न करतां। प्रपंच-उपाधी न सांडतां।
जनामध्यें सार्थकता। विचारेंचि होय ॥

अशी प्रपंचउपाधीची बैठक समर्थांनी अद्वैतवादाला दिलेली आहे. मराठी सन्त-वाङ्मयात समर्थांची ही निष्काम कर्मयोगाची बैठक अपूर्व ठरली आहे.

## सिद्धान्त आणि साधना :

संप्रदाय म्हटला की उपास्य, विचार ( तत्त्वज्ञान ) आणि आचारनियमावली ही तीन प्रमुख अंगे लक्षात घ्यावी लागतातच. अनुकूल काळाची वाट पहात बसण्याचे दिवस संपले; आता संघटन-संचालनाचे मोके साधण्याचे दिवस आले म्हणून परिस्थितिसापेक्ष धनुर्धारी रामाचे दैवत समर्थ-संप्रदायाने लोकास दिले. "नायमात्मा बलहीनेन लभ्यः।" या उपनिषदादेशाचे समाजाला वास्तववादी आचरण करता यावे म्हणूनच. बुद्धिबलशाली सेवाभाव समाजात सदैव जागृत रहावा, म्हणून हनुमंताच्या मूर्ति गावोगाव स्थापल्या जातील, असेहि स्वता ' अक्रा मारुती ' स्थापून समर्थांनी पाहिले याच्याच जोडीला " रामवर-दायिनी " शक्तिदेवीची उपासनाहि समर्थांनी प्रचलित केली. मर्यादा, सेवा आणि शक्ति यांचे नियमबद्ध उर्फ नेमस्त

अधिष्ठान आपल्या प्रत्येक संघटन-संचालनेला हवे, असा दण्डक समर्थांनी घालून दिला. "सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे ॥" समर्थांच्या आयुष्याच्या पूर्वार्धातच स्वताचा आयुष्यक्रम संपवून गेलेल्या भगवद्गीतेवरील सव्वालाख टीकेमुळे विख्यात झालेल्या दासोपंतांच्या गीतार्णवात, गीतेच्या सातव्या अध्यायातील आठव्या श्लोकापैकी "पौरुषं नृषु" या पदावरील टीका "पुरुषाअंगी पुरुषपण। तेचि भगवंताचे अधिष्ठान।" अशी आहे. दासबोधाच्या विसाव्या दशकाच्या चवथ्या समासांतील सहाव्या ओवीत "कळेने सृष्टी चालली भगवंताचे।" असे समर्थांनी सांगितले आहे. ही भगवंताची कळा "आहे तरी सर्व ठायी। पाहों जाता कोठेच नाही।" अशी आहे. म्हणून निष्काम कर्मयोगी पौरुष हेच परमेश्वरी अधिष्ठान होय. ते बळकट धरून "जो जो (कार्य) करील त्याचे आणि त्याच्या चळवळीचे ऊर्फ प्रयत्नप्रथांचे सामर्थ्य आहे" म्हणजेच ते सामर्थ्य आपले तेज दाखविल्याशिवाय राहाणार नाही, असा आत्मविश्वासही समर्थांनी आपल्या संप्रदायात संचारविला आहे.

भागवत धर्माचा स्वरूप-संप्रदाय चालविताना समर्थांना प्रत्येक व्यक्ती पौरुषमय हवी होती. "देहपुरामध्ये ईश। म्हणोन तया नाव पुरुष। जगामध्ये जगदीश। तैसा ओळखावा॥" (दा. ११-९-१२) असे सांगून "नरदेह हा स्वाधेन। सहसा नव्हे पराधीन। परी तो परोपकारी झिजवून। कीर्तीरूपे उरवावा॥" असे वळण समर्थांनी घालून दिले आहे. त्याबरोबरच हे बजाविले आहे की, "विचार पाहेल तो पुरुष॥" (दा. १०-९-२८) आणि "जो मानला बहुतांसी। कोणी बोलो न सके त्यासी। धगधगीत पुण्यराशी। महापुरुष॥" (दा. १९-४-९). कारण "अवघ्यांची चिंता करी महापुरुष" (दा. १९-४-२४). तोच "राखो जाणे नीति न्याय। न करी, न करवी अन्याय। कठीण प्रसंगी उपाय। करूं जाणे॥ ऐसा पुरुष धारणेचा। तोचि आधार बहुतांचा। दास म्हणे रघुनाथाचा। गुण घ्यावा॥" (दा. ११-६-१८ व १९). समर्थांच्या स्वरूप-संप्रदायाचा अयोध्यामठ होता तो असा होता.

"रघूनायकासारखा देव नाहीं। क्रिया पाहतां चोखडी सर्व कांहीं॥" (करुणाष्टक १८-३) आणि तोही "भयनिवारण, भक्तवत्सल। वरपराक्रम किर्तीविमल।" (करुणाष्टक ३६-१) हे उपास्य ठरले तरी त्याची उपासना करण्यास मारुतीसारख्या बळकट मेंदू-मनगट-मनांचे तरुण जोडावयाचे तर ती प्रक्रिया साध्य होण्यास वैदिक गुरुकुलांच्या धर्तीवर विद्यामठांची स्थापना हे संघटनासूत्र समर्थांनी मग सहजच हाती घेतले. शक्य झाले तसे समर्थांनी महाराष्ट्र, तेलंगण, कर्नाटक, दक्षिण देश व उत्तर भारतामध्ये आपले मठ स्थापले. "काशीपासून रामेश्वर। समर्थ संप्रदाय अपार। बोधप्रसिद्धी थोर थोर। प्रस्थाने रूढली॥" असे मेरुस्वामींनी सांगितले आहे. या मठातून "मोठा थोरला ग्रंथसंग्रह असे. यच्चयावत् सर्व साधुसंतांच्या संस्कृत-प्राकृत

ग्रंथांना आणि समर्थांच्या कवितासमुद्राला तेथे स्थान असे." ( समर्थप्रताप, प्रस्तावना, पृ. ६१-६२ ). या मठामार्फत श्रीरामनवमीचा व हनुमज्जयंतीचा असे उत्सव तरी व्हावयाचेच. आपल्या सांप्रदायिकांनी "अभ्यासेंचि प्रकट व्हावें । प्रकट होवोनि नासावें । हें बरें नव्हे ।।" यासाठी ती योजना होती. तेथे परमार्थाची शिकवण मुख्यतः मिळावयाची ती समजून घेणे व समजावण्याची कला सम्पादन करणे इकडे जितके लक्ष असावयास हवे तितकेच "प्रचीतीचे बोलणें । प्रचीत येईल तैसें घेणें । श्लाघ्यवाणें ।।" हा कस सांभाळण्यावरहि लक्ष कटाक्षाने असे. "तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ।" या पदात समर्थांनी (१) कायावाचामनें । यथार्थ रामी मिळणें । (२) कामक्रोध सांडणें । मदमत्सर दंडणें । (३) परस्त्रीनपुंसक होणें । परद्रव्य न पोसणें । "परद्रव्य आणीक कान्ता परावी । यदर्थी स्वयें सांड जीवीं करावी ।।" (४) जैसें मुखें बोलणें । तैसी क्रिया चालणें, ती "विचारोनि बोले, विवंचोनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले ।।" अशी. (५) मायानिवर्तक ज्ञानें ज्ञानचि पै होणें, आणि (६) निर्गुणसुख साधणे, अशी रामदास्याची ठळक लक्षणे सांगितली आहेत. त्यास अनुसरून हर क्षणाचे वैचारिकसुद्धा सर्व जीवनच उदात्त होऊन "वृत्ति होईल उदासिन जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ।। " यायोगेच "सर्वांमुखी मंगल बोलवावें ।।" असे दिव्य साधणारी "करी वृत्ति जो सन्त तो सन्त जाणा" असे जनमनावर ठसविणारे आचरण सांप्रदायिकाकडून व्हावयाचे.

समर्थ संप्रदायाची आचारप्रणाली माध्व संप्रदायाशी साम्य राखणारी आहे. ( भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, तृतीय संमेलनवृत्तांत कृ. वि. कालगावकर आचार्यांचा निबंध पहा. ) द्वैतातून अद्वैत पावण्याच्या संशोधक प्रतिज्ञेमुळे, कर्ममार्ग उत्कृष्ट राहण्यासाठी वैष्णवांचा कडकपणा समर्थांनी स्वीकारला आहे. "देशकालवर्तमान । सावधान सावधान ।। " होऊन समर्थांनी आपला संप्रदाय उभारला व फैलावला. कारण परमार्थाच्या बाबतहि हिंदूंच्या विधर्मधार्जिण्या मनःस्थितीचा गोंधळच गोंधळ त्यांच्या धार्मिक आचारविचारांच्या अवास्तव स्वरूपात समर्थांनी असा पाहिला की—

षड्दर्शनें नाना मतें । पाखांडें वाढलीं बहुतें ।
पृथ्वीमध्ये जेथें तेथें । उपदेसिती ।।१।।
स्मार्ती आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं आघवीं ।
ऐसी पाहतां गथागोवी । उदंड जाली ।।२।।
कित्येक कामनेचे भक्त । ठांई ठांई जाले आसक्त ।
युक्त अथवा अयुक्त । पाहतो कोण? ।।३।।
या गलबल्यामध्यें गलबला । कोणी कोणी वाढविला ।
त्यास देखों सकेनासा जाला । वैदिक लोक ।।४।।
त्याहीमध्ये हरिकीर्तन । तेणें वोढले कित्येक जन ।
प्रत्येयाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे! ।।५।। (दा. १५-२)

राज्य गेलें म्लेंछ क्षेत्रीं । गुरुत्व आलें कुपात्रीं ॥
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीच नाहीं ॥६॥ (दा. १४–७)

तेव्हा समर्थांनी ठामपणे उपदेशिले की, "नाना देवांचा वळसा । करूंच नये ॥१॥ जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार । शुद्ध विवेकें परमेश्वर । ओळखावा ॥२॥ आपल्या देवास ओळखावें । मग मी कोण हें पहावें । संग त्यागून रहावें । वस्तुरूप ॥३॥" (दा. ६–१०)

स्वत: अगोदर तसें करूनच समर्थांनी आपल्या मठांना व शिष्यांना ती शिस्त लावली. देवस्थाने उभी करून तन्निमित्त गांवोगांवी सामुदायिक महोत्सव घडवून आणावयाचे, डोहातून मूर्तिभंजक राज्यकर्त्यांच्या भीतीने लोकानी बुडवून ठेवलेल्या देवमूर्तींचा शोध घेऊन त्या बाहेर काढावयाच्या व त्यांची जाहीरपणे देवळातून स्थापना करावयाची आणि त्यानिमित्ते लोकामागे देवभक्तीचे व्यवहार लावावयाचे, ही समर्थांची कामगिरी निर्भय साहसाची होती. "हेळामात्रें मुक्त करीन या जनां । तरीच पावना राघवाचा ।" अशा प्रतिज्ञेने चालणे आणि "ब्रीदचि राखणें पावनाचे ।" हे समर्थांना कर्तव्य वाटे. त्यायोगे लोकांच्या अनुकूलतेचा प्रवाह समर्थांनी आपल्याकडे ओढून घेतला. परमार्थाला कसलेच भय नसते; राजभयहि नसते (दा. १–१०–७). मसूरच्या पहिल्या रामोत्सवात (सन १६४५) बादशाही झाडाची फांदी तोडूनच समर्थांनी रामरथ पुढे नेला होता. दत्तु नापिकासारख्या सुद्धा आपल्या सर्व सांप्रदायिकानी आपल्यासारखेच निर्भय असावे, अशी समर्थांची अपेक्षा असली तर नवल काय ? विचार-उच्चार-आचार-स्वातंत्र्य नसेल तर व्यक्तीचे, समाजाचे वा राष्ट्राचे जीवन, विकास आणि स्वास्थ्य ( स्वत:च्या म्हणून पात्रतें-प्रमाणे यथासांग असणे ) अशक्यप्राय होतात. राजकर्त्यांची खुशामत, जबरदस्तांचा जुलूम, आंधळे अनुकरण, विवेकशून्य आचार आणि या सगळ्यातून निर्माण होणारी दडपशाही व लाचारी यांची मनस्वी चीड समर्थांना होती. एरवी आपल्या अद्वैत-वादाला त्यांनी मुरड घातलेली नव्हती. ग्रंथसाहेबात समाविष्ट होण्यासारखे अभंग लिहिणाऱ्या नामदेवप्रभृति सन्ताप्रमाणे समर्थांनी जी हिंदी पद्यरचना केली, ती उर्दू, व्रज आणि अवधी या भाषाप्रकाराचा उपयोग करून तर आहेच; पण अल्ला हे रामाइतकेच ( समर्थकृत पदपदांतरे, २३८।३९ ) पवित्र नाव घेऊन समर्थांनी आपल्या अद्वैतमनोवृत्तीचा आविष्कार केला आहे. 'दासविश्रामधामा' शमनामीर नावाचा एक मुसलमान अवलिया समर्थांचा मित्र असलेचा उल्लेख आहेच. हिंदुच्या धार्मिकतेला ताप देणाऱ्या मुसलमानी शिरजोरीला वठणीस आणण्याकरिता, "जैशास तैसें जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी थाटे ।" या न्यायाने लढाऊ वृत्तीला साजेसे उद्‌गार समर्थांनी आपल्या उपदेशात प्रसंगोपात गोविले आहेत. त्यांचा रोख स्वजनांचा स्वधर्माभिमान जागृत करण्याकडे आहे. स्वकीयत्वाच्या अभिमानाचा अभाव हा परक्यांच्या जुलमाहून अधिक घातक ठरतो. "पहावें आपणांसि आपण" या शिकवणीला धरूनच जगातील द्वैतातून अद्वैताकडे जाण्यासाठी "आत्मानुभवी

वाटा चोखाळण्याची " ती समर्थांची न्यायनिष्ठुरता व कर्तव्यकठोरता होती. "जेणें विठ्ठलमात्रा घ्यावी । तेणें पथ्यें सांभाळावीं ।। " या वारकरी दण्डकाला परजूनच समर्थांनी सार्वजनिक, सामुदायिक, संघटनात्मक जीवनातील आपले पथ्य वरीलप्रमाणे धारकरी केले होते. आपल्या शिष्यांनी व मठांनी ते अचूक सांभाळावे असे साहजिकच त्यांना अपेक्षित असणार.

म्हणून मठावर जे संचालक अथवा महंत नियुक्त करावयाचे, त्यांच्या पात्रतासिद्धी समर्थांनी ठरवून टाकल्या होत्या. "करूं महंतीला धाडिती जयासी । दासबोध, झोळी, काठी तयासी । वोपुनि सिकविती श्रीरामासी । धरोनि मानसीं वर्तावें ।।१।। ग्रंथांतरीं विवरत जावें । नित्यनेम श्रद्धेनें सर्वदा करावे । कीर्तनासि विन्मुख न व्हावें । सार शोधावें प्रत्ययानें ।।२।। येकाकारणें बोलतां स्वहित । सकळांसि तेणें बिबतो अर्थ । जेवीं उद्धवासि बोधितां श्रीकृष्णनाथ । जाले पावन बहुतेक ।।३।। आदौ करोन मंगलाचरण । सप्रेम भावें कीजे भजन । ऐकोनियां ग्रंथश्रवण । मग निरूपण पदादि म्हणावें ।।४।। वर्णोनि ससांग सिंहासन । तेथोनि प्रार्थना, मागणें, स्तवन । घडिघडी श्रीरामनाम गर्जोन । आरति गावी आदरें ।।५।। प्रार्थना स्तवन करूनी मागुती । मग गाउनि सेवटी शेजारती । गुरुदेवा तोषविजे ही पद्धति । सगूणध्यानग्रंथीं विलोका ।।६।।" ('दासविश्रामधाम' पहा). त्याचबरोबर त्यांना समर्थांनी बजावलेले असे की, "म्हणे उदास दास हा । बरें पहा, बरें पहा । करील प्रेत्न जीतुका । तयास लाभ तीतुका ।।" अद्वैत आणि एकेश्वरीवाद लोकसंग्रहार्थ आणि लोकहितार्थ कर्मे करीत राहण्यानेच आचारशुद्ध राहणारा. भक्तीयोगातील निवृत्ती निष्क्रिय होता कामा नये. म्हणून समर्थांनी संप्रदायाला घालून दिलेल्या नियमात नित्य सूर्याचे व मारुतीचे दर्शन, एक भीमरूपी स्तोत्र, मनोबोधाचे कमीत कमी अकरा श्लोक व दासबोधातील दोन समासांचे वाचन, ही कमीत कमी आवश्यक कर्मे होती व आहेत. याशिवाय समर्थ संप्रदायाची लक्षणे प्रत्येक सांप्रदायिकाने जेथे सांभाळली पाहिजेत, तेथे महंताने ती अधिकच तत्परतेने सांभाळली पाहिजेत, हे काय सांगावयास हवे? ती लक्षणे अशी–

प्रथम लिहिणें दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर ।।१।।
आशंकानिवृत्ति ऐसी चौथी स्थिति । पांचवी प्रचीति अनुभवें ।।२।।
साहावें तें गाणें, सातवें नाचणें । टाळी वाजविणें आठवें ते ।।३।।
नववा अर्थभेद, दहावा प्रबंध । अक्रावा प्रबोध प्रचीतीसी ।।४।।
बारावें वैराग्य, तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे ।।५।।
पध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अव्यग्रता ।।६।।
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वां ठायीं ।।७।।
अठरावें लक्षण वृत्ती उदासीन । लोलंगता जाण तेथें नाहीं ।।८।।
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान । राखे समाधान ज्यांचें त्यांचें ।।९।।
विसावें लक्षण रामउपासना । वेध लावी जना भक्तिरंगें ।।१०।।

आपला संप्रदाय व सांप्रदायिक प्रबुद्ध असावेत; प्रचीतीवर त्यांचा मुख्य भर रहावा; गायनादिक कला त्यांना याव्या, कारण " विदेश पाहतां नाहीं । धन्य ते गायनी कळा ।। आवडे सकळैं लोकां । इच्छिलें पुविती सर्व ।।२।।;" अर्थभेद व प्रबंध ही सामर्थ्ये अर्थांतरासाठी आवश्यकच; प्रबोध ही त्याच्यापुढची पायरी; मनोरंजनातून अर्थभेद, प्रवंध (प्रवचन, ग्रंथविस्तार) करता येऊन लोकांना प्रबोधन करता आले तर ते अधिक टिकाऊ होते; समर्थांचा कटाक्ष अंतरंगावर होता; "नाना शंका प्रत्युत्तरें । नाना प्रचीत साक्षात्कारें । जेणें करतां जगदंतरें । चमत्कारिती ।।" (दा. १९–२–३); वैराग्य (विरक्ति) किती कडकडीत असावे याचे विवेचन दासबोधातून (द. २ स. ९) अभ्यासण्यासारखेच आहे; विवेकाबद्दल तर काय विचारावे? "विवेकामध्यें सांपडेना। ऐसे काहीच असेना" असे दासबोध (१९–६–२८) स्पष्ट सांगतो; "संसारत्याग न करितां। प्रपंच उपाधि न सांडितां । जनांमध्यें सार्थकता । विचारेंचि होय ।। (दा. ६–९–२४) विवेकें जे पैसावले । तेचि अवतारी बोलिले । येणेंचि न्यायें झाले । मनुचक्रवर्ती ।। " म्हणूनच बहुत जनास उद्योगास लावून अनेक समुदायांना उठावणी देणारा पुरुष समर्थ ठरतो, योजकतेतील विवेकाने, असे समर्थांनी स्वच्छ केले आहे. लोक राजी राखणे कठीण असले तरी ते कठीण दिव्य करूनहि "समुदाय करणाऱ्या सांप्रदायिकाने राजकारणहि केले व पाहिले पाहिजे;" राजा व प्रजा यांचे संबंध, लोकसमाजाची स्थिति सुधारण्यासाठी कराव्या लागणाऱ्या चळवळी, लोकांचे पुढारी व त्यांच्या कर्तव्यांचे नियमन, लोकसंग्रह इत्यादि गोष्टींचा समावेश समर्थांच्या धर्ममूलक राजकारणात होतो; म्हणूनच आपल्या ग्रंथात समर्थांनी राजकारणाचे सिद्धान्त, राजकारणाचा शास्त्रविचार, कर्त्यांचे पात्रतासिद्धत्व ठिकठिकाणी सांगितले असून परराज्याच्या स्वाभाविक परिणामास आपण लोकच कसे कारण होतो, हे समर्थांनी विशद केले आहे; तुफान प्रसंगात "धीर धरा, व्यापक प्रयत्न करा, राज्याच्या घडामोडी निरंतर होत असतात, तेव्हा कलह–पक्षभेद–वितंडवाद टाकून दांडगा प्रयत्न करा व रामराज्याचा कित्ता घ्या," असे लोकास सांगून समर्थांनी राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म विशद केले आहेत. अव्यग्रता, प्रसंग-ओळखण आणि उदासीन वृत्ति यांच्याइतके निष्काम–कर्मयोगाच्या यशाचे दुसरे घटक कोणते सांगता येतील? तात्पर्य, "यत्नाचा लोक भाग्याचा" होतो, तो "अचूक यत्नाने" होतो आणि "व्याप–आटोप करिती । तेच प्राणी सदैव होती।" हे जाणून "अन्तस्त्यागी बहि:संगी लोके विहर राघव।" हा वसिष्ठोपदेश प्रभु रामचंद्रानी जसा आचरणशुद्ध राखला, तसाच "ज्ञानबोधानें अंतरीं सुटतो । वैराग्यानें प्रपंचपाश तुटतो ।" हा प्रत्यय समर्थ सांप्रदायिकांनी लोकास आचरणशुद्ध आणून द्यावा, असा समर्थांचा नेमस्तपणा होता. या नेमस्तपणाला संयमशीलतेची जोडहि अपेक्षित होती. "नेणपण सांडू नये । महंतपण मोडूं नये । द्रव्यासाठीं हिंडो नये । कीर्तन करीत ।। " (दा. १४–१–४५)

समर्थसांप्रदायिकाने दैनंदिन नित्यक्रम म्हणून वरील जबाबदाऱ्या सांभाळून शिवाय गुरुध्यान, महावाक्याचे स्मरणोत्तर चिंतन, तारकमंत्रस्मरण, आराध्यचिंतन, मंगलाचरण, भूपाळ्या, श्रीरामाचे सगुणवर्णन, देव-भक्तसंतादिकांचे गुणगान वगैरे करावयाचेच ! याशिवायही काही दण्डक असत. त्याचे वर्तन "जनी बोलण्यासारखें" हवे; त्याने "नित्य नूतन हिंडावें।" कारण त्यायोगे मनुष्यमात्र धांडोळता येतो; "आमुची प्रतिज्ञा ऐशी। कांहीं न मागावें शिष्यांशीं।" अशी निःस्पृहता जगास पटलेली असावी; आणि भिक्षा मागुनसुद्धा "परोपकाराचिया राशी।" त्याने उभाराव्या. भिक्षा आणि भिक्षेचे महत्त्व ( दा. १४।२ ) ओळखून मेखला, शिरोभूषण, झोळी, रामनामांकित कमरपट्टा व भगवे निशाण यासह सज्ज होऊन सांप्रदायिकाने "जय जय रघुवीर समर्थ !" अशी गर्जना करून श्रीरामप्रभुपुढे मनोबोधातील "गणाधीश जो ईश" प्रभृति चार श्लोक म्हणावयाचे आणि "तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा। सदा स्वस्थ चितीतसे या महींद्रा।। गणाधीश ऐशा उरी पूर्ण द्यावें। भवीं दैन्य हें देशधाडी करावें।।" अशी प्रार्थना करून भिक्षेस बाहेर पडावयाचे; "भिक्षामिषे लहानथोर परीक्षून सोडता सोडता" मनोबोधातील "भवाच्या भयें काय भीतोसि लंडी।" या श्लोकापासून सुरवात करून लोकजागर करावयाचा. रस्त्याने जाताना "रामा, रामा, हो रामा" असे भजन समर्थ करीत, त्या धर्तीवर सांप्रदायिकाने "गुरुराज महाराज रामदास माउली" असे भजन करीत जावयाचे; भिक्षेहून परत आल्यावर "मनाचीं शतें ऐकतां दोष जाती" हा मनाचा श्लोक म्हणून सुंदर वरदायिनीची आरती म्हणून झाल्यावर "पक्की रसोई" करून नित्यक्रम चालवावयाचा. तात्पर्य, पाठीस लागलेल्या पोटाची व्यवस्था हातोहात करून आपला परमार्थ प्रामुख्ये चालवावयाचा. असा शिरस्ता समर्थांनी घालून दिला होता. "न्याय, नीति, भजन मर्यादा। काळ सार्थक करी सदा।।" हा सांप्रदायिकांच्या जीवनाचा मथितार्थ होता.

समर्थांच्या संप्रदायात प्रापंचिक, अप्रापंचिक आणि प्रपंचाला मुकलेले असे सर्व लोक असत आणि आहेत. त्या सर्वांनी कोणत्या धारणेने व नेमस्तपणाने आपला संप्रदाय चालवावा, याचे सामान्य स्वरूप वरीलप्रमाणे आढळून येते. "सत्यसंकल्प तो विष्णु, तेंचि ज्ञान, उपासना।" असे असल्याकारणाने "सदा सर्वदा देव सन्निध आहे। कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे।।" अर्थात् सत्यसंकल्पाच्या अभयपणावर माणसाने "गल्बला होचि नेदावा" तर "समयासारखा समयो ये ना।" हे लक्षात घेऊन "प्रसंग-मान न चुकतां "जरूरी प्रमाणे" शक्तियुक्ति जये ठायीं। तेथें भगवन्त धावती।" अशी करणी करावी आणि "जन हे वोळले जेथें। अंतरात्माचि वोळला।" या कसावर माणसाने व विशेषतः सांप्रदायिकाने आपला परोपकारपूर्ण प्रत्येक आचार-विचार-प्रचार घासून पहावा. समाजसन्मुख राहून समाजाच्या वाढत्या शहाणपणाबरोबर आपणही शहाणे राहून समाजाचा कर्तृत्वशाली घटक होऊन राहण्यात जनसामान्यापासून सर्वांचा परमार्थ विशद होत असतो.

" पृथ्वीमध्ये उदंड जन । जनांमध्ये असती सज्जन ।। यांकरतां समाधान । प्राणिमात्रांसि ।। ४३ ।। तो मनोगताची आंगें जाणे । मान, प्रसंग समये जाणें । संतप्तालागीं निववूं जाणें । नाना प्रकारें ।।४४।। " ( दा. १८–१० ) असे सज्जन माणसाने झाले पाहिजे. सज्जनांपैकी निःस्पृहपणा धरून लोकसंग्रही पण वैयक्तिक सुखदुःखांना जिंकून पुढे गेलेले ' उदास ' जे कोणी असतील, त्यांना जनतेला जागे-पणाने संघटित करण्यासाठी समर्थांनी योजना आखून दिली होती. " समर्थे समर्थ करावे । युक्तिबुद्धिने भरावे । देखदेखोनि विखरावे । नाना देशी ।। " अशा समर्थ सांप्रदायी सज्जनाने जे व्रत स्वीकारावयाचे ते " पहिलें हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ।।१।। चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप । अन्यायें थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ।। " संतसज्जनांनी आपल्या चळवळीला परमेश्वराचे अधिष्ठान मांडताना " पौरुषं नृषु " जागृतपणें सांभाळण्यासाठी " पहिले हरिकथा–निरूपण " केले पाहिजे. आपल्याप्रमाणे आपल्या अनुयायातही " अभयं सत्त्वसंशुद्धि " मुरवण्यासाठी समर्थ आपल्या शिष्याला एकवीससमासी दासबोधात " तूं तर माझें सिंहाचें पिल्लू । " असे म्हणाले, तसेच संतसज्जनांनी आपल्या अनुयायास संबोधून तयार केले पाहिजे. त्यासाठीच त्यांना व समाजाला ' हरि ' म्हणजे वायुपुत्राच्या वृत्ति सूचित करणाऱ्या कथा सांगाव्या; पराक्रमाच्या, उदात्ततेच्या, उमदेपणाच्या, स्वाभिमानी सर्वोत्कटतेच्या गोष्टी रामकृष्णादिक देवादिकांच्या सगुणचरित्रातून, परमपवित्र पुराणातून ठसवाव्यात आणि तसे करताना, एवढेच नव्हे तर संघटनात्मक चळवळीच्या यत्नदेवाची पूजा करताना, या जगताचे संचालन करणारा परमेश्वर जसा निराकार, निर्विकार आणि ' करून अकर्ता ' असतो, त्याचप्रमाणे संत-सज्जनांनी प्राप्त कर्तव्य करीत असता, " उपाधींत गवसों नये । उपाधीविण कामा नये । " असे वागले पाहिजे. म्हणजे " दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो । " हे सूत्र त्यास साधले पाहिजे. त्यासाठी त्यांनी " मुख्य सूत्र घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें । " म्हणजे झाले !

हरिकथानिरूपणाच्या बरोबरीने दुसरे जे संतसज्जनांनी नेतेपणाने वा महंतीने करावयाचे आहे ते राजकारण होय. " कालो वा कारणं राज्ञः राजा वा काल-कारणम् । इति ते संशयो माऽभूत्, राजा कालस्य कारणम् ।। " असे महाभारत स्पष्ट सांगते. राज्यसूत्रधारांच्या धोरण-परिणामांकडे लक्ष ठेवून त्यांना आपल्या परमा-र्थासाठीही समाजस्वास्थ्यकारक बनविणे व ते तसे असल्यास त्याचे " मान, प्रसंग, समय " साधणे अशा गोष्टी ' धुरा ' असलेल्या संतसज्जनास करणेच कर्तव्य आहे. एवढेच नव्हे, तर " प्रपंचीं जाणे राजकारण । " हे त्यास पहावे लागते. तसे केल्या-विना चालतच नाही. तसे केल्यानेच जरूर तर समाजाच्या खबरदार पाठिंब्यावर परचक्र, सुलतानी, जुलूमशाही यांच्याविरुद्ध वैचारिक क्रांति समाजात उठविता येते. स्वतः समर्थांनी मनुष्ये पारखून त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना मार्गदर्शन केले. तशा विचारक्रांतीला आचरणशुद्ध करण्यासारखा शहाजी, तानाजी, शिवाजी भेटला

की, " लोकांसि राखतां राजी । सर्व राजीच होतसे । " असे 'स्व-राज्य' लोकांना लाभतेही. तथापि काळाची शेंडी धरणारा तसा लढवय्या राजकारणी भेटेपर्यंत त्याच्या कर्तबगारीस पार्श्वभूमि वा पाया म्हणून उपयोगी पडणारी वैचारिक क्रांति समाजाचे निःस्पृह नेतेपण पतकरलेल्या महंताने आपल्या लोकसंग्रही हरिकथानिरू-पणाने करून ठेविली पाहिजे. स्वराज्यात देखील राज्यसूत्रधारांच्या धोरणधारणा-मुळे होणारे समाजस्वास्थ्यावरील परिणाम जनतेला समजावून देऊन लोकमताचा वचक राष्ट्राच्या कारभारी मंडळावर ठेवणे महंताचे कर्तव्य आहे.

हे सर्व करताना जीव घालून पराकाष्ठेचे असे श्रम करावयाचे की, त्या श्रमाच्या आखणीबांधणीतील कमीपणा, दोष किंवा त्यांना होईलसा वाटणारा विरोध याचे दिग्दर्शन कोणी आक्षेपाने करावयापूर्वीच तो संभाव्य म्हणून आपल्या लक्ष्यात आला होता, हे महंती वा नेतृत्व पतकरणाऱ्या संत-सज्जनांच्या प्रयत्न-पुरुषार्थाने समाजास पटले पाहिजे. तसे झाले तरच विरोधकांचे सारे विरोध वित-ळून जातील किंवा विरोधाकरिताच विरोध करीत असतील तर त्यांचे पितळ उघडे पडेल. आक्षेप फेडून 'अत्यंत साक्षेप' म्हणजे जीव लावून प्रयत्नांचा पर्वत उभार-ताना, कोणावर अन्याय वा कोणाचा छळ होऊ नये म्हणून जसे जपले पाहिजे, तसेच आपणावर कोणी लहानथोर अन्याय केले तरी ते करणारांच्या अज्ञानाकडे, परिस्थितीकडे अगर (आणि) हेतूकडे लक्ष देऊन ते क्षमा करावेत आणि अपकार-कर्त्यांसही उपकार करून लाजवावे, हे नेतृत्व करणाऱ्या संतसज्जनास वा महंतास शोभेसे होईल. कोणाच्याही कार्यक्षमतेचा अपुरेपणा सारखा सारखा बोलून कोणाला निरुत्साही हिणकस ठरवू नये. समाजाचे स्वाभिमानपूर्ण कर्तृत्व संपादण्यासाठी ज्या स्वस्थतेची व शांततेची जरूर आहे, तीसाठी लागणारा संयम संत-महंत-नेत्यांनी स्वतः राखावा आणि दुसऱ्याकडूनही सांभाळला जाईल अशी दक्षता घ्यावी. अशा महंतापैकी जो कोणी "ब्राह्मणू ब्राह्मवेत्ता तो । ब्राह्मणू ब्रह्मनिश्चयी । ब्राह्मणू ब्रह्म-स्थितिचा । ब्राह्मणू म्हणजे गति ।। " असेल, त्याला समर्थांनी सांगितले आहे की, " ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ॐ भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ।। " जनी जनार्दन मानणारा तो विशाल दृष्टीचा अखंड कर्मयोगी चळवळ करणारा स्थितप्रज्ञ शरीरयात्रा चालविण्यासाठी भिक्षा मागत असला, तरी त्याने समाजाच्या शक्तिदेवतांची, मातृदेवतांची व गृहदेवतांची पवित्रता निर्धास्त राहण्याची दक्षता बिनचूक घेतली पाहिजे. 'ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म' अशीच प्रत्येक स्त्री, समाजात सन्मानिली गेली पाहिजे.

एवंगुणविशिष्ट प्रवृत्ति-निवृत्ति-समन्वयाचा महाराष्ट्र-धर्म प्रस्थापित होण्यासाठी समर्थसंप्रदायाला अफाट मनुष्यबळाची आवश्यकता होती. आपले सांप्रदायिक " भिक्षामिषे लहानथोरे परीक्षून सोडीत असता " त्यांच्या नजरेत जे " तीव्रबुद्धीचे मोहरे " येत असतील, त्या तरुणांना निवडून आपल्या 'उदासपंथी' म्हणून त्या काळी ओळखल्या जाणाऱ्या भक्तिपंथाच्या मठात आणून, विशद भक्ति-

मार्ग शिकवावयाचा. समर्थ संप्रदायाच्या कडक शिस्तीला व ब्रीदाला ते जागताहेत, असे दिसून आल्यावर आणि संप्रदायाचे मर्म त्यांच्या अंगी मुरते आहे असा आढळ झाल्यावर, लोकावर छाप पाडण्याची व व्याप आटोपण्याची त्यांची कुवत लक्षात घेऊन त्यांच्याकडे मठाची कार्यवाही व परिणामतः महंती यथानुक्रम सोपवावयाची, असा समर्थांचा शिरस्ता होता.

समाजाच्या रोकडया प्रबोधशक्तीसाठी समर्थांनी आपला जो संप्रदाय उभा केला होता, त्याची संघटनप्रणाली ही अशी होती. लोकातील धर्मशैथिल्य, निरुत्साह व पराधीनता जाऊन धर्मनिष्ठा, कर्तव्यजागृति व आत्मविश्वास उत्पन्न करण्याकरिताच श्रीराम-हनुमंत-उत्सवास संप्रदायात महत्त्व होते व आहे. तरी चाफळास या उत्सवाच्या निमित्ते मठामठांचे कार्य साकल्याने सादर होई. संघटनेच्या प्रभाव-समालोचनास व पुढील कार्याची आखणी करण्यास त्या मठामठांच्या इतिवृत्तांचा उपयोग होई व व्हावयाचाच. श्रीमच्छंकराचार्यानंतर सर्वत्र मठ स्थापन करून संप्रदायाचा प्रसार समर्थांनीच केला. त्यानी अकराशे मठ स्थापन केले वा करविले, असे समजण्यात अतिशयोक्तीची अतिशयोक्ति आहे. तथापि मुसलमानी राज्यात महत्त्वाच्या ठिकाणी समर्थांनी मठ स्थापिले होते, हे लक्षात भरण्यासारखे आहे. मात्र राजधानीत वा ठाण्यात मठ स्थापन न करता, आसपास मुकाट्याने काम करता येईल, अशा ठिकाणी मठ करण्याचे धोरण होते. कऱ्हाडास विजापूरकरांचे सुभेदार-ठाणे होते म्हणून जवळच शहापूर, उंब्रज, मसूर येथे मठ स्थापून त्यांचे व सर्वच मठांचे केंद्र चाफळ हे डोंगराळ प्रदेशात केले होते, या गोष्टीलाही महत्त्व आहे. एकान्ती निर्धास्त विचार शक्य व्हावा, हे त्यातील धोरण, " युक्तिबुद्धीने भरलेले " महंत आणि मठ एकशेअकराच्या सुमारास होते, हे संप्रदायाच्या उपलब्ध कागदपत्रावरून उघड आहे. त्यातूनही फार तर एकोणतीस मठाधिपति संप्रदायाचे संचालक होते असे दिसते. समर्थांनी व त्यानी "मरहटा तेवढा मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।" असा उघड उघड उपदेश लोकांस केला. फार काय, " बहुतां दिसांचें हें बंड। म्लेंछ जाहले उदंड। त्यांचें करूनि दुखंड। राज्य करावें॥ " असा उपदेश समर्थांनीच लोकास प्रथम दिला. राजकारणात सुद्धा वास्तवावर आधारलेला असा धर्ममूलक, विवेक-वैराग्यप्रधान प्रयत्नवादाचा परमार्थ महाराष्ट्राला शिकवून कर्तव्यदक्षतेने सार्थनामा होण्याचे वळण समर्थ संप्रदायाने लावले, ही या संप्रदायाची ऐतिहासिक कामगिरी होय.

## रोकड्या सामर्थ्याचा प्रभावी प्रत्यय :

प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांच्या इतिहासावरून दिसून येते की, जेव्हा एखाद्या राष्ट्राचा उदय होतो वा एखादे परतंत्र राष्ट्र परराज्याचे जू झुगारून देऊन स्वतंत्र होते, तेव्हा त्या राष्ट्राच्या उदयास अगर स्वातंत्र्यप्राप्तीस समरांगणावरील देशाभिमानी योद्ध्याचा पराक्रम जसा कारणीभूत असतो तसेच देशाभिमानी कविशाहिरांचे, चळवळ्याचे व मुत्सद्द्याचे प्रोत्साहक उद्गारही कारणीभूत असतात.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुष्कळ वर्षे परदास्यात खितपत पडलेल्या महाराष्ट्रास जे स्वातंत्र्य मिळाले त्यासही, न्या. रानडयानी 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे, अनेक विभूतीचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. त्यातील समाजाची विचारधारा स्वावलंबी व स्वाभिमानी राखण्याचे राष्ट्रीय सेवाकार्य संतमंडळीनी साडेतीन शतके सर्व भारतभर केले होते. समर्थ संप्रदाय ऊर्फ धारकरी पंथ स्थापून, भवानीला प्रार्थना करताना–

दैत्य संहारिले मागें ऐसें ऊदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं मूळ सामर्थ्य दाखवी ।।
तुझा तूं वाढवीं राजा शीघ्र आम्हांचि देखतां ।।

अशी मागणी प्रसाद म्हणून करणारे समर्थ व त्यांचे अनुयायी यांनी राजधर्म व क्षात्रधर्म फैलावला; "प्रपंचीं जाणें राजकारण" म्हणजे राजकारणात मन घातल्याशिवाय प्रपंचात भागणार नाही, अशी बहुजनसमाजाला शिकवण दिली; या सगळयाचा उपयोग शिवरायाच्या स्वराज्यस्थापनेस अनुकूल वातावरण निर्माण करण्यात व पुढे स्थापन झालेल्या स्वराज्यामुळे अमर कृतज्ञता सर्व भारतभर समाजाने बाळगण्यात खासच झाला आहे.

गॅरिबाल्डीच्या चरित्रात श्री. न. चिं. केळकरांनी समर्थांना महाराष्ट्राचे मॅझिनी म्हटले आहे तर श्रीयुत वासुदेवराव मुंडले यांनी इटालीच्या काव्हूरला इटालीचा रामदास म्हणून संबोधले आहे. मॅझिनीचे प्राबोधक लेखन आणि काव्हुरची " शक्ती युवती " समर्थांच्या ठायी असल्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनी आपल्या (कोल्हापूर) साहित्य संमेलनातील भाषणात सांगितले आहे. आचार्य जावडेकरांनी आपल्या राजनीती–शास्त्रपरिचयात "श्रीसमर्थ रामदासांनी लोकमताला राजनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व दिले आहे" असे स्पष्ट केले आहे. प्रा. हरिभाऊ लिमयांनी इतिहासाचे अभ्यासक म्हणून सरळच सांगून टाकले आहे की, "रामदास हे लोकामध्ये चैतन्य उत्पन्न करणारे फार उच्च दर्जाचे लोकनायक होते. म्लेंछाकडून हिंदूस भोगाव्या लागणाऱ्या यातनांचे हृदयद्रावक वर्णन करून महाराष्ट्रातील लोकांची मने उद्दीपित करण्याचा त्यांचा हेतु होता." " समर्थांनी लोकांची मने उद्दीपित करताना " हळु हळु शिकवूनच ती केली होती. "आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ-विवेका । येथें आळस करूं नका । विवेकी हो ।।१।। प्रप्रंच सोडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल । प्रपंच परमार्थ चाळवाल । तरी तुम्ही विवेकी ।।२।। प्रपंच सांडूनि परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंटयाला । परमार्थ कैचा ।।३।।" (दा. १२–१) अशी प्रपंच-परमार्थाची जोड घालावयास सांगून त्याचे सूत्रमय युक्त सांगितले आहे की, "प्रपंचीं जाणें राजकारण । परमार्थी साकल्य-निवारण । सर्वांमध्ये उत्तमगुण । त्याचा भोक्ता ।। "(दा. १९–४–१७) राजकारण जे प्रपंची पहावयाचे त्याचा उमाळा समर्थांनी दासबोधात सत्तावीस ठिकाणी व इतरत्र नऊ

ठिकाणी केला आहे. (त्याचा गोषवारा मागेच आला आहे) शिवाय सामाजिक व धार्मिक विषयात समाजाला समर्थांनी बुद्धिवादी वळण लावले. "देव्हाऱ्याचा देव। करूं नेणें सर्व जीव। तयाचे नि ब्रह्म-कटव। निर्मिला न वचे।।२२।। देवें निर्मिली हे क्षिती। तिचे पोटी पाषाण होती। तयासीच देव म्हणती। विवेकहीन।।२९।। जो सृष्टी निर्माण करता। तो ये सृष्टिपूर्वी होता। मगहे तयाची सत्ता। निर्माण झाली।।३०।। (दा० ८-१)" असे स्पष्ट शिकवण्यास समर्थ डरले नाहीत. त्याचप्रमाणे "साधुचा देह खितपला अथवा श्वानादिकी भक्षिला। तें प्रशस्त न वाटे मनाला। मंद बुद्धिस्तव" (दा. ७-१-२५) असाही लोक-समजूतीतील भोळेपणा उघड्यावर टाकण्यास समर्थांनी कमी केले नाही.

"कुग्रामींचा वास। आयुष्याचा नाश। विश्वेचा आभ्यास। तेथें कैंचा।।१।। कळेना परीक्षा। चातुर्य मर्यादा। लागतसे सदा। पोट धंदा।।२।। पोट-धंदा नीच जनांची संगती। तेथें कैशी गती विवेकाची।।३।। विवेकाची गति सज्जन-संगती। दास म्हणे स्थिति पालटावी।।४।।" म्हणून तीव्र बुद्धीची वाढती बाळें वेळ प्रसंगी मठात आणुन आणवून, त्याना शिक्षण देण्यावर समर्थांचा साहजिकच ओढा असे. शिकवणीचा पहिला धडा समर्थ देत तो असा "घरीची माणसें राजी राखावी ती परोपरी। भंगलें चित्र जाणावें, रक्षावें बहुतापरी।। १।। अंतरी प्रीति राखावी शब्दो-शब्दीं परोपरी। तूटली प्रीती ते खोटी रक्षिली पाहिजे बरी।।२।। विपट पडिले लोकी। चालते ते कळेचिना। शोधिलें पाहिजे लोकी। जाण जाणोनी वर्तणे।। ३।। वर्तना येत नाही रे। वर्तणें नकळे जनी। सकळांसि राखणें राजी। हे मुख्य भक्ति जाणिजे।।४।।" उदात्तपणा व भलेपणा याचा प्रारंभ असा घरापासून झाला पाहिजे. हा आरंभ करताना आपल्या बुद्धीचा उपयोग प्रवचनापेक्षा स्वतःच्या वर्तनाने प्रवर्तन करण्यात केला पाहिजे. "सांगावें तें आपणांला। आपणूं करतां बरे।।१।। प्रसंगें वर्तता आलें। येथातथ्यचि सुचिलें। मनुष्य राखिलें राजी। तो प्राणी शाहणा बरा।।२।।" असे वर्तनशुद्ध शहाणपण दाखविताना नाही "मुळींच नेणतें व्हावें। जाणत्या-नेणत्यामधे।।१।। महत्त्व वेगळें आहे। महत्त्व जाणती कळा। नेणत्याला मिळो जाणें। पुढें मागें हळूं हळूं।। २।।" आणि शहाणपण सुचावयाचे तर "एकान्त सेवितां आधीं। चाळणा करतां बरी। अभ्यासीं लावतां बुद्धी। अकस्मातचि संभवे।।" हे खरे. पण "जाणोनि काय होतें रे। वर्तणें सक्त पाहिजे।।" अर्थात् जे वागून दाखवावयाचे ते "शक्ति आहे तों करावें। विश्व कीर्तीनें भरावें।।" तसे झाल्यास "शहाणें उदंड कष्टती। वडील उपकारें दाटती।।१।। ज्यास त्यास पाहिजे तो। जनीं वाटयास येतो।।२।। न सांगता कार्य करी। ज्ञान उदंड विवरी।।३।। स्तुती कोणाची न करी। प्राणीमात्रीं लोभ धरीं।।४।। कदा विश्वास मोडीना। कोणी माणूस तोडीना।।५।। दास म्हणे नोहे दुःखी। आपण सुखी लोक सुखी।।६।।"

घरोब्याच्या मंडळीत असे वागताना प्रपंच नेटका झाल्याशिवाय कसा राहील? असा "सुकृताचा योग" सर्वांनाच असेल असे नाही. तरीही "भला रे भला बोलती

तें करावें ।। " हे व्रत घेऊन " होत नाहीं यत्न ऐसें काय आहे ?।। " अशी खूणगांठ मनाशी बांधावी व " जेथील विषयो तेथें । विपरीत करतां नये " हे पथ्य सांभाळून चालावे. घरीदारी हीच शाळा लागली तर मुले बिचवी झाल्याशिवाय थोडीच राहतील ? आईने मुलाला घरी कसे ईर्षाबाज करावे हे सांगण्याकरताच समर्थांनी अंजनीगीत नाहीना लिहिले ? " अवघे रामायण ज्याचेनि झाले " त्या हनुमंताची आई अंजनी म्हणते की, " क्षणामधें रावण वधुनि । जरी कां आणतां राघवपत्नी । तरी पुत्राचा माझे मनीं । उल्हास होता ।।१।। असत्य वाटेल रामा बोली । दुग्ध-धारा ते सोडिली । शिला उदरीं खोचुनी गेली । विखंडे जेव्हां ।।२।।" अंजनीसारख्या गृहदेवता प्रेरक शक्ति बनून त्यांची मुले मोकळ्या वातावरणात " गृहीची राजी " राखून चालणारी झाली तर शाळेत वा मठात मुलाना कोणते वळण लागावे ?

" शक्तिने पावती सूखें । शक्ति नसतां विटंबना ।
शक्तिनें नेटका प्राणी । वैभवें भोगिता दिसे ।।१।।
उदंड खस्तिचीं कामें । मर्द मारून जातसे ।
नामर्द काय तें लंडी ? । सदा दुश्चीत लालची ।।२।। "

अशाने रग आली तरी जीवनाला रंग येण्यासाठी वळण लावले पाहिजे की,

" सदगुणीं सदभाव नाहीं ज्ञान-गर्व । तयालागी सर्व सारखेचि ।
निंदका-वंदका संकटी सांभाळीं । मन कदाकाळीं पालटेना ।।२।।
पालटेना मनीं परस्त्री-सांचनीं । निववी वचनीं पुढिलांसी ।।३।।
पुढिलांसी नाना सुखें देत आहे । उपकारी देहे लावितसे ।।४।। "

असा माणूस विद्यार्थ्याने व्हावे. शक्तिमान, विवेकी आणि शीलवंत असे उमदे तरुण मग जगाचा वेध घेताना समजून चुकतात की, " जनीं जनार्दन आहे । परंतु सज्जनीं वसे । जना आणि सज्जनाला । एकचि करतां नये ।। "

जन म्हणजे ज्याच्यापासून काही निर्माण होते तो; तर सज्जन म्हणजे ज्याच्यापासून होईल ते चांगलेच होईल असा. अशा लोकामधील परमेश्वर पाहण्याची सवय करताना आणखीही एक तत्त्व शिकावू मनावर उमटावे लागते की,–

" उत्तमू प्रत्यय-ज्ञानी । मध्यमु शास्त्र-निश्चयी । अधमू लोक-धाटीचा । पाखंडी अधमोधम् ।।१।। उत्तमू मुख्य ज्ञानी तो । मध्यमू तो उपासकू । अधमू संशयी कर्मी । कर्मभ्रष्ट अधमोधम् ।।२।। धन्य तो सर्व ही जाणें । सार शोधून घेतसे । प्रत्ययेविण मानेना । तो ज्ञानी दुल्लभू जनीं ।।३।। " त्यामुळेच, " सर्वत्र ज्ञान तो ज्ञाना । प्रत्ययें बोलतो खरें । न्यायनीत्या मिळो जाणें । तोचि तो लोकसंग्रही ।।१।। मनेंचि पारखी लोकां । परंतु न बोले कदा । जाणत्या नेणत्या लोकां । प्रसंगीं वर्तवी जनीं ।।२।। " कारण " पाखरी तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना । तैसे सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ।। "

भक्तीमार्गी बहुजन समाजाला सामाजिक व धार्मिक आणि राजकीय बाबतीत वास्तववादी वाटचाल बुद्धिवादाने करावयास जसे समर्थांनी व त्यांच्या संप्रदायाने शिकविले, तसेच राजकारणीसुद्धा सर्व धुरंधरांना 'इशारतीचे' असेल ते ते कळवीत असत. हे "विवेकें करावें कार्यसाधन ।" यासारख्या कल्याणस्वामींच्या सांकेतिक ओवीबद्ध पत्रावरून म्हणता येईल. या सर्वसामान्य लोकशिक्षणाच्या संबोधनापेक्षा समर्थांनी आपल्या प्रबोधनाने जनसामान्याला पात्रतासिद्ध राष्ट्रीय नागरिक बनविण्याचा जो प्रयत्न केला त्याला तितकेच महत्त्व आहे. व्यक्तिमात्राला अन्न-वस्त्र-शिक्षा-दीक्षा या गोष्टी घरात, समाजात, राष्ट्रात आणि जगात मिळाल्याच पाहिजेत. हे व्हावयाचे तर घरापासून जगापर्यंत जिव्हाळा वाटला पाहिजे. तशी थोर बुद्धी करावयास समर्थांनी शिकवण दिली आहे. "सर्वत्र पेरणें विद्या । लोकां-मध्यें हळूं हळूं । लोकांत जीव घालावा । चालावा भक्तीमार्ग हा ।।" असा समर्थांचा रोख असल्यामुळे "नेणते जाणते करण्या" वर त्यांचा भर. म्हणून "उकलून सांगणें सोपें । मैत्रिकी सर्व लोकांसी ।।" असा त्यांनी रस्ता आखला. भिक्षा मागताना मनाचे श्लोक म्हणून, नित्यनेमे कीर्तन करून अगर उत्सव उभा-रून सामुदायिक लोकशिक्षण जसे समर्थ साधीत होते, तसेच वैयक्तिक शिक्षणा-साठीही ते उद्बोधन करीत आणि आपल्या मठांचा उपयोग होऊ देत.

समाजाचा असा हा नेटका प्रपंच सावरावयास लागणारा नेटकेपणा "समान देखणें आत्मा । समान करणें दया । वंद्य, निंद्य विचारावें । हें मुख्य जाणती कळा ।।" समाजाची विस्कटलेली वा विस्कटणारी घडी नीट बसविण्यास व जनतेत नवा जोम, नवी आशा, नवा उत्साह स्वधर्माची नि स्वकर्तव्याची जाणीव उत्पन्न होण्यास वरील तऱ्हेचा नेटकेपणा ठाकठीक असावा लागतो. हीच खरी व्यावहारिक ब्रह्मविद्या. या कामी विरोधक उठत नाहीत असे नाही; पण कार्यकर्त्याला आपल्या नीतीतेजोवर्धनाने विरोधकांना गप्प करता येते. येथे एक पथ्य पाळावयाचे असते. ते हे की, "निमाल्यावरी वैर कां हो करावें? ।।"

सामाजिक जीवनाची जशी व्यक्तिसापेक्ष तयारी ठेवता ठेवताच भोवतालच्या देशपरिस्थितीची जाणीव ठेवून-

वन्हि तो चेतवावा रे । चेतवितांचि चेततो ।।
विवेक जाणिजे तैसा । वाढवितांचि वाढतो ।।

आणि देशपरिस्थितीची जाणीव ठेवून प्रभुप्रार्थना करीत रहावे की-

संभवामि युगे युगे हें वचन । येणें समाधान होत नाहीं ।।१।।
होत नाहीं देवा श्लाघ्य येणें जिणें । कर्म हें भोगणें दीना ऐसें ।।२।।
दीनाऐसें कदाकाळीं हें न व्हावें । समर्थचि व्हावें मुख्य पद ।।३।।
मुख्य पद दृढ धरूनियां देवें । निश्चळचि व्हावें दास ह्मणे ।।४।।

समर्थांच्या तेजस्वी वाणीने दिलेल्या वैयक्तिक व सामाजिक अशा पातळी-वरील राष्ट्रीय शिक्षणाने महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण झाले. लोकभ्रम नाहीसे

होऊन पारतंत्र्याची चीड व स्वराज्याची आवड आस्थापूर्वक निर्माण झाली. लोकसंग्रहात खरी देवभक्ति असून "देवद्रोही तितुके कुत्ते। मारूनि घालावे परते। देवदास पावती फत्ते। यदर्थी संशयो नाहीं॥" असा विश्वास जनतेत दृढावला आणि कर्तव्यजागृति होऊन दक्षता बळावली. आणि ? छत्रपति शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांना लोकपाठिंबा सर्व बाजूंनी मिळून हिंदवी स्वराज्याची छत्रपतींची कल्पना साकार झाली. समर्थही आनंदले की, "बुडाला औरंग्या पापी। हिंदुस्थान बळावलें। उदंड जाहलें पाणी॥ स्नानसंध्या करावया॥"

## समर्थांचे सहगामी आणि अनुगामी :

समर्थांची दृष्टि आणि समर्थ-निर्मित सृष्टि ही अशी वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांचे सहगामी आणि अनुगामी साधु-संत त्यांच्याविषयी नितांत आदर बाळगून, त्यांच्या पाऊलखुणांचे अनुसरण करण्याचा प्रयत्न आपापल्या मति-शक्तीप्रमाणे करीत राहिले.

समर्थांचे बंधु रामीरामदास वा श्रेष्ठ आणि 'दास पंचायतना' तील चार साधु यांचा समर्थांच्या सहगामी संतात प्रामुख्याने समावेश करावा लागेल. रंगनाथस्वामी निगडीकर, जयरामस्वामी वडगांवकर, केशवस्वामी भागानगरकर व आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर या चौघांचाही समर्थांशी घनिष्ठ संबंध होता; त्यांच्या भेटी-गांठी आणि पत्रव्यवहारही चालू असे. देवाधर्माचे वैभव वाढविण्याच्या उदंड उद्योगात या चौघांनीही आपापल्या कार्यक्षेत्रात आपापल्या परीने मोठेच कार्य केले. समर्थांच्या शिष्यात कल्याणस्वामींचा लौकिक मोठा. समर्थांच्या सेवेत रत झालेले कल्याणस्वामी डोमगावमठाचे अधिपति म्हणून ३६ वर्षे नांदले ( समाधि : इ. स. १७१४ ). 'दासबोधा' चे लेखन यांच्याच हातचे. दिनकरस्वामी तिसगावकर मात्र पारमार्थिक दृष्टया एक थोर समर्थानुयायी होते. नगर जिल्ह्यात वृद्धेश्वराच्या डोंगरावर यांनी तप केले. इ. स. १६५४ मध्ये यांना समर्थानुग्रह प्राप्त झाला. यांचा 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ खरोखरच अनुभूतीचा सूर्य आहे. 'दासबोधा' च्या खालोखाल ज्याची महती आहे, असा हा ग्रंथ रोकडया प्रत्ययाच्या तेजाने झळाळणारा आहे. दिनकरस्वामींची स्फुट कविताही वेधक आणि उद्बोधक आहे. यांचे पुत्र रामचंद्र दिनकर हेहि परमार्थातील अधिकारी होते. समर्थ-शिष्यात वेणाबाईंचे स्थान मोठे. मिरजमठाच्या अधिपति म्हणून समर्थ-संप्रदायाच्या इतिहासात यांची विशेष नोंद करावी लागेल. यांचे 'सीतास्वयंवर' आणि अन्य स्फुटरचना साधी असूनही रसाळ आहे. वेणाबाईंचे प्रशिष्य गिरिधरस्वामी हे प्रचंड ग्रंथरचनेमुळे समर्थसंप्रदायात प्रथितयश आहेत. यांनी बाळपणी समर्थांना पाहिले होते. 'निवृत्तिराम' हा यांचा प्रमुख आध्यात्मिक ग्रंथ होय. यांनी 'समर्थप्रताप' नामक ग्रंथात समर्थांचे सामर्थ्यशाली चरित्र प्रभावीपणे गायिले आहे. हे श. १६५१ मध्ये बीड येथे समाधिस्थ झाले. याशिवाय 'भीमोपदेश,' 'रामसोहळा' इत्यादि ग्रंथाचे कर्ते मेरुस्वामी, कल्याणाच्या बंधूचे पणतू आणि 'भक्तलीलामृत' या ग्रंथाचे

कर्ते शिरगावमठपति भीमस्वामी, ग्रंथरचनेचा उदंड उद्योग करणारे तिरुवेळंदूरचे माधवस्वामी व त्याचे अनुगामी आणि 'दासविश्रामधाम' हा समर्थ-संप्रदायाचा विश्वकोश रचणारे आत्मारामस्वामी येक्केहाळीकर, इत्यादि अनेक व्यक्तींनी समर्थनिष्ठेतून वाङ्मयनिर्मिति केली, मठ-महन्ती सांभाळली आणि रामरंगी रंगून परमार्थ-साधना आचरली.

समर्थांच्या हयातीत संप्रदायाची वाढ झपाटयाने झाली. समर्थांची अद्वितीय कर्तृत्व-वक्तृत्वशक्ति व पुढे मिळालेले राजसहाय्य आणि जनतेतील विभूतिपूजेचा परंपरागत जिव्हाळा ही त्याची प्रमुख कारणे होत. "उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मिळमिळीत अवघेंचि टाकावें।।" असा समर्थ-शिकवणीतील दृढभाजकही त्या यशास कमी कारणीभूत नव्हता. शिवाजीमहाराजांनी १६५८ मध्ये रामोत्सवास दोनशे होनांची देणगी दिली. तेव्हापासून व विशेषतः चाफळच्या देवस्थानास सन १६७८च्या दसऱ्याच्या दिवशी छत्रपतींनी सनद करून दिल्यापासून समर्थ-संप्रदायास सुरू झालेला राजाश्रय संभाजी, राजाराम व शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सुरू होताच. त्यामुळेच रे. डेमिंगने "समर्थ-संप्रदाय हा व्यवहारदृष्टया महाराष्ट्र राज्याचा धर्मच होऊन बसला होता," असा शेरा मारला आहे. समर्थांच्या १६८१तील स्वर्गवासानंतर त्यांची जागा भरून काढील व 'उत्कट-भव्य' घेऊन व घ्यावयाचा उपदेश करून संप्रदायातील सर्व मठामहंतांना सहकारसमन्वयाने संघटित राखील, असा नेता नव्हताच. "आहे तितुके जतन करावें। पुढें आणीक मेळवावें।" हा समर्थांनी संभाजीराजांना केलेला उपदेश संभाजी महाराजांच्या नंतर औरंगजेबाने लढाईच्या धामधुमी उठवून छत्रपति घराण्यालाच जेथे व्यवहारात आणून दिला नाही, तेथे समर्थ-संप्रदायाला नुसते "हरिभजनावीण काळ दवडूं नको रे।" एवढेच म्हणत बसावयास लागले, हे समर्थांसारख्या 'समर्थ' माणसाच्या अभावाचे साहजिक फळ होय. औरंगजेबाने उठविलेल्या दख्खन स्वारीच्या धामाधुमीने चाफळास व सज्जनगडास दरसाल भरणारा महंतमेळावा व कार्याचा आढावा जेथे बंद पडला, तेथे दुसऱ्या गोष्टी काय बोलावयाच्या? समर्थ-शिष्या अक्काबाई देशपांडे यांनी चाफळ-सज्जनगडाचे मठ नित्यनैमित्तिक चालवून सांभाळले व त्यांचेच अनुकरण इतरही सांप्रदायिकांनी केले, हे 'येतां अशुभसा काळ नवा। कूर्म गुरु करावा' या दृष्टीने ठीक होते. पण मोंगलाईतही औरंगजेबानंतर मराठ्यांनी भीमथडीची तट्टे गंगेत नाहवली व अटकेपार झेंडे लावले, तरी समर्थ सांप्रदायिकांच्या वंशपरंपरागतांनी व नूतन दीक्षितांनी आपला संप्रदाय तेजस्वी करण्याचे व समर्थांचा वारसा ऐतिहासिक दृष्टया सांगण्या-चालविण्याचे मनावरच घेतलेलेही दिसत नाही. पेशवाईच्या उत्तरार्धात हजारो समर्थ-सांप्रदायिकांच्या तेजस्वी कार्याची राष्ट्रीय गरज असता, ती मुळीच पुरवली गेली नाही. ब्रिटिश रियासतीच्या उच्चाटणाची स्वप्ने भारतीय पाहू लागल्यापासून आणि विशेषतः लो. टिळक-म. गांधींच्या कालखंडात रामदासी संप्रदायाचे नवसंस्करण झाले होते. रामदास-साहित्याचा अभ्यास पुनश्च इतका सुरू झाला की त्या रामदासी नव-

संस्करणावर इंग्रजी राजवटीचा भयंकर दात होता. पांगारकरकृत ‘रामदासीबोवा’ या पुस्तकाला जप्ती भोगावी लागली आणि तालीमखाने व नमस्कारमंडळे यांच्याबद्दल सरकारी वर्तुळातून जळफळाट झाला. तरीही “समजले आणि वर्तले” ही समर्थांची शिकवण पचनी पाडणारी संघटना निर्माण करण्यावर नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा कटाक्ष होता. समर्थांचे वैराग्य, प्रयत्नवाद,समाज-हितचिंतन व आत्मविश्वासाचे सामर्थ्य या गुणांचा वारसा नीट पारखून चालवावा आणि समर्थांच्या महाराष्ट्रधर्माची व्याप्ति भारतभरीची, किंबहुना, “चिंता करतो विश्वाची।” याचा प्रत्यय आणून देणारी व्हावी असा ध्येय-वेधही काही महत्त्वाकांक्षीचा होता. गुरुदेव टागोर व म. गांधी तसे “विश्वमानव” होऊ लागले होते. समर्थ सांप्रदायिकानीही तसे होण्यातच समर्थ संप्रदाय अजरामर होणारा असताना, वाईचे गोसेवक चौंडेमहाराज, गोंदवलेकर महाराज, हैदराबाद मठाचे केशवबुवा बोरगावकर अगर गोमान्तकशुद्धिप्रसिद्ध विनायकमहाराज मसूरकर यांनी आणि केरळकोकिळ ~~आठवले~~, ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर व समर्थ आठवले वाग्देवता-मंदिराचे शंकर श्रीकृष्ण देव यांनी आपापल्या परीने समर्थ-संप्रदायाला धार आणण्याचे काही काळ यशस्वी प्रयत्न केले; पण ते तोटकेच पडले. प. पू. श्रीधरस्वामीमहाराजांचे समर्थसेवा मंडळ नव्या काळास साजेशी व्यवस्था राखून समर्थांची कर्तृत्वस्थाने समाजाच्या स्फूर्तीकरिता नीटनेटकी ठेवण्याचा प्रयत्न उभारून राहिले आहे व समर्थसंजीवनीचा प्रसार करीत आहे. पण सांप्रदायिकांची साखळीसूत बळकट संघटना बांधून समाजाचे जीवन ‘उत्कट भव्य’ करण्याकडे सांप्रदायिकानीच सहकारपूर्वक कर्तव्य बजावल्याशिवाय संप्रदायाला अपेक्षित तेज चढणार नाही. समर्थ-वाङ्मयासारख्या चतुर चैतन्यमय ग्रंथराजाचा विवेक-वैराग्यशील अभ्यास करून आणि व्यवहारसन्मुख व समाजसन्मुख होऊन समर्थ संप्रदायाची कालोचित अशी नवी उभारणी व संगादणी करणारा ‘समर्थांचा सेवक’ निर्माण होईल तो सुदिन !

• • •

# समर्थांचे ठळक शिष्य

तीर्थयात्रा करावयास लागल्यापासून समर्थांनी शिष्य-सांप्रदाय वाढविण्यास सुरवात केली. तो वाढता वाढता "नभामाजी तारांगणा" सारखा वाढला. त्यामध्ये "समर्थे कित्येक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थांसि विदित भले ।" आणि जी प्रगट शिष्यमंडळी त्यांनी जन्मभर केली ती "भूमंडळी कोणी मोजिली?" महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर हिंदुस्थानातील इतर प्रांतात संप्रदायाने धर्म-जागृती करून बहुजन-समाजास कर्तव्यदक्ष व सन्मार्गगामी समर्थांनी केले. राजसत्तेच्या जोरावर चालत आलेल्या धर्मांतराला आळा घालण्याचे काम ज्ञानेश्वरादि सर्वच संतजन करीत आले; पण मठ स्थापून व तेथे महंत नेमून संप्रदायाची संघटना समाजाच्या दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी सेवेला लावण्याचा व्याप फक्त समर्थांनीच केला. मुसलमानी राज्यात महत्त्वाच्या ठिकाणी समर्थांनी मठ स्थापून "राजकारण उदंड करावे । परी गुप्तरूपे ।" हे धोरण धरले. बेदर प्रांतातील रामस्वामीच्या शिष्यवराने राजकारणच राजकारण केल्याचे वर्णन समर्थ-प्रतापात आहे.

समर्थ-शिष्यात कल्याणस्वामी (डोमगाव मठ) यांच्या सारखे समर्थांच्या सर्व कसोटयास उतरलेले शिष्य होते तर वासुदेवस्वामी (कण्हेरी मठ) सारखे प्रतिसमर्थ समजले गेलेले पण (पूर्वाश्रमी सदाशिवशास्त्री येवलेकर असताना श्री. शंकराचार्यांसारख्या विद्वत्तेच्या अहंभावाने ताठरलेले पण समर्थांनी एका महारा-करवी विनीत करताच ) छत्रपती शिवाजीराजानाही पूज्य वाटावे असेही शिष्य होते. दिनकरस्वामी (तिसगाव मठ) याना समर्थांनी स्वतःच आपल्या फिरतीत तिसगावला येऊन अनुग्रह दिला, तेव्हाचाच काय तो समर्थांचा त्याना प्रत्यक्ष सहवास. पण त्यानी स्वावलंबनाने समर्थांना व समर्थसांप्रदायाला तेज चढेल असेच स्वबुद्धीने कार्य केले. निजाम हद्दीतील सुकना नदीचे काठी मालगाव येथे त्र्यंबकराज ऊर्फ भोळाराम हा समर्थांचा शिष्य होता तोही सांप्रदायाच्या शिस्तीनेच पण स्वावलंबनाने आपल्या आवाक्याप्रमाणे लोकांचे डोक्यात भरण्या-सारखे कार्य करी. महंत आण्णाप्पा ( नागपूर प्रांताच्या निलंगे मठाचा ) हाही

समर्थ-सांप्रदायात शिरणारा गर्भश्रीमंत तरुण ऐहिक संसारापासून अठराव्या **वर्षीच** झटकला व समर्थ-सांप्रदाय जोरात वाढवू लागला. त्याची समर्थांच्यावर एवढी नितांत श्रद्धा होती की, "नसे ऊपमा सद्‌गुरू रामदासा। जयाचेनि हा तूटला जन्मफासा॥" असे त्याचे उद्‌गार आहेत. कर्नाटकातील मन्यार-गुढी मठाचे **अनंत मौनी** समर्थांप्रमाणे आजानुबाहु होते, वेदवेदांत व्याकरणात पारंगत होते. आणि गृहस्थाश्रमी असूनही कडकडीत विवेकी-वैराग्याचे होते.

समर्थांच्या काही शिष्याही कर्तबगार होत्या. **चिमणाबाई उर्फ आक्काबाई देशपांडे** यानी तर समर्थांच्या पाठीमागे चाळीस वर्षे चाफळ, सज्जनगड, जांब येथील उत्सवादि कारभार नेकीने, नेटाने आणि नियमाने पार पाडून मोंगली उचापतीतही आपली सत्वशीलता दाखवली. सीतास्वयंवराच्या कर्त्या **वेणाबाई देशपांडे** (मिरज) या समर्थांच्या शिष्येने आपल्या पात्रतासिद्धीने समर्थांच्याकडून कीर्तने करण्याची अनुज्ञा सर्वप्रथम मिळविली आणि इच्छा-मरणी झाली.

**अंबिका बाई**- (वाळवे मठाधिपति) या वेणाबाईंच्या सारख्याच दुसऱ्या समर्थशिष्या. पुराण-कीर्तन श्रवणाने अध्यात्मज्ञान समजून तत्त्वज्ञानाच्या विषयावरही सोप्या भाषेत गोड पदे करण्याची योग्यता याना आली होती. पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही समाजोन्नतीच्या सेवेत अवसर ठेवला पाहिजे. म्हणूनच समर्थांनी स्त्रियांना अनुग्रह दिला. वेणाबाईंच्याप्रमाणेच अंबिकाबाईंचीही शिष्यपरंपरा आहे.

**छत्रपति शिवाजी राजे, निळो सोनदेव मुजुमदार, बाळाजी आवजी चिटणीस, रामचंद्र नीळकंठ पंतअमात्य** असे मातबर राजकारणीही समर्थ-शिष्यत्व अभिमानाने सांगत.

समर्थांचे शिष्य कल्याणस्वामी. त्यांच्या परंपरेतील दासविश्रामकार **आत्माराम महाराज**. त्यांचे एक प्रसिद्ध शिष्य **नरसोबा**. हे मराठा. यानी भालकी येथे मठ स्थापला. बालाघाट प्रांतात लातूरपासून २५ कोसावर भालकी आहे. तेथे मराठा-ब्रह्मचारी शिष्यांची परंपरा आहे. या मठाची ही अद्वितीय परंपरा आहे. "वरप्रसाद" हा या मठाचा सांप्रदायिक शिस्त सांगणारा ग्रंथ आहे.

समर्थांच्या पश्चात् त्यांच्या शिष्य-प्रशिष्यानी "हरिकथा निरुपणा" कडेच लक्ष दिलेले दिसते. किंबहुना राजकारणादि इतर व्याप-आटोप सावरणे हे त्यांच्या आवाक्याबाहेरचेच ठरले. भवभूतीने म्हटल्याप्रमाणे "वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे। नच खलु तयोर्ज्ञाने शक्तिं करोत्यपहान्ति वा॥ भवतिच तयोर्भूयान् भेदः फलंप्रति तद्यथा। प्रभवन्ति शुचिर्बिंबोद्‌ग्राहे मणीर्न मृदां चयः॥" हेच खरे. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात- "धर्म-राज्य स्थापनेचे अद्‌भुत कार्य समर्थांच्या तारुण्यात सुरू होऊन त्यांच्या वार्धक्यात मूर्त झाले. पुढे धर्मराज्याची स्थापना झाल्यावर समर्थांच्या मठाना तत्कालीन सत्ताधीशानी कृतज्ञताबुद्धीने उत्पन्ने दिली." व तेच मठांच्या सत्त्वशिथिलतेस एक कारण झाले. कारण "आहे तितुके

जतन करावे । पुढे आणिक मेळवावे । महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।। ” हे समर्थांनी वृद्धापकाळीही संभाजी महाराजास सांगितले, तशी ज्वलंत शिक्षणज्योत तळपत ठेवणारा मठाधिपति आपण व्हावयासच पाहिजे, अशी आच सांप्रदायातील कोणाजवळ आढळली नाही !

तथापि समर्थांच्या कारकीर्दीत आणि नंतरच्या सत्तावीस वर्षे चाललेल्या मोंगलाबरोबरीच्या अटीतटीच्या सामन्याचा शेवट होईपर्यंत, समर्थ–सांप्रदाय हा राज्यधर्मच होऊन राहिला होता असे रे डेमिंगासाहेब म्हणतो. “रामदासी सांप्रदायाच्या नीतिमत्तेपेक्षा अधिक नीतिमत्तेचे उदाहरण दुसऱ्या कोणत्याही हिंदु धार्मिक संप्रदायाने घालून दिलेले नाही. रामदासांचे आचरण पवित्र होते व त्यानी स्वत: पवित्र आचरणाचा धडा आपल्या सांप्रदायातील लोकाना घालून दिला होता ”

● ● ●

# समर्थ साहित्याचे स्वरूप

लोकशिक्षणासाठी समर्थांनी आपल्या संचाराच्या क्षेत्राचे लोकभाषेप्रमाणे निरनिराळ्या भाषात काव्ये लिहिली. नुसत्या मराठीतील त्यांच्या साहित्याची गणना करावयाची म्हटले तरी अभंग ३८७०, अष्टाक्षरी पाच लघुकाव्ये ५५५, अष्टाक्षरी प्रकरणे १६७०, प्रबोध ३२६२, ओवीबद्ध लघुकाव्ये २७४१, दासबोध ७७५१, पदपदांतरे ३५००, प्रासंगिक ३००० अशी २६३४९ ग्रंथसंख्या होते. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात विविध धर्मपंथींनी केलेले कार्य असाधारण महत्त्वाचे आहे. विजयानगरच्या साम्राज्याने दोनशे वर्षे झगडत राहून इस्लामी बेबंदशाहीला पायबंद घातला हे त्याचे कार्य मान्य करूनही, संतांच्या कामगिरीचे महत्त्व अबाधितच राहते. याच परंपरेचा वारसा चालविणारे रामदास हे एक नवयुगप्रवर्तक संत होते, असे इतिहासाने सिद्ध केले आहे. नित्य आणि नैमित्तिक, कालनिरपेक्ष आणि कालसापेक्ष, अशा दोन्ही गरजांचा विचार करूनच त्यांच्या सांप्रदायिक वांग्मयाची मांडणी झालेली होती. आत्मोन्नति-बरोबरच समाजोन्नती आणि पारमार्थिक कल्याणाइतकीच ऐहिक उत्कर्षाची तळमळ समर्थांच्या वांग्मयात आहे. "निशिदिनि जनचिंता लागलीसे उदारा।" हे त्यांच्या वांग्मयजीवनाचे उगमस्थान आहे.

भक्तिमार्गातील विविध बाजूंचा समर्थांनी आपल्या वांग्मयात ठायी ठायी परामर्श घेतला आहे. त्यांच्या विचार-प्रतिपादनाचा बाह्य आविष्कार सरळ, ठसठशित आणि जोमदार आहे. भक्तिमार्गाच्या अधिष्ठानावर त्यांनी समाजाला जो सर्वंकष आचारधर्म शिकवला, त्यात समर्थांचा आगळेपणा आहे. वारकरी सांप्रदाय व समर्थ सांप्रदाय यातील पुष्कळशी एकरूपता ध्यानात घेऊनही समर्थांची व्यापकता, राजकीय घटनाविषयी जागरूकता, प्रपंचविज्ञानाचा तपशील, ही त्यांची स्वतंत्र वैशिष्टये आहेत. जीवनात आत्मज्ञानाचे स्थान श्रेष्ठतम असून तीच जीव-नाची इतिकर्तव्यता आहे ही समर्थांची भूमिका ठिकठिकाणी प्रगट झाली आहे. आपले उपास्य दैवत रामाची आदर्श दैवत म्हणून जनमनी स्थापना करताना, शेकडो वर्षे पारतंत्र्यात पिचत पडलेल्या समाजासमोर देवांचे बंधविमोचन करणाऱ्या

कोदंडधारी रामाचा आदर्श हेतुपुरःसर ठेवल्याचे रामदासांच्या वांग्मयात स्पष्ठ होते. " बळे तोडिला बंध त्रीदशांचा । ह्मणोनि कथा थोर या राघवाची ॥ " हे त्यांच्या वांग्मयाचे ध्रुपदच होते. निवृत्तिपर विचारसरणीने भारावलेला समाज रामराज्याचाही आस्वाद घेण्यास असमर्थ असतो हे समाजातील उणे ओळखूनच ते " राहू देऊ नये । कोणी एकाचे । " हा कटाक्ष समर्थ वांग्मयाने धरला आहे.

मनासारखी सुंदरा ते अनन्या । मनासारखे पुत्र, जामात, कन्या ।
सदा बोलती रम्य वाचा सुवाचा । जगी जाणिजे योग हा सुकृताचा ।

असे सांगून " ज्यांचा जो व्यापार । तेथे असावे खबरदार । " एवढेच नव्हे तर " प्रपंच व्यवसायाचे ज्ञान । बरे पाहे ॥ " अशी समर्थांनी आग्रहपूर्वक शिकवण दिली आहे. समर्थ रामदासांच्या उपदेशातील सुवर्ण–कलश म्हणजे महाराष्ट्रधर्म. तो रियासतकार सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे " प्राक्कालीन साधुसंतानी दाखविलेला प्रकार तर खराच,परंतु त्याहून काही जास्त अर्थाचा समावेश त्यात होत होता.नाही तर 'महाराष्ट्र' शब्द जोडण्याचे कारण नव्हते.त्या शब्दात पुष्कळ अर्थ भरला आहे. महाराष्ट्र देशाची रचना, त्यातील लोकांच्या अंगचे पाणी व प्रयत्न केला असता बाहेर येणारे सामर्थ्य इत्यादि गोष्टींचा रामदासाच्या मनातील अर्थ या शब्दात व्यक्त होतो. पूर्वीच्या साधूंच्या उपदेशाची दिशा केवळ वैराग्याची होती. स्वदेशाचे व स्वराष्ट्रसंबंधाचे लोकांचे कर्तव्य म्हणून काही आहे व ते समजावून दिले पाहिजे या गोष्टी साधूंच्या विचारात नव्हत्या. रामदास विद्वान्, बहुश्रुत व देशकालज्ञ होता... लोकांनी ऐक्य करून स्वराज्य स्थापन करावे; स्वराज्य स्थापनेवाचून स्वधर्मोन्नति व्हावयाची नाही; धर्म व राष्ट्र यांचा निकट संबंध आहे; असा त्यांच्या उपदेशाचा अर्थ होता. " निष्कर्षानेच समर्थवांग्मयाचा उपदेश अमरपणे असा आहे–

" मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते ।
धन्य धन्य म्हणे लोक । सत्क्रिया करिता बरी ॥१॥
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्म–वासना ।
देवालये करावी मोठी । वापी, कूप, सरोवरे ॥२॥
स्वये आपण कष्टावे । बहुतांचे सोशीत जावे ।
झिजोनि कीर्तिस उरवावे । नाना प्रकारे ॥३॥
आपले अथवा परावे । कार्य अवघेच करावे ।
प्रसंगी कामास चुकवावे । हे विहित नव्हे ॥४॥
जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकास हव्यास उपजे ।
लोक राजी राखोन कीजे । सकळ काही ॥५॥
जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ।
रात्रंदिवस विवेकी लोक । सांभाळित जावे ॥६॥
उपाधीस कंटाळला । तो भाग्यापासून चेवला ।
समयी धीर सांडिला । तोही खोटा ॥७॥

संकटी कंटाळो नये । करावे अत्यंत उपावे ।
तरी मग पाहता काय । उणे आहे ? ॥८॥

भल्याने परमार्थी भरावे । शरीर सार्थक करावे ।
पूर्वजास उद्धरावे । हरिभक्ति करुनी ॥९॥

दृढनिश्चय धरावा । संसार सुखाचा करावा ।
विश्वजन उद्धरावा । संसर्गमात्रे ॥१०॥

सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणे ।
सर्वत्र ज्ञान पेरावे । लोकामध्ये हळूहळू ॥११॥

समर्थांचे वाङ्मय तेजस्वी व शहाणपणाच्या समाधानकारक आयुष्याची गुरुकिल्लीच. मुख्य ग्रंथांचा विचार करताना एक गोष्ट खटकते ती की त्यांच्या एकाही ग्रंथाचा प्रारंभकाळ व समाप्तिकाळ नमूद केलेली नाही; याचे कारण कदाचित् " समर्थ कृपेचे हे बोल" असें जे त्यानी दासबोधाला ह्मटले आहे, तेच त्यांचे मत आपल्या इतर वांग्मयासंबंधीही असेल! म्हणून परमेश्वरी प्रेरणेचे आरंभ व शेवट त्याचा तोच ठरवू शकणार हे उघड आहे. " जनस्थान गोदावरी वास केला । प्रभू देखिला, दास संतुष्ट झाला ।" यासारख्या वचनावरून समर्थांची करुणाष्टके पंचवटीच्या परिसरात झाली असे फार तर म्हणता येते तशीच कथा इतरही समर्थ साहित्यातील अस्मानी सुलतानी, परचक्रनिरूपण समर्थांनी तीर्थयात्रेतील अनुभवाने लिहिली. बाकी सर्व साहित्य कृष्णा-खोऱ्यात निर्माण झाले. इतिहासाचार्य राजवाडे आपल्या रामदास या निबंधात सांगतात की "शके १५५४त म्हणजे इ. स. १६३२त नाशकास दासांनी नीति, धर्म व राज्य स्थापून परमार्थाचा मार्ग दासबोध लोकाना दाखवण्याचा निश्चय केला, त्या निश्चयाचे फळ दासबोध होय." स. भ. देव म्हणतात, " सर्वतोपरी निकृष्ट स्थितीला पोचलेल्या समाजाला ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्यांची दिशा स्पष्ट रीतीने आखून देऊन शाश्वत सुखाची जोड करून देणे, हेच या (दासबोध) ग्रंथाचे प्रयोजन आहे. ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्यांची संगती या ग्रंथात जशी घालून देण्यात आली आहे. तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात, क्वचितच असेल ! असले शिक्षण देणारा प्राकृतात तरी एवढाच ग्रंथ होय. या ग्रंथाचा उपयोग चिरंतन आहे."

दासबोधापूर्वीचे त्याच्यासारखेच लोकमान्य झालेले ग्रंथ म्हणजे विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत हे होत. सर्वांचे विषय एकच असले तरी दासबोध हा शिकवणीचा ग्रंथ आहे तर बाकीचे स्वानंदोद्गारवाची ग्रंथ आहेत.

दासबोध हा मुख्यतः भक्ति-ज्ञान-वैराग्याचा ग्रंथ आहे. " भक्तिचेनि योगे देव । निश्चये पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी॥" एवढेच नव्हे, तर भक्ति, आत्मस्थिति, शुद्ध ज्ञान, शुद्ध उपदेश, सायुज्यमुक्ति, शुद्ध स्वरूप, अलिप्तपणा, जीवशिव, मुख्य ब्रह्म, यांचे "निश्चय" या ग्रंथात बोलले असल्याकारणाने

हा निश्चयात्मक ज्ञानभक्तिचा ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या वाचनाने अज्ञान, दुःख व भ्रांति जाऊन वैराग्य व विवेक अंगी बाणतात असे ग्रंथकर्ता रामदास स्वामींनी आत्मविश्वासपूर्वक सांगितले आहे. देहबुद्धिचे धोके जाऊन व संदेहाचे किंतु नाहीसे होऊन संसाराचे उद्वेग लुप्त होतील व " मनासि होये विश्रांति । समाधानी ।। "

" माझे बोलणे साधे आणि सप्रचीत ।" असले तरी ते " शास्त्रेसहित" असेच आहे. एवढेच नव्हे तर ते दुसऱ्याच्या निरीक्षणावरून केले नसून " आधी केले मग सांगितले । " असे आहे, असे समर्थ निक्षून सांगतात. आणि ? " प्रत्ययाचे बोलणे प्रत्ययेचि पहावे ।। " असा इशारा करून जगाच्या परीक्षेकरता आपला पत्ता उघडा ठेवतात. दासबोधाच्या पूर्वार्धात मुमुक्षूंचे अवगुण निघुन जाऊन विवेक, वैराग्य व सद्भक्ति कशी होईल आणि उत्तरार्धात लोकसेवा हीच परमेश्वर–सेवा या तत्त्वाचा अनुभव येण्यासाठी ज्ञानोत्तर कर्म कसे करावे, अध्यात्म ज्ञानाने स्वतःचे समाधान झाल्यावर त्या ज्ञानाचा उपयोग लोककल्याणार्थ कसा करावा याचे विवेचन केले आहे.

नासे अज्ञान, दुःख, भ्रांति । सीघ्रचि येथे ज्ञानप्राप्ति ।<br>
ऐसी आहे फलश्रुति । इये ग्रंथी ।।१।।<br>
योगियांचे परमभाग्य । अंगीं बाणे ते वैराग्य ।<br>
चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेसहित ।।२।।<br>
नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती ।<br>
प्राणी पावे उत्तम गति । श्रवणमात्रे ।।३।।

## दास – बोध

ज्याला लोकांच्यावर सत्ता चालवावयाची असेल त्याने परमेश्वरी पूर्णतत्त्वा–कडे अखंड लक्ष देऊन आपले प्रत्येक पाऊल टाकले पाहिजे. समजूतदारपणा फाक–विला व विकसविला पाहिजे, विकाराना मुसक्या घातल्या पाहिजेत, आणि जुलूम-शाहीच्या जडीबुट्टीच्या सिंहासनावाचून दुसरीकडे पायही न टाकणाऱ्या पशुवृत्तीला लगाम लावून कायमची खेचली पाहिजे, आपल्या अत्युच्च पदाला आवश्यक असलेली कर्तव्ये त्याने अभंग तत्परतेने पार पाडली पाहिजेत.

लोकपुढारी व्हावयाचा कस असा धारेवर धरणारा आहे. तो सर्वकालीन आहे. महंत ऊर्फ लोकपुढारी उत्पन्न करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला श्रीमत् दासबोधाने जोड दिली आणि " स्नानसंध्या टिळेमाला । अंतर्निष्ठ उपासना । नित्यानित्य विवेकानें । धन्य संसार होतसे ।। मर्यादा न्यायनीतीची । अन्याय न घडे कदा । सन्मार्ग योग देवाचा ।।ध०।। देवालयें शिखरें रम्यें । धर्मशाळा परोपरी । परत्र साधकां लोकीं ।।ध०।। अन्नोदकें वस्त्रदानें । धन्य धन्य ब्राह्मणीं भजे । उदास–वृत्तीनें लोकीं ।।ध०।। बावी, सरोबरें, टाकीं । मठ वृक्ष परोपरी । उपकार समस्तै

लोकां ।।ध०।। पराचे जीविचे जाणे। आस्ति नास्ति विचारणा। अत्यंत सर्व भूतांसी ।।ध०।। कदापि सत्य सोडिना। नित्य नेमस्त बोलणें। ओढतो बहुतां लोकीं ।।ध०।। होमयाग पुरश्चरणें। निरुपणें हरिकथा। ब्रह्मसंतर्पणें यांचा ।।ध०।।" वगैरे वगैरे थाटाने महाराष्ट्राचे आनंदवनभुवन झाले. अशा प्रभावी रचनेचे रघुनाथ पंडितासारख्या रसरंगाने–

"आम्हातुम्हास भव–वारिधिमाजी तारु।
जे वाचितां परिसतां मग होय तारु ।।"

असे वर्णन केले. ती समर्थरचना आहे तरी काय? शके १५७१ पासून १६०३ पर्यंत विचारपूर्वक तयार होत राहिलेल्या दासबोधाची रचना मध्यकालीन इतर संतमंडळींच्या विषयरचनेहून पुष्कळ प्रकारे भिन्न आहे. भाषा गोड, शुद्ध व सुलभ आहे. विषयाची रचना अत्यंत व्यवस्थित व सुसंगत आहे. लोकमान्यांनी निर्वाळा दिला आहे की, "उत्कटभक्ति आणि त्याचबरोबरच आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असे जे प्रवृत्तीपर भागवतधर्माचे लक्षण किंवा गीतेचा सिद्धांत याचा पूर्ण खुलासा कोणास पाहिजे असल्यास तुकाराम महाराजांनीच शिवाजी महाराजांस ज्या सद्गुरूस शरण जाण्यास सांगितले त्या श्रीरामदास स्वामींच्या दासबोधग्रंथा–कडेच त्याने वळले पाहिजे... कर्मयोगाचे खरे महत्त्व शुद्ध व प्रासादिक मराठी भाषेत सांगितलेले ज्यास पहावयाचे असेल त्याने समर्थांच्या दासबोधाचे व त्यात–ल्यात्यातही विशेषेकरून उत्तरार्धाचे पठण केले पाहिजे."

दासबोधाचा पहिला स्तवनदशक शारदा–गणेश–गुरुसभा–कवि–श्रोते–नरदेह इतक्याची स्तवने करतो. याचा अर्थच असा आहे की, व्यष्टि, समष्टि आणि परमेष्टि यांच्या समरूप समुच्चायातच खराखुरा परमार्थ व परमेश्वर–प्रतीति होते हे ठरविण्याचा समर्थांचा उद्देश आहे.

व्यक्तिसुधारणेवर समाजाची उन्नतावस्था अवलंबून असल्याकारणाने, आणि ज्या समाजात व जगात आपण राहतो त्या समाजाचा व जगाचा एक कर्तव्यदक्ष घटक प्रत्येक व्यक्तीने होणे जरूर असल्याकारणाने व्यक्तिविकासार्थ मूर्खलक्षणा–पासून विरक्तलक्षणापर्यंत दुसऱ्या दशकी दासबोधाने चर्चा केली आहे.

समाजाचा व जगाचा कर्तव्यदक्ष घटक होण्याकडे लक्ष ठेवून व्यक्तीने आपले जीवन हाकारावयाचे म्हणजे स्वार्थत्यागाचा-यज्ञाचा-विरक्तीचा प्रश्न हाटकून येतो. सहकार्य हे जितके सुखावह तितकेच त्यागमय असते. होडीत बसणाऱ्या प्रत्येक व्यतीने सर्वच्या सर्व होडीची वाहतूक निर्धास्त होण्यासाठी जपावे लागते; अर्थात सर्व होडीच्या कुशल वाहतुकीसाठी का होईना, प्रत्येक व्यक्ति आपापल्यापरी तयारीची असावी लागते. समाजशास्त्राच्या दृष्टीने यालाच व्यक्तिविकसन म्हणतात. पण नुसत्या व्यक्तिविकसन या शब्दामागील समाजघटकत्वाची रंगरचना लक्षात न आल्यामुळे, व्यक्तिविकसन म्हणजे स्वतःच्या पायापुरतीच वहाण

कापणे असा खोटा अर्थ होऊन बसतो. संकुचित स्वार्थाच्या असल्या खोटेपणाने त्यावेळी व्यक्ति आपले जीवन काढीत असतात. त्यावेळी समष्टीस्वरुप संसार तर नासतोच नासतो; पण व्यक्तिविषयक संसाराचेही वाटोळे होते. 'घटं विध्यात् पटं छिंद्यात्' असा सारा कारभार होऊन बसतो. त्याचे सुंदर वर्णन दासबोधाच्या तिसऱ्या दशकात पहावयास सापडते. अर्थात असल्या कचकटयातून सुटून व्यष्टीच्या दृष्टीने नेटका संसार समष्टीकडे व परमेष्टीकडे म्हणजेच समाजाकडे लक्ष देऊन करावयास शिकविण्यासाठी नवविधा भक्तिच्या दासबोधांतर्गत चतुर्थ दशकाचा अवतार आहे.

समष्टी व परमेष्टी याच्यावरील दृष्टी सुटू न देता आणि न चळू देता व्यक्तिविकसनाचा उपदेश भक्तिद्वारा करताना परमेश्वराच्या बरोबरीने गुरुपूजा सांगितली आहे. आपल्यापुढे काहीतरी आभासमय ध्येय ठेवून चालण्यापेक्षा उदाहरण म्हणून ध्येयपुरुष ठेवावा आणि त्याच्या तत्वाची वर्तनपूजा साधावी असा आधुनिकांचा सिद्धांत आहे. गुरुपूजेत आधुनिक विभूतीपूजेचे केवढे तरी उदात्त स्वरूप दाखविले आहे बरे? ध्येयपुरुषाची वर्तनपूजा साधताना त्या ध्येयपुरुषाच्या तत्वज्ञानाचा अभ्यास अंगी मुरावा लागतो. तो मुरविण्याकरिता त्या तत्वज्ञानाचे मुख्य सूत्र वा मंत्र समजला पाहिजे. म्हणून एकनाथांची एकनिष्ठा ध्येयपुरुषाच्या वर्तनपुजेसंबंधी ठेवण्याची आवश्यकता गुरुशिष्यासंबंधाचे व मंत्राचे महत्त्व वर्णन करून दासबोधाचे पाचव्या दशकात दाखविली आहे. याच गुरुशिष्यासंबंधाची व सायुज्य-मुक्तीची सांगड काय आहे यांचा धागा सहाव्या दशकाने स्पष्ट केला असुन आध्यात्म ऊर्फ देवशोधन म्हणजेच व्यक्तिविकसनाची अंतीम सीमा काय व कशी आणि का व कोणत्या वळणाची, हे स्पष्ट मांडले आहे.

दासबोधाची रचनाच गुरु-शिष्य संवादाची आहे. अर्थात् गुरुने शिष्याला तरबेज करण्याच्या परिणामकारक उपायांचा त्यात अवलंब केला असला तर नवल काय? शिष्याची स्मृति सूर्यकिरणाइतकी ताजी रहावी म्हणून दिलेल्या शिकवणीची उजळणी मोजकेपणाने करण्याची गुरुजनांची चाल असते. नवीन द्यावयाची शिकवण शिष्याच्या मनावर ठसावयास हा जुना धागा उपयोगी पडत असतो. दासबोधात हा प्रकार वारंवार पहावयास सापडतो. सातवा दशकच पहा. त्याचा पहिला समास हा मागील दशकातील सर्व विवेचनाचे सिंहावलोकन असून दुसऱ्या समासापासून ब्रह्मविवरणाला सुरवात आहे. ब्रह्माचे पर्याय, चौदा ब्रह्मे म्हणजे काय, शुद्ध ब्रह्म कशास म्हणतात? ब्रह्म, ब्रह्मांड आणि पिंड यांचे परस्पर संबंध कोणते वगैरे गोष्टींचा उलगडा सदर सातव्या दशकात समर्थांनी अद्वैत-निश्चयाने पशूचा परमेश्वर होणे हे मानवी जीवनाचे सार्थक स्पष्ट करून दाखविले आहे. पण मग "ब्रह्म होऊन संसार करणें विहित नव्हे" असा प्रश्न उत्पन्न होतो, त्याचे समर्पक उत्तर सातव्या समासापासून दहाव्यापर्यंत समर्थांनी मोठ्या चतुराईने दिले आहे. व्यष्टीने परमेष्टीरूप प्राप्त करून घेतल्यावरही त्याचा लोकांना म्हणजे समष्टीलाही

उपयोग होतो, म्हणून ' कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते " हा गीतेप्रमाणेच समर्थांचाही सिद्धांत आहे.

ओघानेच कर्मयोग आचरणारा असतो तरी कसा, हे शिष्याच्या मनावर ठसविणे जरूर होते. त्याप्रीत्यर्थ आठवा दशक खर्ची घातला. तथापि ब्रह्म व त्याच्या अनुषंगाने जो मायेचा प्रश्न उद्‌भवला होता, त्याचे उत्तर देऊन शिष्याला निःशंक करणे जरूर असल्यामुळे ते प्रथम उरकून नंतर समर्थांनी कर्मयोग्याचे स्वरूप विशद केले आहे.

कर्माला अकर्म करून राहणारा सिद्धही जर आम्हा माणसासारखाच दिसावयाचा आणि जर "अंतर्निष्ठांच्या खुणा अंतर्निष्ठ जाणती!" तर सिद्ध आणि साधा यांच्यातील तफावत एका ज्ञानाशिवाय दुसऱ्या कशाने कळणार! जेथे ज्ञान खुंटते तेथेच जर ब्रह्मप्राप्ती होते,तर कर्मयोगाला या विचिकित्सेत पडण्याचे कारणच काय ? प्रकाश पाडीत रहावयाचे एवढेच सूर्याला ठाऊक असते. आपल्या प्रकाशापासून चंद्राचे किरण अमृतमय होतात आणि मर्त्य जगाला जीवनजंतु मिळतात म्हणून मी कोणी श्रेष्ठ आहे असा अभिमान कर्मयोगी सूर्याच्या ठिकाणी बिलकूल नसतो. ही स्थिती कर्मयोगी बनल्यानंतरची असल्याकारणाने त्याच्यापूर्वी " मायोद्‌भवानंतर त्या मायोद्‌भवालाच चिकटून असलेल्या गुणरूपाचेही " वर्णन शिष्याला स्पष्ट करणे जरूर होते. ते दासबोधाच्या नवव्या दशकाने केले असून, गुणमायातीत म्हणजे संन्यास अंगी मुरलेला कर्मयोगी कसा असतो याची फिरून एकदा उजळणी पाठोपाठ जगज्जोती नामक दहाव्या दशकात 'पिंडी तेंच ब्रह्मांडी ' म्हणजेच आपल्यावरून जग पारखावे असा उलगडा करून पहिल्यापासून आतापर्यंत सांगितलेल्या शिकवणीचा आढावा घेतला आहे.

अशा तऱ्हेने व्यक्तीची परमावधीची उन्नती करण्याचा बिनचूक मार्ग सांगितल्यावर समष्टीच्या संबंधात परमार्थाचा मानवी संसाराला उपयोग करून घेण्याची युक्ती दासबोधाच्या भीमदर्शकाने दाखविली आहे. प्रपंच असो, नाही तर परमार्थ असो, त्याचा नेटका निर्वाह विवेकाशिवाय होत नाही. विवेकपूर्ण अभ्यासाने चालणाऱ्या त्या परमार्थ्यासाठी समर्थांनी लोकसंग्रहाचा दंडक दिला आहे.आणि दंडक घेऊन लोकपुढारी ऊर्फ महंत होणाऱ्याने व्यवहारात काय करावयास पाहिजे याचे विवेचन स्पष्टपणे केले आहे. व्यक्ती निष्काम झाली तरी शरीरपात होईपर्यंत एक वा अन्य तऱ्हेचे कर्म त्या मागचे सुटत नाही. " यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवोतरो जन: " या न्यायाने कर्मयोग्याने भोवतालचा प्रपंच सावरायाचा, तो स्वत: अलिप्त राहून सावरावयाचा असला तरी, "परस्पर सुधारणेने अगर दैवावर विसंबून" तो सावरावयाचा नाही; तर झीज सोसून, जनस्थल-कालमान राखून कार्य केले पाहिजे असे विवेकवैराग्यनामक बाराव्या दशकाचे व्याख्यान आहे. स्वाचरण व प्रबोधशक्ती या प्रयत्नांच्या मुख्य दिशा लोकसंग्रहात्मक महंतीला ऊर्फ कर्मयोगी पुढारीपणाला आवश्यक म्हणून ठसवून समर्थांनी बाराव्या दशकात 'महंताने महंत करण्याची महत्वाकांक्षा बाळगावी' असे उत्तेजन दिले आहे.

"नम्र झाला भुतां। तेणें कोंडिलें अनंता" ही समर्थपदवी प्राप्त करून घेणाऱ्या या दुसऱ्या टप्प्यावर आल्यानंतर झालेल्या ज्ञानाच्या दृढीकरणासाठी स्वस्थ चित्ताचे स्मृतिसंशोधन संबंध तेराव्या दशकभर दासबोधाने केले आहे. प्रपंच-परमार्थाची सांगड घालून महंताने चालावयाचे व चालवावयाचे; तरी समष्टीचा गाडा हाकताना शरीरधारणा ऊर्फ पोटाचा प्रश्न वटारून डोळे पुढे उभा राहतो हे विसरून चालणार नाही. निस्पृहपणे लोकसंग्रहात्मक धोरणाने समाजाचा संसार हाकताना परमेष्टीवरील दृष्टी चळता कामा नये म्हणून भक्तिमार्गाचा फैलाव महंताने केला, त्यासाठी कीर्तनरंग उभारला, आपल्या अंगच्या 'काही एक उत्कटत्वाने' लोक भारून टाकले, तरी त्याने बुवाबाजी चुकूनही करता कामा नये, असा चौदाव्या दशकात समर्थांनी शिरस्ता घालून दिला आहे. पोटाकरिता महंताने भिक्षा मागायाची खरी; पण ती समाजाची लूट करण्याकरिता नव्हे किंवा तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "भिक्षा पात्र अवलंबिणें जळो जिणें लाजिरवाणें" अशा हीन वृत्तीकरिताही नव्हे; तर शरीरधारणेकरिता. समाजाच्या-धारण-पोषणाच्या आणि विकास-संवर्धनाच्या संसाराचे सूत्र महंताने हाती घेतले असल्याकारणाने त्याच्या पोटाची काळजी समाजाने केलीच पाहिजे. समर्थांनी फक्त पोटाच्या जरुरीपेक्षा दाणाही अधिक नाही इतकीच एकमुष्ठि भिक्षा घ्यावयाचा उपदेश महंताला दिलेला आहे. ही एकमुष्ठि भिक्षा घेताना देखील समाजाचे कार्य म्हणून "लहान थोर परीक्षून घ्यावयास सांगितले आहे." समाजातील लहान थोरांची परीक्षा झाल्याशिवाय एकंदरीत सामाजिक उठाव साधता येत नाही. हे लक्षात घेतले म्हणजे साध्या संसाऱ्यापासून महंतापर्यंत कशा पद्धतीने गेले असता व्यष्टि-समष्टीचे कार्य होऊन व्यष्टीला परमेष्टीसुद्धा साधते हे अखंड ध्याननामक चौदावा दशक सांगत असल्याकारणाने लोकपुढारी होऊ इच्छिणाऱ्याने त्याकडे ध्यान देणे जरूर आहे.

दहाव्या दशकापर्यंत व्यष्टीला परमेष्टी रूप होण्यासाठी करावा लागणारा अभ्यास ज्याप्रमाणे सांगितला त्याप्रमाणेच भीमदशकापासून व्यष्टीने समष्टी स्वरूप कसे व्हावे हे पंधराव्या दशकाअखेर सांगितले आहे. व्यष्टी, समष्टी, परमेष्टीचा मेळ घालण्यास मोक्षाची खरी आर्य कल्पना व्यष्टी-समष्टी, विकास व शास्त्रास धरून बहारीची मांडण्यात आलेली आहे. आणि तेवढ्याच भागाचा सिंहावलोकनात्मक भाग या आत्मदशकात येऊन गेला आहे. समष्टीच्या भूमिके-वरून परमेष्टीच्या भूमिकेकडे जाण्याचा उपक्रम सपातिन्वय दशकात मानवी जगाच्या पलीकडच्याही भूतमात्राशी समरस होऊन प्रतिपादन केलेला आहे. पंचभूतात्मक सृष्टिच वैचित्र्याने भरली असल्याकारणाने व विविधत्वामुळेच अस्तित्वात टिकत असल्यामुळे तिला व्यापून राहणाऱ्या परमात्म्याला ओळखण्याचे विविध सांप्रदाय निघाले तरी आश्चर्य नाही. या विविधतेत असलेल्या एकरूप परमेश्वराला विवेकाने ओळखून उपासना केली व चालविली पाहिजे.

कर्ता करविता देव एक हे तत्त्व समष्टीतून परमेष्टी पाहण्यात आणि त्याचप्रमाणे व्यष्टी आणि समष्टी यांच्या एकजीव मिळणीने परमेष्टिकडे धाव घेण्यात कसे समाविष्ट झाले आहे हा प्रकृतिपुरुष नामक सतराव्या दशकाचा विषय आहे. या विविधतापूर्ण जगात व्यष्टी-समष्टिच्या समन्वयाचा व्यावहारिक मार्ग बहुजिनसी असणार हे उघड आहे; म्हणून अठराव्या बहुजिनसी दशकात महंताला ऊर्फ लोकपुढाऱ्याला असे सर्व मार्ग सांगून असा इषारा दिला आहे की, जो जागृत राहून आस्ते आस्ते श्रवणमननपूर्वक अभ्यास करीत जातो तो प्रत्यय घेत घेत अज्ञ जनास सांभाळत सांभाळत समर्थ पदवीला पोहोचतो. मात्र एकांति विचार-विवरण हा त्याचा अमोघ मार्ग असतो.

पशूचा परमेश्वर होण्यासाठी आणि त्यासाठी दुसऱ्याला मार्ग दाखविण्या-करिता येथपर्यंत महंतासाठी ऊर्फ लोकपुढाऱ्यासाठी व्यष्टी, समष्टी व परमेष्टी यांच्यावर दृष्टी देऊन मानवी जीवनाचे जे सूत्ररूप विवेचन केले त्याचा व्यष्टी-समष्टी-समन्वयापुरता स्मृतिसुंदर समारोप शिकवण-निरूपण दशकात समर्थांनी केला असून पुढील पूर्ण दशकात व्यष्टि-परमेष्टि व समष्टि-परमेष्टी यांच्या सम-न्वयाने व्यष्टी-परमेष्टी-समष्टी या उत्क्रांतीचा तर्कशुद्ध समारोप केला आहे.

अशा रीतीने महंत ऊर्फ लोकपुढारी उत्पन्न करण्याच्या शाळेचा अभ्यासग्रंथ समर्थांनी महाराष्ट्राला दिलेला आहे. विषयाच्या प्रतिपादनात ओघाने आलेल्या पोटविषयाचेही तपशिलवार वर्णन बारीकसारीक छटासह समर्थांनी केले असल्या-कारणाने व अध्ययन-पद्धतीशी उजळणी आणि फेरउजळणीचा निकट संबंध असतो याची भूल पडल्याकारणाने अक्षर-वाचकाला श्रीमत् दासबोध म्हणजे एक समर्थांच्या लहरींनी निपजलेली वाङ्मय-कंथा वाटते. तथापि अर्थ-वाचकाला वर दिग्दर्शित केल्याप्रमाणे श्रीमत् दासबोध पुढारीपणाचे शिक्षण देणारा प्रमाण-ग्रंथ असल्याचे अभ्यासू नजरेने प्रत्ययाला येते. " सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें । परी तेथें परमेश्वराचे । अधिष्ठान पाहिजे ।" असे आश्वासून " आधी प्रपंच करावा नेटका । मग पहावे परमार्थ विवेका " अशी शिकवण देणारा समर्थांचा महाराष्ट्रधर्म म्हणजे सतराव्या शतकातील स्मृतिग्रंथ होता. शक-पूर्व हजार वर्षाखाली मराठी लिपी अस्तित्वात आल्यापासून, ' खटनटाशी खटनट घालून ' सुद्धा अगोदर जगणे आणि मग चांगल्या तऱ्हेने जगणे कसे जगावे व तद्द्वारा समाजाची प्रगतीपर धारणा कशी साधावी हे अनुभवसिद्ध सांगणारा दुसरा स्मृतिग्रंथ मराठीत झालाच नाही.

दास म्हणजे गुलाम समजा, दास म्हणजे साधा सेवक समजा अगर दास म्हणजे परमेश्वराशी एकरूप होऊ पाहणारा परमार्थी समजा. दासबोध हा चतुर्थी तत्पुरुष समास घेऊन आपल्याला असे म्हणता येईल की, त्याच्या उद्धाराचा नेमका रस्ता समर्थांनी दाखविला आहे. दासबोध हा तृतिया-तत्पुरुष समास घेण्याचीही चाल आहे. तसे केल्यास ' दास ' या शब्दाचा जो आपण अर्थ घेऊ, त्याप्रमाणे

समर्थांचा किंचित् अत्युक्त विनय अगर आत्मविश्वास प्रगट होईल. मात्र "आधीं केलें मग सांगितलें" या ब्रीदाचे समर्थ असल्याकारणाने 'दास' शब्दाचा तिसरा अर्थ घेऊनच आत्मविश्वासपूर्ण असे आपल्या ग्रंथाचे नामाभिदान केले असावे, असा आमचा विश्वास आहे. तथापि 'दासबोध' हा तृतियातत्पुरुष व चतुर्थीतत्पुरुष असा दोनही तऱ्हेचा समास एकसमयावच्छेदेकरून सोडविण्याचाही काही सुबुद्धांचा सांप्रदाय आहे. तोही मोठा अर्थबोधक असून, निरनिराळ्या तऱ्हेने समास घेऊन जी अर्थप्रचिति होते, त्यापेक्षा या समासद्वयाच्या एकीकरणाने समर्थांच्या सामाजिक आपुलकीला बहारीचा रंग चढतो आणि 'समासां'नी म्हणजे कोऱ्या जागांनी लिहिलेल्या दासबोधाची अक्षरे म्हणजे ती अक्षरेच तेवढी नसून ती अक्षरे सुचवितात त्या अर्थाचा खोल अभ्यास केला नाही तर कोरी जागा वाचत बसल्याचाच अनुभव येईल, या भीतीने मननपूर्वक अभ्यासाकडे चित्त वेधते. कारण दासबोध "अभ्यासेंचि प्रगट" झाला आहे. दासबोध तर्कशुद्ध व्यवहारविचारांचा आणि रचनाशैलीने गद्यच ग्रंथ असून ऐहिक जीवनाच्या बिनचूक आकलनाने उदात्तच उदात्त शिकवण देणारा ग्रंथ आहे. दशक ७ स. १० ओवी ४२ त "सरली शब्दांची खटपट । आला ग्रंथाचा शेवट" असे म्हटले आहे. त्यावरून सात दशकांचाच दासबोध प्रथम तयार झाला. समाजात अनन्वित व विस्कळीत प्रकार चालू असता, समर्थांनी नाशिकाला शके १५५४ त ( स. १६३२ ) नीती-धर्म-राज्य स्थापून परमार्थाचा मार्ग लोकांना दाखवण्याचा निश्चय केला, त्या निश्चयाचे हे फळ होते. आठवा ज्ञानदशक मग परिपुर्ततेकरता लिहून समर्थांनी "अध्यात्मनिरूपण निरूपिले" दासबोधाचा द. ६ स. ४. हा शके १५८१ ( स. १६५९ ) त लिहिला त्याचप्रमाणे द. १८ स. ६ त्याच वर्षी अफझल-प्रसंगाने लिहिला हे उघड आहे. अशा रीतीने आठव्या दशकानंतरचे सर्व समास प्रसंगाप्रसंगाने एकेका सरस व्याख्यानासारखे तयार झाले आणि त्या सर्वांचा संग्रह पूर्वी सांगितल्याप्रमाणे शिस्तीने करून वीसदशकांचा दासबोध शके १६०२ मध्ये गुंफण्यात आला. अगदी आरंभीचा समास जो अत्याधुनिक दृष्टचा बुद्धिवादाचे बीजारोपण करणाऱ्या ओवीने आरंभित आहे तो कदाचित आधुनिक पुस्तकांच्या प्रस्तावनेसारखी दासबोधाची सर्व जुळण झाल्यावरही लिहिला असेल. समाजाला ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्याची दिशा स्वतंत्र रीतीने दाखवून देऊन शाश्वत सुखाची जोड करून देणे हेच दासबोध ग्रंथाचे सार्वकालीन प्रयोजन होय. कर्मयोगाचे खरे महत्त्व शुद्ध व प्रासादिक मराठी भाषेत सांगितलेले ज्यास पहावयाचे असेल त्याने समर्थांच्या दासबोधाचे व त्यातल्या त्यात विशेषेकरून उत्तरार्धाचे पठण केले पाहिजे असे लो. टिळकांचे मत आहे. दासविश्रामधामात म्हटल्याप्रमाणे समर्थांचा "दासबोध" म्हणून एक ग्रंथ आहे तो कर्मयोगातील शिकवणीचे विवरण करणारा असेलही.

श्रीसमर्थ हे उत्तम ग्रंथकार आणि ग्रंथपाल होते. त्यांनी संस्कृत, मराठी, हिंदी व्रज, अवधी या भाषेत कवन केले आहे. संस्कृतात रामायण लिहिले आहे. हिंदी,

व्रज, अवधी या भाषेत अभंग व पदे रचिली आहेत. ती सर्व अद्याप अप्रकाशित आहेत. मराठीत दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, पदपदांतरे, जनस्वभाव गोसावी, एकवीस समासी म्हणजे जुना दासबोध, आत्माराम, मानसपूजा, जुनाटपुरुष, अंतर्भाव, पंचसमासी, सप्तसमासी, सगुण-निर्गुणध्यान ही प्रकरणे महत्त्वाची आहेत.

'जनस्वभाव ( किंवा बहुधा ) गोसावी ' हे श्रीसमर्थकृत उद्बोधक प्रकरण ७० ओव्यांचे आहे. साधुसंतांच्या हातून घडलेले व घडणारे चमत्कार व कित्येकांची जगावेगळी वागण्याची विचित्र तऱ्हा यांचे परमार्थमार्गात महत्त्व किती, ते श्रीसमर्थांच्या या न्यायनिष्ठुर पण विनोदपर लिहिण्यावरून आपणास कळणार आहे. या कवनात साठसत्तर चमत्कारांचा फक्त नामनिर्देश केलेला आहे. चमत्कारसिद्धी म्हणजे साधुत्व नव्हे किंवा पूर्णपुरुषत्व नव्हे हे समर्थांना येथे सांगावयाचे आहे. या प्रकरणाचा वाक्प्रवाह पुढे चालवावयाचा होता असे दिसते.

## मनोबोध

"मनास बुद्धि सांगणे । जनास काय सांगणे ?" असा बोध लोकाना व्हावा, म्हणून श्रीसमर्थांनी मनाला उद्देशून हे श्लोक केले आहेत. "मन एवं मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः।" हा सिद्धांत आहे. "मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ॥" अशी भावना केल्यास मनुष्य आपला आपणच शत्रु होऊन जीवपणे बद्ध होतो. परंतु "आपण वस्तु मुळी एक । ऐसा ज्ञानाचा विवेक ॥" केला तर मनुष्य जन्ममरणापासून मुक्त होतो.

आपले शिष्य साऱ्या राष्ट्रभर भिक्षेला निघाले म्हणजे लोकांची प्रवृत्ति परमार्थमार्गाकडे वळविण्याचे कामी त्याना उपयोगी पडावेत म्हणून श्रीसमर्थांनी हे श्लोक केले. सर्व राष्ट्रभर संचार करून प्रत्येक घरापुढे खड्या आवाजात एक एक श्लोक म्हणून जय जय रघुवीर समर्थ असा घोष करावयाचा व "मुष्टि एक" भिक्षा संतुष्टपणे घेऊन श्रीस्थळी उत्सवाची सांगता करावयाची, असा श्रीसमर्थ-शिष्यांना दण्डक होता.

हे मनाचे श्लोक जो कोणी श्रवण करील तो क्रमाक्रमाने बद्धाचा मुमुक्षु, मुमुक्षुचा साधक व साधकाचा सिद्ध होऊन ज्ञान-वैराग्य-सामर्थ्य यांनी संपन्न होईल. हे श्लोक त्रिखंडात्मक आहेत. पहिले ६६ बहुधा कर्मपर; पुढचे ६९ (श्लोक १३५ अखेर) उपासनापर आणि राहिलेले ७० ज्ञानपर आहेत. पहिले ६६ परमार्थाकडे मनाचा ओढा लावतात, ६७ ते १०१ त श्रीरामाची थोरवी गाऊन नामस्मरणाचा महिमा ठसविला आहे, १०२ ते ११५ त 'वर्तावयाचे नियम' सांगितलले आहेत, ११६ ते १३५ त श्रीरामाचे भक्तवात्सल्य मनावर प्रतिबिंबित केले आहे, आणि १३६ ते २०५ त आत्मज्ञानाचा बोध करून जीवास ज्ञान-वैराग्यसंपन्नता-प्राप्ती सुलभ केली आहे.

" आधी ते करावे कर्म । कर्मयोगे उपासना । उपासका सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षचि पावणे ।। " असा बोध या श्लोकापासून होतो. म्हणूनच " वेदाचे जे गुह्य । शास्त्राचे जे सार । " असे मनाच्या श्लोकाचे स्तवन अधिकारी पुरुषांनी केले आहे. या श्लोकात अनन्यभक्तीचा महिमा, श्रीरामनामस्मरणाचे महत्त्व, सत्संगाची थोरवी विचार-उच्चार-आचारांची एकरूपता, इंद्रियदमनाची आवश्यकता, परोपकारबुद्धी, वितंडवादाचा फोलपणा, विचार-विवेकाची श्रेष्ठता, सद्गुरुलक्षणे, श्रीरामाचे ब्रीद, श्रीरामाचे रूप असे महत्त्वाचे अकरा तरी विषय सांगितले असल्याकारणाने श्रीसमर्थांच्या सर्व ग्रंथाचे सार या २०५ श्लोकात आहे. हे श्लोक अत्यंत गोड, प्रेमळ, तल्लीन करणारे आहेत; साधनावाचून सन्मार्ग दाखविणारे आहेत. समर्थच आत्मविश्वासाने सांगतात, " मनाची शते ऐकता दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती । चढे ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य अंगी । म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ।। " मनोबोधापैकी " मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।। " वगैरे 'सुवेल' म्हणून प्रसिद्ध असलेले ५० श्लोक सर्व-परिचित असतातच. मनोबोधाच्या २०५ श्लोकातील उपदेश परिणामकारक अशा जोरदार भाषेत केला आहे. म्हणून मनोबोध हा महाराष्ट्र वाङ्मयातील अत्यंत दैदिप्यमान असा हिरा असून भगवद्गीतेला जसे कृष्णाचे तसेच मनोबोधाला समर्थांचे उपनिषद् मानतात.

**मनाचे श्लोक** अर्थगर्भ असल्यामुळे ते मानवी व्यवहारांची आणि नीतितत्वांची सूत्रेच आहेत. ते समर्थांच्या साहित्यनिर्मितीचा सर्वांगसुंदर फुलोरा ठरले आहेत. दीडशे श्लोक ( २०५ पैकी ) अध्यात्माने परिपूर्ण आहेत. भक्तिमार्गाच्या सुगमपंथाने ऊर्ध्वगतीला नेऊन ते मोक्षाचा दरवाजा खुला करून देतात. ईश्वराच्या भक्ताविषयी असलेल्या करुणेचे दाखले देऊन सर्वसाधारण माणसाला पारमार्थिक सत्याचा प्रत्यय घडविण्याचे वैशिष्टच त्या श्लोकात आहे. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः ।।' असा सुसंवाद करण्याची ते बहुजनसमाजास हाक देतात. खरा देव कोण हे विश्लेषण करून समर्थांनी मनाच्या श्लोकात सांगितले आहे.

असे हे मनाचे श्लोक आणि समर्थांची **करुणाष्टके** हा महाराष्ट्राचा ठेवा आहे. श्री. देव सांगतात- " करुणाष्टके म्हणजे करुणाघन परमेश्वरास-आपल्या इष्ट उपास्य दैवतास-दीनदयाळ सद्गुरुस परोपरीने व प्रेमभराने आळविणारी कविता. तीत पश्चात्ताप आहे, संसाराची अस्थिरता आहे, विवेकयुक्त वैराग्य आहे, मोक्षाची अपेक्षा आहे, सद्गुरुचा धावा आहे. " फणिवर उठवीला, वेग अद्भूत केला । त्रिभुवनभर लोकी कीर्तिचा घोष गेला ।। " हे मारुतिरायावरील करुणाष्टक सर्वांचा मेरुमणि आहे. "

**आत्माराम**- हा समर्थांचा छोटा ग्रंथ आध्यात्मदृष्टीने महत्त्वाचाच आहे. ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव तसाच समर्थांचा आत्माराम. " जगाची संचालना करणारे

चैतन्यतत्त्व विषाप्रमाणे अमृतातही भरलेले असल्याकारणाने जगातील 'पदार्थ मात्र तितुका गेला । अवघा ईश्वरचि उरला ॥' ही प्रथम मनोधारणा आणि नंतर वृत्ति व तीतून जीवनसहजता साध्य झाल्याचा साक्षात्कार या ग्रंथाभ्यासाने येतो.

शिवाय रामायण, चौदा ओवी शते, स्फुट ओव्या, षड्रिपु, पंचीकरणयोग, चतुर्थमान, मानपंचक, पंचमान, स्फुटप्रकरणे, स्फुट, श्लोक स्फुट अभंग, (पूर्वारंभ, जुनाट पुरुष, अंतर्भाव, आतमाराम, पंचसमासी, सप्तसमासी, सगुणस्थान, निर्गुणध्यान, मानसपूजा, एकवीस समासी व जनस्वभाव, गोसावी अशी ) अकरा लघुकाव्ये व परिशिष्ट म्हणजे चतु:समासी असेही समर्थांचे वाङ्मय आहे. लघुकाव्यातील "प्रपंच-वणवा पेटला । परमार्थ जाळूनि विझाला । तेथे रामदास जाळोनि गेला । धावणे करा कोण्ही ॥" ही ओवी वाचणाराला-ऐकणाराला अंतर्मुख बनवते. समर्थांची पदपदांतरे संगीतप्रवीणाला अमृतरस आहेत. रागदारीतील "कल्याण करी राम-राया" हे समर्थांचे पद राष्ट्रगीताइतक्या योग्यतेचे आहे–

"आधी केले, मग सांगितले ।" हे समर्थांचे ब्रीदच असल्याकारणाने, त्यांच्या ऐहिकजीवनातील शिकवणीने महाराष्ट्रातील तयार झालेल्या मनोवृत्तीने शिवछत्र-पतींचे स्वराज्य साकार झाले. छत्रपतीना राज्याभिषेक झाल्यानंतर समर्थांनी आपला आनंद "आनंदवनभुवन" गीतात प्रगट केला आहे. कारण ऐहिक शिकवणीतील समर्थांचे एक स्वप्न साकार झाले होते. समर्थ म्हणतात–

## आनंदवनभूवनी

जन्मदु:खे, जरादु:खे । नित्य दु:खे पुन:पुन्हा ।
संसार त्यागणे जाणे । आनंदवनभूवनी ॥१॥
वेधले चित जाणावे । रामवेधीं निरंतरी ।
रागे हो, वीतरागे हो । आनंदवनभूवनी ॥२॥
संसार वोढिता दु:खे । ज्याचे त्यासीच ठाउके ।
परंतु एकदा जावे । आनंदवनभूवनी ॥३॥
न सोसे दु:ख ते होते । दु:ख शोक परोपरी ।
येकाकी येकदा जावे । आनंदवनभूवनी ॥४॥
कष्टलो, कष्टलो, देवा । पुरे संसार जाहला ।
देहत्यागास येणे हो । आनंदवनभूवनी ॥५॥
जन्म ते सोसिले मोठे । अपाय बहुता परी ।
उपाय धाडिले देवे । आनंदवनभूवनी ॥६॥
स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।
हिंडता फिरता गेलो । आनंदवनभूवनी ॥७॥
हे साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ ऊठिले ।
विघ्नघ्ना प्रार्थिता गेलो । आनंदवनभूवनी ॥८॥

स्वधर्माआड जे विघ्ने । ते ते सर्वत्र ऊठिली ।
लाटिली, कुटिली देवे । दापिली कापिली बहू ॥९॥
विघ्नाच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला ।
घर्डिली, चिर्डिली रागे । रड्विली, बड्विली बळे ॥१०॥
हाकिली टाकिली तेणे । आनंदवनभूवनी ।
हाक बोंब बहू जाली । पुढे खत्तल्ड मांडले ॥११॥
खौळले लोक देवांचे । मुख्य देवचि ऊठिला ।
कळेना काय रे होते । आनंदवनभूवनी ॥१२॥
स्वर्गीची लोटली जेथे । रामगंगा महानदी ।
तीर्थासी तुळणा नाही । आनंदवनभूवनी ॥१३॥
ग्रंथी जे वर्णिले मागे । गुप्तगंगा महानदी ।
जळांत रोकडे प्राणी । आनंदवनभूवनी ॥१४॥
सकळ देवांचिये साक्षी । गुप्त उदंड भूवने ।
सौख्यासि पावणे जाणे । आनंदवनभूवनी ॥१५॥
त्रैलोक्य चालिले तेथे । देव-गंधर्व-मानवी ।
ऋषी, मुनी, महायोगी । आनंदवनभूवनी ॥१६॥
आक्रा, आक्रा बहु आक्रा । काये आक्रा कळेचि ना ।
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवनभूवनी ॥१७॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंद-विमोचने ।
मोहीम मांडली मोठी । आनंदवनभूवनी ॥१८॥
सुरेश उठिला आंगे । सुरसेना परोपरी ।
विकटे कर्कशे याने । शस्त्रपाणी महाबळी ॥१९॥
देव-देव बहु देव । नाना देव परोपरी ।
दाटणी जाहली मोठी । आनंदवनभूवनी ॥२०॥
दिक्पती चालले सर्वे । नाना सेना परोपरी ।
वेष्टीत चालले सकळै । आनंदवनभूवनी ॥२१॥
मंगळे वाजती वाद्ये । महागणा-समागणे ।
आरंभी चालला पुढे । आनंदवनभूवनी ॥२२॥
राशभे राखिली मागे । तेणे रागेचि चालिला ।
सर्वत्र पाठिशी फौजा । आनंदवनभूवनी ॥२३॥
अनेक वाजती वाद्ये । ध्वनीं कल्लोळ उठिला ।
छबिने डोलती ढाला । आनंदवनभूवनी ॥२४॥
विजई दीस जो आहे । ते दिसी व्यर्थ ऊठिती ।
अनर्थ मांडला मोठा । आनंदवनभूवनी ॥२५॥

देवची सुष्टला होता । त्याचे भक्तीस भूलला ।
सांगुतां क्षोभला दुःखे । आनंदवनभूवनी ॥२६॥
कल्पांत मांडला मोठा । म्लेंछ दैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभूवनी ॥२७॥
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनी ॥२८॥
पूर्वी जे मारिले होते । तेचि आता बळावले ।
कोपला देव देवांचा । आनंदवनभूवनी ॥२९॥
त्रैलोक्य गांजिले मागे । विवेकी ठाऊके जना ।
कैपक्ष घेतला रामे । आनंदवनभूवनी ॥३०॥
भीमचि धाडिला देवे । वैभवे धाव घेतली ।
लांगूळ चालिले पुढे । आनंदवनभूवनी ॥३१॥
येथूनि वाढिला धर्मू । रमाधर्म समागमे ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभूवनी ॥३२॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंछसंहार जाहला ।
मोडिली मांडिली क्षेत्रे । आनंदवनभूवनी ॥३३॥
बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
ताडिले, पाडिले देवे । आनंदवनभूवनी ॥३४॥
गळाले, पळाले, मेले । जाले देशधडी पुढे ।
निर्मळ जाहली पृथिवी । आनंदवनभूवनी ॥३५॥
उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया ।
जप-तप-अनुष्ठाने । आनंदवनभूवनी ॥३६॥
नाना तपे, पुरश्चरणे । नाना धर्म परोपरी ।
गाजली भक्ति हे मोठी । आनंदवनभूवनी ॥३७॥
लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला ।
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभूवनी ॥३८॥
बंड पाषांड उडाले । शुद्ध अध्यात्म वाढले ।
राम कर्ता, राम भोक्ता । आनंदवनभूवनी ॥३९॥
देवालये दीपमाळा । रंगमाळा बहुविधा ।
पूजिला देव देवांचा । आनंदवनभूवनी ॥४०॥
रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि ऊठिली ।
मर्दिले पूर्विचे पापी । आनंदवनभूवनी ॥४१॥
प्रत्येक्ष चालिली राया । मूळमाया समागमे
नष्ट-चांडाळ ते खाया । आनंदवनभूवनी ॥४२॥
भक्तासि रक्षिलें मागे । आताही रक्षिते पहा ।
भक्तासि दीधले सर्वे । आनंदवनभूवनी ॥४३॥

आरोग्य जाहली काया । वैभवे सांडिली सीमा ।
सारसर्वस्व देवांचे । आनंदवनभूवनी ॥४४॥
देव सर्वस्वि भक्तांचा । देव, भक्त, दुजे नसे ।
संदेह तुटला मोठा । आनंदवनभूवनी ॥४५॥
देव-भक्त एक जाले । मिळाले जीव सर्वही ।
संतोष पावले तेणे । आनंदवनभूवनी ॥४६॥
सामर्थ्ये येशकीर्तीची । प्रतापे सांडिली सीमा ।
सारसर्वस्व देवाचे । आनंदवनभूवनी ॥४७॥
राम कर्ता, राम भोक्ता । रामराज्य भूमंडळी ।
सर्वस्वे मीच देवाचा । माझा देव कसा म्हणो ? ॥४८॥
हेचि शोधोनि पाहावे । राहावे निश्चली सदा ।
सार्थक श्रवणे होते । आनंदवनभूवनी ॥४९॥
वेदशास्त्र-धर्म-चर्चा । पुराणे महात्म्ये किती ।
कवित्वे नूतने जीर्णे । आनंदवनभूवनी ॥५०॥
गीत-संगीत-सामर्थ्ये । वाद्य-कल्लोळ ऊठिला ।
मिळाले सर्व अर्थार्थी । आनंदवनभूवनी ॥५१॥
वेद तो मंद जाणावा । सिद्ध आनंदभूवनी ।
आतूल महिमा तेथे । आनंदवनभूवनी ॥५२॥
मनासी प्रचिती आली । शब्दी विश्वास वाटला ।
कामना पुरती सर्वे । आनंदवनभूवनी ॥५३॥
येथूनि वाचती सर्वै । ते ते सर्वत्र देखती ।
सामर्थ्य काय बोलावे ? । आनंदवनभूवनी ॥५४॥
उदंड ठेविली नामे । आपस्तुतिच मांडली ।
ऐसे हे बोलणे नाही । आनंदवनभूवनी ॥५५॥
बोलणे वाऊगे होते । चालणे पाहिजे बरे ।
पुढे घडेल ते सारे । आनंदवनभूवनी ॥५६॥
स्मरले लिहिले आहे । बोलता चालता हरि ।
काय होईल पाहावे । आनंदवनभूवनी ॥५७॥
महिमा तो वर्णवेना । विशेष बहुतापरी ।
विद्यापीठ ते आहे । आनंदवनभूवनी ॥५८॥
सर्व सद्या, कळा, विद्या । न भूतो न भविष्यति ।
वैराग्य जाहले सर्वै । आनंदवनभूवनी ॥५९॥

पारमार्थिकदृष्टचा आपल्या शिकवणीची परिणती कशी व्हावयास पाहिजे हे समर्थांनी आपला पट्टशिष्य कल्याण यासच उघड सांगितले आहे. कारण "अनुभवाच्या खुणा, अनुभवीच जाणती ॥" अशी तेथे अवस्था असते.

## सोलीव सुख

जयजयाजी सद्गुरुवर्या । पूर्णब्रह्म प्रतापसूर्या । तुज नमोजी आचार्या करुणासिंधो ॥१॥ जे भवसमुद्री पोळले । विषयमदे अंध जाहले । चौऱ्याशींत वाहू लागले । मार्ग सुचेना तयासी ॥२॥ ऐसे विश्व बहुत बुडाले । मी जीव म्हणोनी धावू लागले । मुळीचे स्मरण विसरले । मी कोण ऐसे ॥३॥ तयासी मुक्त करावया पूर्ण । तू बा उतरलासी ज्ञानघन । रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिशी ॥४॥ ऐसे औदार्य तुझे सघन । ह्मणोनि आलो मी शरण । दयार्णवा कृपा करुन । मज दातारे तारावे ॥५॥ आपण आपणा ते पावे । ऐसे माझे मनी बोलावे । ते दातारे गोचर करावे । रोकडे ब्रह्म ॥६॥ ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचे भरते आले स्वामीलागोनी । आसन सांडोनिया तयेक्षणी । कडकडोनि भेटले ॥७॥ रे बाळका, ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर । माझे कंठी बैसला साचार । बरे घेई निष्ठा-वस्तु ॥८॥ मग स्नेहाळे नवल केले । वोसंगाशी शिष्या घेतले । अर्ध मात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्री ॥९॥ खडतर औषधी दिव्य रसायन । नयनी झोंबले जाऊन । डोळियाचा डोळा फोडुन । चित्सूर्य भेदिले ॥१०॥ पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला । त्रिकुट श्रीहाट चुराडा केला । सेवी भरला गगनगर्भी ॥११॥ उग्र तेज लखलखाट । तेथे जाला चौदेहाचा आट । भ्रांति पडली वळकट । तेव्हा बाळ निचेष्टित पडे ॥१२॥ ऐसे पाहोनी

---

[ **सोलीव-सुख-टीपा-** ( ओवी अंकापुढे शब्दार्थ विवरला आहे )

२) चौऱ्याशी = चौऱ्यायशी लक्ष योनींच्या महापुरात.

३) विश्व = असंख्य जीव.

६) आपण आपणाते पावे = मी आपले निजरूप पावावे.
बोलावे = विचारावयाचे आहे.
गोचर = प्रत्यक्ष.

७) ज्ञानाचे = योगज्ञानाचे

८) वाग्दोर = लगाम (प्रश्नरूप)

९) वोसंगासी = मांडीवर
अर्धमात्रा = अ, उ म् या तीन मात्रांचा जो ओंकार म्हणजे प्रणवाचे सार, म्हणजेच महाकारण

१०) कानात ओतलेले ( औषध ) ते दिव्य रसायन त्याच्या नेत्रात उतरले व त्याला दिव्य दृष्टि आली व सूर्याच्या द्वारे वरील आकाशात भेद करू लागली

११) त्या दिव्याकाशात सोहंचा उदय होऊन त्याच्या जीवरूप अंशाने सर्व विराट प्रकाशित झाले व त्रिकूट आणि श्रीहाट हे नाहीसे होऊन सोऽहं सर्वत्र दिसू लागले.

१२) स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चारही देह विरून गेले व देहभान विवर्जित होऊन शिष्य स्वरूपस्थितीत लीन झाला.

सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकी ठेवित । वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुले ॥१३॥ जागृत करोनी ते वेळी । अजपाची दोरी देऊनी जवळी । विहंगम–डोल्हारी तयेवेळी । अलक्ष्यलक्षी बैसविले ॥१४॥ धैर्याचे आसन बळकट । आणि इंद्रिये ओढूनि सघट । धरे ऊर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदी लक्ष लावी ॥१५॥ पुढे करूनिया जाणिव । मागे सारोनि नेणिव । जे जे जाणिव अभिनव । ते तू नव्हेसी तत्त्वता ॥१६॥ तैं मार्गाची करू नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी । दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहत कोल्हाळ ॥१७॥ आता अग्री लक्ष लावी । काय दिसेल ते न्याहाळी । चंद्रज्योति प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ॥१८॥ ते सुख अंतरीं घेउनी । पुढे चाल करी संगमी । तेथे विजु ऐसा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥१९॥ तेही जाणोनि मागे सारी । पुढे सूर्यबिंब अवधारी ॥ ज्वाळा निघती परोपरी । डंडळु नको कल्पान्तीं ॥२०॥ वायोमुख करोनि तेथे । गिळी वेगे सूर्यकिरणाते । मग देखसी आनंदमार्तंडाते । तेजोमय मम पुत्रा ॥२१॥ अनंतभानु–तेज अद्‌भुत । खदिरांगार ज्वाळा उसळत । धारिष्ट तेथे न निभत । दुर्घट व्यूह तेथीचा ॥२२॥ तेथे हुशारीचे काम । अग्री लक्ष लावोनि नेम । तीरे लावोनि सुगम । मागे सारी सूर्याते ॥२३॥ पुढे दिसेल जे नवल । ते पाही हंसमेळ ।

---

१३) सावध = याच स्वरूपानंदी सावध होऊन रममाण हो.

१४) जागृत = देहभानावर आणून
अजपाची दोरी = स्वरूपानुसंधान बळकट ठेवून.
अलक्ष्यलक्षी = विहंगममार्गाने नेऊन अलक्ष्याच्या पलिकडचे निर्वाण स्वरूपच त्याला करून सोडले.

१५) सघट = इंद्रियाचा पूर्ण संयम करून जो ऊर्ध्वसत्यपथ त्या मार्गाने जाऊन स्वरूपी स्थिर रहा असे सांगितले.

१७) तिसरी = घंटा, मृदुकिंकिणी व तिसरा अनुहत असे नाद त्याला दाखविले.

१८) चंद्रज्योति = वरच्या बाजूस लक्ष लावून पाहता चंद्र चमकला व ब्रह्मसर्गाचा सारा व्यूह उभारला.

१९) सुख = ते सुख अंतरी दृढ धरून व स्वरूपानुसंधान कायम ठेवून हळहळू वर प्रवेश कर म्हणजे सुवर्णवर्णाच्या अनंत विजा चमकल्यासारखे होईल.

२०) पुढे = पुढे सूर्यबिंब दिसायला लागून त्याच्या चहूकडून ज्वाला पसरतील पण तू यावर ढळू नकोस, त्यात गुरफटून राहू नकोस.

२१) जो ऊर्ध्वमुख झालेला श्वास त्या ठिकाणी काकीमुखातून वर नेऊन सभोवार पसरलेली सूर्यकिरणे नाहीशी करून टाक म्हणजे आनंदसूर्यच सर्वत्र भरून राहील.

२२) अनंत = अनंत सूर्याचे व अनंत अग्नीचे तेज दिसू लागेल.

२३) अग्रीलक्ष = मूळचे स्वरूपधारणेचे निशाण चांगले धर व तो सूर्यही मागे टाक.

चंद्रकिरण शीतल । पाहसीं तू मम वत्सा ॥२४॥ तेव्हा मागील दाह समेत्र शीतळाई सर्वांग होईल । चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणे ॥२५॥ तेचि डोळियाचा डोळा पाही । देहातीत वर्म विदेही । चिन्मय सुखाची नवाई । भोगी आपुले की गा ॥२६॥ अनुभवाची शीण भरली । आग्रापरीं उसळली । भूमंडळी प्रभा पडलीं । कर्पूरवर्ण नभ जाले ॥२७॥ तया मध्यभागी सघन । अढळपद दैदिप्यमान । उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ॥२८॥ ते तुझे स्वरूप नेटेवोटे । जेथे समस्त जाणणे आटे । ऐके जालासी घिटे । बळकटपणे बलाढ्य ॥२९॥ ऐसे सुख योगिया लाधले । तेव्हा देहाचे मरण गेले । सांगणें ऐकणे मुराले । एकत्वपणे एकचि ॥३०॥ शांती येवोनि माळ घाली । अलक्ष्यसेजे निजेली । हंसपदे ऐक्य जाली । सुख सुखाते निमग्न ॥३१॥ तेथील अनुभव घेउनी । स्वानुभव पाहे कलटुनी । आला मार्ग ते क्षणी । दिसेनासा जाला की ॥३२॥ त्रिकूट श्रीहार गोल्हाट । बुडाले ते औटपीठ । इडा-पिंगळा-सुषुम्नातट । विराले ते स्वात्मसुखे ॥३३॥ स्थूळ सूक्ष्म कारण । नेणों काय जाले महाकारण । इंद्रिये चुबकली जाण । धाव मोडली तयांची ॥३४॥ पंचभूतांचे खवले । तयांचे ठावचि पुसले । अपरिमित आनंदले । निमग्न जाले सुरवात ॥३५॥ सखोल भूमि ऐसे जाले । सुख सुखासी

---

२४) पुढे = सत्यस्वरूप परमात्मा पाहशील व त्याचा चंद्राप्रमाणे प्रकाश पसरेल.

२५) चंद्राची प्रभा = तूही चंद्राप्रमाणे कांतियुक्त होशील.

२६) डोळा = तोच डोळ्याचा डोळा होय.
देहातीत वर्म = तोच देहातीत परमात्मा.
चिन्मय सुख = तोच तू होऊन त्याच्या अपरिमित सुखाचा भोग घे.

२७) अनुभवाची शीग = त्याचा स्वानुभव प्रकाश सर्वत्र व्यापून राहिला व आकाश श्वेतवर्ण झाले.

२८) सघन = त्याच्या मध्यभागी घनदाट अढळ परमात्मा, सर्व ब्रह्मांडाच्याही पलिकडचा आहे.

२९) जाणणे आहे = ते तुझे शुद्ध स्वरूप आहे. तेथ सर्व ज्ञानाची आटणी होते.

३०) सुख योगिया = हे पूर्ण सुख योग्यानाच आकळते.

३१) शांती माळ घाली = अखंड आत्मतृप्ती.
अलक्ष्य सेजे निजेली = तिने अलक्ष्य सेजेवर वरिले.
हंसपदे ऐक्य जाली = त्या स्वरूपानुभवात शांतीचे व तुझे लग्न लागून तू तिशी समरसता पावलास.

३३) त्रिकूट = येथवर येताना त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, इडा, पिंगळा, शुषुम्ना ' जे जे काही वाटेत लागेल ते ते सर्व स्वात्मसुखाच्या मूळपदी आल्यावर मागे राहिले, नाहीसे झाले.

भेटले । स्वये आत्मत्व प्रगटले । माझे देही रोकडे ॥३६॥ मग सहज समाधि जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन । हे सद्गुरुचे देणे (वरदान) । काय उत्तीर्ण म्या व्हावे ? ॥३७॥ जरी स्तुती तयाची करावी । माझी मती नाही बरवी । अनिर्वाच्य गती बोलावी । परा वाचा कुंठित ॥३८॥ आता जी मी लिडवाळपणे । तुमचे कृपेने करितो स्तवन । सूर्यापुढे खद्योत जाण । तैशापरी बोल हे ॥३९॥ जयजयाजी करुणासिंधु । जयजयाजी भवरोग-वैद्य । जयजयाजी बाळबोधु । कृपाघना समर्था ॥४०॥ जयजयाजी अविनाशा । जयजयाजी परेशा । जयजयाजी अध्यक्षा । दयार्णवा ॥४१॥ जयजयाजी पूर्णचंद्रा । जयजयाजी अलक्ष्यविहारा । जयजयाजी भवसिंधुभास्करा । आनंदप्रभु ॥४२॥ तुझी स्तुती करिता सांग । वेदस्तुती जाले अव्यंग । तेथे प्राकृत मी काग । वर्णावया योग्य नव्हे ॥४३॥ कल्याण म्हणे जी रामदासा । माझा मुकेपणाचा ठसा । ते मोडोनि वसोसा । मज आपणाऐसे केले ॥४४॥ ऐकोनि मृदुवचन । कुरवाळले तया लागून । गुरुशिष्य हे बोलणे । उरले नाही ते वेळी ॥४५॥ एकपणे एकचि जाले । ऐक्यरूपी सम मिळाले । करूनिया सुख उसळले । नाहीपण जाऊनी ॥४६॥ सुगरिणीचा पाक जाहला । नभाभाजनी वाढिला । अक्षयपदी सुगरावला । संत जेवती स्वानंदे ॥४७॥ अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले । सिद्ध तरी डोलो लागले । बद्ध मुमुक्षु होताती ॥४८॥ यापरते आन नाही बोलणे । श्रीराम दाशरथीची आण । एकपत्नी तो सुजाण । आपुले पद दे दासा ॥४९॥ इति श्रीदासबोध-ग्रंथ । त्यातील हा सोलीव अर्थ । श्रोते ऐकता यथार्थ । समाधिस्थ होती ॥५०॥

समर्थांनी हे छोटेसे योगानुभवाचे प्रकरण श्रीकल्याणस्वामीसाठी तयार केले. ओ. ४४, ४९, ५० यावरून ते स्पष्ट आहे. "इति श्री दासबोध-ग्रंथ । त्यातील हा सोलीव अर्थ ॥"

समर्थांनी याउप्परही आपल्या आत्मचरित्राबद्दलही निर्देश केला आहे तो असा "आत्माराम दासबोध । माझे स्वरुप स्वतः सिद्ध ।" प्रयत्न प्रचीति व प्रबोध या तीन शब्दात समर्थांच्या चरित्राचे व समर्थसाहित्याचे सार आहे. "नित्य नेमे विवरिता । स्वये ब्रम्हचि होय ॥" अशी श्री कल्याणस्वामींनी ग्रंथराजाची सप्रचीत महती वर्णन केली आहे. ते जनसामान्याच्या अनुभवास यावयाचे तर पक्के लक्ष्यात ठेवले पाहिजे की–

"१) ईश्वराचे सर्वत्र अस्तित्व मानून तो आपली कर्मे पहात आहे असे मानणे २) संपूर्ण जनतेच्या सुखामध्ये व्यक्तीचे सुख आहे हे समजून चुकणे

---

३६) सखोल भूमिके = त्या अफाट स्वात्मसुखाच्या भूमिकेवर.

४३) काग = कावळा

४४) वसोसा = श्रम.

४७) सुगरावला = एका परमात्मसुखानेच रसाळ झाला. ]

३) गरजवंतास दान करून अवशिष्ट राहील त्याचा स्वतः भोग घेणे ४) लोभ न धरणे ५) सर्व धन हे केवळ आपलेच नव्हे तर सर्व प्रजेचे आहे असे धरून चालणे ६) सत्कर्मे करणे ७) दीर्घायुष्य प्राप्त होईल असे सदाचरण करणे ८) आत्मोन्नतीच्या मार्गावर दृढ विश्वास ठेवणे ९) ब्रह्मार्पण-बुद्धीने प्राप्त कर्तव्यें करण्यातच मोक्ष आहे, अशी खात्री असणे १०) सत्कर्म हे केव्हाही भवबंधनकारक नसते हा विश्वास बाळगणे" अशा मार्गाने जीवन काढणाराच समर्थपणे जीवन जगू शकतो. कारण कोणताही समाज विचाराने चालेल तर जगात अनीतीला कोठेही थारा मिळणार नाही व आनंदीआनंद होईल. एक इंग्रजी वचन आहे की-" The world is a comedy to those who think and a tragedy to those who feel". याचा प्रत्यय घेण्यासाठी काय करावे? तर "संसार निःसार. सतसमागमाने हर्षशोक हा ठेवून दक्षतेने संसार करावा. संसारात कसे वागावे हे समजण्यासाठी दासबोधातील एक समास तरी रोज वाचीत जावे." – शंकर गोविंद कान्हेरे ऊर्फ श्रीसच्चिदानंद महाराज (१८६०-१९३४)

• • •

# संप्रदायाचे नित्य-नैमित्तिक

## "वर्तांया" ची सूत्र-चाळिशी

श्रीमच्छंकराचार्यांची धर्मकारणातील व लोकमान्य टिळकांची राजकारणातील चतु:सूत्री लोकमानसात एवढी ठसली आहे की समर्थ रामदासानीच जी प्रथम चतु:सूत्री सांगितली आहे, तेवढीच लोक सुटसुटितपणे मानीत असतात.

'पहिले ते हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ॥ १ ॥
चवथा अत्यंत साक्षेप ।'


समर्थसंप्रदाय एवढाच 'चार लक्षणी' नसून 'चाळीस-लक्षणी' आहे हे स्फुट ओव्या क्रमांक १४, स्फुट प्रकरण ३ रे आणि दासबोध द. ११ स. ५ या समर्थ रामदासांच्याच वाग्विलासावरून अभ्यासकाना पटल्याशिवाय रहात नाही.

५ 'फेडावे नाना आक्षेप' हे समर्थ-संप्रदायाचे पाचवे लक्षण आहे. कोणी काही शंका घेतल्या किंवा विचारल्या अगर संप्रदायातील समाजहितघातकी अगर समाजस्वास्थ्यासंबंधी उणीव दाखविली, तर त्या पृच्छकाचे व शंकेखोराचे समाधान होईल इतका आपला संप्रदाय शुद्ध असल्याचे सांप्रदायिकाला पटविता आले पाहिजे.

६ 'क्षमा सर्वदा ऐक्यरूपे करावी।' राजा असो वा रंक असो, त्याच्या वृत्तीतील चांगुलपणा तेवढा घेऊन व त्याच्याशी समरसपणे वागून त्याचे मत शांतपणे ऐकावे व मग त्याच्या प्रतिपादनात, वागण्यात अगर अन्यथा काही चूकवाक झाली असेल, घसर घडली असेल तर त्याला त्याची माफी करून, त्याला आपलासा करून सोडावा.

७ 'जाणावे पराचे अंतर।' दुसऱ्याचे मनीचे ओळखून त्याच्याशी वागावे. जनताजनार्दनाची हार्दिक सेवा हेच खरे व्यावहारिक भजन असे समर्थ मानीत.


भेटो कोणी एक नर । धेड, महार, चांभार ।
त्याचे राखावे अंतर । या नाव भजन ॥१॥




श्री. अरविंदशेठ प्रभु रामरायाचे दर्शन घेताना




चाफळ- नवराममंदिराचे भूमीपूजन




नवे राममंदीर चाफळ




जुने राममंदीर चाफळ



श्रीराममंदिराचे प्रवेशद्वार



शिवथरघळ– बाहेरील देखावा



सज्जनगड प्रवेशद्वार

दुःख नेदावे कोणाला । उंच नीच जरी झाला ।
अंतरात्मा वोळखिला । तोचि जाणा सज्जन ।।२।।

अशा सज्जनांचा गडच समर्थांना महाराष्ट्रात निर्माण करावयाचा होता. सज्जनगड ऊर्फ परस्परांच्या अंतःकरणांचा सहकार-समन्वय होऊन जी संघटना होते ती समाजस्वास्थ्याची 'बळकट काठी' ठरते. हे कार्य सोपे नाही. म्हणूनच 'राजी राखणे सकळ लोक कठीण आहे ।' तेव्हा समर्थांनी सुचविले आहे-

'राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।'

८ 'सदा रामदासी उदासीन व्हावा ।'

म्हणजे ज्याला रामदास्य करावयाचे आहे, त्याच्या मनाची व वृत्तीची बैठक उंच असावी लागते. 'कार्यकर्त्यांच्या गुणे कार्यभाग होतो ।' म्हणून कार्यकर्त्याने नेहमी आपले 'अधिष्ठान परमेश्वराचे ठेवावे ।' परमेश्वर जसा 'आहे तरी सर्वा-ठायी । पाहो जाता कोठेच नाही ।' असा असतो, तसेच कार्यकर्त्याने, रामदासाने असावे. आणि ते स्वतः लोकेषणेवर पाणी सोडूनच. मग त्याने पोटी आशा धरून प्रवचन, कीर्तन, व्याख्यान करू नये, हे काय सांगावयास पाहिजे ? 'वक्ता पाहिजे उदास । जयाचे बोलणे निराश । जयाचे हृदयी आस । तो वक्ता नव्हे ।।'

९ 'नीति-न्याय सांडो नये ।' हा माणुसकीचा धर्म होय. येथेच खरी सामाजिक समानता व्यवहारशुद्ध असते. परस्पर, व्यक्तिव्यक्तिमधील जिव्हाळा आणि आदर ज्यायोगे अखंड राहतो त्याला नीति म्हणतात. आणि कोणाच्याही तनसडी-पासून अन्नपर्यंत कशाचाही अपहार कोणाकडून होत नाही; आणि केलेल्या परि-श्रमाचा परिहार होऊन सुखासमाधानाने सेवेचा मुशाहिरा मिळत जातो, तेव्हा त्याला सामाजिक न्याय म्हणतात. रस्त्याच्या नियमापासून सर्व सभ्यता पाळण्यावर आणि समाजात ती पाळली जाते हे पाहण्यावर रामदासाने लक्ष्य ठेवले पाहिजे.

१० 'संकेते लोक वेधावा ।' खूण पटेल असे बोलून व वागून लोकांची मने आकर्षून घ्यावीत आणि मगच त्याना हितोपदेश करावा. 'आधी केले मग सांगि-तले ।' असा उपदेश लवकर आत्मसात् होतो. त्यातही ज्यास उपदेश द्यावयाचा त्याचा मगदूर किंवा पात्रतासिद्धी पहावीच लागते. 'अवघड होड घालू नये । काही केल्या ।।'

११ 'आधि प्रपंच करावा नेटका' म्हणजे जन्माला आल्यासारखे काल-परिस्थितिसापेक्ष जे कौटुंबिक वा सामाजिक अथवा वैयक्तिक जीवनासाठी आव-श्यक कर्तव्य असेल, ते लोकास जोम राहील अशा बेताने पार पाडावे. जीवन हा जर झगडा आहे, तर तेथे माघार वा बावळटपणा उपयोगीच नाही. आपल्या भोवतालचे जग व जमाना आहे तसाच कुरकूर न करता, जमेस धरून, आपले कर्तव्य धीटाईने विवेकशुद्ध करीत राहण्याने प्रपंच नेटका होत असतो. हे कर्तव्य पार पाडल्यावर मात्र 'परमार्थविवेक' पाहिला पाहिजे. 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण' त्यातून म्हणजे केल्या कर्तव्याच्या फलितातून कसे सिद्ध

होईल यावर लक्ष हवे. अशा वागण्यानेच म्हणज नेटका प्रपंच केल्यानेच, मुळात 'नासका असलेला' प्रपंच फिका होत जातो. 'हे प्रत्ययाचे बोलणे प्रत्ययेचि पहावे।' असे आहे. सुखदु:खाचे प्रसंग अवधानाने व धैर्याने पार पाडल्यानंतर 'अंतरी सार-विचार राहून' विश्वाची ( सर्वांची ) चिंता वाहिली असेल, तर प्रपंचात मनुष्य गुरफटत नाही व तो अनासक्ति-योग साधित राहतो.

१२ 'उपाधीसी विस्तारावे।' आपल्या आटोपासारखे खटाटोप करून रामदासाने आपल्या कार्याचा व्याप वाढवीत असावा, तो 'मनूच्या माशासारखा.' त्यातून अनेक मानसिक व शारीरिक उपाधि निर्माण होतात हे खरे; पण त्या निभावून नेण्याने व त्याचा परिणाम स्वत:वर होऊ द्यावयाचा नाही ही खबरदारी घेण्यानेच लोकसंग्रह वाढत जातो.

१३ 'सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः।' असे वचन प्रचलित आहे. त्यातील अनुभव लक्ष्यात घेऊन कार्यकर्त्या रामदासाने आपली वागणूक प्रथमपासूनच नम्र ठेवावी लागते. समाजात अकारण मत्सराला, कलहाला व आग्रहाला जागा होऊ नये म्हणून नि:स्पृहतेबरोबर विनम्रतेचीही आवश्यकता असते.

१४ 'दोष देखोन बोलो नये।' दुसऱ्याचे अवगुण, उणे अगर विपरीत वर्तन लक्ष्यात आले तरी ते 'नाना उपाये।' मुकाट्याने पण अचूकपणे सुधारीत जावे. त्यांची वाच्यता अगर त्याबद्दलचे वाक्ताडन करण्याच्या भानगडीत पडू नये. आणि ? त्या दोषाला वगळून जर दुसऱ्यांच्या गुणांचे चीज करता येत असेल तर ते कौशल्याने समाजकारणी करवून घ्यावे. त्यानेही ती दुसरी व्यक्ति उन्नत होत जाते.

१५ दुसऱ्याच्या दोषाचे दिग्दर्शन आईच्या वात्सल्याने सुचविता आल्यास सुचवावे पण त्यांचा सारखा पाढा वाचीत राहू नये. कारण त्याने माणसे 'अंतरीची तुटतात.'

१६ घराला जसा शौचकूप हा स्वच्छतेकरता घाणेरडा विषय असतो, तसाच समाजातही दुर्जन असतातच. त्याना

'सज्जनापरीस आळवावे। महत्त्व देउनी।'

म्हणजे ते समाजाला तापदायक होत नाहीत. शौचकूप देवघरापेक्षाही स्वच्छ ठेवण्याने रोगराईपासून परावृत्तिची जशी तरतूद होते, तसेच दुर्जनाशी वागणूक करताना त्याना 'उपकारानेच नमवावे' लागते. कारण 'परोपकार करीतचि गेला। पाहिजे तो ज्याला त्याला।' अपकारकर्त्यांसही उपकार करणे ही तपश्चर्या आहे. मात्र त्या उपकाराने आपल्यात पराभूतिची वृत्ति निर्माण झाली आहे, हे त्या दुर्जनास कधीही भासमानसुद्धा होता कामा नये, याबद्दल रामदासाने डोळ्यात तेल घालून जपलेच पाहिजे.

१७ एकच हट्ट घेऊ नये. 'हटनिग्रही पडो नये। विवेकी पुरुषे॥' निश्चत ध्येयावर अढळ नजर ठेवून, आपलाच मार्ग तेवढा बरोबर असा वावदूकपणा करू

नये. दुसऱ्यांच्याही युक्तिने ध्येय जवळ येत असेल व तीं स्वीकारण्यात आपली तत्त्वच्युति वा नीतिच्युति होत नसेल, तर त्या दुसऱ्यांच्या युक्तिलाही वाव देत जावा.

१८ कारण ध्येयनिश्चितिनंतर जलदीने पण पूर्ति टिकाऊ ठरेल अशा निश्चित पावलानी, अचूक वाटचाल करण्यास अनेक मार्ग वा उपाय सापडले तर त्यातील जास्तीत जास्त परिणामकारक ठरणाऱ्या कमीत कमी वेळाच्या मार्गांचा वा उपायांचा अवलंब चैतन्यकरच ठरतो.

१९ 'अघटित घडवावे।' आणि 'समाजाचे आणि राष्ट्राचे दुःख ते बीघडावे।' हे साध्य करताना, 'अचूक चुकेना कोठे। त्याची राज्ये समस्तही ।।' हे बिलकूल विसरून चालणार नाही. प्रयत्नान्ती परमेश्वर मिळतोच मिळतो.

२० 'मरहटा तेवढा मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा ।।' मेला तरच हटला, जिता तर जेता होईपर्यंत प्रयत्नशीलच राहिला, अशा वृत्तीची माणसे एकजूट राखण्यानेच मोठ्यात मोठा राष्ट्रधर्म सांभाळला जातो. 'फड नासोचि नेदावा।' अशा व्रताच्या राम-दासाला व लोकसेवकाला वरील संघटनकुशलता सहजच साध्य आहे.

२१ केव्हाही आणि कोणाशीही अतिवाद करू नये. दोन्ही अगर सारे पक्ष समंजस असले तर वाद तुटतोच तुटतो. 'तुटे वाद, संवाद तो हीतकारी।' पण एकपक्षीय अभिमान, मत्सर, द्वेष इत्यादि विकारानी ग्रासलेल्या मंडळींशी संवाद होणारच नाही व वादही तुटणार नाही. तेथे आपली बाजू समजावून देतानाही शब्दछल होतो व वितंडवादात त्याचे पर्यवसान होते. वितंडवाद खेदाला कारण होतो. कारण लोक 'आपलल्याल्या साभिमाने। मीपणे वाद घालिती ।।' त्यातून ध्येये भिन्न, कल्पना भिन्न असल्या की मग विचारावयासच नको! अंतरी भेद नसला, अद्वैत असले की वाद संभवत नाही. 'निशब्द शब्द खुंटला। वेवाद वाव तूटला।' म्हणून 'अनंत ब्रह्म ते असे। तयास पक्षही नसे। संत, संत संत रे। निवांत रे, निवांत रे। उदंड हो बरे बरे। तुम्ही म्हणाल ते खरे। कळेल ते सुखे करा। धराल ते सुखे धरा ।।' असे सांगून वाद सोडावा व आपल्या मार्गास रामदासाने लागावे, कार्यकर्त्याने चालावे.

२२ 'कल्याण करी देवराया। जनहित वितरी' हीच रामदासाची, लोकसेवकाची, कार्यकर्त्याची सदैव हार्दिक इच्छा असावी. 'चिंता वाहतो विश्वाची:' असे जर रामदासी ब्रीद, तर पालकाच्या वात्सल्याने कोणाचे कधीतरी वाईट चिंतिता येणे शक्य तरी आहे काय?

२३ पण विश्वाची चिंता करणे म्हणजे सद्विचार प्रवर्तन नव्हे. लोककल्याण 'केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे ।।' तसे करताना खस्ता खाव्या लागतात, नीच बोलणे सोसावे लागते. 'झिजल्यावाचूनि कीर्ती कैची?। मान्यता नव्हे की फुकाची ।।' या पाऊल–टाकीतून लोक–वत्सलता निर्माण होत असते.

२४ 'उदंड बाजारी मिळवण्यापेक्षा' आपल्या जीवित-कार्यास उपयोगी पडणारे कणखर समूह मिळवण्यासाठी 'लोकांचे चालीने चालावे । लोकांचे बोलीने बोलावे ॥' व 'आपणासी जे जे काही ठावे । ते हळूहळू ( म्हणजे मानत मानत ) शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥' तसे करताना 'बरे वाईट सोसावे समुदायाचे ॥' लागणारच लागणार.

२५ पण ते सोसावे लागणारे तारतम्यानेच सोसले पाहिजे 'आपला मगज राखूनच' ते सोसले तर निभावते. अन्यथा त्याला लाचारींचे वा मूर्खत्वाचे स्वरूप येते.

२६ दुसऱ्याचे दुःखी दुखावे । दुसऱ्याचे सुखी सुखावे ॥ लोकांच्या सुख-दुःखाचे वाटेकरी होण्यात सहानुभुतीचे व त्यातूनच सहकार-संघटनेचे धागे निर्माण होतात.

२७ रामदासाचे, लोकसेवकाचे, कार्यकर्त्याचे पाठांतर खूप असावे. रामदासाने व्युत्पन्न असण्यावर समर्थांचा भर होता. एरवी तो लोकांचे आक्षेप कसे फेडू शकणार? म्हणूनच समर्थांनी सांगितले आहे की 'अर्थेवीण पाठ कासया करावे? वेथं का मरावे घोकुनिया ? ॥१॥ होऊनिया अर्थ सार्थक करावे । रामदास भावे सांगतसे ॥२॥'

२८ 'विचारूनी बोले, विवंचून चाले ।
तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥'

विचार करून शब्द उच्चारावा व मागचा-पुढचा तरतम भाव नि परिणाम हेरून पावले टाकावीत ती अशी की त्यांच्यायोगे त्रास झालेले, पोळलेले, रागावलेले असतील त्याना समाधानच समाधान लाभावे. त्यासाठी 'बोलला शब्द चाटणार नाही, लिहिला शब्द खुडणार नाही, टाकले पाऊल माघारी घेणार नाही' अशा प्रतिज्ञेचा अभ्यास करणे व तो अंगवळणी पाडून घेणे जरूर असते.

२९ रामदासाने, लोकसेवकाने, कार्यकर्त्याने आपले मन शांत ठेवून दुसऱ्या-सही तसे ठेवण्याची दीक्षा दिली पाहिजे व वळण लावले पाहिजे. 'सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ॥' हे लक्षात ठेवले पाहिजे.

३० निराग्रहवृत्ति लोकसेवकात आढळली की लोकही त्याचेशी जुळते घेण्यास चुकत नाहीत.

'जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हा मजालसी थाटे ॥'

हे जितके खरे तसेच आपण जी वागणूक लोकापासून अपेक्षितो, तशीच त्याना आपणही दिली पाहिजे, हेही खरे आहेच.

३१ 'रिकामा जाऊ ना दे क्षण ।' असे व्रत रामदासाने, लोकसेवकाने आचार-शुद्ध ठेवावे म्हणजे प्रवचनापेक्षा पदप्रमाण लोकाना सापडते व ते उदाहरण गिरवून 'प्रपंच-व्यवसायाचे ज्ञान बरे पाहे ।' या पातळीवर तरी ते येतात.

३२ समाजात दुर्जनांचा माज फारच वाढला, तर त्यांना लक्ष्यात रहाण्या-सारखा धडाही द्यावा लागतो, तेव्हा तो उपायाच्या ऐवजी अपाय मानून चूक धरण्याचाही संभव असतो. विशेषतः राजकारणाच्या आखाड्यात असे प्रसंग आल्याशिवाय रहात नाहीत. पण दुर्जनास धडा देण्यासाठी अपार अपाय ठरण्या-इतकी शिक्षा लावण्याची वेळ आलीच तर ती शिक्षा किंवा अपाय अगाऊ वा अगोदर बोलून करूच नये; परभारेच त्याच्या प्रत्ययास आणावा.

'काटीने काटी झाडावी। झाडावी परि कळोची नेडावी ।।' यात कुशलता आहे.

३३ 'उदंड राजकारण करावे । परी गुप्तरूपे।।'

कोणत्याही देशाचे शासनकर्तेच त्या देशाच्या सुखदुःखास, स्वास्थ्यास्वास्थ्यास कारण असतात. तेव्हा त्याना ताळ्यावर आणण्याचे, ठेवण्याचे किंवा असल्याचे पहावे, ते त्याची जाहीर नामुष्की न होता, न करताच त्या शासकाच्या धोरणात व प्रथा-प्रणाली-प्रयत्नात समाजाला हितकारक असा बदल घडवून आणण्याची पराकाष्टा रामसेवकाने, लोकसेवकाने, कार्यकर्त्याने केली पाहिजे.

३४ 'भिक्षामिषे लहानथोरे परीक्षून सोडावी ।' आणि 'बये थोर ते चोर होऊनि गेले ।' असतील त्यातील ताठराना नमवावे पण गमवू नये.

३५ समाजात हिरवट माणसेही कमी नसतात. त्याच्यांशी 'संपर्क पडू देऊ नये' कचरट माणसाशी तर बोलूसुद्धा नये. त्यातून त्याना टाळताच येणे अवघड वा अशक्य झाले तर मौन धरावे. 'वेडे होऊन बैसावे।' आणि शक्य तर त्यांच्याकडूनच बगळले जावे. राजकारणाच्या क्षेत्रात तर हे सत्व निष्ठापूर्वक सांभाळावे लागते.

३६ 'अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।' हे पथ्य राजकारणात आणि धर्मकारणात कसोशीने पाळल्याशिवाय भागतच नाही. नाही तर केव्हा 'अर्थी विपर्यास' होईल आणि मामला गळ्यात येईल, याचा नियम सांगता येत नाही.

३७ 'धीर्धरा, धीर्धरा, तकवा, हड्बडू गड्बडू नका' हे समाजाला नेहमीच सांगून, 'समयासारखा समयो ये ना ।' म्हणून त्याचा फायदा केव्हा, कसा व कितपत उठवावयाचा, आणि काही झाले तरी जीवन विशेषतः सामाजिक जीवन सातत्याने प्रगत ठेवावयाचे, यावर रामदासाचे, लोकसेवकाचे, कार्यकर्त्याचे अखंड लक्ष हवे. 'जनांचा प्रवाहो चालला म्हणजे बरे । तुंबता नये' ही दक्षता हवी.

३८ लोकसेवेची अशी तपश्चर्या करणारा कार्यकर्ता 'लोकास वाटे हवा हवासा।' परी हुडकू जाता 'गवसेनासा होतो.' पण ऐन प्रसंगी येऊन तोच लोकांची अडणूक व अडवणूक दूर करीत असतो. तोच अखंड कीर्ति करून जातो. त्यायोगे लोकांना 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।' याचा कित्ता मिळत राहतो.

३९ रामदासाने लोकात वागण्याच्या 'चातुर्याच्या वाटा' चोखाळून ठेवल्याच पाहिजेत. त्याच प्रसंगानुसार व कार्यपूर्तिच्या उचितपणास अनुसरून कार्यकर्त्या-कडून होणाऱ्या जगदुद्धाराला उपयुक्त होत.

४० समाजात काही 'अढणीवरचे शंख' व 'पालथे घडे' भेटतातच. त्यांना डोक्यावर घ्यावयाचे कारण नसले तरी तिरस्काराच्या गर्तेत फेकून देऊ नये. त्यांचा उपयोग बुद्धिबळातील प्याद्याइतकाच फारतर करावा.

हे सगळे व्याप करताना जो उद्योग करावयाचा तो 'अत्यंत साक्षेप' म्हणजे हाती घेतलेल्या कामात जीव ओतून केलेला उद्योग असला पाहिजे. कर्तव्यकर्मात मग्न होऊन ते पार पाडल्याशिवाय, ते सोळा आणे चोख होणारच नाही. हा अत्यंत साक्षेप 'तिसरे ते सावधपण सर्व विषयी ।' राखूनच करावयास हवा. म्हणजे काळ–काम वेगाचे गणित सांभाळून जसे कर्तव्य करावयास हवे, तसेच 'उणे पडु देउ नये कोणी एकाचें ।' म्हणजे आपल्या कार्यातील सहकाऱ्यांचे व कार्याच्या भागविभागाचे देखील! भगवान् श्रीकृष्णानी 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।' सांगितले आहे, तसेच आपल्या आपल्या कार्याचा प्रत्येक बारीक–सारीक भागही परिश्रम आणि कौशल्य ओतून असा केला पाहिजे की आपले सगळे कार्य चोहोबाजूनी वर्णन करण्यासारखेच असल्याचे लोकप्रत्ययाला आले पाहिजे. राज्यकर्त्यांच्या ऊर्फ शासनाच्या धोरणाचे व प्रथाचे परिणाम लोकजीवनावर होऊन 'कालस्य कारणम्' होत असते, हे लक्षात वागवून चाललेल्या राजकारणा–तूनही आपल्या ध्येयाची वाटचाल अनिर्बंध, सुखरूप, निदान सरळसूत कशी होईल, इकडेही रामदासाने किंवा लोकसेवकाने जागरूक लक्ष ठेवले पाहिजे. आणि सर्वातून प्रामुख्याने साधले पाहिजे ते 'हरिकथा–निरूपण ।' हरि म्हणजे वारा किंवा मारुति यांच्या सारखा सर्वत्र निर्भय संचार करून, 'दरी–कंदरी टाप मारोनि जातो' अशा घोड्याप्रमाणे संकटावर तर मात केलीच पाहिजे. पण त्याचबरोबर 'असो काळ, दुष्काळ, खाई तृणा न ।' असा सिंहाच्या बाणेदारपणाचा पीळ सांभाळूनच सगळ्या गोष्टी झाल्या पाहिजेत व तशाच गोष्टीचा उपदेश निरक्षेप बुद्धीने व समर्पित सेवाबुद्धीने समाजास झाला पाहिजे.

रामोपासक होणाराना जी पथ्ये-तथ्ये कटाक्षाने पाळावी लागतात याचे हे समर्थ रामदासस्वामीनी स्वाचरणाने प्रवर्तित केलेल्या समर्थ–संप्रदायातील विहंगमावलोकन आहे. या सूत्रचाळिशीतून न्यहाळून न्यहाळून स्वत: मर्यादापुरुषोत्तम व्हावयाचे आणि समाजाचे नेतृत्व करूनही समाजाचा व राष्ट्राचा सेवायोग साधावयाचा आहे. चिरंतन समर्थ संप्रदायाची स्वत: समर्थ–रामदासानी केवळ वैचारिक भूमिकेतून आखणी करून ती व्यवहारशुद्धिसाठी स्वत:च्या हाती धरली नाही की समाजाच्या हाती दिली नाही. समाजाच्या सन्मुख होऊन विवेचक कर्तव्यबुद्धिने जीवनाच्या समस्या समर्थ रामदास सोडवित असता, त्याना व समाजाला प्रत्यय–प्रबोध झाला, त्यातूनच समर्थ–संप्रदाय उभा राहिला आणि कळिकाळावर मात करून यशस्वी ठरला. तो आस्थेने अनुसरल्यास सदैव काळावर मात करील व अमर सेवा करील.

## नामस्मरण-भक्ति

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ॥
नामस्मरणें पावावें । समाधान ॥१॥

नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ॥
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥२॥

सुखदुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ॥
नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥३॥

हर्षकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं ॥
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥४॥

कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट ॥
अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥५॥

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ॥
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥६॥

संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ॥
नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ॥७॥

वैभव सामर्थ्य आणि सत्ता । नाना पदार्थ चालतां ॥
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडू नये ॥८॥

नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ॥
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥९॥

बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृद्धापकाळीं ॥
सर्व काळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥१०॥

उफराटचा नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठीं ॥
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥११॥

हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला ॥
नारायणनामें पावन झाला । अजामेळ ॥१२॥

नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ॥
महापापी तेची जाले । परमपवित्र ॥१३॥

नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ॥
महांदोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥१४॥

चहूं वर्णी नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ॥
जड मूढ पैलपार । पावती नामें ॥१५॥

## ३ दासबोध पारायण

दररोज स्नानसंध्या, देवपूजा वगैरे केल्यावर श्रीदासबोधाचे निदान दोन समास, मनोबोधातील अकरा श्लोक आणि दोन करुणाष्टके म्हणावयाची. मनन-पूर्वक अर्थ लक्ष्यात घेऊन निदान दोन समास वाचण्यापूर्वी करावयाचे मंगला-चरण असे-

गणेशःशारदा चैव सद्‌गुरुः सज्जनस्तथा ।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ॥१॥
गणेश शारदा सद्‌गुरु । संत सज्जन कुळेश्वरु ।
सर्वही माझा रघुवीरु । सद्‌गुरु-रूपे ॥२॥
माझे आराध्य दैवत । परमगुह्य गुह्यातीत ।
गुह्यपणाची मात । न चले तेथे ॥३॥
योजातो मरुदंशजो क्षितितले संयोजयन् सज्जनान् ।
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वांतापहारिः सदा ।
सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः ॥४॥
शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।
कवी वाल्मिकासारखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा ॥५॥
मला वाटते अंतरी त्वा वसावे । तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावे ।
अपत्यापरी पावया प्रेमग्रासा । महाराजया सद्‌गुरो रामदासा ॥६॥

दररोजचे वाचन पुरे झाल्यावर श्रीदासबोधाच्या उपसंहारातील बारा ओव्या म्हणावयाच्या त्या अशा-

जाले साधनाचे फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुण ब्रह्म ते निश्चळ । अंतरी बिंबले ॥२०-१०-२६॥
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्त्वांचा ।
साध्य होता साधनांचा । ठाव नाही ॥२७॥
स्वप्नी जे जे देखिले । ते ते जागृतीस उडाले ।
सहजचि अनिर्वाच्य जाले । बोलता न ये ॥२८॥
ऐसे हे विवेके जाणावे । प्रत्यये खुणेसी बाणावे ।
जन्म-मृत्यूच्या नावे । शून्याकार ॥२९॥
भक्ताचेनि साभिमाने । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थ कृपेची ही वचने । तो हा दासबोध ॥३०॥
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारे केला शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥३१॥

वीस दशक दोनसे समास । साधके पहावे सावकाश ।
विवरता विशेष विशेष । कळों लागे ॥३२॥
ग्रंथाचे करावे स्तवन । स्तवनाचे काय प्रयोजन ? ।
येथे प्रत्ययास कारण । प्रत्ययो पहावा ॥३३॥
देह तंव पाचा भूतांचा । कर्ता आतमा तेथीचा ।
आणि कवित्वप्रकार मनुष्याचा । कशावरूनी ॥३४॥
सकळ करणे जगदीशाचे । आणि कवित्वचि काय मनुष्याचे? ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचे । काय घ्यावे ॥३५॥
सकळ देहाचा झाडा केला । तत्त्व समुदाय उडाला ।
तेथे कोण्या पदार्थाला । आपुले म्हणावे? ॥३६ ॥
ऐसी ही विचाराची कामे । उगेच भ्रमो नये भ्रमे ।
जगदीश्वरे अनुक्रमे । सकळ केले ॥३७॥

या ओव्या म्हटल्यावर श्रीदासबोधाची आरति करावयाची. श्रीदासबोधाची एकशे तेरा पारायणे करण्याचा संकल्प श्रीगुरुचरणी करून दर एकादशीला नव्या पारायणाला प्रारंभ करण्याची पद्धति आहे. पारायण पंधरा दिवसात पुरे व्हावे हा उत्तम मार्ग.

ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत या अप्रतीम रसाळ ग्रंथानंतर दासबोधाची निर्मिती झाली असली तरी अध्यात्म-ग्रंथात त्याचे वैशिष्टच आहे. बहुजन-समाजाला अध्यात्मात सुलभतेने प्रवेश करता यावा अशा सहजतेने समर्थांनी अध्यात्मसमस्यांची उकल दासबोधात केली आहे. म्हणून प्रत्येक सांप्रदायिकाला स्पष्ट समजलेले असले पाहिजे की:-

१) " तेथे दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक ओसरे । समूळ द्वैत निवारे । त्या नाव **ज्ञान** ॥ " आपण कोण हे पहात असता, " जया पाहता पाहता तोचि जाले । तिथे लक्ष-आलक्ष सर्व बुडाले । " असे होऊन जाते, ते **ज्ञान**. " **ज्ञान** तेचि जे जाणीव विरे । देहबुद्धि + निःशेष सरे ॥ "

२) " ब्रह्मा, विष्णु आणि हर । त्यासी निर्मिता तोचि थोर । तो ओळखावा **परमेश्वर** । नाना यत्ने करोनी ॥१॥ तो देव ठायी पडेना । तरी यमयातना चुकेना । **ब्रह्मांडनायक** चोजवेना । हे बरे नव्हे ॥२॥ जो जाणेल **भगवंत** । तया नाव बोलिजे संत । जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥३॥ जाणिजे **परमात्मा** निर्गुण । त्यासीच म्हणावे ज्ञान । त्यावेगळे ते अज्ञान । सर्व काही ॥४॥" कारण " तुटेना फुटेना कदा **देवराणा** । चळेना ढळेना कदा दैन्यवाणा । कळेना कळेना कदा लोचनासी । वसेना, दिसेना जनी मीपणासी ॥५॥ "

३) अर्थातच **परमार्थ** [ जीवनाचे सर्व श्रेष्ठ ( परम ) साध्य ( अर्थ ) ] समर्थांमध्ये समर्थ योग असून " आहे तरी परम सुगम । परी जनासि झाला दुर्गम ।

का जयाचे चुकले वर्म । सत्समागमाकडे ॥ " परमार्थ हा " रोकडा ब्रह्मसाक्षात्कार। वेदशास्त्री जे सार । ते अनुभवासि ये ॥ " ज्या स्थितीत शब्द लुळे पडतात व मन पांगुळते त्या स्थितीची म्हणजे जीवब्रह्मैक्याची प्राप्ती श्रवणमनन-निदिध्यासानेच होते. त्यासाठी संपूर्ण वासनाक्षय ( मोक्षाच्या वासनेचा क्षय त्यात येतोच ) व्हावा लागतो. " ब्रह्मस्थिति बाणतां अंतरी । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी। दृश्याची जुनी जर्जरी । कुढि झाली ॥ " मूळातच मन उन्नत होत गेले पाहिजे. " परमेश्वराला ओळखिले । आपण कोण असे कळले । आत्मनिवेदन जाले । म्हणजे बरे ।१। ब्रह्मांड कोणे केले । कासयाचे उभारले । मुख्य कर्त्यांस ओळखले । म्हणजे बरे ।२। " या परमार्थाच्या वर्मापर्यंत कसलीही वृत्ति न स्फुरता, कल्पना न भासता, अद्वितीय आनंदरूपाने, सदैव विमल व निर्विकल्प असणे हाच खरा परमार्थ.

त्यासाठीच महाराष्ट्र-धर्माचे आचरण करावयाचे. या शब्दाचे जनक गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधर असून वेदाविषयी प्रामाण्यबुद्धि, श्रुतिस्मृति-प्रणित वर्णाश्रमधर्मपरिपालन, गो-जीव-हत्त्या व मद्यपानादिकांचा सर्वथैव त्याग इत्यादि महाराष्ट्रधर्माचे घटक आचरणशुद्ध राहिलेच पाहिजेत. त्यापायीच समर्थांच्या प्रत्येक मठाची शिस्त असे की ज्याला जे काम नेमून दिले ते त्याने करावे म्हणजे शिस्त राहते व कामही चांगले होते. निःस्पृह शिष्यानी तर याचना वा विवंचना करून अधःपतन पतकरताच कामा नये.

## ४ चाफळ व सज्जनगडावरील दैनिक उपासना

### प्रातःस्मरण

गणेशः शारदा चैव सद्‌गुरुः सज्जनस्तथा ।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ॥१॥
कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् ॥२॥
समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडिते ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥३॥
विष्णुशक्तिसमुत्पन्ने शंखवर्णमहीतले ।
अनेकरत्न-संपन्ने भुमिदेवि नमोनमः ॥४॥
राम राम वद गे सखि जिव्हे । राघवाविण तुझे यश नोहे ।
भक्षिसी मधु तरी नच कामा । राम नेइल तुला निजधामा ॥५॥
कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानाम् ।
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य ॥
विश्रामस्थानमेकं कविवर-वचसां जीवनं सज्जनानाम् ।
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥६॥

प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ।
सदाचार हा थोर सांडू नये तो । जनी तोचि तो मानवी धन्य होतो ।।७।।

घनश्याम हा राम लावण्यरूपी । महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ।।
करी संकटी सेवकाचा कुडावा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।८।।

बळे आगळा राम कोदंडधारी । महाकाळ विक्राळ तोही थरारी ।
पुढे मानवा किंकरा कोण केवा? । प्रभाते मनी. ।।९।।

सुखानंदकारी निवारी भयाते । जनी भक्ति भावे भजावे तयाते ।
विवेके त्यजावा अनाचार हेवा । प्रभाते मनी. ।।१०।।

सदा रामनामे वदा पूर्णकामे । कदा वाधिजे नापदा नित्य नेमे ।
मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा । प्रभाते मनी.।।११।।

जयाचेनी नामे महादोष जाती । जयाचेनि नामे गती पावेजेती ।
जयाचिने नामे घडे पुण्य ठेवा । प्रभाते मनी. ।।१२।।

न वेचे कथा ग्रंथिचा अर्थ काही । मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही ।
महाघोर संसार शत्रू जीणावा । प्रभाते मनी. ।।१३।।

देहदंडणाचे महादुःख आहे । महादुःख ते नाम घेता न राहे ।
सदाशीव चिंतीतसे देवदेवा । प्रभाते मनी. ।।१४।।

बहूतापरी संकटे साधनांची । व्रते दान उद्यापने ती धनांची ।
दिनांचा दयाळू मनी आठवावा । प्रभाते मनी. ।।१५।।

समस्तामधें सार साचार आहे । कळे ना तरी सर्व शोधून पाहे ।
जिवा संशयो वावगा तो नसावा । प्रभाते मनी. ।।१६।।

नव्हे कर्म, ना धर्म, ना योग काही । नव्हे भोग, ना त्याग, ना सांग पाही ।
म्हणे दास विश्वास नामी धरावा । प्रभाते मनी. ।। १७ ।।

पुण्यश्लोको नलो राजा । पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोको च वैदेही । पुण्यश्लोको जनार्दनः ।। १८ ।।

अहल्या द्रौपदी सीता । तारा, मन्दोदरी तथा ।
पंचकं नास्मरेन्नित्यं; महापातकनाशनम् ।।१९।।

नमो आदिबोधात्मरूपा परेशा । नमो हंसनारायणा निर्जरेशा ।।
नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रिरामा । नमो मारुते रामदासभिरामा ।।२०।।

या नमनानंतर (१) उठि उठि बा रघुनाथा। विनवी कौसल्या माता ।। प्रभात जालीसे समस्ता । दाखवि आता श्रीमुख ।। (२) राम सर्वांगी सावळा । हेम-अलंकारे पिवळा ।। नाना रत्नांचिया किळा । अलंकार शोभती ।। (३) उठि उठि बा मारुती । उठवी अंजनीमाय ।। प्रभात झाली बापा । रामदर्शना जाय ।। (४) उठि उठि बा श्रीसद्गुरु । भक्त-कामकल्पतरु ।। तू भवसिंधूचे तारु । करुणाकरू समर्था ।।

ही धृपदे असलेल्या भूपाळ्या म्हणून झाल्यावर काकड-आरती करावयाची. प्रथम, " काकड आरति परमात्मया श्रीरघुपती । राजाराम रघुपती। जिवी जिवा प्रकाशती कैशी निजात्मज्योती ।।धृ।।" ही रामाची आणि नंतर " ओवाळा ओवाळा श्रीगुरुरामदासराणा । जयगुरु राम०।। पंचहि प्राणांचा दीपक लाविला जाणा ।। " ही समर्थांची म्हणावयाची. काकड आरतीचे समाप्तीनंतर-

"परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।" हा भगवद्-गीतेचा श्लोक त्रिवार उच्चारून "हे वचन अखंड अबाधित रहावे ।।" अशी विनवणी करावयाची. ते झाल्यावर " काकडा झाला आता मुख प्रक्षाळा । मधु-नवनीत-शर्करा घेऊनि जनकाची बाळा ।। ध्रु ।।" ही मुखप्रक्षालन-भूपाळी म्हणावयाची. या-भूपाळीनंतर

भला राम विश्राम योगेश्वराचा । जपू नेमिला नेम गौरीहराचा ।।
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी । जिवा सोडवी राम हा अंतकाळी ।।१।।
सदासर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।।
उपेक्षू नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणे हेचि आता ।।२।।
समर्था, मनी सांडि माझी नसावी । सदासर्वदा भक्तचिंता असावी ।।
घडेना तुझा योग हा प्राप्त कोठे । उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।३।।

हे श्लोक म्हणून "सज्जनगड-निवास माझे रामदास माये । माझे रामदास माये । श्रमहारिणी-निवास माझे कल्याण माये । माझे कल्याण माये ।।" असे भजन करावयाचे ! येणे प्रमाणे-

प्रात:स्मरण झाल्यावर " गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति । नर्मदे, सिंधु, कावेरी, जलेऽस्मिन् सन्निधिं करू ।।१।। पापोऽहं पापकर्माहं पापात्मा पापसंभव: । त्राहि मां कृपया गंगे सर्वपापहरा भव ।।२।। " अशी करुणा भाकीत स्नान करावयाचे; आणि संध्या वगैरे आटोपून सूर्यनमस्कार घालावयाचे. त्यानंतर " भीमरूपी" म्हणून " हनुमंता, रामदूता " हे स्तोत्र म्हणावयाचे. मग " जय जय रघुवीर समर्थ" म्हणून " भिक्षेस " निघण्यापूर्वी झोळी श्रीरामापुढे ठेवून-

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमो शारदा मूळचत्वादिवाचा । गमू पंथ आनंत या राघवाचा ।।१।।
नवविध भक्तीच्या कोठडचा दिव्य जीला ।
निगम वेद चारी शोभती पक्ष जीला ।।
म्हणवुनि विनवीतो मुक्ति तू देइ दासा ।
शरण तुज कामधेनू तोडि संसारपाशा ।।२।।
तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा । सदा स्वास्थ्य चिंतीतसे गा महेंद्रा ।।
प्रजाधीश देशा उरी पूर्ण द्यावे । भवी दैन्य हे देशधाडी करावे ।।३।।
शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।
कवी वाल्मीकीसारखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरो रामदासा ।।४।।

असे श्लोक म्हणून व नमस्कार घालून "भिक्षामिषे लहान-थोरे परीक्षित" जाऊन आणि "बहुत आणता घ्यावे। मुष्टी एक॥" हे पथ्य सांभाळून सूर्य डोक्यावर येताच मुक्कामास परतावयाचे. भिक्षेसह झोळी समाधीपुढे (अगर देवतेपुढे) ठेवून "मनाची शते ऐकता दोष जाती। मतीमंद ते साधना योग्य होती॥ चढे ज्ञान-वैराग्य-सामर्थ्य अंगी। म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी॥" असा आत्मविश्वास प्रगट करावयाचा व भिक्षेत मिळालेल्या जिनसांच्या विल्हे लावावयाच्या.

त्यानंतर भोजनोत्तर थोडी विश्रांति घेतल्यानंतर "दिसामाजि काही तरी ते लिहावे। प्रसंगी अखंडीत वाचीत जावे॥" एवढेच नव्हे तर पुराण-श्रवण, अभ्यास, चिंतन वगैरे करीत "रिकामा जाऊ ना दे क्षण॥" असे जीवन काढावयाचे.

## सायंकाळी

प्रथम श्रीरामरक्षास्तोत्र म्हणावयाचे. नंतर (१) "अनुदिनि अनुतापे तापलो रामराया" (२) "तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलो" (३) "नसे भक्ति ना ध्यान ना ज्ञान काही" (४) "उदासीन हे वृत्ति जीवी धरावी" (५) "बुद्धि दे रघुनायका" (६) "उदासीन हा काल कोठे न कंठे" हे समर्थांच्या जीवीचे आर्त (७) "रघूनायका काय कैसे करावे" आणि (८) "तुजवीण रामा मज कंठवेना" ही करुणाष्टके म्हणावयाची. त्यानंतर समर्थांना विनवावयाचे की-

"तुला मागतो रामदासा दयाळा। दिनाकारणे देइ आता कृपाळा॥ घडो भक्ति तूझी असे त्वा करावे। समर्था मला पूर्ण वैराग्य द्यावे॥१॥ नको वासना विषयी होऊ देऊ। परद्रव्य देखोनिया तृण भाऊ॥ असे दृढ वृत्तीमध्ये त्वा वसावे। समर्था मला पूर्ण वैराग्य द्यावे॥२॥ नको काम हा क्रोध चांडाळ पापी। नको मोह तैसा मद क्रूर-रूपी॥ मला कल्पनेपासुनी सोडवावे। समर्था... ॥३॥ सदा सर्वदा शांति वीरक्त राहे। हरी-कीर्तनी चित्त माझे वसो हे॥ अखंडीत अध्यात्म कर्णी पडावे। समर्था मला...॥४॥ असे मूढ मी काहि माते कळेना। कधी दास्य-दास्यत्व तूझे घडेना॥ शिरी हात ठेवोनि दुःखा हरावे। समर्था मला...॥५॥ सदा संगती सज्जनाची असावी। मती, दुर्मती काही कोठे नसावी॥ मनी लोचनी रामरूपा पहावे। समर्था मला... ॥६॥ असे आवडी अंतरी दर्शनाची। परी भाग्यहीना मला भेटि कैची?॥ करी प्रार्थना दीनवाणी स्वभावे। समर्था मला ... ॥७॥ खरा दासबोधी असे भाव माझा। मना-माजि हा लागला ध्यास तूझा॥ म्हणे उद्धवासेच हाती धरावे॥ समर्था मला ... ॥८॥

या अष्टकाच्या समाप्तीनंतर श्रीसद्गुरुस्तवन करावयाचे ते "शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे।" हा श्लोक प्रारंभी म्हणून-" उपदेश ज्याला असे राघवाचा। श्रवणी असो गुण परीक्षिताचा॥ विवेकी विरागी जनी पूर्ण तैसा। नमस्कार माझा सद्गुरो रामदासा॥१॥ करी कीर्तने नारदासारखाची। कदर्यूपरी शांति ज्याचे

सुखाची ।। जया वाटते कांचनी केर जैसा ।। नमस्कार माझा सद्गुरो रामदासा ।।२।। स्मरणी जसा शंकर की प्रल्हाद । चकोरापरी आठवी रामचंद्र । रमा सेवि पादांबुजे जाण तैसा । नमस्कार माझा सद्गुरो रामदासा ।।३।। पृथूसारखा अर्चनी वाटताहे । खरा अक्रुराच्या सवे वंदिताहे ।। नसे गर्व काही अणूमात्र ऐसा । नमस्कार माझा सद्गुरो रामदासा ।।४।। खरी भक्ति हो होत त्या मारुतीची । तशी रामदासांचिया एकतेची ।। नसे भेद दोघां जळी गार जैसा । नमस्कार माझा सद्गुरो रामदासा ।।५।। जये अर्जुनासारखे सख्य केले । मुळीहूनिया द्वैत नि:शेष केले ।। सिता-नायकू दृढ केला निवासा । नमस्कार माझा ... ।।६।। बळी आत्म-निवेदनी पूर्ण झाला । विदेहीपणे दास तैसा मिळाला ।। म्हणे उद्धवसूत वर्णूच कैसा । नमस्कार माझा ... ।।७।।

शेवटी विनवावयाचे की-

तुझा भाट मी वर्णितो रामराया । सदा सर्वदा गाय क्रीडे सवाया ।।
महाराज दे अंगचे वस्त्र आता । बहुजीर्ण झाली देहबुद्धि--कंथा।।

या विनवणीनंतर (१) "वंदिला गजवदन, सुख सुख सुखाचे सदन" (२) "रामदूत वायुसूत भीमगर्भ जुत्पती।" (३) "नाम श्रीराम सुंदर । ध्याती श्री उमा-महेश्वर" (४) "नयनी पाहता हनुमंत । ज्यासी वर्णिती महंत ।।" (५) "श्रीसमर्थ मुख्य प्राण । सच्चिदानंदाची खाण ।।" या सवाया आणि वेळ असेल तशा (१) सिंहासनपर बैठे राम । कपि आये जो तमाम ।। (२) धन्य सूर्यनारा-यण । ज्याचे वंशी रघुनंदन ।। (३) धन्यक्षेत्र पंढरपूर। तेथे यात्रा मिळाली प्रचुर ।। (४) राजनके राज महाराज । दीन दासके काज ।। (५) जगदंब जगदेश्वरी । श्रीराम अयोध्याविहारी ।। (६) धन्य धन्य रामदास । त्रिभुवनी ज्याचा वास ।। (७) जय जय सद्गुरु रामदास । कीर्ति जयाची अविनाश ।। (८) "ब्रह्मचारी प्राणनाथा । त्रिभुवनी तुझी सत्ता ।।" याही सवाया म्हणावयाच्या. तथापि पहिल्या पाच सवाया झाल्यानंतर, शनिवारी "हरी गिरिवरी ठाण । बळे चालिले फुराण।।", रविवारी "नाम जेजुरीगड सुंदर । तेथे नांदे म्हाळसावर ।।", सोमवारी "धन्य कैलासभुवन । शुभ्र शंकराचे ध्यान ।।", मंगळवारी "धन्य तुळजापुर सुंदर । माता नांदे घरोघर ।।", बुधवारी "नाम विठ्ठल सुंदर । ब्रह्मा, विष्णु आणि हर", गुरुवारी "सारासार नीति न्याय । मुख्य भक्तीचा उपाय ।", शुक्रवारी "जय जगदंब सौख्यदानी । लक्ष्मी माय जग-ज्जननी ।।" अशा सवाया म्हणावयाच्याच. प्रत्येक दिवशी अखेर "साचा उपदेश देत। भली भली मति देत । समता समबुद्धि देत । कुमतीको हरत है ।। १।। मागको दिखाव देत । भाव देत भक्ति देत । प्रेमकी प्रतीत देत । आभार भरभरत है ।।२।। स्थान देत ध्यान देत । आतमको विचार देत । ब्रह्मको बताय देत । ब्रह्ममय करत है ।।३।। मूढमती कहे जसवंत । ना हि जन कछू देत । श्रीगुरु निशिदिनी देत । की देवोहि करत है ।।४।। ही सवाई म्हणून जोहार करावयाचा तो असा-

परमसुंदर रूप श्यामल। इंद्रनीळकिळ कांतिकोमल। भयनिवारण भक्तवत्सल। वरपराक्रम कीर्तिविमल ।।१।। भुवन-कंटक-दैत्यमारक। अमरमोचन, दैन्यहारक। दुरितनाशन पुण्यकारक। हरितसंकट दासतारक ।।२।। विकट-विषम-ताळछेदक। वर अनाचरदैत्यभेदक। दशमुखांतक सिरच्छेदक। ऋषिमुनीजन--चित्तवेधक ।।३।। अमर-भूषण उत्तमोत्तम। भुवनपालक हा रघूत्तम। वीरवीरांतक हा वीरोत्तम। असुर-अंतक हा वरोत्तम ।।४।। बहुतपीडक-दैत्यभंजन। ऋषिमुनिजन-योगिरंजन। दुरितदानव-दुष्टभंजन। अतुलकीर्तन वेस्तवेजन ।।५।।

म्हणावा " जय जय राम ।।

जय जय मार्तंडवंशावतंस। जय जय कैवल्यधाम। जय जय भरताग्रज। जय जय सीतारमण ।। जय जय सिंहासनाधीश्वर। जय जय सुरराज विराजितपद। नमस्ते। नमस्ते। नमः ।।

तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा। सदा स्वस्थ चिंतीतसे गा महींद्रा ।।
प्रजाधीश देवा उरी--पूर्ण द्यावे। भवी दैन्य हे देशधाडी करावे ।।

जय जय रघुवीर समर्थ। सद्‌गुरुसमर्थ रामदासस्वामी महाराज की जय।
महारुद्र हनुमान की जय। श्रेष्ठ श्री गंगाधर स्वामी महाराज की जय।

जय जय रघुवीर समर्थ ।।

एवढा कार्यक्रम करूनही श्रीरामहृदयम्, चौपदी, श्रीरामनामावली ('श्रीराम राम हे म्हणा' या सवाईसह) वगैरे ह्मणावयाची पद्धत आहे. अशा रीतीने कार्यक्रम करून झाल्यावर भजन व्हावयाचे. प्रथम जय जय राम राम राम। सीताराम राम राम ।। या आळवणीनंतर "रामा हो जय रामा हो। पतितपावना पूर्णकामा हो" हे पद म्हणून अभंग म्हणावयाचे ते-

(१) रत्नजडित सिंहासन। वरी शोभे रघुनंदन ।। (२) राम-सद्‌गुरुची कृपा। जेणे दाखवी स्वरूपा ।। हे होत. मग, "रामकृष्ण हरी। जय जय रामकृष्ण हरी" असे आळवून शनिवारी श्री मारुतीरायावरील अभंग, रविवारी श्रीसूर्य, श्रीराम, खंडोबा यावरील अभंग, सोमवारी श्रीशंकरावरील अभंग, मंगळवारी श्रीतुळजाभवानीवरील अभंग, बुधवारी श्रीविठ्ठलावरील अभंग, गुरुवारी श्री-गुरुमहात्म्यावरील अभंग, शुक्रवारी श्रीकृष्ण व श्रीजगदंबेवरील अभंग म्हणावयाचे. प्रत्येक दिवशी उपसंहार म्हणून अभंग म्हणावयाचा तो असा-

"धन्य राजाराम धन्य जानकी सती। धन्य लक्ष्मुमण, धन्य दास मारुती ।।१।
धन्य ती अयोध्या, धन्य तेथीचे जन। धन्य सूर्यवंश जेथे श्रीराम निधान ।।२।।
धन्य तो दशरथ, धन्य कौसल्यामाता। धन्य तो वशिष्ठ ज्याची राघवी सत्ता ।।३।।
धन्य ते वानर ज्यासी राम कृपाळू। धन्य रामदास ज्याचे नामी निर्मळू ।।४।। "

या अभंगानंतर "रामा, रामा, हो रामा ।।" असे भजन म्हणून "कष्टी आला जीव केली आठवण । पावले किरण मारुतीचे ।। " हा अभंग म्हणून "जय रामदास माऊली।।" हा जयजयकार करावयाचा. नंतर (१) "आम्ही अपरा–धी अपराधी । आम्हा नाही दृढबुद्धी ।।" (२) "नेणो भक्ती नेणो भाव । आम्ही नेणो दुजा देव ।।" (३) "आता पावन करावे । शरणागता उद्धरावे ।। " असे अभंग म्हणून "पतित पावना रामा । जय जय पावना रामा ।" व "रामदास गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायी " अशा आळवणी करावयाच्या.

हे सर्व झाल्यावर श्रीरामाजवळ (१) साफल्या निजवल्या कौसल्यामाता ।। (२) सुरवरदायिनि, दहर सुखसदना ।। (३) जयदेव जयदेव जय महारुद्रा । आरत भेटीचे जीणे कपींद्रा ।। या आरत्या म्हणतात. समर्थांच्या समाधिजवळ (१) नाना देही देव एक विराजे (२) बहुरुपी, बहुगुणी बहुता काळांचा ।। (३) सुखसहिता दुखरहिता निर्मळ एकांता ।। या आरत्या म्हणतात. गुरुवारी ब्रह्मा विष्णू हरादिक मानसी ध्याती ।। ही आरती आणखी समाधिजवळ म्हणा–वयाची असते.

आरतीनंतर श्रीरामाजवळ "वदन सुहास्य रसाळ हा राघव ।।" व समाधिजवळ " त्रिविध तापहारक हे गुरुपाय । भवसिंधुसी तारक गुरुपाय ।।" ही पदे म्हाणावयाची. मग म्हणावयाचे (१) सदासर्वदा योग तूझा घडावा । (२) चदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । (३) मुखी राम त्या काम बाधू शकेना । हे तीन मनाचे श्लोक. मग म्हणायच्या ओव्याः–

हनुमंत आमची कुळवल्ली । राम–मंडपा वेला गेली ।
श्रीरामभक्तीने फळली । रामदास बोले या नावे ।।१।।
आमुचे कुळी हनुमंत । हनुमंत आमुचे मुख्य दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धिते न पावे सर्वथा ।।२।।
साह्य आह्मासी हनुमंत । आराध्य दैवत श्री रघुनाथ ।
श्रीगुरु श्रीरामसमर्थ । काय उणे दासासी ? ।।३।।
दाता येक श्रीरघुनंदन । बरकड लंडी देइल कोण ? ।
तया सोडोन आम्ही जन । कोणाप्रती मागावे ? ।।४।।
म्हणोनि आम्ही रामदास । श्रीरामचरणी आमुचा विश्वास ।
कोसळोनी पडो हे आकाश । आणिकाची वास न पाहू ।।५।।
स्वरूपसांप्रदाय अयोध्यामठ । जानकीदेवी श्रीरघुनाथदैवत ।
मारुति उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।।६।।

मग, "स्वधामासि जाता प्रभू राम राजा । " हा मनाचा श्लोक, "आपदा–मपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् । " हे रामरक्षेतील नमन, आणि "नमो आदिबोधा–स्वरूपा परेशा । " हा श्लोक म्हणावयाचा. उपसंहार करावयाचा तो असा की–

ध्यान करू जाता मन हारपले । सगुणी जाहले गुणातीत ।।१।।
जेथे पाहे तेथे राघवाचे ठाण । करी चापबाण शोभतसे ।।२।।
राम माझे मनी, राम माझे ध्यानी । शोभे सिंहासनीं राम माझा ।।३।।
रामदास म्हणे विश्रांति मागणे । जीवाचे सांगणे हितगुज ।।४।।

जय जय रघुवीर समर्थ ।। सद्‌गुरु समर्थ रामदासस्वामी महाराज की जय ।। महारुद्र हनुमान की जय ।। श्रेष्ठ श्रीगंगाधरस्वामी महाराज की जय ।। जय जय रघुवीर समर्थ

वरील नित्यक्रमांच्या परिपाठाबरोबरच चैत्रमासी रामनवमीचा व हनुमज्जयंतीचा, माघमासी दासनवमीचा आणि मूळ मठाधिपतिच्या पुण्यतिथीचा उत्सव अगर आपण उपदेश ज्यांच्यापासून घेतला त्या दीक्षागुरूंच्या पुण्यतिथीचा उत्सव करण्याची प्रथा सर्वत्र आहे. याशिवाय समर्थसांप्रदायाची चार धामे व समर्थचरणपवित्र ( कुबडी तीर्थापासून सर्व ) क्षेत्रयात्राही सांप्रदायिक भक्तिभावाने करीत असतात. आदिलशाहीच्या सत्तासिंहगुहेतील **अकरा–मारुति** जे समर्थांनी आपल्या सांप्रदायसंघटनकार्यास सुरवात करताना प्रथम स्थापले ( त्याच्या अगोदर टाकळीस, महाबळेश्वर वगैरे ठिकाणी व तीर्थ यात्रेत आवश्यक वाटले तेथे स्थापलेल्या मारुतिनंतरच ) त्यांची यात्राही समर्थसांप्रदायिकाना भक्तिभावाने करावीशी वाटते. सत्तासिंहगुहेतील अकरामारुतींच्या दर्शनार्थ आणि त्या निमित्ताने "राजा कालस्य कारणम्" असलेमुळे, शासकीय धोरणाच्या व्याप–आटोपांचा आवाका यावा म्हणून दर्शन–श्रुतिनी पडताळे, पडसाद व प्रमाणे घेण्यासाठीही समर्थशिष्यांची नियमित ये–जा "त्या रामकथा ब्रह्मांड भेदून पैल्याड नेणाऱ्या" आदर्श रामसेवकांच्या क्षेत्रस्थानात होऊ लागली होती. तिलाच पुढे रूढीने यात्रेचे पावित्र्य चिकटले व ते अद्यापही जनमानसात ठाम आहे.

सुप्रसिद्ध अकरा मारुतींची नावे तत्कालीन राजकारणास उपयुक्त होती म्हणून त्याना त्या स्वराज्य स्थापनेच्या काली विशेष महत्त्व आले होते, असे समर्थगाथाकार श्री. अनंतदास म्हणतात. हिरोजी फर्जंद याने पन्हाळा किल्ला घेतल्यावर **पारगाव** येथे रायगडाहून शिवाजी महाराज गेले, त्याच वेळी पोलादपूरहून समर्थ तेथे राजकारणाच्या खलबताकरता गेले होते. **मसूर** गाव तर विजापूर प्रांत व शिवाजीची पुणे प्रांताची जहागीरी यांचे मध्ये फार महत्त्वाचे ठिकाण होते. **शहापूर मसूर, चाफळ,** (दासमारुती व प्रताप मारुती), **माजगाव, उंब्रज, शिंगणवाडी,** ही मारुतीची स्थाने आदिलशाहीच्या कऱ्हाड–सत्ताकेंन्द्रात, तर **शिराळे** व **बहेबोरगाव** येथील मारुतीची स्थाने आदिलशाहीच्या **मिरज** केंद्राशी निगडित असून **पारगाव, मनपाडळे,** ही मारुतिची स्थाने वारणानदी आणि किल्ले पन्हाळा इकडील आदिलशाहीच्या धोरणाचे वारेमाप घेणारी होती.

कृ. ५८

• • •

# ब्राह्मण्य रक्षावें आदरे

"अहो ज्या नरा रामविश्वास नाही । तया पामरा बाधिजे सर्व काही ।। महाराज तो स्वामि वायूसुताचा । जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ।।" असा एक श्लोक श्री समर्थ रामदासांनी मनोबोधात लिहिला आहे. यातील "राम" म्हणजे "दाशरथी राम" असा अर्थ घेण्याची सामान्यांची चाल आहे व ती सांप्रदायिकांकडून अविरोध चालू आहे. याचे कारण "वायुसुताचा स्वामी राम" "दाशरथी रामाशिवाय" दुसरा कोण? हे इतिहास तरी काय सांगणार?

इक्ष्वाकु-कुलावतंस ऐतिहासिक रामाची अशी महती सांप्रदायिकांपासून जनसामान्यापर्यंत सर्वांनी आपल्या मेंदूवर ठसवून घेतली, याचे कारण समर्थ रामदासांनी "देवा सोडवित्या" रामप्रभूची दैवतपूजा परिस्थिती-सापेक्षतेने महाराष्ट्रात महाराष्ट्राच्या ऐहिक व पारमार्थिक उद्धारासाठी उभी केली होती. माणुसकीच्या पाठकण्यावर समाजाचा परिस्थितिसापेक्ष तोल सांभाळून समाजाचा सात्त्विक जीवनप्रवाह तुंबू न देता, "प्रवाहो चालला म्हणजे बरे । तुम्बता नये ।। " हे महंत ऊर्फ संतांमधील लोकनेते पहात असतात. समर्थ रामदासांनी तेच केले. त्यासाठीच रामोपासना त्यांनी प्रचलित केली. जनसामान्यांच्या डोळ्यापुढे रावणराज्याचा शेवट करून दंडकारण्याला "महा-राष्ट्र" बनविणाऱ्या निष्काम-कर्म-योगी अशा दाशरथी रामासारख्या ऐतिहासिक महापुरुषाची परंपरा दिली व " इतिहासाचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडविण्याची प्रेरणा केली." आणि? " घडीने घडी सार्थकाची करावी " असा आदेश देऊन " असो, महार, धेड, चांभार । त्यांचे राखावे अंतर । या नाव भजन ।।" असा दंडक घातला व सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण लोकसंग्रहपूर्वक केले.

आणि तरीही समर्थ रामदासांचा " राम " हा शब्द त्या ऐतिहासिक सूचनार्थाबरोबर व्यापक अर्थ उद्‌बोधून असतो, हे विसरून चालणार नाही. प्रारंभी दिलेल्या श्लोकातील "राम" या शब्दाला "आत्मा", सर्वात्मा, परमात्मा असा व्यापक अर्थ अभिप्रेत असून बुद्धिवाद्यांच्या समाधानाकरता "अहो, ज्या नरा आत्मविश्वास

नाही । तया पामरा बाधिजे सर्व काही ।। " असा सरळ अर्थच समर्थ रामदासांना अभिप्रेत आहे. काय तो आत्मा " वायुसुताचा स्वामी आहे? " हो आहे. आकाश-तत्त्वातून वायु आणि वायूपासून अग्नि, अग्निपासून पाणी अशा क्रमाने सर्व सृष्टि-संचालनच झाल्यामुळे वायुसुत म्हणजे निर्भयपणे सर्वसंचारी अंजनीसुत जसा हनु-मान, तसाच सगळा सृष्टिव्यापार असाही व्यापक अर्थ आहे. सगळा सृष्टिव्यापार म्हणजे जर वायुसुत तर त्याचा " स्वामी " जो आत्मा तो " नाथ लोकत्रयाचा " आहेच आहे हे उघड आहे. " करिती ब्रह्मनिरुपण । जाणती ब्रह्म संपूर्ण । तेचि जाणावे ब्राह्मण ।। "

पण " राम " शब्दाला असा व्यापकतम अर्थ चिकटविण्यात समर्थ रामदासांचे अतिशयोक्तीस प्राधान्य देणारे काव्यवात्सल्य आहे की भाषाशास्त्रात तसा काही आधारच आहे ? रामदासांना भाषाशास्त्रातील रूढींचा व पूर्वसूरींचा तसा ऐति-हासिक परंपरेचा आधारच आहे. वाल्मीकी रामायणाची आजकाल व आज-उद्या सुद्धा मिळणारी संहितावृत्ति " सूत्रग्रंथोत्तर-कालीन " आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. तसे लक्षात ठेवून आपण मागोवा घेत गेलो तर " राम " हा शब्द 'पाणीदार, बाणेदार, तेजस्वी, नर, पुरुष ' इतक्या अर्थांनी अनेकानेक भाषात प्रचलित होता, असा डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर प्रभृति संशोधकांचा स्पष्ट आढळ आहे, हे कोणाही अभ्यासकास दिसून येते. ' राम ' शब्दाचा त्या अर्थाने होणारा वापर " सुदास-" पूर्वकाली म्हणजे वेदपूर्वकाली जसा होता तसा आजच्या विसाव्या शतकाच्या चरम-पादाच्या सुधारलेल्या वाटचालीतही आहे. " अमक्या तमक्या गोष्टीत किंवा व्यक्तीत काही राम नाही. " असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा ' पाणीदारपणा, तेज ' याशिवाय दुसरा कोणता अर्थ अभिप्रेत असतो ? म्हणून तेजाचे तेज, चैतन्याचे चैतन्य जो आत्मा, परमात्मा, त्याचेसह, ऐतिहासिक परंपरेच्या साक्षीदार भावप्रधान मनात साक्षात्काराने बिंबावा म्हणून ( " चिंता करतो विश्वाची " म्हणणाऱ्या ) समर्थ रामदासानी आपल्या ' उदास ' पंथास रामोपासनापंथ बनविला. आणि ? परमात्मा जसा " आहे तरी सर्वाठायी । पाहो जाता कोठेच नाही ।। " असा असतो तसाच अलिप्तपणा, " करून अकर्तेपणा " किंवा " मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोका-करवी करवावे ।। " व " दास डोंगरी राहतो । यात्रा देवाची पाहतो ।। " असा चैतन्य-दण्डक रामदासांनी आपल्या सांप्रदायाच्या मठाधिपतींना घालून दिला. चंद्रगुप्ताला सम्राट करून त्याला राज्यकारभारासाठी " अर्थशास्त्र " आखून देऊन आर्य चाणक्य वानप्रस्थ झाला. विजयानगरचे साम्राज्य हरिहर बुकाचे स्वाधीन करून माधवाचार्यांनी चतुर्थाश्रम घेतला. त्यांच्यासारख्यांची उदाहरणे गिरवूनच समर्थ रामदासांनी शिवराज्याभिषेकापासून अलिप्तपणे " यात्रा ( राष्ट्र ) देवाची पाहतो । " हे व्रत धरले, हे त्यांच्या " सदा बोलण्यासारखे चालताहे " या उक्तीस धरून झाले.

समर्थ रामदासांच्या संघटना-कुशलतेतील आणि समाजजीवनाला अध्यात्माची जोड देण्यातील हीच दूरदृष्टि आहे. तशा " दीर्घसूचनेचे नर " च राष्ट्रात एक-

जिनसीपणा निर्माण करू शकतात. ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर म्हणतात की-

"देशात आलेल्या लोकांचे एक-संस्कृतीकरण करणे ही गोष्ट सर्व जनतेच्या सौख्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे आणि याबाबतीत भारतीयानी जी कामगिरी केली ती जगाच्या इतिहासात अत्यंत अतुल्य आणि नावाजण्याजोगी आहे. भारतीयांच्या व्यापक-क्षेत्रीय समाजनिर्मितीच्या इतिहासावर मानवी रक्ताचा सडा शिंपलेला नाही आणि याचे कारण ब्राम्हणाची व्यापक अभिरुचि आणि सर्व-विद्या-संरक्षणाची (सेवा) वृत्ति होय. प्राचीन जगामध्ये सुसंघटित अशा ज्या आचार्य-परंपरा होत्या, त्यामध्ये ब्राम्हणाची, मगांची, इजिप्तमधील आणि असरियामधील उपाध्याय वर्गाची, त्याचप्रमाणे यहुदी लोकांच्या गुरुवर्गाची गणना करता येईल. या सर्व आचार्य-परंपरामध्ये ब्राम्हणवर्गच विद्यारक्षक झाला. ब्राम्हणाचा वर्ग निर्माण होण्यापूर्वी "अथर्वा" हेच प्राचीन भारतीयांच्या उपाध्याय-वर्गाचे नाव होते. देशातील कवि ( विद्वान ) वर्गाकडून आणि आचार्य वर्गाकडून दैवत-सांप्रदायांची संघटना करण्याचा जो प्रयत्न झाला त्यात रामायणकथा निर्माण झाली. दाक्षिणात्य सांस्कृतिक इतिहासात अत्यंत महत्त्वाची लोकधर्मैक्याची ती खटपट होती."

अशा प्रयत्न-पुरुषार्थालाच समर्थ रामदासांनी "ब्राम्हण्य रक्षावे आदरे ॥" असे म्हटले आहे. सुखदुःखांनी भरलेल्या जीवनाच्या संगीताचा प्रारंभ केव्हा झाला हे जसे कुणाला सांगता येत नाही, तसेच त्याचा शेवट केव्हा होणार हेही सांगता येत नाही. मात्र प्रत्येकाला ठाऊक आहे की हे संगीत अखंड चालू आहे. त्याच्या निनादात जन्माला येणारा प्रत्येक जीव आपला म्हणून एक नवा सूर घेऊन येतो. त्या नव्या सुराने अखंड चालू असलेले संगीत नवा बहर घेते. जीवनाच्या संगीताला नवा बहर देणे हेच ब्राम्हणाचे लक्षण प्रामुख्याने असल्याकारणाने, ते ब्राम्हण्य परंपरेने रक्षण्याकरिता व राष्ट्राच्या एकसंस्कृतीकरणाने राष्ट्र समर्थ करण्याकरताच समर्थ रामदासांनी ( "बलहीनेन न लभ्य:" असलेल्या ) आत्म्यापासून ( देवाना बंदिशाळेत घालून "सर्वं यज्ञैः प्रतिष्ठित" असलेले सात्विक, सरळ, असे ) ऋषिजीवन उध्वस्त करणाऱ्या रावणराज्याची अखेर साधणाऱ्या दाशरथी रामाच्या ऐतिहासिक वास्तववादाचे प्रबोधन करणाऱ्या सर्व संकलित संस्कृतीचा वारसा समाजाने आपल्या रसरशीत जीवनपरंपरेने चालवावा, या हेतुनेच रामोपासना उभी केली, चालवली, फैलावली. मारुतीरायाच्या मागे समर्थ रामदासाप्रमाणेच "रामकथा ब्रह्मांड भेदून पैल्याड न्यावी ॥" यात राष्ट्राच्या इतिहासाचे अमरपण आहे.

"जगी वावरे जो अणूरेणू काही । रिता ठाव या राघवा-वीण नाही ॥" या समर्थ वचनातील "राघव" शब्दास "राम" सारखाच व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. रघुवंशीय तो जसा राघव ऊर्फ दाशरथी श्रीराम, तसाच मनुच्या माशा-

सारखा आपला व्याप आणि आटोप वाढविणारा महामत्स्यविशेष किंवा समुद्र असाही राघव शब्दाचा अर्थ आहे. हे विसरून चालणार नाही. सकलविद्यासंरक्षण म्हणजे जीवनशास्त्रातील आपले अस्तित्व वा वैशिष्टच दाखविणे, नवे नवे ज्ञान मिळविणे आणि प्रगती करणे हे तीन घटक (विद् = असणे, जाणणे, मिळविणे; विद्या). ते ज्या ज्या साधनानी हाताळता येतील त्यांचे त्यांचे सहकारसमन्वयाने संरक्षण करीत राहणारांची बुद्धि व्यापकातली व्यापक असावयास पाहिजे. व्यापक बुद्धीने वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि जागतिक जीवनसाधनांचा समज-उमजपूर्वक सांभाळ करणाऱ्या जबाबदाऱ्या पेलणारा मगदुर तोच ब्राह्मण्य या नावाने जुन्या वाङ्मयात ओळखला जात असे. "समजोन उमजोन कार्य करणे । तेणे कदापि न ये उणे ।। कार्यकर्त्यांच्या गुणे । कार्यभाग होतो ।।" म्हणून तो मगदूर असणाराचे बाबतच "ब्राह्मणस्य च देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते ।" असे भगवान् मनूचे वचन आहे. रोमाँरोलाँचेही म्हणणे आहे की, "डोक्यावर जबाबदाऱ्यांचा भार जास्त आणि उपभोगाच्या नावाने "अङ्क्ष्व' (शून्य) तसेच नित्यनैमित्तिक कर्म करीत असता आणि देशकालपरिस्थितीला अनुकूल व्यवहार करीत असता, ब्राह्मणाने आपल्या उदाहरणाने कोणत्याही बाबतीतला अत्युच्च आदर्श ठेवणे हे ब्राह्मण्य होय. " हे ब्राह्मण्य रक्षणे, येरा गबाळाचे काम नव्हे. त्याला जीवनातील श्वासोच्छवास देखील उच्चतम पातळीवरून व्हावे लागतात. "वृत्ति होइल उदासिन (उत् + आसीन = उंच बैठक असलेली) जेव्हा । राम-दास म्हणणे मग तेव्हा ।। " असे समर्थ रामदासांचे वचन आहे, त्या सरळ सरळ अर्थानेच. एक संस्कृत सुभाषितही आहे की " वृत्तं यत्नेन संरक्ष्यं ब्राह्मणेन विशेषतः । अक्षीणवृत्तो न क्षीणो वृत्ततस्तु हतो हतः ।। " अशा निर्धाराने राहणारा ज्ञानसंपन्नच 'वेदव्यास' या पदवीला योग्य होय. "वेद-विभागी राजहंसू । यालागी नामे वेदव्यासु । तेणे म्या केला श्रुतिविलासू ।।" (ए. भा. २१-३७९) असे आपले सम्यग् ज्ञान आत्मविश्वासपूर्वक जो सांगू शकतो, तोच ब्राह्मण. लोकापुढे उदात्त कल्पना आणि उच्च मनोवृत्ति मांडण्याचे काम ब्राम्हणाचे आहे. वैदिक काळा-पासूनचा हा इतिहास आहे. ही थोर कामगिरी करताना, त्याची कुठे घसर झाली अगर त्याला आपल्या जीवनप्रणालीपासून दूर व्हावे लागले अथवा प्रतिष्ठेच्या प्रस्थापित लौकिक समजूतीतील उच्चतेपासून ढळावे लागले, तरी त्याचे अभिजात श्रेष्ठत्व सात्विक, राजस, तामस अशा तीनही लोकाना मान्यच राहते. "जरी ब्राम्हण झाला भ्रष्ट । तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ ।। " आपल्या व्रतपात्रता-सिद्धीनेच राहतो. स्वार्थपरायणता अनार्यच अनार्य, ही खातरजमा ब्राम्हणाची असते. स्वार्थपरायणतेत देशाची थोरवी नाही, धर्माचे वैभव नाही, ब्राम्हण्याचाही अभिमान नाही. म्हणून परकीय आक्रमणानी व सत्तापीडानी जे "ब्राम्हण बुद्धि-पासून चेवले । आचारापासून भ्रष्टले " त्यानी काय केले? असा सवाल करून समर्थ त्याना बजावण्यास चुकले नाहीत की "अन्न मिळेनासे झाले ।।" यावरून तरी "शहाणे व्हा." ब्राम्हणाला 'राम' या शब्दाची वेदपूर्वकाळा-

पासूनची 'तेजस्वी, पुरुष' या अर्थाची परंपरा व रावणाच्या तडाक्यातून कर्तबगार, दिव्य शक्तीच्या समाजाला सोडविणाऱ्या दाशरथी रामाची ऐतिहासिक परंपरा ठावूक असून ती आचरणशुद्ध राखता आली पाहिजे. ती समर्थ रामदासांनी राखून दाखवली आणि तेही कोणत्या अवस्थेत? तर लंगोटी लावून गिरिगव्हरी वास करून! धम्मपदानेही सांगितले आहे की,

" अकिंचनमनादानं तमहं ब्रवीमि ब्राह्मणम् ।
यस्मिन् सत्यं च धर्मश्च तमहं ब्रवीमि ब्राह्मणम् ।। "

जो दरिद्रनारायण असूनही कोणाचे काही ठेवून घेत नाही आणि ज्याच्या ठिकाणी "सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म ।।" तोच खरा ब्राह्मण होय. समर्थ रामदासांना हे पक्के ठाऊक होते आणि ते आपल्या कळत्या वयात त्यानी कडक शिस्तीने आचरून दाखविले. ब्राह्मण ब्रह्मवेत्ते हवेत. ब्राह्मणानी कडक तपाचरण केले पाहिजे. समर्थ रामदासांनी गोदातटी ते ऐन उमेदीत साधले. त्यामुळेच त्यांचे स्पष्ट मत झाले की विलासभोगाची कुबुद्धि ब्राह्मणांना होणे हे राष्ट्राचे खडतर दुर्दैव होय. ब्राह्मणांनी विरक्त, निःस्पृह व असंग राहून सर्व राष्ट्राला व्यवहार, राजकारण व परमार्थ याचे शिक्षण देऊन, गति-प्रगतिदाते व्हायला पाहिजे. कार्य कर्तव्यात मग्न, लोककृत निंदास्तुतीची तमा न धरता समाज-सेवायोगी राहाणारे विद्याभ्यासी, व्यासंगी आणि "हें विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाचीं स्थिर ।" त्याचप्रमाणे 'न मागे तयाची रमा होय दासी' अशा वृत्तीने चालणारे ते ब्राह्मण्य रक्षितात. भगवान मनूने व त्याही पूर्वी महाभारतात युधिष्ठिर-नहुष संवादात जो विषय ठासून सांगितला आहे तोच परंपराप्राप्त समर्थांनी ही समजावला आहे. हैदराबादचे रामदासपंचायतनातील केशवस्वामीही ब्राह्मणाची योग्यता सांगतात ती अशी-

ब्रह्मींची ब्राह्मणे आलो भिक्षेलागी ।
अलक्ष भिक्षा वेगी द्यावी आम्हा ।। ध्रु ।।
शुद्ध स्वयंपाक केला नाही जीही ।
त्यांची भिक्षा नाही घेणे आह्मा ।। १ ।।
कर्मकांडाचे ब्राह्मण, त्यासी न सोडी कर्मठपण ।
त्यांची भिक्षा जाण नेघो आह्मी ।। २ ।।
भेदबुद्धीपाक असे ज्याचे घरी ।
भिक्षा त्याची करी घेणे नाही ।। ३ ।।
शुद्ध ब्रह्मवादी शुष्क भिक्षा केवळ ।
तेथे एक चूळ न भरू आह्मी ।। ४ ।।
ध्यान-धारणा-योग लय-लक्ष्यदीक्षा ।
ते अपूर्ण भिक्षा नेघो आह्मी ।। ५ ।।

संकल्प-विकल्प गेले नाही ज्याचे ।
भिक्षादान त्याचे नेघो आह्मी ॥ ६॥
ऐसिया भिक्षेलागी फिरता आपण
गुरुकृपे केशवी पूर्ण प्राप्ती झाली ॥७॥

सूफी कवि शाहतुकराव म्हणतो:- "कहाँ रामदास और केशवदास पाऊं?" समर्थ रामदासांचे अवतारकृत्य तसेच होते. "ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते" कृच्छ्राय, तपसे चेह प्रत्यानंतसुखाय च ॥" (स्कंध ११-१७-४२) अशी तीव्रतम आच असल्यामुळेच दासबोधाच्या चौदाव्या दशकाचे ७ व ८ या समासांची मांडणी समर्थ रामदासानी केल्याचे सूक्ष्माभ्यासकाला कळून चुकते !

अनंत अवकाशाच्या विशालतेत मानवी जीवनाचे सहस्रकमळ वासना-विकारांच्या कर्दमात उगवले, तरी जीवखाऊ परिस्थितीच्या व मनोवृत्तींच्या कीटकांच्या करालतेतून त्याचे संरक्षण करून नानाविध कलाविकलांच्या रंगाढंगानी ते विनटावे आणि कीर्तिरूपाने त्याचा सुगंध आजच्या, उद्याच्या, अनंत काळच्या पिढ्यापिढ्याना वारसाहक्काने पुरावा, अशी दक्षता बाळगणाराच्याकडूनच राष्ट्राचा इतिहास आणि संस्कृति अमर होत असतात. पण कबिराने म्हटल्याप्रमाणे बहुतेकांची स्थिति अशी असते की-

"कस्तूरी कुंडली बसे, मृग ढुंडे वनमाही ।
ऐसे घटिघटि राम है, दुनिया देख नाही ॥"

म्हणून माणसाला प्रिय असते ते न मिळाल्याकारणाने जे मिळाले तेच त्याला गोड करून घ्यावे लागते. याच्या उलट, आत्मनिरीक्षणपूर्वक स्वतःचा आवाका, व्याप, आटोप ज्यांचे लक्षात येतात, ते आपल्या मर्यादा ओळखूनच पुरुषोत्तम होण्याचा प्रयत्न करतात. आणि म्हणून महान् सत्ये जशी सहज-सुंदर असतात तसेच खरे महान् पुरुष अलौकिक असूनही "अलौकिक होऊ नये लोकांप्रति ॥". इतक्या साधेपणाने वावरताना आढळतात. पुढे भोवती उभ्या रहाणाऱ्या वास्तवाचे हर्षभराने स्वागत करून, त्यातील जेवढ्याला माझ्या ध्येयानुकूल मला करता येईल तितक्याला तसे करण्याचे धैर्य व ध्येय-वास्तवातील तफावत नीट जाण-ण्याचे विवेक जे दाखवतात, तेच राष्ट्राच्या इतिहासात आपली फूल नाही फुलाची पाकळी तरी सादर समर्पू शकतात. समुद्रातील रत्ने सगळ्यांच्याच हाताशी येत नाहीत. पण अगदीच शंख-शिपला हाती लागल्या तरी त्यानाही मी कलाकुसरीने चिरस्थायी मनोरमता देईन, एवढी तरी जिद्द माणसात हवी. ती निर्माण करण्यातही "स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरलेल्या" परमेश्वराची ऐहिक व पार-मार्थिक सेवा आहे. तशी करीत राहण्यानेच "प्रपंच करावा नेटका । मग पहावे परमार्थविवेका ॥ " साधत जाते. त्या साधनेतूनच सर्वत्र 'राम' पाहता येतो व "उत्कट, भव्य तितुकें घ्यावे । मिळमिळित अवघेच टाकावे ॥" ही वृत्ति धर धरते. या

वृत्तीच्या "अभ्यासेचि प्रकट व्हावे " असे गनाने घेतले तर जे सर्व उत्कट, भव्य घेतलेले असते ते 'स्व–भाव' बनते. आणि मग त्या बृहत् प्रतिष्ठेने सर्वत्र आत्मचैतन्याचा साक्षात्कार होत जातो. तसा होऊ लागला तर "मनी धरावे ते होते" चा आनंद "शब्दांची आटणी" होऊन मिळत जातो. भक्तीचे हे पर्यवसान व्हावयास मन, बुद्धि व लोकसंग्रह विशालच विशाल होऊन "जो परोपकार करीतचि गेला। पाहिजे तो ज्याला त्याला॥" असे सेवाभावी ब्राम्हण्य आत्मसात् व्हावे लागते. ते आत्मसात् झालेले "ब्राम्हण्य रक्षावे आदरें" हे समर्थांनी "आधी केले व मग सांगितलें॥" आहे. "वर्णाश्रमधर्माच्या व्यवस्थेमध्ये कर्मफल–त्यागाचे शिक्षण आपोआपच मिळते. ब्रम्हचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या आश्रमात फलसंग्रह करणे हे धार्मिक दृष्टया अयोग्य समजले आहे. फक्त गृहस्थाश्रमातच कर्मफल आपल्यापाशी ठेवता येते, पण ते केवळ त्याग करण्यासाठीच जमावयाचे असते. कारण तीनही आश्रमांचा प्रतिपाळ गृहस्थाश्रमालाच करावा लागतो. त्याप्रमाणे आश्रमव्यवस्था व त्याग हाच धर्म आहे. वर्णधर्मात "ब्राह्मणांचा आदर्श सर्वांच्या समोर आहे आणि ब्राह्मणधर्म हा त्यागाचाच धर्म आहे." (पं. सातवळेकर कृत पुरुषार्थ बोधिनी गीता पृ. ४०५).

● ● ●

# रामदासांचे राजकारण

'ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ।।' असे समर्थ रामदास-स्वामींनी दासबोधाच्या एकोणिसाव्या दशकाच्या सहाव्या समासातील पंचविसावे ओवीत उद्गार काढले आहेत. विशद भक्तिमार्ग बोलणाऱ्या दासबोधात राष्ट्राचे शासन करणारा राजा कसा पाहिजे हे सांगण्याचे कारणच काय ? 'बहुत जन सुखावे तो कसा काळ फावे ।' अशी विश्वचिंता वाहणाऱ्या संताला 'जनांचा प्रवाहो चालला म्हणजे बरे । तुंबता नये ।' या प्रेरणेने जनताजनार्दनाची भक्ति करताना, जे व्यावहारिकमार्ग सांगावे लागतात, त्यापैकीच राजा कसा असावा हे सांगणे कर्तव्य-प्राप्त ठरते. 'उपाधी कराव्या पण उपाधीत गवसू नये ।' अशी प्रवृत्तिनिवृत्तींचा प्रीतीसंगम असलेली समर्थ रामदासांची भक्तिप्रणाली असल्याकरणाने, त्यांच्या संप्रदायात 'दुसरे ते राजकारण' हे महत्त्वाचे सूत्र आहे; कारण-

'कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूत् राजा कालस्य कारणम् ।'

हे महाभारताचे वचन समर्थ कसे विसरतील ?

समर्थ रामदास ज्या अस्मानी सुलतानीच्या काळात संचार करीत होते, त्या अस्मानी सुलतानीचा विसर करूनही, समर्थ रामदासांचे 'ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ।' हे वचन राष्ट्रतेजोवर्धनार्थ अमरपणे आवश्यक आहे. मोठ्यात मोठ्या ध्येयाच्या बाबतीत त्यांचा कैवार घेणारे शासनकर्ते असतील तर महत्त्वा-कांक्षी आणि बुद्धिमान व कर्तृत्ववान तरुण आपली पराकष्ठा करून पात्रतासिद्धीने राष्ट्राची शान राखीत जातील, हे समर्थ रामदासांचे व्यावहारिक निदान कोण चुकीचे म्हणेल ? पण शासनसंस्थेस राष्ट्रातील तरुणांच्या जिद्दीपेक्षा, महत्त्वाकांक्षे-पेक्षा आणि राष्ट्रतेजोवर्धनापेक्षा ज्यावेळेस निराळेच चाळे सुचत असतात, तेव्हा किमानपक्षी समाजाचा नैतिक पाठकणा बळकट ठेवणाऱ्या परमार्थीपरमेश्वरभक्त असणाऱ्या लोकांचे स्वास्थ्यसंरक्षण करणाऱ्या शासनव्यवस्थेची ( राजाची ) जरूरी आहेच आहे. ही बजावून सांगण्याची व त्या दृष्टीने लोकजागृती करण्याची जबाब-

दारी निःस्पृह संतांनी करावयाची नाही, तर कोणी करावयाची ? समर्थ रामदासांनी ते कर्तव्य करणे हे आपल्या संप्रदायाचे एक अंगच करून सोडले होते. म्हणूनच त्यांनी दासबोधात वरील वचन उघड उघड मांडले.

परमेश्वरभजनी लोकांना उघड राजकारणात वैचारिक संचालन करावयास लावणारी परिस्थितीच समर्थ रामदासांच्या काळी होती. 'म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुता दिवसांचे माजले बंड ॥' हा त्यांच्या तीर्थपर्यटनातील स्वानुभव होता. 'याकारणे अखंड । सावधान असावे ।' असा इशारा समर्थ रामदासांनी जनतेस दिला. पूर्वीच्या अनेक शतकांचा इतिहास आठवून व तीर्थाटनात 'भिक्षामिषे लहानथोर । परीक्षून' आपल्या काळाच्या देशस्थितीचे वास्तविक स्वरूप मांडताना समर्थ रामदासांनी तत्कालीन शासनसूत्रे हलविणारांचे वर्णन वरील शब्दांनी केले आहे. बंड म्हणजे निरर्गल व अनावर असे शासनकर्ते पुष्कळ दिवसांच्या जुलूमशाही करण्याच्या सरावाने कमालीचे दुर्जन झाले आहेत, हे त्यांचे प्रजाजनाविरुद्ध आणि शासनकर्त्यांच्या कर्तव्याविरुद्ध बंड आहे. हे जनतेच्या नजरेस आणणे समर्थ रामदासांना कर्तव्यच वाटले. 'प्रजानां विनयाधानात् रक्षणात् भरणात् अपि ।' प्रजाजनांचा पिता होऊन राहणे हे शासकांचे आद्य कर्तव्य. ते कोठच्या कोठे जाऊन स्वैरपणे शासक प्रजेवरच जुलूम करू लागले, तर लोकजागृति करून त्या शासकीय बंडाचा बीमोड लोकाकरवीच करविला पाहिजे, हे समाजहितचिंतकांचे कर्तव्यच असते. मग 'चिंता करतो विश्वाची' म्हणणाऱ्या निःस्पृह संतांचे ते कर्तव्य असतेच असते. म्हणूनच समर्थ रामदासांनी भारताच्या अनेक शतकांचा इतिहास वरील ओवीत साररूपाने जनतेस सांगून टाकला.

प्रजा बंड उभारते ती शासकांचे बंड मोडून काढण्याकरताच. समर्थ रामदासांनी आपल्या पर्यटणात समाजाची भयंकर अवनति झालेली पाहिली. उत्तरेत म्लेंच्छ सत्ताधाऱ्यांनी घातलेला पाशवी धिंगाणा, दक्षिणेकडे पोर्तुगीजांनी धर्मप्रसारार्थ मांडलेला धुमाकूळ व मध्यभागी महाराष्ट्रात बहामनीराज्याच्या पाच शाह्यानी मांडलेली बेबंदशाही, यांनी सारा देश रक्तबंबाळ होऊन हवालदिल झाला होता. 'कित्येक म्लेंच्छ होऊन गेले । कित्येक फिरंगणात आटले ।' (दा. १५-२-३) अशी परिस्थिती चिनी प्रवासी हुएनसिंग भारतात फिरून गेल्या (६२९ ते ६४५) नंतर जी झाली, ती महाराष्ट्रालाही शेवटी भोगल्याशिवाय राहिली नाही.

सिंधप्रांतात ७१२ चे सुमारास बगदादच्या वालीद खलिफाच्या आज्ञेने इराणच्या सुभेदाराचे मदतीने मंहमदगिजनी याने स्वारी केली. त्याने ठिकठिकाणी हजारो पुरुषांची सरसकट कत्तल केली, कित्येकाना मुसलमान करून सोडले, हजारो कुलीन स्त्रियास दासी करून इराणात पाठविले, कित्येकींना आपसात वाटून

घेतल्या, अनेक भव्य देवालये उध्वस्त केली आणि अगण्य संपत्ति लूटून नेली. अडीचशे वर्षांनी पंजाब व सिंध या प्रांतावर गिजनीच्या सबक्तगिनाने व महंमदाने स्वाऱ्यांचा सपाटा चालविला आणि १०२७ पर्यंत हिमालयाच्या कुशीतील नगरकोट येथील तटबंदी देवालय लुटून नेले. ठाणेश्वर येथून असंख्य स्त्रीपुरुषांना कैद करून नेले, मथुरा लुटली, सोमनाथ फोडून अनन्वित अत्याचार केले. सन १२००त महंमद घोरीच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानचा सत्यानास अफगाणांनी केला.

शहाजहानच्या कारकीर्दीतील ( १६२७ ते १६५८ ) धुमाकुळाचा अनुभव समर्थ रामदासस्वामींच्या डोळ्यांनी व कानांनी प्रत्यक्षच घेतला होता. त्यामुळेच मुस्लीम शास्त्यांनी प्रजेविरुद्ध हिंदुस्थानात माजविलेले ते ' बहुता दिवसांचे बंड ' पाहून ' उत्सीदेयुरिमे लोकाः न कुर्यां कर्म चेदहम् । ' असे समर्थांना वाटले आणि त्यातूनही शासकांचा दुर्जनपणा रामदासांना स्वस्थ बसणे अशक्यच करू लागला. ( History of India by Mount Stuart Elphinstone व चिंतामणराव वैद्यकृत ' मध्ययुगीन भारत ' पहा. )

प्रजेच्या संपत्तिची व स्त्रियांच्या अब्रूची लूट, देवालयांचा व देवमूर्तींचा विध्वंस आणि लोकांना बाटविणे ही ' दुर्जन '-पणाची वैशिष्टये काही कमी संतापजनक नाहीत. त्यातून शहाजहान आपले दरबारातील सरदारांच्या बायकावर डोळा व हात मारीत असे, आणि अकबर मीनाबाझार भरवीत असे, हे लक्ष्यात घेतले म्हणजे एस्. आर्. शर्मांचे Mughal Empire in India, Elliot & Dowson Vol VI, बर्निअर, इतालियन ग्रंथकार जो मोंगलाकडे नौकरही होता तो मनुची, यांचे ग्रंथ कोणाला तपशीलवार वाचावयास शिफारस करण्याची देखील गरज नाही. जाळपोळ, कत्तल, धर्मवेडेपणा, बेइमानी व न्यायाची विटंबना इ. स. १२९६ पूर्वीपासून, विशेषतः करणवाघेला व अल्लाउद्दीन खिलजी यांच्या चकमकीतून राज्यनाश व कमलदेवी–देवलदेवीचा पावित्र्यनाश झाला, तेव्हापासून रजपूत स्त्रियांना करावे लागलेले जोहार, १६३५ मधील शहाजहानने बुंदेलखंडात केलेले अनाचार–अत्याचार ( श्री यदुनाथ सरकारकृत औरंगझेब भाग १ पहा ), मथुरेचा फौजदार मुर्शिदकुली याने पंड्याचे वेषाने यात्रायात्रातून घातलेल्या हिंदु-स्त्रियावरील धाडी, जोधपूर राज्यात देवळांच्या झालेल्या मशिदी, असे प्रकार नित्य निदर्शनास येऊ लागल्यावर, ईश्वरीकृपेला पात्र झालेल्या समर्थ रामदासासारख्या माणसाला बेचैन झाले नसते, तर तो महापुरुष वैयक्तिक मोक्षाचा स्वार्थीच होता, असाच आरोप इतिहासाने केला नसता काय ? आपल्या निरीक्षणातून रामदासांनी आपली हळहळ व्यक्त केली की १६४६ ते १६६० गावे लूट आणि खून यांचे आगर होते.

किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या । किती शांमुखी जाहजी फांकवील्या ।।
किती येक देशांतरी त्या विकील्या । किती सुंदरा हाल होवोनि मेल्या ।।

( दासबोधांचे द. ३ स. ओ. २७ ते ३० याही पहाव्या. )

समर्थांच्या पूर्वी अशा हृदयद्रावक अवस्थेची करुण कहाणी श्रीगुरुचरित्राच्या एकोणतिसाव्या अध्यायात आली होती. पण श्रीगुरुनृसिंहसरस्वतींचा पुण्यप्रतापही त्या अनन्वितांना आळा घालू शकला नव्हता ! कंधार येथील मशिदीच्या बाहेर ज्या बैठकी केल्या आहेत त्या अगर नंदुरबारेस मशिदीच्या दरवाजाचे चौकटीस वरच्या बाजूस बसविलेली शिला पहा, तेथे शंकराच्या पिंडी उपडचा करून वापरल्याचा प्रत्यय येईल. टॅव्हरनिअर या प्रवाशाने आपल्या भारतभ्रमणाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे, त्यात राजाज्ञेने हिंदुधर्माचा व वैदिक संस्कृतीचा उच्छेद कसा मांडला होता, त्याची वर्णने मिळतात. ती वाचली म्हणजे समर्थांनी दासबोध द. ६ स. ६, ३४, ३५ मध्ये वर्णिलेली स्थिति सत्यच असल्याचे प्रत्ययास येते.

येक देव दुराचारी । फोडिला बळे ॥
येक देव जाफाणिला । येक उदकी टाकिला ॥
येक देव नेऊन घातला । पायातळी ॥

गोवळकोंडचाच्या कुतुबशाहीच्या नोकरीतून सुटलेल्या व पुढे मोंगलाईकडे नोकरीस गेलेल्या मीरजुमलाच्या मनात आले की त्याने गाजीकोट किल्ल्यावर तोफा ठेवण्यासाठी मायले या पाश्चात्य कारागिराची नेमणूक केली व ठिकठिकाणच्या देवळातील सोने, रुपे, तांबे, पितळ या धातूंच्या असंख्य मूर्ति गोळा केल्या. गंजीकोट येथील प्रख्यात देवस्थानातील मूर्ति कामास आणल्या ही हकीगत १६५२ ची आहे. सन १६३६ ते १६४४ औरंगझेब दक्षिणेत सुभेदार असताना गोवळकोंडा व विजापूर येथील कुतुबशाही व अदिलशाही यांना जरबेत राखण्याकरता ज्या मोंगलांच्या स्वाऱ्या होत त्यात "मार्गात सर्व ठिकाणी मोंगल सैन्याने पिकांचा सपशेल नाश केला, घरे जाळली, गुरे पळवली, गावकऱ्यांच्या कत्तली केल्या. त्यामुळे भरभराटीत असलेली गावे कायमची बुडाली आणि लोकसंख्या कमी झाली" ( यदुनाथ सरकारकृत औरंगझेब पहा ) मनुचीने लिहिले आहे की विजापूर-गोवळकोंडचावर स्वारी करण्यासाठी औरंगझेबाने औरंगाबाद सोडले, त्यावेळी कूच करण्याच्या पूर्वी सहा दिवसाहून जास्त दिवस आधी, आपल्या आखलेल्या रस्त्यावर ऐंशी काफराना बळी द्यावे असा हुकूम झाला. एका रांगेत लोकांना ओणवे उभे करून त्यांचे हात बांधावेत आणि त्यांची डोकी उडवावी असे मार्गदर्शन होते. ( प्रवास आणि पर्यटने हे केर याचे पुस्तक, ब्रिकने दिलेल्या जहांगीरच्या आठवणी, यात्रेकरू रेव्ह टेरी वगैरे ग्रंथ वरीलबाबत पुरावा देतीलच. ) औरंगझेबाला कसलीही वचने देण्यात व ती मोडण्यात काही कमीपणाच वाटत नसे.

अशा स्थितीत समर्थ रामदासांना कृतिप्रवर्तक लोकशिक्षण देऊन लोकांना तेजस्वी करण्याची बुद्धि झाली, आणि त्यानी ठरविले की-

'जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळू हळू शिकवावे ।
शहाणे करून सोडावे । सकळ जन ।'

म्हणून मग रामदासांनी आपले मठ ऊर्फ समर्थ विद्यालये ठिकठिकाणी स्थापिली. अखिल भारतात समर्थ रामदासाचे अकराशे मठ होते. कास्मे ड गार्डा याने सन १६९५ मध्ये लिहिलेल्या शिवचरित्रात, शाहिस्तेखानाच्या पुरंदर-परिसरातील रहिवासाचे वर्णन करीत असता 'शिवाजी व रामजी ' या मथळ्याखाली गार्डा लिहितो-

'या भागात एक प्रचंड संस्था आहे तिचा उल्लेख जरूर केला पाहिजे. संस्थेचा अधिकार विस्तृत भूभागावर चालत असून संस्थेचे अधिपति एक थोर ब्राह्मण गृहस्थ आहेत. बाहेर अनेक लढाया चालू असल्या तरी या संस्थेत कोणाही शिवसैनिकाने केव्हाही जावे आणि शांततासौख्य भोगावे सैनिक मुसलमान असो अगर हिंदु आणि हिंदूपैकी कोणत्याही जातीचा असो, त्यास तेथे मुक्तद्वार असते. बाहेरचे सारे विरोध या ठिकाणी मावळतात, असा या संस्थेचा अधिकार आहे; आणि म्हणूनच ही संस्था साऱ्या हिंदुस्थानचा दवाखाना होऊन बसली आहे. जो कोणी या संस्थेत जातो, मग तो कोणीही असो, त्यास तेथे अन्न आणि राहण्यास जागा ही सुखाने मिळतात. या मठपतींचे म्हणणेच असे आहे की, परमेश्वर कित्येकांना संपत्ती देतो ती इतरांच्या सुखसोयीसाठी दिलेली असते. आपली सारी कमाई रंजल्या-गांजलेल्यासाठी आहे, अशा भावनेनेच मठपति वागत असतात. ही त्यांची वृत्ति असामान्य असलेमुळे सर्व देशभर त्यांच्याविषयी अत्यंत आदरभाव आहे. या भागातून वारंवार लष्कर जाते, त्या सर्व सैनिकांना जगात हा एकच अवतारी पुरुष आहे, असे वाटते. मठपतीने आपले जणू हेर सर्वत्र विखुरलेले आहेत की मठाला डावलून कोणी जाऊच नये. 'आम्ही काय कुणाचे खातो? तो राम आम्हाला देतो.' ते माझ्या एकट्यासाठी नसून सर्वांसाठी असते. या महंताचे भजन-

श्रीरामजी, जयरामजी जय जय रामजी ।
तारक तुजविण न दिसे दुसरा पूर्ण करी मनकामजी ॥

असे असून त्याचे नाव रामजी आहे. त्याजवर ईश्वराची पूर्ण कृपा आहे. त्याचा दानधर्म वाया जाणारा नाही.' ( Foreign Biographies of Shivaji P 60-61 पहा )

काशी-कांती-कोल्हापूर । काश्मीर, कुशावर्त, काऊर ।
कानड-कर्नाटक-कंदार । कनकी लंका ॥१॥
अयोध्या-काशी-कोल्हापूर । मथुरा, दिल्ली, मातापूर ।
द्वारावती बुऱ्हाणपुर । बंकापूर

अशी समर्थ रामदासांची भ्रमंती ( समर्थ वाग्देवतामंदिर बाडांक ६१८ पहा ) झाल्यावर,

'काशीपासूनि रामेश्वर । समर्थ सांप्रदाय अपार ।
बोध प्रसिद्धी थोर थोर । प्रस्थाने रूढली ।'

असे मेरुस्वामीना सांगितले असून, त्या अपार सांप्रदायाने

'लोकी लोक वाढविले । तेणे अमर्याद जाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ।' त्यामुळेच

'कट्ट घालूनि राजकारणा । लोक लावी ।' (दा. १५-२-२५) अशी महति समर्थ सांप्रदायाला आली. कारण,

'कित्येक म्लेंच्छ होऊन गेले। कित्येक फिरंगणात आटले ।' एवढेच नव्हे तर,

'देवमात्र उल्लंघिला । आपुला स्वधर्म बुडविला ।
नित्यापरीस मृत्यु आला । ऐसे समजा ॥'

(समर्थ वाग्वदेवता मंदिर; क्षात्रधर्म बाडांक ६३ पहा.)

असे लोकनिदर्शनास स्पष्ट आणून-

'प्रपंची जाणे राजकारण । परमार्थी साकल्यविवरण ।
सर्वामध्ये उत्तम गुण । त्यांचा भोक्ता ॥ दा.१९-४,१७ ॥'

माणसाने झाले पाहिजे, असा उपदेश मठामठातून दिला जाई. तसे जर झाले नाही तर-

'मऱ्हाट देश थोडा उरला । राजकारणे लोक रुधिला ।
अवकाश नाही जेवायला । उदंड कामे ॥ दा. १५-२-४॥'

ती कोणी करावयाची व व्हावयाची कशी ?

फितव्याने बुडती राज्ये । खबरदारी असेचि ना ।
युक्ति ना शक्ती ना वेगी । लोक राजी असेचि ना ॥
बेदादी बेकैद सेना । कारबारीच चोरटे ।
धन्यासि राखणे राजी । कदाकाळी घडेचि ना ॥
चो टी होरटी तुंदे । नासके लाच इच्छती ।
लौंडीचे दुरी घालावे । मारावे राजकारणे ।' (स्फुट प्रकरण ६०-३४ ते ३६)

मनुचीने आपल्या ग्रंथात म्हटले आहे की 'ऐहिक आणि पारलौकिक' या दोन्ही दृष्टींनी पाहता हा देश राहण्याला योग्य नाही! कोणावर म्हणून विश्वास टाकावयाची सोय नाही. अखंड सावधच राहिले पाहिजे. नेहमी वाईट धरूनच चालले पाहिजे. बोलतात त्याच्या उलट खरे असेल, असेच मानून चालावे लागते. तुम्ही सावध असा किंवा नसा, ते (मोंगल राज्यकर्ते) सर्वांशीच लबाडीने वागतात. मैत्रीचा त्यांनी बहाणा केला, तर मग अतिच जपले पाहिजे. जेथे न्यायबुद्धी नाही, वचनाची चाड नाही, वतनात कसलाच निर्बंध नाही, अशा देशात आत्मोन्नति ती कोठली?' समर्थ रामदासांनी ही निरीक्षिलेली परिस्थिती अशीच नव्हती काय?

तुंड हेकाड कठोर वचनी । अखंड तोले स्वाभिमानी ।।
न्याय नीति अंतःकरणी । घेणार नाही ।।
तऱ्हे शीघ्रकोपी सदा । कदापि न घरी मर्यादा ।
राजकारण-संवादा । मिळोचि नेणे ।।
ऐसे लौंदे बेईमानी । कदापि नाही वचनी ।
पापी अपस्मार जनी । राक्षेस जाणावे ।। (दा. १८-६-३ ते ५)

अशा स्थितीत 'परमार्थी कैवशीराजा' निर्माण करावयाचा किंवा व्हावा अशा तजवीजा करावयास लोकमताचेच परिवर्तन घडविणे जरूर होते. म्हणून मनुचीचे मतानेसुद्धा 'मराठे हे अत्यंत शूर आणि धाडशी आहेत असा त्यांचा देशभर लौकिक आहे.' त्यांनाच संघटित करण्याचे ठरवून कृष्णाकाठी रामदासानी प्रथम विचारक्रांतीला सुरवात केली. ती आदिलशाहीच्या ऐन मोक्याच्या दऱ्याकुटातून, आणि टाकळीपासून परिचित असलेल्या शहाजीराजांच्या मसूर येथील पाटीलकीच्या परिसराचे आसमंतात. 'देवा सोडविता प्रभु रामचंद्र' हे दैवत लोकमानसापुढे उभे करून-

'मऱ्हाठा तितुका मेळवावा । आपुला मऱ्हाट धर्म राखावा ।
येविषी न करिता तकवा । पूर्वज हासती ।।१।।
मरणे हक ते चुकेना । देह वाचविता वाचेना ।
विवेकी होऊन समजा ना । काय करावे ।।२।।
देवद्रोही तितुके कुत्ते । मारून घालावे परते ।
देवदास पावती फते । यदर्थी संदेह नाही ।।३।।
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुक बडवावा बुडवावा । धर्मस्थापनेसाठी ।।४।।
विवेक विचार सावधपण । दीर्घ यत्न केलाचि करणे ।
तुळजावराचेनि गुणे । राम रावण बुडविला ।।५।।

असा इतिहासाचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडविणेची प्रेरणा रामदास लोकाना आपल्या मठामार्फत देत राहिले.

'उदंड राजकारण तटले । तेणे चित्त विभागले ।' म्हणून आपल्या शिष्य-प्रशिष्यानासुद्धा आपापल्या मगदुराप्रमाणे रामोपासना करता करता, राजकारणातही लक्ष घालावयास समर्थ रामदासांनी निक्षून सांगितले आहे. 'मुख्य हरिकथा-निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।' हे आपल्या सांप्रदायाच्या सूत्रावलीत तर रामदासांनी गोवलेच पण 'हरिकथानिरूपण । नेमस्तपणे राजकारण । वर्तायाचे लक्षण । ते ही असावे (दा. ११ ६-४),' असे बजावून हरीकथानिरूपण । बरेपणे राजकारण । प्रसंग पाहिल्यावीण । सकळ खोटे ।। (दा. १२।

२।२९)' अशी मर्यादा सांगून 'राजकारण बहुत करावे । परंतु कळोंच नेदावे ।। (दा. ११।५।४९ )' असे इशारतीचे बोलणेही समर्थ रामदासांनी सांप्रदायिकाशी केले आहे कारण राजकारण येरागबाळांचे व बाजाऱ्यांचे काम नव्हे. 'समयासारखा समयो ये ना।'' Opportunity once lost never returns, याबद्दलची दक्षता डोळ्यात तेल घालून राजकारणात घ्यावी लागत असल्याकारणाने तेथे 'नेम सहसा चालेना । नेम धरता राजकारणा । अंतर पडे ।।' असा सार्वत्रिक अनुभव आहे. तरीही राजकारणाला आपला म्हणून काही तात्विक व भौतिक शिस्तीचा नेम ठेवावयासच लागतो. उघडच, आपलेच तेवढे खरे म्हणून आपण बसू तर राजकारणाला अंतर पडते, ते पडू न देण्याकरता काही तडजोड करावयास तयारी झाली तरी 'ती धूर्तपणाची कामे ।' आपले तात्त्विक व नैतिक 'राजकारण करावे नेमे । ढिलेपणाच्या संभ्रमे । जाऊ नये ।। (दा. १५।९।२७ )' या शीलवंतपणानेच हाताळावयास आली पाहिजेत. नाही तर 'मोठी राजकारणे चुकती । राजकारणे वेढा लागती । नाना चुकीची फजिती । चहूकडे ।। ( दा. १९।८।१५ )' आपले सांप्रदायिकांना म्हणूनच समर्थ रामदासांनी त्याबाबत सूचना केल्या आहेत की- (१) बहुतांना राजी राखावे (२) समुदाय करावे (३) बहुत सोसावे (४) उपाधीस कंटाळू नये (५) कशाही प्रसंगी धीर सोडू नये ( ६ ) अखंडे सावधानता ठेवावी ( ७ ) दुश्चित कदापि नसावे ( ८ ) प्रयत्नांची पराकाष्ठा करावी ( ९ ) जीवाचीही परवा करू नये (१०) नीतिन्याय सोडू नये ( ११ ) अकारण भरी भरू नये (१२) फड नासू देऊ नये (१३) 'चाळणे' चा आळस करू नये (१४) अखंड तजवीजा करीत असावे (१५) जशास तसे हे धोरण ठेवावे (१६) संघटनेत ढिलेपणा येऊ देऊ नये, व (१७) प्रपंची खोटा तो परमार्थीहि खोटाच ठरतो हे विसरूच नये.

समाजाची सुस्थिति समाजाचे नेतृत्व करणाऱ्याची धर्मनिष्ठा, आचारशीलता व कर्तव्यपरायणता यांच्यावर अवलंबून असते. त्यांच्यामध्ये कर्म, ज्ञान आणि उपासना ही वाढीस लावण्यासाठी रामदासानी उद्योग आरंभिला तो राष्ट्राचे आणि परमार्थाचे दोन्ही दृष्टीनी उत्तम साधला पाहिजेच म्हणून. ते घडवून आणण्यासाठी ज्ञानी, विरक्त, निःस्पृह आणि समुदाय मिळविण्यात कुशल असे कार्यकर्ते निर्माण करून ते सर्वत्र विखुरले पाहिजेत. हा आटोप रामदासांनी केला. जीवनाचे उदात्तीकरण करण्याची किमया रामदासांच्या वाणीत होती.

'घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रम्हांडाहुन जाड ।
तेथे कैचे आणिले द्वाड । करंटपण ।।'

असा सवाल करून 'उत्कृष्ट, भव्य तेचि घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे ।।' असे मार्गदर्शन रामदासांनी केले. परमार्थाबरोबरच, परमार्थाचे अंग म्हणून, प्रपंचही यशस्वी केला पाहिजे हे आर्जवून सांगणारा रामदास हा एकटाच संत होऊन गेला. प्रपंचाचे एक अपरिहार्यपणे प्रभावी अंग म्हणून राजकारणाचे

विवरण साधेल त्या प्रसंगांनी सदैव करणारा संत रामदासच होय. दासबोधातील (११-५ व १९-९) हे दोन समास राजकारणासच वाहिले असून त्यात राजकारणाचे तत्त्व व वर्तन रीति सांगितली आहे. शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने कार्य होतसे । शक्तियुक्ति जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।' असे शिकविणाऱ्या रामदासानी वैचारिक क्रांति केली ती शिवाजीराजांच्या स्वराज्यक्रांतीस सहकारी व सहाय्यकारीच ठरली.

'शक्तीने मिळती राज्ये ।' हा रामदासांचा सिद्धांत असलेमुळे बलोपासनेच्या ध्येयाने रामदासांनी आखाड्यांची परंपरा निर्माण केली. (ती लो. टिळक व सावरकर यांच्या राजकीय चळवळींच्या ऐन उमेदीपर्यंत म्हणजे १९११ पर्यंत टिकूनही होती व ब्रिटिश सरकारलाही तिची धास्ती होती, हे जाणकारास सांगावयास हवे असे नाही ! ) शासनसंस्थेसह समाजधारणेच्या तेजस्वी व्यवहाराला रामदासांनी राजकारणाचे स्वरूप दिले आहे, कारण तेच जनसामान्यांच्या आटोक्यात व आटोपात असते. राज्यधारीच परमार्थी असावा, तोच प्रभुरामचंद्राप्रमाणे माणुसकीचे, न्यायनीतीचे राज्य निर्माण करू शकतो. ही रामदासांची धारणा असल्याकारणाने 'मनु चक्रवर्ती जाले । येणेचि न्याये ।' अशी परंपरा त्यांनी सांगितली आहे. मनुष्यमात्राशी निष्काम मैत्री ठेवून मानवी समुदाय न्यायनीतीने वर्तविण्यास, सामुदायिक जीवन पवित्र ठेवण्यास आणि सामाजिक अनवस्था व बेबंदशाही नष्ट करण्यास, विवेकी सावधपणाने दीर्घ प्रयत्न करणे हे रामदासांच्या महंती राजकारणाचे तत्त्वज्ञान असून, धनुर्धारी रामाच्या व शस्त्रधारी क्षत्रियांच्या राजकारणाशी समानधर्मी आहे. राजकीय परदास्य जाऊन परकीयाचा धार्मिक जुलूम नष्ट होण्यास आणि स्वराज्याच्या स्थापनेने स्वधर्माचरण निर्भय होण्यास, रामदासांनी महाराष्ट्राला त्यांचा स्वभावसिद्ध धर्म दाखवला. त्यांच्या अनुयायानी आपल्या ध्येयापुढे व ध्येय पुरुषापुढेच फक्त हात जोडावेत आणि इतरत्र प्रतापी ठाण मांडूनच रहावे, म्हणूनच रामदासांनी नुसते आखाडेच काढले नाहीत, तर आदिलशाहीच्या कऱ्हाड केंद्राचे कुशीत पहिलेवहिले मारुति स्थापन केले. शक्तिमंतातील शक्तिमंत आणि 'बुद्धिमतां वरिष्ठ' अशा प्रतापमारुतीची भक्ति तरुणामध्ये पसरविण्यात, तरुण निर्भय, सर्वसंचारी आणि निरपेक्ष सेवायोगी व्हावेत हाच रामदासांचा हेतु होता. कारण उत्कृष्ट पूजा म्हणजे पूज्य देवतेचे गुणानुसरणच. 'नासती तूटती चिंता आनंदे भीमदर्शने' अशी फलश्रुति असणारी भीमरूपी स्तोत्रे आदिलशाहीच्या कुशीतील केंद्रातून रामदासांच्या सांप्रदायामार्फत घुमू लागलेली ऐकून गावोगावी असा आत्मविश्वास निर्माण झाला की वेशीवेशीवर राक्षसाला पायी तुडविणाऱ्या प्रताप-मारुतीची देवालये आणि आखाडे उभे राहू लागले. सिमला या गावी रामदास कधी काळी गेले होते की नाही, हे नक्की सांगता येत नाही; पण तेथील प्रताप-मारुति रामदासांनीच स्थापला असल्याचे आजही सांगतात. यावरून, रामदासांच्या युवकोत्थानाची चळवळ कशी

यशस्वीपणे लोकमानसात घर करून बसली होती याची स्पष्ट कल्पना येते. 'अशक्य' हा शब्दच युवकांच्या ध्यानामनातून हद्दपार होऊन रहावा म्हणून प्रताप-मारुतीची स्थापना जशी गाव-वेशीवर व्हावयाची तशी आखाडचा-आखाडयातही व्हावयाची, यात नवल काहीच नव्हे; आपणास नेहमी यशच यश यावे अशी आकांक्षा धरणाऱ्या युवकाला म्हणजे स्वारशिपायापासून जनसामान्यालाही रामदास सांगत की–

ठसा हेमधातूवरी वातसूतु ।
तथा ताइताची वरी रौप्यधातु ॥

आपल्या दंडावर अगर गळयात ठेवावी म्हणजे जीवन कसे कणखर कर्मयोगाने चालवावयाचे, याची सतत जागृति राहील. 'कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे उत्तरेकडे।' ही महत्त्वाकांक्षा तरुणात निर्माण व्हावी आणि त्यानी–

'उचित हित करावे. उद्धरावे धरावे ।
अनुचित न करावे, सज्जनी येश घ्यावे ॥
अघटित घडवावे, सेवका सोडवावे ।
हरिभजन घडावे, दुःख ते वीघडावे ॥'

रामदासांना 'मुलांची आवडी' फार. त्यांच्यात ते समरस होऊन खेळत आणि आपल्या सांप्रदायिकासुद्धा 'भिक्षामिषे लहान थोरे परीक्षून' सोडीत. याचे कारण आपल्या सांप्रदायाला व 'गुप्तरूपे करावयाच्या राजकारणाला' नेहमी नव्या दमाची, नव्या उत्साहाची मंडळी मिळावीत. ती हिंदुस्थानच्या सर्व प्रदेशातून मिळण्यासाठी, ज्या प्रदेशात रामदास संचार करीत त्या प्रदेशाच्या देशभाषेने ते आपल्या पंथाचा व राजकारणाचाही प्रचार करीत. त्या दृष्टिने रामदासांच्या तेलगु कानडी-हिंदा-वाङ्मयाचे संशोधनपूर्वक प्रसिद्धीकरण अजून फारसे झालेलेच नाही. समर्थ वाग्देवतामंदिरातील 'हा समग्र ग्रंथ पाहिल्यावीण' सगळा रामदास समजावयाचा नाही, आणि समजला तरी येरागबाळांच्या पचनीही पडावयाचा नाही. 'म्लेंच्छ दैत्य मातला' असा माणुसकीचा मुडदा पाडून अरेरावी करणाऱ्या व सत्ता गाजविणाऱ्या परधर्मीयाबद्दल, रामदास समाजात असंतोष निर्माण करीत होते. तरी मुस्लीम-परधर्मार्थीबद्दल ते जिव्हाळाच बाळगत. 'कैपक्षी परमार्थी' नुसता राजा अथवा शासकच असून चालत नाही, समाजाची व राष्ट्रघटकांचीही ती वृत्ती असावी लागते. त्याचे साक्षात् उदाहरण रामदासच होते. त्यांच्याकडे मुस्लीम परमार्थीचीही ये जा असे, आणि त्यांच्यामध्ये व त्यांच्या द्वारा जमेल तर मुस्लीम समाजातही मिसळून रामदास आपल्या राजकारणासुद्धा सर्व सांप्रदायाचा प्रचार करण्यास कमी करत नसत.

'रे भाई, याद करो अल्लाहकी । हक चलणा सब दिल पाखी ॥६॥
कुबल बखतकु ज्यायेंगे । ज्यायागे मुसलमाना ।
वेग धरणीकी तलब आई । तब तो अलबत ज्याणा ॥१॥

हिंदु मुसलमान अल्लाह–निरंजन ।
दोउ नहीं रे, समज्यत समज्यत नहीं रे ।
बंदा कहे समजो रे भाई । सोई खुदाके प्यारे ।।२।।

अशी उपदेशपर हिंदी पदे रामदासांची अनेकानेक आहेत, ती आमूलाग्र अभ्यासलीच पाहिजेत; कारण ' नभामाजि तारांगणे । तैसे लोक ' आपल्या पाठीशी घेण्याच्या प्रयत्नातील रामदासांच्या उपायांचा मागमूस त्यायोगे अभ्यासकांना लागणार आहे. ' त्रैलोक्यास पडिले ठावे । सामर्थ्य ज्याचे । ' अशी रामदासांच्यावर रामकृपा व्हावयास, स्वतः रामदासांनी यत्नदेवाची जी पूजा केली तीही अभ्यास–ताना, लक्ष्यात येते की–

'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील त्याचे ।
परंतु तेथे परमेश्वराचे । अधिष्ठान पाहिजे । ।। दा. २०–४–२६ ।।

असा आदेश लोकांना देणाऱ्या रामदासांनी 'आधी केले मग सांगितले ।' या न्यायाने, सब देशभर हजारो मठ स्थापिले, लक्षावधि जनांची मने आपलोशी करून घेतली, श्रीशिवरायांच्या यशासाठा देवोला भार घातला आणि शिवरायासारखा 'कैपक्षी परमार्थी' राजा देशाला मिळाल्यानेच रामराज्य-निर्माणाची कृतार्थता मानली. म्लेंच्छ शासकानी वैदिक धर्मानुयायांची उर्फ हिंदूंची देवालये आणि त्यातील देवमूर्ति छिन्नभिन्न केल्या पण एकाही मशिदीचा विध्वंस समर्थसांप्रदायि–कांनी व स्वतः श्रीशिवरायांनी चुकूनही केला नाही असे 'कैपक्षी परमार्थी' व्रत कटाक्षाने पाळण्यात आले. मात्र सत्ताधारी व आक्रमक 'मांदरांचे मुडदे' पाडत असता रामदासांनी जनतेला ठणकावून उत्तेजना दिला की 'मांडिली (भगली) देवळे बांधावी.' स्वतः रामदासांनी सन १६४७ साली अंगापूरच्या डोहातून रामप्रभूंचो व अगराई भवानीची मूर्ति काढून त्यांची स्थापना अनुक्रमे चाफळास व परळीच्या किल्ल्यावर केलो. चाफळास ग्रामाधिकाऱ्यांनी स्मशानभूमीची जागा दिली, तरी त्या स्मशानभूमीतही राम–प्रताप–पताका उभारून श्रीरामाचा उत्सव १६४८ पासून सुरू केला व राममंदिर बांधून आपल्या सांप्रदायाचा मुख्य मठ तेथे तयार केला. तेथ देशभर विखुरलेल्या मठांच्या अधिपतीस आपल्या वार्षिक कार्याचा आढावा रामोत्सवाचे वेळी सादर करण्याची प्रथा सुरू केला. परळीच्या किल्ल्यावर तर मशिदीच्या सामने भवानीची स्थापना करून त्या 'राम-वर–दायिनी' ला आळविले. 'साहसे श्रीः प्रतिवसति ।' एवढेच यात धोरण नसून 'वन्हि तो चेतवावा रे चेतविताचि चेततो ।' या तत्त्वावर रामदासाची श्रद्धा असल्यामुळे, रामचरित्राचा आदर्श आणि रामोपासनेचा मार्ग जनतेच्या मनावर बिंबवण्यासाठी उदाहरण घालून देण्याचाच तो उद्योग होता.

'रावणासारखा भुवनकंटक रामाने निर्दाळिला' म्हणून रामोपासनेची जोपा–सना करावयाची तर रामासारखेच शस्त्रधारी व्हावयास नको का? तो क्षात्रधर्म

रामदासांनी जनतेत तीव्रतेने जागा करण्यास कमी केले नाही. देवाना रावणाच्या बंदीवासातून मुक्त करणाऱ्या रामाचे दैवत महाराष्ट्रापुढे उपास्यदैवत मांडण्यात लोकांनी रामाप्रमाणेच वेळप्रसंगी युद्ध करूनही देश स्वतंत्र करावा हे ध्येय लोकास सुचवावयाचे असून त्या स्वातंत्र्य-संपादनासाठी शक्तियुक्तिचा आगर असलेला ध्येयनिष्ठ, अनासक्त सेवायोगी लागतो त्यानेच शत्रुचे मरण कशात आहे हे शोधून काढावयाचे असते आणि त्या शत्रूच्या मर्मावर रामबाण चालविला की पारतंत्र्य पार चक्काचूर होते. एरवी आणि राजाज्ञा होईल त्या त्या वेळेला 'मारता मारता घ्यावे। राज्य आपुले।' असाच मामला हाकावा लागतो. या सर्वच बाबतीत आवश्यक ती शस्त्र वापरावीच लागतात. शीख गुरुगोविंदसिंगानी स्वसंरक्षणार्थ सन्तही सशस्त्र असला पाहिजे असा दण्डक घालून दिला होता. तो समर्थ रामदासांच्या परिचयाचाच होता. आपल्या पुरश्चरणाच्या व तीर्थाटनाच्या काळात स्वसंरक्षणाकरता रामदास तिरकमठा व गोफण वापरीत असत. पण गुरुगोविंदसिंहांची गाठ (१६३४) पडल्यापासून एक दुधारी तलवारही ते जवळ बाळगू लागले. पण ती कुबडीत सांभाळलेली गुप्ती असे गुरुगोविंदसिंगाच्या तरतूदीतील मर्म व आपल्या गुप्तता राखून राजकारण करण्याचा बाणा यास धरून रामदासांची ती योजना असे. समाजातील शक्तिदेवता समाजाला वरदायिनी व्हावी म्हणून राम-मारुतींच्या उपासनेबरोबर 'राम-वर-दायिनो' भवानीची उपासना करण्याबद्दल रामदासांचा आग्रह असे. ती महिषासुरमर्दिनी दैत्यसंहार करणारी तर खरीच पण श्रीरामाला लंका दाखवून विजयाचा वर देणारी असल्याकारणाने समाजातील मातृदेवतापूजनाचे दिग्दर्शन करण्यावरही रामदासांचा कटाक्ष होता. सामर्थ्यसंपन्न होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्राला शक्तिदेवतापूजन हा राजकारणाचा पाया करावाच लागतो.

रामदासांनी शक्तिदेवतेची प्रार्थना केली ती राष्ट्रोत्थान व राष्ट्रप्रतिष्ठा या ध्येयभावनाची साक्ष पटविणारीच आहे. पहा-

तुझेनि सर्व बोलणे । तुझेनि सर्व चालणे ।
तुझेनि योगधारणे । तुझेनि राजकारणे ॥१॥
त्रिलोकी जितुके प्राणी । शक्तीवीण वृथा वृथा ॥२॥
मुक्त केल्या देवकोटी । समर्था वरु दीधला ॥३॥
बोलता भवानी माता । महींद्र दास्य इच्छिती ॥४॥

तेव्हा रामदास प्रार्थना करतात की-

येकचि मागणे आता, द्यावे ते मजकारणे ॥५॥
तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाचि देखता ॥६॥
रामदास म्हणे माझे, सर्व आतुर बोलणे ॥७॥
क्षमावे तुळजे माते इच्छा पूर्णचि ते करी ॥८॥

रामदासांनी शक्तिदेवतेला बजावण्यासही कमी केले नाही–

'दैत्य संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो ।
परंतु रोकडे काही । शीघ्र आम्हासि दाखवी ॥'

म्हणूनच ते लोकांनाही सांगत की–

" सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख ॥ "

रामदास असे स्पष्टोक्तीने आपला पंथप्रचार करीत होते, ते भरमसाट आततताईपणाने नव्हे. त्यांनी––

" अंतरी कल्पना केली, एकान्ती बोललो बहु ॥ "

अशी आपल्या प्रचाराची पार्श्वभूमि सांगितली आहे. उत्तर भारताच्या तीर्थयात्रेत गुरु गोविंदसिंगाशी जसे रामदास एकान्ती बोलले ( श्री. काकासाहेब गाडगोळकृत शिखांचा इतिहास पहा ) आणि त्यांनी " गुप्ति " हाती धरली, तशीच आणखी कोणाकोणाशी एकान्तातली चर्चा त्यांनी केली याचा स्पष्ट उल्लेख राम–दासांनी आपल्या राजकारणातील गुप्ततेच्या धोरणाप्रमाणे केला नसला तरी दक्षिणेत शहाजी राजांसारख्याशी त्यांची " एकान्ती बोलणी " झाली होती, हे ऐतिहासिक पदविन्यासानी स्पष्टच आहे. सन १६३१ (शके १५५३ ) त शहाजीराजांचा मुक्काम नाशिक त्र्यंबक–भागात असता, त्यांचा व रामदासांच्या निष्ठापूर्वक रामोपासना करण्यातील लौकिकाचा परिचय होता. त्याच्याच जोरावर ( शके १५६४) सन १६४२ मध्ये शहाजीराजांचा मुक्काम बंगलोरास असता, आपल्या तीर्थयात्रेत रामदास त्यांस भेटले आणि त्यातून आलेल्या मनोमन, सांकेतिक निर्भयतेने रामदासांनी शहाजीराजांच्या पाटीलकीच्या मसूर केंद्रात आणि आदिलशाहीच्या कऱ्हाडसारख्या सत्ताकेंद्राच्या कुशीत रामोत्सव सुरू केला व रामाच्या पालखीचे आड येणारी सरकारी झाडाची फांदी तोडून सफा केली. भूमिगत अथवा " गुप्ती चळवळ करण्याचा " ज्यांचा अभ्यास आहे त्यांना रामदाससबधीचे हे प्रत्ययाचे बोलणे पटणारे आहे. " राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावें ।' हे त्या धकाधकीच्या मामल्यातील कठीणपणा, बळकटपणा आणि चतुरपणा न समजणाऱ्या व लेखी पुराव्यावरच आपल्या इतिहासाचा भर देणाऱ्या पुस्तकी पोपटपडितांना समजणेच कठीण ! बंगलोरला शहाजीराजांशी रामदासांनी एकान्ती बोलणे करण्याच्या सुमारासच राजांनी आपला सुपुत्र शिवाजी यास आपल्या मावळच्या मुलुखाचा कारभार कुशलतेने चालविण्याकरता दादोजी कोंडदेवासह धाडले नव्हते काय ? आणि रामदासांनी मसूरास १६४५ साली ( शके १५६७) केलेल्या रामोत्सवाचे वेळी मसूरच्या देशमुखीचे कामासाठी शिवाजी महाराज उपस्थित होते, हे दासविश्रामधाम या ग्रंथात नमूदही आहे. " राम हा देव देवांचा । देव प्रत्यक्ष सोडिले । " एवढेच नव्हे तर " विबुधा आश्रयो ज्याचा । पावलें बंधमोचने । " हे रामोपासनेच्या प्रस्थापनेतील मूलभूत प्रमाण जनतेत स्थिरपद पावत गेले. रामदास

श्रीरामाला समर्थ म्हणत आणि औदत्ताक्य शिकवीत की "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ?" चाफळास राममंदिर होऊन रामोपासनेच्या वार्षिक उत्सवाची व्यवस्था परकीय सत्ताधाऱ्यांच्या मनात किल्मिष न यावे या बेतानेच रामदासांनी आखली. त्या व्यवस्थेला शिवाजी राजे १६५८ पासून दरसाल दोनशे होन देऊ लागले व "कैपक्षी परमार्थी" झाले, हे जगाच्या प्रत्ययासच आले.

'महीमंडळी लोक नाना मुर्शीचे। असंभाव्य लीला कलाकूसरींचे ॥
कितियेक साधे कितीयेक बोधे। कितियेक ते देखिले मंदबोधे ॥१॥
कितियेक बाताड कावाडवाणे। कितियक पापी पुराणे पुराणे ॥
कितियेक तोंडाळ बोढाळ, ऊणे। कुशब्दी किती येक वाचाळ सूणे ॥२॥
करंटे, कुरूपी, विकारी, भिकारी। कितियेक ते तामसी दुःखकारी ॥
कितियेक ते पातकी पापरूपी। कितियेक ते दक्ष पुण्यप्रतापी ॥३॥
भले नष्ट पापी दुरात्मेचि काही। जनी पाहता सारिखे एक नाही ॥
बहु लोक हे तो बहुतापरीचे। कले ते हरीचे तथा दुर्भरीचे ॥४॥
भल्यांचे भले बोलती रम्य वाचा। देहे सुकृती चालतो सुकृतांचा ॥
फिरे दास ऊदास लोकास पाहे। मनामाजि थक्कीत होवानी राहे ॥५॥

असा अनुभव शिवाजीराजांचा व रामदासांचाही होता. तथापि राजकारण व धर्मकारण करणारांना 'पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे। तितुकी भगवंताची घरे' आहेत असे धरून चालावे लागते. परकीय शासन रोज आकान्त मांडत असता अगर अस्मानी सुलतानी ओढवली असता, जनतेस सांगावेच लागते की–

"धीर धरा, धीर धरा, तकवा। हडबडू गडबडू नका ॥
काल देखोनी वर्तावे। साडावे भय पोटिचे ॥"

आणि त्याला उपाय ? 'उपासिकासि सूचना। उपासना, उपासना ॥'

आणि स्वतः 'हिंडता पारखी लोका। कार्यकर्ता जिवी धरी ॥' असा लोक-संग्रह करीत जावे लागते. शहाजीराजांच्या बंगलोर येथील भेटीच्या वेळी बाल-शिवाजी रोहिडे खोऱ्यात हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीच्या उद्योगास लागला आहे, असे रामदासांना कळलेच होते. शिवाजीराजाची व रामदासांची ओझरती भेट मसुरास रामोत्सवाचे वेळी झाली होती. पुढील चार वर्षांत चाफळला रामदासांचा बस बसला आणि रोहिडेश्वरापुढे स्वराज्याची शपथ घेणाऱ्या सवंगडयांच्या मर्दु-मकीने शिवाजीराजानी स्वराज्याचे 'तोरण' बांधून कोंडाणा, राजगड, पुरंदर असे किल्ले हस्तगत केले.

शिवराजांच्या धामधुमीमुळे विजापूर-दरबार चिडला आणि त्याने शहाजीस कपटाने पकडून विजापुरास बंदीखान्यात कोंडले. शहाजीराजांच्या जीवास धोका निर्माण होण्याचा संभव टाळण्यासाठी शिवराजानी मोंगलांचा शह विजापूर दरबारला

देण्यासाठी प्यादी हलविली होतीच. त्या आपल्या लौकिक उद्योगाला साधुसंताच्या आशीर्वादाची जोड मिळावी म्हणून शिवराजानी संत-तुकाराममहाराजांच्या भेटीने संधान साधले. त्या विरक्त भगवद्भक्ताने राजकारणात लक्ष घालणारे सन्त म्हणूनच रामदासाकडे बोट दाखविले. तेव्हा रामदासांच्या भेटीसाठी शिवाजीराजे रामदासांचा ठाव-ठिकाणा पाहू लागले. इकडे रामदासही शिवरायाच्या भेटीसाठी आतुर होतेच. कारण देशस्थितीतील उद्रेकांनी दोघांच्या हृदयांची स्पंदने परकीय सत्तेच्या उच्चाटणाच्या खडकावरच आपटत होती. त्यांनी शिवरायास आपली मनीषा व्यक्त करणारे पत्रच पाठविले—

निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥१॥
या भूमंडळाच्या ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हाकरिता ॥२॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले ।
कित्येकासी आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥३॥
तुमचे देशी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंध विस्मरण आले । वा काय नेणू ॥४॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणे काय तुम्हाप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥५॥
उदंड राजकारण तटले । तेणे चित्त विभागले ।
प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ॥६॥

यातील (ओवी ४) 'ऋणानुबंध विस्मरण जाले, वा काय नेणे।' हे शहाजीराजापासून चालत आलेल्या परिचयप्रसादालाच उद्देशून नाही काय? मूळ सारे पत्रच 'कैपक्षी परमार्थी' चे द्योतक आहे. 'महाराष्ट्रधर्म राहिला काही तुम्हा कारणे ॥' हे जसे अध्यात्म्याच्या भूमिकेवरून गुणग्रहण आहे, तसेच सर्व पत्रही शिवरायांच्या महत्त्वाकांक्षेसंबंधीचा अभिमानच व्यक्त करणारे आहे. परमार्थी म्हणजे अत्यंत वैभव असणारांचा वा मिळवू इच्छिणाऱ्यांचा कैपक्ष घेऊन त्यास लोकसेवेस लावण्याचा ध्वन्यर्थही त्यात कमी नाही.

रामदासांच्या राजकारणाचा शिवाजीमहाराजाशी गुह्यात गुह्य असा निकट संबंध होता, हे समर्थ रामदासांचे एक शिष्यश्रेष्ठ दिवाकर गोसावी यांची शिवाजीराजे यांचेकडे राबत्याची जा ये असे त्यावरून स्पष्टच होते राजकारणाच्या घटनांचा आणि गुप्तगूंचा परिस्फोट होऊ द्यावयाचा नाही असा रामदासांचा कटाक्षाने दण्डक असल्यामुळे, शिवरायाबरोबरीच्या गुप्त खलबतांचा वाकेनिसी टिपणातून संकेत-सूचनांनीच उल्लेख आहे. या टिपणातील नोंद क्रमांक १८ मध्ये लिहिले आहे, की शिवाजी महाराज यास त्रयोदशाक्षरी मंत्राचा अनुग्रह शके १५७१ त शिंगणवाडीचे बागेत वैशाख शु॥ नवमी गुरुवारी

झाला. 'वरकड शिवछत्रपतिप्रकरण आलाहिदा लिहिले आहे' या नोंदीवरून शिवाजी महाराजांच्या भेटीगाठींचे वृत्त मुद्दाम वेगळे लिहून ठेवीत असत हे स्पष्ट होते. अशा नोंदी वाकेनिसी टिपणात आठदहा तरी आहेत, नोंद वेगळीच ठेवण्याइतका शिवसमर्थांच्या दृढ संबंधातील वरचेवर बारकावा ज्याअर्थी दक्षतेने पाळला गेला, त्याअर्थी तो 'राजकारण कळोच नेदावे' या धोरणाशिवाय दुसऱ्या कसल्या कारणासाठी असणार?

सन १६४९ नंतर रामदासांनी अधून मधून परळीचे किल्ल्यावर मुक्काम करण्याचा पायंडा पाडला. त्याकाळी यावनी सत्ताच किल्ल्यावर होती, तरी सिंहाचे गुहेत शिरूनच त्याची आयाळ हलविण्यासारखेच धाडस रामदासांच्या जवळ असल्यामुळे, ते निर्भय संचार करीत. राजकारणाच्या आटोपातील समर्थ संचाराचे तसे उदाहरण सन १६५४ (शके १५७६) साली झालेले अभ्यासूस आढळते. त्या साली आपल्या सांप्रदायाचा प्रमाणग्रंथ दासबोध स्वस्थपणे लिहिण्याच्या निमित्ताने रामदासांनी शिवथर घळीत मुक्काम ठोकला. त्यावेळी शिवथरघळीच्या वरच्या बाजूस राहणारा दिमाखदार चंद्रराव मोरे हा आदिलशाहीचा सरदार आपला करडा अमल जावळी प्रांतावर चालवून विजापूरकर सुलतानापेक्षाही तोऱ्याने प्रजेला वागवी. सूर्यापेक्षा त्याच्या किरणांनी तापलेली वाळूच अधिक तापदायक असते. तेव्हा त्याचा नूर, मगदूर आणि मग्रूरी रामदासांच्या अनुभवास येत गेली. तेव्हा शिवरायास "अमर्याद फितवेखोर। त्यांचा करावा संहार।" (कारण खरडून अगर रगडून अथवा स्नेह-संपादणीने मावळून जाण्याचा संभव चंद्रराव मोऱ्यांच्या फितवेखोरीबाबत अगदीच नाही, असा अंदाजच आला.) शेवटी १६५५ त शिवरायांना जावली हस्तगत करावी लागून १६५६ (शके १५७८ वैशाख) मध्ये चंद्रराव मोऱ्यांना पुण्यास आणून स्थानबद्ध करून ठेवणेच शिवरायांना भाग पडले. सामदामादि स्नेहोपायांनाही त्याने दाद दिली नाही, तेव्हा शिवरायांना आपल्या मार्गातील काटा नष्ट करणेच आले.

सन १६५९ त (शके १५८१ त) रामदास प्रतापगडच्या जवळ शिवथरघळीत व महाबळेश्वराच्या परिसरात चातुर्मास्याचे काळात होते. याच सालात शिवरायांच्या विजयमालिकेत मेरुमण्यासारखा शोभणारा 'अकारपूर्वक' यवनवध झाला. या महत्कृत्यात आपल्यापरीने सल्लामसलत देण्याचे कार्य रामदासांनी केले आणि राजकारण शिजविले, ते दासबोध द. १८ स. ६ मधील—

'नाना वस्त्रे नानाभूषणे। येणे शरीर श्रृंगारणे।
विवेक, बिचारे राजकारणे। अंतर श्रृंगारिजे ॥१॥'

आदि करून—

'म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुता दिवसांचे माजले बंड।
याकारणे अखंड सावधान असावे ॥२॥'

येथेपर्यंतच्या ओव्यावरून समजू शकते. अफझलखान विजापुराहून पैजेचा विडा उचलून निघाला आहे, तेव्हा—

'विवेके करावे कार्यसाधन । जाणार नरतनु हे जाणुन'

असा इशारा देणारे पत्र रामदासांच्या सांप्रदायातील मठाकडूनच शिवरायाला आले होते. अफझलवधानंतर शिवाजीराजे रामदासांना भेटले तेव्हा—

'सकळकर्ता तो ईश्वरू । तेणे केला अंगीकारू ॥'

या शब्दांनी त्यांचा गौरव रामदासांनी केला. 'उत्तम पुरुष लक्षण' अशा नावाने तो समास प्रसिद्ध असून त्याची रचना अशी चातुर्याची आहे की तो समास ज्या प्रसंगाने लिहिला त्याचे स्पष्ट प्रतिबिंब त्यात दिसते, हे काव्यातील ध्वन्यर्थ कळणाराना आवर्जून सांगणे नलगे. क्षात्रधर्म, राजधर्म, सेवकधर्म, सावधानता, तुळजाभवानीची स्तोत्रे वगैरे स्वतंत्र राजकारणाची प्रकरणे रामदासांनी लिहिली आहेत, तीही या समासाबरोबरच अभ्यासली तर रामदासाचे राजकारण साकल्याने लक्ष्यात यावयास नडच नाही. अफझुलवधासंबंधात समर्थप्रतापग्रंथात 'अफझुल-खानास मारवले' असा उल्लेख आहे—

'तुंड हेकाड कठोर वचनी । अखंड तोले साभिमानी ।
न्यायनीती अंतःकरणी । घेणार नाही ॥१॥
तऱ्हे शीघ्रकोपी सदा । कदापि न घरी मर्यादा ।
राजकारणाच्या संवादा । मिळोच नेणे ॥२॥
ऐसे लोंद बेइमानी । कदापि सत्य नाही वचनी ।
पापी अपस्मार जनी । राक्षस जाणावे ॥३॥

हे वर्णन वाचल्यावर अफझलखानाला रामदासांनी कसा अचूक हेरला होता, हे इतिहासाचे अभ्यासकांच्या चटकन् लक्षात येते आणि—

बहुतचि करिता हट । तेथे येऊनि पडले तट ।
कोणीएकाचा शेवट । जाला पाहिजे ॥८॥

म्हणून—

ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणे ॥

हे शिवरायांचेच धोरण रामदासांनी प्रशंसिले आहे; म्हणूनच समर्थप्रतापात गिरधरस्वामींनी 'अफझलखानास मारविले' असा स्पष्ट उल्लेख प्रथम केला असता सांप्रदायिक दण्डकास अनुसरून, नावाला मागाहून हरताळ फासला व 'अकारपूर्वक यवनास मारविले' असा सांकेतिक उल्लेख कायम केलेला दिसतो.

पुढे औरंगझेबाचे सरदार राजे जयसिंग व दिलेरखान यांच्याशी शिवाजी-राजांचा तह होऊन शिवराय औरंगझेबाचे भेटीस जावयाचे ठरले असता, तो मजकूर जेव्हा रामदासांचे कानावर गेला, तेव्हा रामदासांनी इशारतीने सांगितलेच की—

'न जावेचि तेथचि लागेल जावे । न खावेचि जे तेचि लागेल खावे ।।
वदावेचि ना तेचि लागे वदावे । स्वभावेचि निर्माण केलेचि देवे ।। १ ।।

प्रसंगे घडे तेचि मानूनि घ्यावे । अहंतागुणे दुःखशोका न यावे ।।
पुढे काय होईल ते ते पहावे । विवेके नि ज्ञानेचि सूखे रहावे ।। २ ।।

देहभोग होणार काही सुटेना । जनाच्या मना सांगताही तुटेना ।।
म्हणे दास उदास काही न व्हावे । बरे-वोखटे सर्व साहोनि न्यावे ।। ३ ।।

आग्र्यास गेल्यावर शिवरायांना सदर इशारतीचा प्रत्यय येण्यास चुकला नाही. कारण औरंगझेबशाहीच्या नाडीची रामदासाना बरोबर पारख होती. औरंगझेबाने विश्वासघात करून शिवाजीराजांना युवराज संभाजीसह नजरकैदेत ठेवले. औरंगझेबाची कैद म्हणजे मृत्युच्या दरबाराची वाटचालच! अशा भयंकर संकटात शिवरायांनी अफाट कल्पना लढवून, बंदीपाल जो पोलादखान, त्याच्या डोळ्यात धूळ फेकून आपली सुटका करून घेतली. निसटल्यावर दक्षिणेची वाट न धरता शिवराय मथुरेस गेले. मथुरेपासून औरंगझेबाच्याच मुलखातले सगळे पहारे, चौक्या व टेहळणी चुकवून दक्षिणेत यावयाचे कसे ? असा बिकट प्रश्न होता. शिवरायांच्या एकाही सरदाराला अगर सवंगड्याला उत्तरेकडील भाषाच येत नव्हती ! मग उत्तर भारतातील भाषा व रीतिरिवाज सोज्वळ सफाईने कोठले चालविता येणार! अर्थातच त्या प्रांतात राहणाऱ्या, तेथील भाषा समजणाऱ्यांच्या शिवदर्शनाशिवाय, शिवरायांचा प्रवास सुखरूप होणे संभवनीय नव्हते. ती सेवा रामदासांच्या तत्प्रांतीय शिष्यमंडळींनी जाणीवेनेच केली. मथुरेतल्या शिष्यांनी संभाजीला आपल्या घरी ठेवून घेऊन इतर शिष्यवरांनी शिवरायास एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात पोहचवले. हे शिष्य म्हणजे मथुरेत हरिकृष्ण, अंतरवेदीत हरिश्चंद्र, अयोध्येत रामकृष्ण, प्रयागात वेणीमाधव, काशीस रामचंद्र, देवदास आणि कृष्णाजी, गंगासागराकडे हरिवंश, तेलंगणात शिवराम, बेदरात श्रीराम, वऱ्हाडात महारुद्र व बाळकृष्ण, ओढ्यापर्वतावर बल्लाळ, घृष्णेश्वरी आनंद, परळी जगन्नाथास मल्हारी, गोकर्णास भैरव, गोमांतकास गोविंद; याप्रमाणे शिवरायांना कोल्हापूरमार्गाने साताराप्रांतात परत येण्यास सहा महिने लागले. रामदासांच्या मठामार्फतच या प्रवासाची माहिती रायगडास मातोश्री जिजाबाईंना कळत असे. शिवरायांच्या प्रधानमंडळासही ती वार्ता मिळे.

सन १६६९ ( शके १५९१ ) पासूनच्या तीन वर्षात उठावणी करून शिवरायांनी सिंहगड-पुरंदरादि किल्ले परत घेतले आणि ते पूर्ववत् प्रबळ झाले. आता शिवरायांनी राज्याभिषेक करवून घ्यावा अशी राजकारणाच्या प्रतिष्ठाप्रस्थापनेच्या दृष्टीने सर्वत्र आवश्यकता वाटू लागली. रामदासांच्या मते रामवरदायिनीची कृपा असलेला नव्या काळातील “ कैपक्षी परमार्थी ” राम शिवरायच होते. रामदास त्यासाठी आतुरच होते. त्याबाबत वाटाघाट करण्यासाठीच पारगावकडील दाट अरण्यात शिवरामदासांच्या भेटीची व्यवस्था १६७२ ( शके १५५४ ) त झाली.

शिवराज्याभिषेक हे चारशे वर्षे तरी चालत आलेल्या मुस्लीम राज्यसत्तेला घणाघाती आव्हान होते. अशी वाटाघाट गंभीरपणे करण्याचा पहिलाच प्रसंग "समयासारखा समयो ये ना।" अशा स्वरूपाचा शिव-रामदासांना तरी होता. त्या भेटीत राज्याभिषेक करवून घेतलाच पाहिजे असा निर्णय घेतला आणि शिवरायाची पात्रतासिद्धी आपणास मान्य असल्याचे द्योतक म्हणून रामदासानी त्याना महावाक्यांचा उपदेश दिला. शिवाय, देशकालवर्तमानाचा विचार करून गागाभट्टाकडून राज्याभिषेक व्हावा हेही सामदासांनी सुचविले. राज्याभिषेकाला रामदास हजर नव्हते याचे बीज त्यांच्या "दास डोंगरी राहतो, उत्सव रामाचा पाहतो" या वृत्तीत आहे. राज्याभिषेकाच्या अगोदरच्याच वर्षी शिवरायानी समर्थशिष्य कण्हेरीकर वासुदेव गोसावी यास ( शके १५९३, सन १६७१ ) शिवरायांनी अकरा एकर जमीन मठसंचालनेसाठी दिली होती व राज्याभिषेकानंतर शिवरांयानी सज्जनगडावर दीड महिना गुरुसहवासही केला होता.

शके १६०० म्हणजे सन १६७८ साली विजयादशमीस शिवरायांनी चाफळच्या देवालयास सनद करून इनाम गावे दिली, आणि सज्जनगडचा मठ बांधून दिला. तीत म्हटले आहे की–

"श्रीसद्गुरु, श्रीसकलतीर्थस्वरुप श्रीकैवल्यधाम, श्री महाराज, स्वामी, स्वामीचे, सेवेशी, चरणरज शिवाजी राजे, यांनी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे; मजवर कृपा करून सनाथ केले, आज्ञा केली की– 'तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून, धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पालनरक्षण करावे, हे व्रत संपादून त्यात परमार्थ करावा. तुम्ही जे मनी धराल ते श्री सिद्धीस पाववील. त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशी स्थळे करावी, ऐसे जे मनी धरिले ते ते स्वामीनी आशीर्वाद प्रतापे मनोरथ पूर्ण केले. याउपरी राज्य सर्व संपादिले ते चरणी अर्पण करून सर्वकाळ सेवा घडावी, ऐसा विचार मनी आणला, तेव्हा आज्ञा जाहली की तुम्हास पूर्वी धर्म सांगितले, तेच करावेत तीच सेवा होय, असे आज्ञापिले. यावरून निकटवास घडून वारंवार दर्शन घडावे, श्रीची स्थापना कोठे तरी होवून सांप्रदाय शिष्य व भक्ति दिगंत विस्तीर्ण घडावी. ऐसी प्रार्थना केली. तेही आसमंतात गिरिगव्हरी वास करून चाफळी श्रींची स्थापना करून सांप्रदायशिष्य दिगंत विस्तीर्णता घडली. त्यास चाफळी श्रींची पूजा-महोत्सव-ब्राह्मणभोजन-अतिथि-इमारत सर्व यथासांग घडावे, जेथे जेथे श्रींची स्थापना जाली तेथे उच्छावे पूजा घडावी; यास राज्य संपादिले, त्यातील ग्रामभूमी कोठे काय नेमावी, ते आज्ञा व्हावी. तेव्हा आज्ञा जाहली की विशेष उपाधीचे कारण काय? तथापि तुमचे मनी श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला, त्यास यथावकाश जेथे जे नेमावेसे वाटेल ते नेमावे व पुढे जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसे करीत जावे. याप्रकारे आज्ञा जाहली.

त्यास ग्रामभूमीची पत्रे करून पाठविली, श्रीसंनिध चाफळी एकशे एकवीस गाव सर्वमान्य व एकशे एकवीस गांवी अकरा व्रिघेप्रमाणे भूमि व अकरा स्थळी श्रीची स्थापना जाहली, तेथे नैवेद्यपूजेस अकराव्रिघे प्रमाणे नेमिले आहे, तेव्हा संकल्प केला आहे तो सिद्धीस जाण्याविषयी विनंति केली, तेव्हा संकल्प केला तो परंपरेने शेवटास पावावा ऐसी आज्ञा जाहली, त्यावरून सांप्रत गाऊ व भूमि नेमिले."

सन १६७९ (शके १६०१ ) च्या माघशुद्ध पौर्णिमेपर्यंत दीड महिना शिवाजीराजे सज्जनगडास राहून गेले. त्यानंतर दोनच महिन्यांनी शिवाजीराजे इहलोक सोडून गेले. रामदास उद्विग्नच उद्विग्न झाले, तथापि राज्य-कारभारात बऱ्याच घालमेली होऊन रामदासांना संभाजीराजांना पत्र लिहिणे कर्तव्य वाटले. त्यात–

" अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।
तजवीजा करीत बसावे । एकान्त स्थळी ॥१॥
आहे तितुके जतन करावे । पुढे आणीक मिळवावे ।
महाराष्ट्रराज्य करावे । जिकडे तिकडे ॥२॥
शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥३॥
त्याहुनी करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष ।
या उपरी आता विशेष । काय लिहावे ? " ॥४॥

राजकारणाचे अध्यात्मीकरण नव्हे, पण अध्यात्म व राजकारण यांची हातमिळवणी करण्याचा रामदासांचा व्याप आटोप झाला. त्याचे स्वरूप हे असे होते. त्याचे सूत्र ' मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करवावे ॥ '

म्हणजे ते राजकारण नुसते लोकाभिमुख न होता, लोक प्रयत्नवंत होते.

' याकारणे चुकोचि नये । म्हणजे उदंड उपाये ।
उपायांचा अपाय । चुकता होय ॥१॥
व्यापेवीण आटोप केला । तो अवघा घसरतचि गेला ।
अकलेचा बंद नाही घातला । दूरी दृष्टीने ॥२॥
गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणे घेऊन आटोपाव्या ।
ज्याच्या त्याने कराव्या । बळकट बुद्धि ॥३॥
ज्यासी उपाधी आवरेना । तेणे उपाधी वाढवावी ना ।
सावचित्त करोनिया मना । समाधाने असावे ॥४॥
लोकांपासी भावार्थ कैचा । आपण जगवावा तयांचा ।
शेवट उपंढर कोणाचा । पडोचि नये ॥५॥ ( दा. १९८)'

तरीही लक्ष्यात ठेवले पाहिजे की––

'कष्टेवीण फळ नाही । कष्टेविण राज्य नाही ।
केल्याविण होत नाही । साध्य जनी ॥१॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो स्वयेंची कष्टत गेला । तोचि भला ॥२॥
एकान्ती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।
नाना विचारणा करावी । अरि–मित्रांची ॥३॥
धुरेने धीर सोडू नये । मुख्य प्रसंग चुको नये ।
उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ॥४॥
पाहिलेचि पहावे । केलेचि करावे ।
शोधिलेचि शोधावे । राजकारण ॥५॥

राजकारण कर्तृत्वाचे पर्यवसान शासन 'कैपक्षी परमार्थी' होण्यात झाले पाहिजे.

'मोठे ते पाप लोकांचे । प्रभू तो जाणता नव्हे ।
वर्तती शिकवल्या बोले । तो काय म्हैसमंगळू ॥१॥
कारभार बुडाला तो । कोण कोणास पुसते ? ।
लांच, चोरी बहु जाली । घालाघाली परस्परे ॥२॥
धण्याला नेणवे काही । बेंदादी नगरी पहा ।
धणी तो राहिला मागे । कारभारीच नासती ॥३॥
खबरदार बरा राजा । विवेकी सर्वसाक्षपी ।
आज्ञेने सर्वही चाले । तेणे सौख्य बहू जना ॥४॥
सर्वत्र राखणे राजी । सुखदुःख जाणोनिया ।
सर्वांची वाहावी चिंता । बुद्धिवंत करावया ॥५॥'
म्हणोनि असावी दीर्घसूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावे ॥६॥

हे अंगवळणी पडण्यासाठी–

जाणत्यापाशी परीक्षा शिकणे । जाणत्यापाशी तालीम करणे ।
जाणत्यापाशी पोहणे । अभ्यासावे ॥७॥
जाणत्याच्या कथा शिकाव्या । जाणत्याच्या युक्ती समजाव्या ।
जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ काही ॥८॥
जाणत्याचे पेच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे ।
जाणता राखेल तसे राखावे । लोक राजी ॥९॥
हेत समजोन उत्तर देणे । दुसऱ्याचे जीवीचे समजणे ।
मुख्यचातुर्याची लक्षणे । ती ही ऐशी ॥१०॥
बोलके पहिलवान कळकटे । तयासीच घ्यावे झटे ।
दुर्जने राजकारण दाटे । ऐसे न करावे ॥११॥

गनीमांच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ॥१२॥
तयास देखता दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥१३॥ '

शासक असो अथवा लोकशिक्षक असो, राजकारण करताना, लोकनेत्या-प्रमाणेच त्याचे- ' परपीडेवरी नसावे अंतःकरण । '

तर त्याने-

बहुत लोक मिळवावे । एक विचारे भरावे ।
कष्ट करोनि घसरावे । शत्रुवरी ॥१॥

नष्टाशी नष्ट योजावे । वाचाळासि वाचाळ आणावे ।
आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोचि नेंदी ॥२॥

जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हा मजालसी बरी थाटे ॥३॥

हे सहजासहजी होत नाही.

युक्ती ते जाड कळा । विशक्तीसी तुळणा नसे ।
अचूक चुकेना कोठे । त्याची राज्ये समस्तही ॥४॥
उदंड खस्तिची कामे । मर्द मारून नेतसे ।
नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चित लालची ॥५॥
नेटके कार्य साधावे । रोधावे कुटिला जना ।
युक्तीला पाहिजे शक्ति । तस्मात् शक्ति प्रमाणे हे ॥६॥

या धोरण-धारणांनी रामदासांनी आपले राजकारण केले. यामुळेच त्यांना शिवराज्याभिषेकानंतर समाधान लाभले की-

' स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।
हिंडता फिरता गेलो । आनंदवनभुवनी ॥१॥

हे साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ ऊठिले ।
विघ्नघ्ना प्रार्थिले गेलो । आनंदवनभूवनी ॥२॥

स्वधर्माआड जे विघ्ने । ते ते सर्वत्र ऊठिली ।
लाटिली, कुटिली देवे । दापिली, कापिली बहू ॥३॥

कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छ-दैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभूवनी ॥४॥

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ।
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभूवनी ॥५॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।
मोडिली मांडली क्षेत्रे । आनंदवनभूवनी ॥६॥

बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
ताडिले, पाडिले देवे । आनंदवनभूवनी ॥७॥

उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया ।
जप-तप-अनुष्ठाने । आनंदवनभूवनी ॥८॥

आरोग्य जाहली काया । वैभवे सांडिली सीमा ।
सारसर्वस्व देवांचे । आनंदवनभूवनी ॥९॥

सामर्थ्ये यशकीर्तिची । प्रतापे सांडली सीमा ।
ब्रीदेचि दीधली सर्वै । आनंदवनभूवनी ॥१०॥

राम कर्ता, राम भोक्ता । रामराज्य भूमंडळी ।
कामना पुरती सर्वे । आनंदवनभुवनी ॥११॥

रामदासानी केलेल्या राजकारणाचे आणि त्याना मिळालेल्या समाधानाचे हे स्वरूप. कार्यकर्त्या-पुरुषाना तपोनिष्ठ पुण्यवंतांचा पाठिंबा लागत असतो. शिवरायाना समर्थांचा केवढा पाठिंबा होता, हे शिवरायांच्या पत्रातील 'जे जे मनी धरले, ते ते स्वामीनी आशीर्वादप्रतापे मनोरथ पूर्ण केले!' या वाक्यावरूनच उघड होते. समर्थ रामदासांनी राष्ट्रीय जागृति करून 'सकळ लोक एक करावे।' व 'जीव जीवात घालावा। आत्मा आत्म्यात मिसळावा' हे धर्मोपासनाप्रधान राजकारण केले ते किती दक्षतेने हे दासबोध द. १५ स. २ मधील खालील ओव्यावरून स्पष्ट होईल.

उदंड करी गुप्तरूपे । भिकाऱ्यासारिखा स्वरूपे ।
तेथे यशकीर्तिप्रतापे । सीमा सांडिली ॥२१॥

ठायी ठायी भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मत्सरमतांची गोवी । लागोचि नेदी ॥२२॥

खनाळामध्ये जाऊन राहे । तेथे कोणीच न पाहे ।
सर्वत्रांचि चिंता वाहे । सर्वकाळ ॥२३॥

अवघड स्थळी कठिण लोक । तेथे राहणे नेमक ।
सृष्टीमध्ये सकळ लोक । धुंडीत येती ॥२४॥

तेथे कोणाचे चालेना । अणुमात्र अनुमानेना ।
कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ॥२५॥

लोकी लोक वाढविले । तेणे अमर्याद झाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ॥२६॥

उपासनेचा गजर । स्थळोस्थळी थोर थोर ।
प्रत्ययाने प्राणिमात्र । सोडविले ॥२७॥

त्यासाठी रामदासांच्या उद्यमशीलतेची दिशा अशी :-

इशारतीचे बोलता नये । बोलावयाचे लिहू नये ।
लिहावयाचे सांगो नये । जबाबीने ॥१॥
देहदु:खे कदरो नये । उदंडचि करावे उपाये ।
मग सर्व सुखासि काये ? । उणे आहे ? ॥२॥

नेतृत्वाचे हे सुख सन्तमनाला 'बहुत लोक एक विचारे भरलेले' पाहण्यातच मुख्यत: असते. द्रव्यबळ, मनुष्यबळ, शरीरबळ व बुद्धिबळ सहकार-समन्वयाने चालल्याने राष्ट्र चौबळ होते. ही बळे राष्ट्रात कोठे कोठे आहेत व कोठे कोठे उत्पन्न करता येतील याचे निरीक्षणपूर्वक परीक्षण करून त्यांचा संग्रह आणि सहकार-समन्वय साधता येण्यासाठीच सांप्रदायिकांना रामदासानी 'भिक्षामिषे लहान थोरे । परीक्षून सोडावी ॥' असा आदेश दिलेला असे व आहे. लहान-थोरांच्या परीक्षेत जे कोणी-

'अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥१॥
मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे ।
फिरोनि येता भोगावे । महद्भाग्य ॥२॥
नजर करार राखणे । कार्य पाहोन सवाल करणे ।
तेणे रणशूरांची अंत:करणे । चकित होती ॥३॥
मर्दे तकवा सोडू नये । म्हणजे प्राप्त होतो जये ।
कार्य, प्रसंग, समये । ओळखावा ॥४॥
देव (श) द्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । येविषयी संशय नाही ॥५॥

वैदिक काळापासून चंद्रगुप्त मौर्याअखेर हिंदुस्थानातील राजकीय घडामोडी झाल्या त्यात परकीय संस्कृतीचा प्राणघातक हल्ला नव्हता. पण महंमद बीन कासीमच्या हल्ल्यापासून जी संस्कृति सत्तासूत्रे हिंदुस्थानात चाळवू आणि चालवू लागली तिला उत्तरेचा राणा प्रतापसिंह आणि दक्षिणेस हरिहरबुक्क यानीच प्रतिकार केला. त्या व त्यानंतरच्या काळात भारतात वैदिक धर्माधिष्ठित संस्कृति धगधगितपणे सांभाळण्याचे कार्य संतानीच केले आहे. ( न्या. रानडे यांचा मराठी सत्तेचा उत्कर्ष हे पुस्तक पहा. ) 'जन बुडाले बुडाले !!' असा नुमता आक्रोश करीत सन्त बसले नाहीत, तर त्यानी परमार्थाची हाक जनतेला दिली, ती बदलत्या परिस्थितीच्या सापेक्षतेने सामाजिक, आर्थिक, सहकारक आणि राजकीय दौर्बल्याचा नि:पात करून सबलतापूर्वक जीवन-वेध घ्यावयास लावून ! समर्थ रामदासानी अध्यात्माच्या अधिष्ठानावरून राजकारण हाताळले ते संतपरंपरा अखंडितपणे धगधगित ठेवण्यासाठीच.

'कार्य केलेचि करावे । ध्यान धरलेचि धरावे ।
विवरलेचि विवरावे । पुन्हा निरूपण ॥'

अशा चिकाटीने रामदासानी 'अनन्य राहे समुदाय' अशी वैचारिक क्रांति घडविण्यात कसूर केली नाही.

'देशकालवर्तमान । सर्वही अवेधमान ।
कोणते विधि-विधान ? । सावधान ! सावधान ! ।'

अशी रामदासांची विवेक-जागृतीसाठी इशारत मुख्यतः होती. राजकारण करताना सांभाळावयाची आचारसंहिता रामदास सांगतात ती अशी–

'जाणावे परांचे अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासी अंतर । पडोच नेदावे ।।१।।
संकेते लोक वेधावा । येकूण येक बोधावा ।
प्रपंचही सावरावा । यथानुशक्त्या ।।२।।
लोक पारखून सांडावे । राजकारणे अभिमान झाडावे ।
पुन्हा मेळवून घ्यावे । दुरिल्या दोरे ।।३।।
हिरवटासी दुरी धरावे । कचरटासी न बोलावे ।
संबंध पडता सोडून जावे । येकीकडे ।।४।।

(दासबोध द. ११ स. ५)

या आचारसंहितेचे मर्म ज्यांच्या लक्ष्यात येते, त्यांना रामदासांच्या "मूर्खाचे राज्य राहीना । कोणाचे कोण ऐकतो ?" या परखड विचाराचे भान आल्याशिवाय राहणार नाही. "नेटके कार्य साधावे । रोधावे कुटिला जना ।" राजकारणात निष्ठेने हाती धरावयाचे हे वर्तनसूत्र सुजाण राजकारणाचेच बळकट दोर झाल्याशिवाय रहातच नाही. हे मुख्य सूत्र हाती घेऊन राजकारण करणारा शीलवन्त ऊर्फ उत्तम पुरुष कसा असेल बरे ?–

"समर्थापाशी बहुत जन । राहिले पाहिजे साभिमान ।
निश्चल करूनिया मन । लोक असती ।।"

कारण "सकळ गुणामध्ये सार । तजविजा विवेक विचार । जेणे पाहिजे पैलपार ।।" अशा 'पुरुष धारणेचा' तो असतो.

वैदिक कालापासून आपला इतिहास सांगणारा हिंदुस्थान वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय जीवनात नेहमीच 'शांतिरस्तु, पुष्टिरस्तु, तुष्टिरस्तु' अशी मनीषा बाळगून ज्ञानाधिष्ठित शीलवन्त क्रमोपक्रमांचा अवलंब करीत आला आहे. 'मला असत्याकडून सत्याकडे, मृत्यूपासून अमरत्वाकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे ने' अशी प्रार्थना निष्ठापूर्वक करीत आला आहे. हिंदुस्थानाचा अंगविशेष असलेल्या महाराष्ट्रावर शिवसमर्थ-कालखंडात या संस्कृति-संरक्षणाची जबाबदारी एवढी येऊन पडली होती की त्याला मुस्लीमासमवेत पोर्तुगीजप्रभृति ख्रिश्चन धर्मप्रचारकानाही हटवावयाचे होते, आटवावयाचे होते. हिंदुस्त्री-पुरुष-बालकांचे धर्मांतरापायी प्राणार्पण होत असतानाच राजकारणी आणि सांग्रामिक झुंजही

महाराष्ट्राला द्यावयाची होती. म्हणूनच 'देवा सोडवित्या' रामोपासनेबरोबर राजकारणाचा, परमार्थाबरोबर प्रपंचाचा आणि भक्तिबरोबर शक्तियुक्तीचा संप्रदाय उभा करून आपल्या अनन्य साधारण अशा ओजःप्रभावी वाणीने "मारितां मारितां मरावे । तेणे गतीस पावावे ।" असा उत्थानमय आदेश रामदासानी आपल्या लोकजागर करणाऱ्या सदुपदेशात दिला. त्यानेच 'खौळले लोक देवाचे' आणि त्यांनी 'मोहीम मांडिली मोठी । आनन्दवनभूवनीं ।'

रामदासांनी राष्ट्रातील क्षात्रवृत्तिला उत्थान दिले आणि स्वधर्मप्रीति वाढविली, त्यायोगे 'उदंड खस्तीची कामे । मर्द मारून जातसे ।' ही वृत्ति समाजात घर धरून बसली आणि 'केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।' असा आत्मविश्वास बळावला. त्याचा अपरिहार्य परिणाम असा झाला की यवनशाहीची सेवा करण्यात पाप मानावयाच्या ऐवजी प्रायः भूषणच मानण्याचा देशघातक व राष्ट्रघातक ओघ बदलून—

'मराठा तितुका मेळवावा । महा-राष्ट्रधर्म वाढवावा ।
येणेविषयी करता तकवा । पूर्वज हासती ॥'

असा एकजिनसीपणा साकार होऊ लागला. (तो शिवरायानंतर सत्तावीस-संवत्सरी संग्राम जो औरंगझेबाशी झाला त्यात जगप्रसिद्ध होऊन बसला नाही काय ? )इतिहासाचार्य राजवाड्यानी म्हटले आहे की—'महाराष्ट्रात स्वराज्य स्थापण्याच्या कामी मराठ्यांच्या शौर्याचे व मराठ्यांच्या आटोपाचे जितके सहाय्य झाले तितकेच, किंबहुना त्याहूनही जास्त सहाय्य समर्थांच्या उपदेशाचे झाले, राष्ट्रातील लोकाना दिशा दाखविण्यास असल्या महात्म्यांची आवश्यकता सदा असते.

'प्रपंची जाणे राजकारण । परमार्थी साकल्यविवरण ।
सर्वामध्ये उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ (दा. द. १९ स. ४ ओ. १७)

असा एकंदरीने समाज व्हावा, हे रामदासांचे लक्ष्य होते. वैयक्तिक, सामूहिक, सामाजिक, कसलाही प्रपंच ज्याला करणे आहे, त्याला राज्यकर्त्यांनी धरलेली धोरणे, आखलेले आराखडे, अवलंबिलेले अंमलबजावणीचे दंडधर्म यांचा एवढा अभ्यास पाहिजे की त्यांच्यातील आपले जीवनप्रणालीस व ध्येयास अनुकूल असेल त्याचा फायदा उठवावयाचा आणि प्रतिकूल असेल त्याचेवर मात करून, आपल्या प्रणाली-शक्ति शाबूत राखावयाच्या आणि ध्येयसाधनेकडे प्रगतिपर वाटचाल करीत रहावयाचे, हे जीवनकौशल्य त्याला म्हणजे प्रपंची जनाला समजले, उमजले व बजावता आले पाहिजे. भगवद्‌गीतेत जसे दहाव्या अध्यायात 'यद्यद्विभूतिमत् सत्वम्' हे 'ईशतेजोंऽशसंभवम्' होय तसेच प्रपंचात राजकारणाला महत्व आहे.

म्हणून राजकारणाचे एकमेव नेतृत्व करणाराने—

'मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करवावे ।
कित्येक खलक उगवावे । राजकारणामध्ये ।।' (दा. द. १९ स. ९-१८)

या सूत्राने चालावे लागते. म्हणजे राजकारणाचे अध्यात्मीकरण होते, प्रत्येक देशघटकाला देशाच्या भाग्यविधानात आपुलकीचा हिस्सा असल्याचा अभिमान राहतो आणि 'खलक कामास लावल्याने त्यांचा सदुपयोग होत जातो. असे राजकारणाचे सामुदायिक व समाजसन्मुख स्वावलंबन व पुढारीपण करणारा-

'कोठेच पडेना दृष्टी । ठायी ठायी त्याच्या गोष्टी ।
वाग्विलासे सकळ सृष्टी । वेधिली तेणे ।।'

असा 'परमेश्वराचे अधिष्ठान' असलेला असावा, असा समर्थ रामदासांचा कटाक्षच होता. असा 'वाग्विलासे सकळ सृष्टी । वेधणारा' नेता आपल्या देशाची सद्यःस्थिती चिकित्सापूर्ण जाणत असतो व म्हणूनच जनतेस ज्ञानांजन देत असतो-

'जेथे तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणिमात्राची स्थितीगती । कळो येते ।।'

या दक्षतेबद्दल शिथिलता वा आळस झाला तर-

'आळसे आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला ।
अंतरहेत चुकताचि गेला । समुदायाचा ।।'

अशी अवस्था संस्था, संघटना किंवा शासन चालविताना होते व नामुष्कीस कारण होते. शिथलतेने वा आळसाने जशी नामुष्की येते, तशीच अकारण अडवणूक होणाऱ्या, अडवणूक करणाऱ्या, अडचणाऱ्या व्यक्तिना बाजूला सारता आले नाही किंवा गप्प बसवता आले नाही अथवा पराभूत करता आले नाही, तर नामुष्की येते. ती टाळण्यासाठी 'काटोने काटी झाडावी । झाडीली, परी ते कळों नेदावी ।' अशी खबरदारी घ्यावी लागते. परमार्थात तसेच राजकारणात 'अवघड होड घालू नये । काही केल्या ।' यावर भर देऊन, आपण करून दाखवूनच समर्थ उपदेश करीत. अर्थातच कुवतीप्रमाणे किंवा पात्रतेप्रमाणे काम देऊन समाजाला प्रयत्नशील करताना,-

'उदंड मुले नानापरी । वडिलांचे लक्ष अवघ्यावरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ।।'
'बहुत जन सुखावे । तो कसा काळ फावे' हे पाहताना
'सुचित करूनी अंतःकरण । केलेचि करावे राजकारण ।
प्रमाण आणि अप्रमाण समजले पाहिजे ।।'

परमार्थात काय, किंवा राजकारणात काय, नेत्याने आणि अनुयायाने आपल्या जीवनाचे सर्वस्व ओतावे लागते.

'उदंड उपासनेची कामे । लावीत जावी नित्य नेमे ।
अवकाश कैचा कृत्रिमे । करावयासी? ।।'

अशा अखंड प्रयत्नपरमेश्वराच्या उपासनेने समर्थ रामदासांना जे रामराज्य अपेक्षित होते, ते असे–

बहु वृष्टि नाही, अनावृष्टि नाही । कदाही भुमी पीक सांडित नाही ।
जना दण्ड नाही तथा मार नाही । जरा, मृत्य ना व्याधि काहीच नाही ॥१॥
पहा बंद–निर्बंध कोणा असेना । जनी मत्सरू पाहताही दिसेना ।
कुरूपी नसे शब्दकापटय काही । जनी पाहता वादवेवाद नाही ॥२॥
सुखानंद, आनंद, उल्हास वाटे । महासुकृती लोक धार्मिक मोठे ॥
बरा कौल पाळी असा कोण कैचा।जगी धन्य हा राम दाता दिनांचा॥३॥
सदासर्वदा न्याय, अन्याय नाही । नसे ही भुमि वोस ऊदास काही ॥
जगज्जनकू राम राजा स्वभावे । म्हणे दास रायास कल्याण व्हावे॥ ४ ॥

आणि म्हणून रामदासांची नित्य प्रार्थनाही असे की––

रघुनाथदासा कल्याण व्हावे । अती सौख्य व्हावे, आनंदवावे ॥
उद्वेग नासो, वर शत्रु नासो । नाना विलासे मग तो विलासो ॥ १ ॥
कोडे नको रे कळहो नको रे । कापटय कर्मी सहसा नको रे ॥
निर्वाण चिंता निरसी अनंता । शरणागता दे बहु घातमाता ॥ २ ॥
अजयो न हो रे, जयवन्त हो रे । अपदा नको रे, बहु भाग्य हो रे ॥
श्रीमंतकारी जनहितकारी । परऊपकारी हरि, दास तारी ॥ ३ ॥

खूप विचार करून व एकान्तात स्वतःच्या मनाशी व सहकारी सहानुभूतिकाशी पुष्कळ विचारविनिमय करून रामदासानी मनात आणले की, रावणाच्या बंदीशाळेत खितपणाऱ्या देवाना ज्याने मुक्त केले, त्या श्रीरामाचा उत्सव सुरु करुन त्याच्या चरित्राकडे जनतेची मने केंद्रित करता आली तर हताश, लाचार, अवनतीच्या काळातहि लोकचैतन्य निर्माण होईल. म्हणून लोकास शिकविले की–

'संभवामि युगे युगे' हे वचन । येणे समाधान होत नाही ॥ १ ॥
होत नाही देवा, श्लाध्य येणे जिणे । कर्म हे भोगणे दीना ऐसे ॥ २ ॥
दीनाऐसे कदाकाळी हे न व्हावे । समर्थचि व्हावे मुख्य पद ॥ ३ ॥
मुख्य पद दृढ धरूनिया देवे । निश्चळचि व्हावे दास म्हणे ॥ ४ ॥

'राजकारण' या शब्दाच्या प्रचलित रूढ अर्थी इंग्रेजी भाषेत Politics या शब्दाचा उपयोग करतात. Science and art of Government affairs of state Political, principles याप्रमाणे इंग्रज ग्रंथकार करतात. प्रा. सिज्विकचे Elements of politics, सर् जॉन् सीलेचे Introduction to political science, लीकॉकचे Elements of political science, इत्यादि ग्रंथाच्या अभ्यासकाना ठाऊक आहे की देशासाठी सैन्य तयार करणे, सैन्य घेऊन देशाच्या शत्रुवर चाल करणे, समरांगणावर पराक्रमाने जय मिळविणे, या गोष्टींचा जसा राजकारणशास्त्रात समावेश होतो, तसाच सैन्यात रंगरूट होण्याबद्दल मने वळवणे, आळशी दैववादी

परतंत्र लोकाना 'यत्न तो देव जाणावा' अशासारख्या उपदेशाने कर्तव्यदक्षतेची प्रेरणा करणे, 'कष्टेविण राज्य नाही' असे बजावून स्वराज्य-प्राप्तीच्या उद्योगास उठविणे या गोष्टींचाहि समावेश होतो. म्हणूनच श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड म्हणत की "रामदास हा मुत्सद्दी व चतुर पुरुष तत्कालीन भावनांचा मूर्तिमंत पुतळाच होता" फार काय ? आचार्य जावडेकर आपल्या 'राजनीति शास्त्र परिचयात' म्हणतात की-"श्रीसमर्थ रामदासानी लोकमताला राजनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व दिले आहे. लोकासि राखणे राजी । ते राज्य प्रबळे बळे ।" म्हणूनच समर्थानी "राजकारण" केले हे शास्त्रशुद्ध रीतीने म्हटलेच पाहिजे. कोणत्याही काळी व कोणत्याही स्थळी, कोणत्याही विचारवंताने त्यांचा साक्षात् उपदेश राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म या प्रकरणातून उघड उघड ~~केला आहेच~~. "युद्ध करावे खणखणाटे । सीमा सांडोनिया ।।" असा आदेश देणाऱ्या समर्थानी "बहुत लोक मिळवावे । एक विचारे भरावे । कष्टे करून घसरावे । म्लेंछावरी ।।" असे निक्षून शिवाजी राजास व जनतेस १६४९ ( शके १५७१ ) पासून सांगण्यास कमी केले नव्हते. समर्थांच्या राजकारणात कुटिलता वासापुरतीसुद्धा नव्हती हेही लक्ष्यात ठेवले पाहिजे. त्यांचे राजकारणातही संतहृदय होते. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे " लोक एका सूत्रात आकर्षिण्यास समर्थांचा पहिला उपाय भक्ति. आकर्षिलेल्या लोकांचा धर्मरक्षणार्थ उपयोग घडून येण्यास समर्थांचा दुसरा उपाय राजकारण. समर्थाचे राजकारण म्हणजे "धर्म रक्षी ऐसा जो शिवाजी राजा" त्याला सहाय्य जेणे करून होईल ते. समर्थांच्या हालचालींचा प्रांत देशातील ठळक ठळक स्त्री-पुरुषांच्या मनोभूमी रामराज्याकडे प्रवण करण्याचा होता."

# समर्थ व शिवाजी महाराज

समर्थ रामदासस्वामी कृष्णातीरी आपल्या जीवनकार्यासाठी शके १५६६त आले. त्यावेळी शिवाजीमहाराजानी आपल्या स्वराज्य-स्थापनेच्या कामास प्रारंभही केला होता. तोरणा, राजगड, कोंडाणा, पुरंदर व चाकण हे किल्ले शिवाजी महाराजांनी युक्ति-प्रयुक्तीने व प्रसंगविशेषी लढाई देऊनही घेतले होते. पण काही मराठे सरदार शिवाजी महाराजांच्या उलट विजापूरच्या आदिलशाहीस सहाय्य करीत. "शिवाजी महाराजाना महाडावरून परत येताना पकडण्याची कपटयुक्ति आदिलशहाचा सरदार बाजी शामराज याने जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांच्या सहाय्याने योजिली होती. शहाजी राजाना पकडण्याची अधमपणाची युक्ति घोरपडचाने केलीच होती." ( केळूसकरकृत शिवचरित्र पृ. ५६३ ) तीर्थयात्रेवरून कृष्णातीरी येतानाच त्या गोष्टीची जाणीव समर्थांना होती. म्हणूनच त्यानी त्या वृत्तीला हात घालण्यासाठीच "अमर्याद फितवेखोर। त्यांचा करावा सहार। शोधला पाहिजे विचार। ययातथ्य ॥१॥" याप्रमाणे उपदेश करून शिवाजी महाराजांच्या स्वराज्य प्रयत्नात सहाय्य केले.

शके १५६६ ते १५७१ चे काळात समर्थानी आदिलशाहीच्या सत्ताविहारात अकरा मारुतींची स्थापना केली. त्यामुळे त्यांची कीर्ति महाराष्ट्रभर पसरली होतीच. त्यामुळे शके १५७१ त संत तुकारामानी शिवाजी महाराजाना "राया छत्रपति ऐकावे वचन। रामदासी मन लावी वेगी॥" असे पत्राने सांगितलेच असले तर नवल नाही. विशीच्या ऐन उमेदीत असलेल्या शिवाजी महाराजांच्या जीवितकार्याला सहकार देण्यास राजकारणी संत समर्थ रामदासच योग्य अशी गुणग्राहकताच संत तुकारामानी समयसूचकतेने दाखविली असे म्हटले पाहिजे.

( शके १५७६ ते १५८६ ) सन १६५४ ते १६६४ या दहा वर्षात समर्थांचे मुख्य राहण्याचे ठिकाण शिवथर होते. ते रायगडापासून जवळच होते. सन १६५९ ( शके १५८१ ) मध्ये शिवाजी महाराजानी समर्थांना २०० होन रामोत्सवासाठी दिले. कारण शके १५६७ च्या पहिला मसूरचा रामोत्सव शिवाजीमहाराजानी

पाहिला होता आणि तेथून चाललेल्या समर्थांच्या चळवळी म्हणजे चळलेल्याना वळणावर आणण्याच्या हालचाली त्यांच्या कानी ठिकठिकाणाहून येतच होत्या. शिंगणवाडीस ( १३ एप्रील स. १६४९ ) अनुग्रह होऊन ब्रह्मतेजाची व क्षात्रतेजाची गाठ वारा व अग्नि यांच्या गाठीसारखी होऊन, महाराजाना अंगीकृत कार्यात यशच येईल असे समर्थानी सांगितल्यावर महाराजानी स्वराज्यस्थापनेच्या कामात नेटच नेट केला व समर्थांची भविष्यवाणी खरी झाली. १६ मे १६४९ रोजी शहाजी राजे बंधमुक्त झाले व शिवरायाना यशच येत गेले, असे समर्थांना दिलेल्या ( स. १६७९ च्या ) सनदेत शिवाजी महाराजानी मोकळ्या मनाने मान्य केले आहे.

शके १५७१ ते १५७७ पर्यंत शिवाजी महाराजांचे राजकारण शहाजी-राजांच्या अटकेमुळे तटले होते. त्या काळात शिवाजी महाराज सवड सापडताच समर्थांच्या भेटीस जात. समर्थाचा मुक्काम चाफळ खोऱ्यातील निबघळीत एकदा असता, महाराज आले. त्याना तहान लागली होती. तेव्हा कुबडीने समोरचा दगड बाजूला करून मधुर पाण्याचा झरा वाहता केला. तो कुबडीतीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. शके १५७६ पासून ( सन १६५४) पुढे शिवथर घळीत राहून दासबोध लिहित असता, जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांच्या हालचालीवर समर्थाचे लक्ष होते. हा अस्तनीतील निखारा असल्याचा इशारा समर्थांनी शिवाजी महाराजास देऊन टाकला.

नंतर कर्नाटकात बंडे उपस्थित झाल्याने आदिलशहाने शके १५७६ त शहाजी राजाना तिकडे पाठविले. कर्नाटकात जाण्यापूर्वी शहाजीराजे परळीस सहकुटुंब येऊन समर्थांस भेटून गेले. शके १५७७ त समर्थ साताऱ्याजवळ करंजगावी भिक्षा मागत असता, त्यांच्या झोळीत शिवाजी महाराजानी 'मिळवलेल्या सर्व राज्याची भिक्षा घातल्याची चिठ्ठी टाकली. तेव्हा "क्षत्री करावे क्षात्रधर्म" असे सांगून सावधानता राखण्याचा उपदेश करून समर्थांनी राज्य शिवरायांचे शिवरायास दिले. "खबरदारी आणि वेगी । तेणे सामर्थ्य चढे अंगी । नाना प्रसंगे कार्यभागी । अंतराय न पडे ॥१॥ जेथे बहु विचार । तेथे ईश्वरी अवतार । मागे झाले थोर थोर । धके चपेटे सोसोनी ॥२॥" पाच वर्षे आपल्या कोंडलेल्या उत्साहास शहाजीराजांच्या परवानगीने समर्थांनी वाट करून द्यावी, असा या सर्व घडणीतील शिवाजी महाराजाचा मतितार्थ होता. (श्रीसमर्थांचा गाथा पहा.) तो समर्थ समजले व ती जबाबदारी त्यानी घेतली. शके १५७७ च्या ज्येष्ट वद्य पक्षात रामेश्वरयात्रेचे निमित्त करून समर्थ तंजावरास गेले आणि तेथून विश्वासाच्या माणसाबरोबर शिवाजी महाराजाना समर्थांनी दिलासा पोहोचविला. शके १५७९ मध्ये प्रतापगड बांधून झाल्यावर प्रवेशसमारंभास समर्थ हजर होतेच.

शिवाजीराजांच्या आक्रमक राजकारणाला शहाजीराजांची पूर्ण परवानगी समर्थानी मिळवताच, शिवाजी राजानी आपली स्वराज्याची मोहीम जोराने सुरू

केली. त्यायोगे विजापूर दरबार एवढा खवळला की शिवाजीला कैद करून आणण्याचा नाही तर, त्याचा शिरोभाग दरबारला सादर करण्याचा विडा अफझलखानाने उचलला. अफझलखान हा त्या वेळी वाईचा सरसुभेदार होता. त्याच्या पैजेच्या विडचाची बातमी लागताच समर्थांचे पट्टशिष्य कल्याण यानी एक सांकेतिक पत्र शिवरायास लिहिले ते असे :--

" **विवेके करावे करावे कार्यसाधन । जाणार नरतनु हे जाणुन । पुढील भविष्यार्थी मन । रहाटोचि नये ॥ १ ॥** चालो नये असन्मार्गी । सत्यता बाणल्या अंगी । रघुवीर कृपा ते प्रसंगी । दासमहात्म्य वाढवीत ॥ २ ॥ रजनीनाथ आणि दिवाकर । नित्यनेमे करिताती संचार । घालिताती येरझार । लाविले भ्रमण जगदीशे ॥ ३ ॥ आदिमाया मूळ भवानी । हेचि जगताची स्वामिनी । **एकान्ती विवंचना करोनी । इष्ट योजना करावी ॥ ४ ॥** अफझलखानाच्या अखेरीसंबंधात समर्थांनी आनंदप्रदर्शनार्थ चाफळवाडीचे चाफळक्षेत्र केले व नवीन मारुति बाजार पेठेत बसविला. तसेच दासबोधातील १८ व्या दशकातील ६ वा समास समर्थांनी पुरा केला. त्यातील पहिल्या बारा ओव्या पूर्वसूचनेच्या आहेत. नंतरचा भाग राजांच्या अभिनंदनाचा आहे.

शके १५८३ (सन १६६१) मध्ये आपले कुलदैवत (तुळजापूरची) भवानीचे दर्शनास जाण्याचे, राजकारणाच्या दबावाने, शिवाजीराजाना दिवसेदिवस अवघड होणार असे स्पष्ट दिसू लागल्यामुळे त्यानी प्रतापगडावर भवानीमंदिर स्थापले व समर्थांना आपला "महापुरुष" किंवा अध्यात्म गुरु केले (सातारा गॅझेटिअर पृ. ८३). समर्थांनी भवानी देवीला रामवरदायिनी म्हणून नेहमीच संबोधिले असून प्रतापगडावर देवीची स्थापना झाल्यावर " वडिली केलेला नवस" फेडण्याकरताही तेथे गेल्यावर प्रार्थनाभिषाने ते देवीला मनमोकळेपणाने म्हणाले-

"थोडचाने श्लाघ्यता केली । थोर संतोष पावली । उत्तीर्ण काय म्या व्हावे? । तुझे कृपेसी रोकडे ॥ १ ॥ तुझेचि तुजला दिल्हे । म्या हे कोठूनि आणले? । संकटे वारिली नाना । रक्षिले बहुता परी ॥ २ ॥ जीवीचे जाणते माता । तू माता मज रोकडी । लोकांच्या चुकती माता । अचूक जननी मला ॥ ३ ॥ येकचि मागणे आता । द्यावे ते मजकारणे । तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आह्माचि देखता ॥ ४ ॥ रामदास म्हणे । माझे सर्व आतुर बोलणे । क्षमावे तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥ ५ ॥

" मातेसि काय चोरावे? । सर्वही ठाऊके तिला ॥ " असल्याकारणाने "प्रतापगिरिचे ठायी । आदि शक्ति विराजते । कामना पुरती तेथे । प्रचिती रोकडया जनी ॥ " असे समर्थ '।नीत.

शके १५६७ पासून १५८१ पर्यंत शिवाजी महाराजांच्या स्वराज्यप्रयत्नाचा उष:काल असल्यामुळे राजकारणात समर्थांनी प्रामुख्याने भाग घेतला. शके १५८१चे सुमारास महाराजांच्या पदरी अनेक शूर व विश्वासू सेनानायक व मुत्सद्दी होते. अफझलवधामुळे शेजारच्या शत्रूवरही महाराजांचा वचक चांगलाच बसला होता. म्हणून शके १५८१ नंतर समर्थ शिवाजी महाराजांच्या प्रयत्न पुरुषार्थाचे अभीष्ट-चिंतकच होऊन राहिले असे मात्र नव्हे. त्यांचे " उदंड करावे। परी गुप्तरूपे ।। " राजकारण चालूच होते. शके १५८७ (सन १६६५) मध्ये संभाजीसह शिवाजी राजे औरंगझेबाच्या दरबारी आग्र्यास गेले. औरंगझेबाने केलेला धिक्कार सहन न झाल्याने राजाना नजरकैद झाली. तीमधून त्यानी आपली सुटका १७ ऑगष्ट १६६६ मध्ये करून घेतली. प्रथम ते मथुरा प्रयाग-काशी येथील समर्थांचे मठात गोसाव्याचे वेषाने गेले. आणि समर्थ शिष्यांच्या सहकाराने रायगडी परतले. मथुरेत शिरताच प्रथम महाराज मोरोपंत पिंगळ्यांच्या मेहुण्याकडे गेले आणि त्यांच्या सहाय्याने समर्थांच्या मठाधिपतीकडून पुढील सर्व व्यवस्था झाली. समर्थांचा विश्वनाथ या नावाचा शिष्य उत्तर हिंदुस्थानात याच वेळी यात्रेस "आकाश-वाणी" च्या प्रेरणेने गेला होता. ही "आकाशवाणी" म्हणजे समर्थांचाच आदेश छत्रपति शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका ही "इतिहासाची पुनरावृत्ति होते" या सत्याचे ठळठळीत उदाहरण आहे. इंग्लंड सिंहहृदय रिचर्ड (पहिला) हा ११८९ ते ११९९ एवढाच वेळ राजा असताना "होली लँड" मधील क्रुसेड्स्च्या लढाया मारून येत असता शत्रूच्या जाळ्यात सापडला आणि हिकमतीने सुटला. स्वीडनचा बारावा चार्लस् ( १६९७ ते १७१८ ) रशियाशी झालेल्या लढाईत १७०९ मध्ये पुलटोवा ( Pueltowa ) येथे पराभव झाल्यावर तीन वर्षांनी बेंडर ( Bender ) येथे १७१३त तुर्कांच्या तडाक्यात व कचाटयात सापडला. कॉन्स्टँटिनोपलहून स्वतःची सुटका करून घेताना त्यालाही युक्त्या प्रयुक्त्यांचे व्यूह रचावे लागले. छत्रपति आग्र्याच्या बंदीखान्यातून सुटले. ते वरील दोन प्रसंगापेक्षा परिस्थितीवर ताण करून.

शिवाजीराजाना रायगडी राज्याभिषेक झाला. त्यापूर्वी तो घडवून आणावा म्हणून ज्या वाटाघाटी झाल्या व मार्गदर्शने घडली, त्यातून गागाभट्टांची योजना समर्थांच्याच सूचनेवरून झाली असे मानण्यास जागा आहे. (शके १६०२ सन १६८० मध्ये संभाजी महाराजानी वासुदेव गोसाव्यास करून दिलेल्या जमीनीच्या कागदा-तील संदर्भावरून) राज्यारोहण झाल्यावर सर्व कुटुंबासह श्री शिवराय समर्थांजवळ दीड महिना येऊन राहिले. एवढेच नव्हे तर चिटणीस बखरीवरून समजते की "रामदास स्वामींच्या सांगीप्रमाणे शिवाजी महाराजानी विद्येच्या प्रगतिसाठी पारितोष योजना सुरू केली. शके १५९९ ( सन १६७७ ) मध्ये सामानगडावर बांधकाम चालू असता, इमारत-प्रकरणावर दोन स्फुट समास समर्थांनी लिहिले त्यात " लोहार, सुतार, कुंभार। कामगार लहान थोर। मांग, महार, चांभार।

नाना याती ।। पात्रतासिद्धीने कामा यावे" असेच म्हटले आहे. पुढल्याच वर्षी चाफळ सज्जनगड देवस्थानास छत्रपतिनी सनद करून दिली. त्यावेळचे पत्रावरून छत्रपतिचा व समर्थांचा जिव्हाळ्याचा संबंध किती प्रदीर्घ होता, हे डोळस अभ्यासकास स्पष्ट होणारे आहे. महाराष्ट्राचा इतिहास घडविणाऱ्या या दोन महापुरुषांची अंतःकरणे एक होती, एकस्पंदनी होती. म्हणूनच शिवाजीराजे आपल्या अवतारसमाप्तीपूर्वीही समर्थांना भेटून गेले होते. छत्रपतींनी अवतार संपविल्याचे कळताच, समर्थही उदासीन, अलिप्त, निगोड वृत्तीनेच राहू लागले. शिवाजी राजे व समर्थ हे दोन महापुरुष आपापल्या वैयक्तिक श्रेष्ठ गुणानी, चारित्र्याने व कामगिरीने इतिहासात अजरामरच राहणारे आहेत. श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि सद्‌गुरु समर्थ रामदास स्वामी हे दोन्ही स्वतंत्र आणि स्वयंभू पुरुष होते. कविवर्य मोरोपंत म्हणतात की–

"शिवरायास ज्ञानद जो जैसा याज्ञवल्क्य जनकास ! तरले भवार्णवी बहु दृढतर ज्याची धरोनी जन कास ।।" जनकराजाने आपले सारे राज्य याज्ञवल्क्याचे चरणी अर्पण केले होते. त्याचप्रमाणे शिवाजी राजानीही केले. या परस्पर-भक्तिभावापेक्षा आपापल्या कामगिरींच्या सहकार-समन्वयाने त्यानी जो महाराष्ट्राचा, भारताचा आणि भारतीय संस्कृतीचा उत्कर्ष साधला त्याला इतिहासात आगळेच महत्त्व आहे.

सतराव्या शतकात सह्याद्रिची सहनशीलता संपवून, त्याच्या अन्तर्वालातील सुप्त ज्वालामुखीला जाग आणली ती शिव-समर्थांनी. समर्थानी जनतेच्या मनातील करंटेपणाची साचलेली राख फुंकून टाकून, तिच्या आत्मशक्तीचा निखारा फुलवला तर शिवरायानी परवशतेचे हीन जाळून स्वातंत्र्याचे सुवर्ण उजळून काढले. या दोन महापुरुषांच्या प्रेरणानी निर्णायक स्थितीतही जनतेच्या पुरुषार्थाची परिसीमा झाली आणि संतानी जुलूमशाहीचे थडगे सह्याद्रिच्या कुशीत बांधले गेले. त्यानंतर महाराष्ट्राचा पराक्रम अटकेवर झेंडे लावून बसला आणि स्वराज्याचे साम्राज्य झाले. पण या साऱ्या चढत्या-वाढऱ्या पदवीत शिवसमर्थांच्या निखळ ध्येयदृष्टीचे सत्व उरले नव्हते, त्यामुळे मराठा सत्तेचा उत्कर्ष जेवढ्या झपाट्याने झाला, तेवढ्या झपाट्यानेच त्याला उतारही पडला ! अठराव्या शतकाची अखेर स्वातंत्र्याची संध्याकाळ पहातच झाली ! !

श्रीसमर्थांनी आपल्या अचाट सामर्थ्याने सर्व राष्ट्र जागविले, उपासनेचे महत्त्व त्याच्या गळी उतरविले. शिवाजी महाराजाना वेळोवेळी सल्ला-सूचना दिल्या. त्याशी आपण व शिष्यद्वारा जरूर तेव्हा 'इशाऱ्याचे बोलणे' केले त्याना प्रसंगी आवश्यक ते सहाय्यही दिले. एवढेच नव्हे तर त्यानी भविष्यही वर्तविले होते की–

देवद्रोहियांचा नाशचि आहे। समुद्रतीरस्थांचा नाशचि आहे ।।

● ● ●

# प्रबोधन

"चिंता करतो विश्वाची ।" असे लहानपणापासून म्हणणाऱ्या समर्थांनी "बहुतजनास चाळवी । नाना मंडळे हालवी । तेणे हे समर्थ पदवी । विवेके होते ।" हे स्वोदाहरणाने सांगितले आहे. ऐहिक व पारमार्थिक जीवनांचा सुरेख संगम समाजाने साधावा म्हणून सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या समर्थांचा आत्मविश्वास असा होता की–"राघवाची पदे मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रे ॥१॥ हेळामात्रे मुक्त करीन या जना । तरीच पावना राघवाचा ॥२॥ राघवाचा वर पावलो सत्वर । जनाचा उद्धार करावया ॥३॥"

त्या आत्मविश्वासाच्या जोरावर जेथे तेथे मठ स्थापन करून श्रीराम जयंतीचे व हनुमान–जयंतीचे उत्सव समर्थांनी सुरू केले आणि "प्रपंची जाणे राजकारण" असे सरळ लोकाना सांगून त्यानी लोकांची मने पारमार्थिक तशीच ऐहिक स्वातंत्र्याकडे सन्मुख केली. आपल्या जीवनकार्याविषयी समर्थ एवढे "निश्चयाचा महामेरू" होते की "साह्य आम्हासी हनूमंत । आराध्य दैवत श्री रघुनाथ । गुरु श्री राम समर्थ। काय उणे दासासी ॥१॥ दाता एक रघुनंदन। वरकड लंडी देईल कोण? ॥ तो सोडून आम्ही जन । कोणाप्रति मागावे ? ॥ २॥ म्हणोनि आम्ही रामदास । रामचरणी आमुचा विश्वास । कोसळोनि पडो रे आकाश । आणिकाची वास न पाहू ॥ ३ ॥ हा आत्मविश्वास त्यानी जनतेत निर्माण केला.

समर्थांची शिस्त फार कडक होती तरी भाविक लोकाना ते प्रेमाने जवळ घेत. समर्थांना घोड्यावर चांगले बसता येत होते. वयाच्या ६७ व्या वर्षी सुद्धा हेळवाक खोऱ्यात आजारी असताना ते घोड्यावरून चाफळास आले होते. शिवाजी महाराजानी त्यास एक चपखल घोडा दिला होता. त्याचे नावच रामबाण होते. समर्थाना पोहताही चांगले येई. उंब्रजजवळील मांड नदीचे पुरात एक मनुष्य बुडाला असता समर्थानी त्यास कृष्णामांडसंगमावर जिवंत बाहेर काढले.

समर्थांची स्थिति आत्मस्थिती होती; वृत्ति उदासीन होती, अवस्था उन्मत्ती होती; खाली पाहून पण भराभर चालत; फार थोडे बोलत; त्यांची मुद्रा अगो-

घरी होती, आसन सिद्धासन असे. त्यांचा धगधगीत ब्रम्हचर्याश्रम हाच त्यांचा खरा आश्रम होता.

कौल झाला रघुनाथाचा । मेळा मिळाला भक्तांचा ॥१॥
अहंभाव वरचेवरी । बळेचि घातला बाहेरी ॥२॥
क्षेत्री विवेक जाहला । क्रोध देशोधडी केला ॥३॥
काम देहीचा कोंडला । मद-मत्सर पाडला ॥४॥
लोभ-दंभ नागविला । अहंकार बुडविला ॥५॥
कुत्ते मीपण पळाले । उगेच अज्ञान गळाले ॥६॥
फितवेखोर होता द्वंद्व । त्याचा केला शिरच्छेद ॥७॥
तिरस्कार दावेदार । त्यास बोधे केला मार ॥८॥
मन चोरटे धरिले । नित्यनेमे जर्जर केले ॥९॥
आळस साक्षेपे घेतले । पायी धरूनी आपटिले ॥१०॥
दुश्चितपण अकस्मात । निरुपणी केला घात ॥११॥
कपट मैंद सांपडले । उभे सर्वांगी तोडिले ॥१२॥
बंड-पाखांड तुटिले । बळेचि धरुनी कुटिले ॥१३॥
शब्द बांधोनी पाडिला । निःशब्द तेथे प्रतिष्ठिला ॥१४॥
गर्व-ताठा विटंबिला । वाद विवेके झाडिला ॥१५॥
जेणे भावार्थ उडविला । धरूनि विकल्प बुडविला ॥१६॥
करुनि अभावाचा नाश । राहे रामी रामदास ॥१७॥

असे आहे समर्थ रामदासानी केलेले आपल्या जीवनाचे समालोचन. त्यात ऐहिक व आध्यात्मिक अशी जीवनाची दोनही अंगे धन्यार्थाने त्यानी उघड करून दाखविली आहेत, हे मर्मज्ञाना मुद्दाम सांगणे नलगे !

विविध-लक्षणयुक्त अधिकारी शिष्यमहंतांच्या सहाय्याने, आपल्या राष्ट्राला गौरवाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून उदंड राजकारण आणि अमाप लोक-संग्रह या युगपुरुषाने केला व आपल्या तेजस्वी वाणीने भारतातील अगणित लोकांच्या जीवनात क्रांति घडविली. कोणी तरी समर्थांना 'क्रांतिकारक रामदास' असे म्हटलेही आहे.

"आधी प्रपंच करावा नेटका ।" म्हणून सांगणाऱ्या समर्थांनी स्वाभाविक षड्विकारही कारणी लावण्यास सांगितले आहे 'काम' (इच्छा) ही शत्रु मानणे याच्यासारखी दुसरी चूक त्रिभुवनात नाही. योग्य मर्यादेच्या आत सर्व विश्वाला आपल्या गोडीत सुख उत्पन्न करणारा इतका चांगला विकार दुसरा कोणताहि नाही. ब्रह्मचाने हे विश्व जरी खेळ म्हणून उत्पन्न केले असले तरी त्या खेळातील प्रसरणाचे आदिसूत्र म्हणून त्याला हा 'काम' उत्पन्न करावा लागला. याची जी अत्यंत सूक्ष्म अशी छाया 'प्रेम' नावाने वावरते ती अंगावर पडली असता थंडी-तल्या कोवळचा उन्हाप्रमाणे मधुर लागते. या कोवळचा उन्हाच्या बळावर कसलेहि

साहस आचारावयास माणसे आजवर प्रवृत्त झालेली आहेत. 'क्रोधा' ने तरी आपले काय वाईट केले आहे ? त्याला बेफाम सोडता कामा नये. बेफाम सुटलेल्या इतर मनोविकारावर जर फटकारा मारून त्याना मर्यादेत आणावयाचे असेल तर 'क्रोधा' चा उपयोग केवढा तरी आहे. 'लोभा' ने संसार सिद्ध केला आहे. लोभामुळे माणसे केवढ्या प्रचंड उद्योगाना हात घालीत आली आहेत ! त्यांची महत्त्वाकांक्षा याचमुळे बळावली आहे. 'मोहा' ने तर अरुचकर व बीभत्स वस्तूकडे सुद्धा पाहण्याला निराळ्या कांचा प्राप्त झाल्यामुळे, त्यांच्यातील खरे गुण ओळखण्याला मदत होते. हा मोहाचा गुण जर अंगी नसता तर कवींना वस्तुजातींचे सामुदायिक सौंदर्य जे वर्णिता येते ते कधीहि आले नसते..'मद' हा वैभावाच्या स्थैर्याला उपयोगी पडतो, आणि फार बळावला तर त्याच वैभवाचा नाश करतो. 'मत्सर' ची भीति सर्वांनीच बागळलेली आहे. पण संसाराच्या निरुंद मार्गावरून चालत असताना स्त्री-पुरुषांचा झोक जाण्याचा संभव फार असतो. त्या प्रसंगी त्यांना थोडेसे दरडावून त्यांचा तोल सावरून धरण्यास 'मत्सरा' इतका उपयोगी मित्र दुसरा कोणीहि नाही. परंपराविषयीचा अविश्वास हा भाबडेपणाने बोलून दाखविण्याइतका कायम प्रबल नसतो, पण सूक्ष्मरूपाने तो त्या ठिकाणी असतो, त्यामुळेच परस्पराना मार्गावर ठेवण्याचे काम सूक्ष्म मत्सराच्या लपतछपत केलेल्या दर्शनाने घडवून आणता येते. या प्रतिपादनावरून ध्यानात येईल की, ज्या षड्विकारांना रिपु रिपु म्हणून संबोधिलेले आहे ते संसारी माणसांचे रिपु नव्हेतच आणि म्हणूनच आम्हाला त्यांची भीति काहीच नाही. ज्या कोणाला तप आचरावयाचे असेल, रानावनात जाऊन बसावयाचे असेल, ज्यांच्या एकाग्रतेच्या मार्गात हे विकार विघ्न आणीत असतील त्यांना हे रिपुसारखे वाटावेत हे स्वाभाविक आहे. पण संसारी लोकांना त्या स्वरूपात ते तसे नाहीत. तेव्हा त्याना मर्यादित राखून सत्कारणी लावणे ही कला माणसाने आपल्या कर्तव्यपूर्तीसाठी साध्य करावी. हेच उचित होय.

समर्थांनी आपल्या उपदेशाने कर्तव्यमूढ महाराष्ट्राला कर्तव्यदक्ष केले, परमार्थ व व्यवहार, धर्मकारण व राजकारण यांचे मधुरमीलन करून बहुजन-समाजाची अंतःकरणे धर्ममूलक विवेक-वैराग्य-प्रधान प्रयत्न-पुरुषार्थावर विकसित केली.

प्राचीन परंपरेत गुरुकुलातून बाहेर पडताना शिष्यांना 'सत्यं वद, धर्मं चर' इ. आदेश दिला जात असे. प्रत्यक्ष लोककार्यात आपल्या शिष्यांना रवाना करिताना श्रीसमर्थही असा कळकळीचा बोध देत. ते म्हणत-'आता तुम्ही राष्ट्राच्या भिन्न भिन्न (नेमून दिलेल्या) भागात परिभ्रमण करा, तेथील लोकांची भिक्षेच्या मिषाने चाळणा करून वेचक लोक राष्ट्राकरिता तन-मन-धन अर्पण करण्यास तयार होतील असा अचुक यत्न करा. खेड्यापाड्यातील झोपडी-झोपडीमधून जा, आणि सर्वांना सौम्य वाणीने समजावून सांगा की, बांधवहो, तुम्ही झोपी गेला आहात काय? निद्रेचा त्याग करावा अशी वेळ अजून आली नाही का? तुम्हाला राष्ट्राचे, धर्माचे व मायबहिणींच्या पवित्र शीलांचे काही शुभाशुभ वाटत

नाही काय? आपलीच सुखसोय, आपलाच ऐषाराम यात गुंग राहून तुम्ही कोणत्या घोर पापाचे धनी होणार आहात? स्वतःपलीकडे समाजासंबंधी आणि राष्ट्रासंबंधी आपले काही कर्तव्य आहे याची जागृती घ्या ना! अस्मानी सुलतानीच्या भयाने निराश होऊन स्वाभिमानशून्य जीवन जगू नका. तुमचे थोर थोर पूर्वज, तुमची भयकारी झोप कधी संपणार म्हणून विचारीत आहेत. ते ऐका. धीर धरा, गडबडू नका, तकवा सोडू नका, केल्याने होत आहे. यत्न तो देव जाणून वन्ही तो चेतवावा. श्रीरामानी वानरांच्या सहाय्याने मदोन्मत्त रावणाला मातीमोल केले व श्रीकृष्णाने गवळी–शेतकरी यांच्या मदतीने मोठमोठे राजे महाराजे ठार मारून त्यांची जुलमी राज्ये धुळीला मिळविली, आणि जनतेला सुखी केले. मथुरेचा कंस, चेदी देशाचा शिशुपाल, मगध देशाचा जरासंध तसेच शृगाल, पौंड्रक, नरकासुर, दुर्योधनादि सम्राटाना नाहीसे करून त्याने संदेश दिला आहे की–'स्वधर्मे निधनं श्रेयः।' धर्मासाठी मरावे। परी ना दुजाचे द्रव्य वा राज्य घ्यावे॥ प्रिय शिष्यांनो, तुम्ही स्वतः राष्ट्रकल्याणाच्या मार्गावर उभे राहून, लोकांनाहि राष्ट्रधर्मनिष्ठेच्या सामर्थ्याचा साक्षात्कार होईल असे कार्य करा.' समर्थांच्या या बोधाप्रमाणे, आपल्या कार्यकर्तृत्वाने रथी–अतिरथी ठरून जे शिष्य नवराष्ट्राच्या उभारणीसाठी आणि उत्कर्षासाठी बद्धपरिकर झाले व या महान् प्राणयज्ञदलाचे पाईक बनले आणि मुखात रामनाम, खांद्यावर झोळी आणि जीवनात लोकसेवेचे व्रत घेऊन गुरु-आज्ञेप्रमाणे महाराष्ट्रधर्माकरिता अहर्निश चंदनाप्रमाणे झिजले, त्यात कल्याणस्वामी सर्वश्रेष्ठ मानले पाहिजेत. रामायणात जे मारुतीचे स्थान तेच दासायनात कल्याणांचे. 'नारायण विधि वसिष्ठ राम। रामदास कल्याणधाम' असे जे परंपरेचे भजन आहे ते कल्याणांच्या या अधिकाराचे पावनदर्शन घडवीत आहे.

समर्थ रामदास यांच्यासारखा 'बडा राष्ट्रीय संघटक झाला नाही' याबद्दल डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन्, महात्मा गांधी यांच्यासारख्या आधुनिक राष्ट्रोद्धारकांचे एकमत आहे. सिंहलद्विपपासून हिमालयापर्यंत रामदासांचे मठ आणि मारुति पसरले असून पोर्तुगीजांच्या राजकीय सूत्रधारांनी शिवाजीचा समर्थ व चाणाक्ष सहकारी रामदास असे नमूद करून ठेवले आहे. चेतनाहीन भारताला चैतन्यमय करून सोडणारा सन्त आणि अखंड भारताच्या एकजिनसीपणाने त्याच्या निर्मळ स्वातंत्र्याचा वैचारिक पाया घालणारा समाजशिक्षक म्हणून रामदासांनी छत्रपति शिवाजी महाराजांच्या पराक्रमी राजकारणाला साथ दिली म्हणूनच, वैदिकधर्म हैराण अवस्थेतूनही हिऱ्यासारखा चमकत राहिला. 'उच्च भव्य तितुके' आचरून शाश्वतपणे भारताने जगात महान् राष्ट्र म्हणून नांदावे, हीच समर्थ-शिकवणीची परिणती होती व आहे. गमविलेले स्वातंत्र्य कमावणे कष्टासायासांचेच असते. ते मिळवल्यावर ते राखणे खूप शर्तीचे कर्तव्य असते. पण ते सातत्याने सत्वशील सांभाळणे हे जीवाभावाने करावे लागते व ते जीवाच्या करारावरच होते. या तपश्चर्येची प्रेरणा शिवसमर्थ-कार्याच्या सक्रीय अभ्यासनातच आहे. ईश्वरी साक्षात्कार आणि युक्ति–बुद्धि–शहाणपणाचा व्यवहार, यांचा मनोरम प्रीतिसंगम म्हणजेच

शिव-समर्थ-चरित्र-चारित्र्यांचा निष्कर्ष. संस्कृतिसंरक्षक राजदंड हाच शान्ति ब्रह्माचा उपासक. हेच प्रबोधन सर्वांना शान्ति, पुष्टी, तुष्टी देऊन कोणी करीत असेल, तर तेच शिवसमर्थ-कर्तृत्वाचे रामायण शिवसमर्थ संघटनेसंबंधाने ('सावधान ! सावधान ! अखंड सावधान ! ' हा जीवनाचा बीजमंत्र रामदासांच्याशिवाय ) व्यावहारिक, पारमार्थिक, राजकीय आणि राष्ट्रीय कार्यक्षेत्रात, कोण्या संताने दिला ? ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे--

वेद जेणे सुभाष । सुख जेणे सोल्लास ।
हे असो रूपस । विश्व जेणे ।।(१८-१७२७)

असे वर्तन माणसामाणसाकडून होत गेले तरच भारत संस्कृतिसंपन्न स्वातंत्र्य प्रभावीपणे भोगीत व चालवीत रहाणार आहे. हे नीट धीटपणे समर्थांनीच भारतीयांना शिकविले. आणि तेही 'अलौकिक होऊ नये लोकप्रति' असे वागून

दिसे सकळासी सारखा । पहाता विवेकी नेटका ।।
कामी, निकामी लोका । बरे पाहे ।।
जाणोन पाहिजेत सर्व । हेचि तयाचे अपूर्व ।।
ज्याचे त्यापरी गौरव । राखो जाणे ।।

या नतृत्वनम्रतेच्या पथ्यानी लोकसंग्रह करून समर्थ चालले होते.

ढगाशिवाय पाऊस नाही. पावसाशिवाय पीक नाही, बीजाशिवाय फल नाही तशीच गुरुशिवाय सुखाची किल्ली सापडत नाही. चिमणी आहे, तेल आहे, कातरलेली वात आहे, पण पेटवणारी काडी नाही. तर दिवा कसा जळणार? हा गुरुविण गति नाही. या म्हणण्याचा अर्थ आहे. वैयक्तिक, सामुहिक, सामाजिक, राष्ट्रीय जीवनात गुरू प्रकाशझोत देतो. त्यायोगे शिष्याचा, अनुयायाचा, जनसामान्याचा मार्ग सुकर होतो. ध्येयाच्या उत्तुंग शिखरावर त्या प्रकाशझोतामुळेच सरळ आरूढ होता येते; अंतरीची वजनदारी, शांति ब्रह्मानंदलहरी आणि बारकाव्याची दृष्टी यांचा प्रत्यय येत जातो. समर्थ रामदासांनी जनसामान्याला रामराज्यासाठी रघुकुलरीति म्हणजेच मानवी जीवनाची नीति प्रथम शिकवली. जीव जाईल पण जीभ अमर राहील. 'बोले तैसा चाले' असे होण्यासाठी 'आधी केले मग सांगितले' ही रीति अधिक प्रभावी व समाजात आत्मविश्वासाची परिणति करणारी. राम-रहिम कृष्ण-ख्रिस्त सर्व ॐ कारमयच खरे; पण ते आपल्या अंत:करणातून उमटले पाहिजेत. धर्मातील साक्षात्कार तोच आहे.

तो व्हावयाचा असेल, सर्वांभूती परमेश्वर पहावयाचा असेल, ‘ जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवन्त ।’ हा स्वभाव व्हावयाचा असेल, तर जनजागृतिसाठी असलेले मनाचे श्लोक त्यांच्या प्रबोधनासह माणसाने मेंदूत मुरवून घेतले पाहिजेत. ‘ भव्य उदात्त तितुके घ्यावे । मिळमिळित अवघेचि टाकावे । ’ ही वृत्ति त्या उपासनेनेच निर्माण होईल. ती वृत्ति एकदा निर्माण झाली की पाश्चात्त्य व पौर्वात्त्य संस्कृतीतील सोनफुलांचा सुगंधमय संचय करूनच कर्तव्यपूर्तीची फुले माणसाला परमेश्वरचरणी वाहता येतील.

स्वलक्षणधारणाद्धर्म: या यशोवर्म्याच्या व्याख्याप्रमाणे समर्थ रामदासांचा ‘ महाराष्ट्र धर्म ’ आहे. ‘ मेला तरच हटतो ’ असा ‘ मराठा तेवढा मेळवावा ’ ही धर्माची परंपरा आहे भाग्यासी काय उणे रे ? यत्नावाचोनि राहिले ।’ अशी त्यांची शिकवण असून ‘केल्याने होत आहे रे । आधी केलेच पाहिजे । यत्न तो देव जाणावा । अंतरी तुष्टता बरे ।। ’ असे त्याचे आश्वासन आहे. ‘ अचुक चुकेना कोठे, त्याची राज्ये समस्तही, ’ असा त्यांचा आत्मविश्वास असून, ‘जो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला’ असे त्याचे लोकसंग्रह– सूत्र आहे. ‘ राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे । ’ हा ‘ सर्वेषामविरोध ’ साधण्याचा मूलमंत्र आहे. महाराष्ट्र–धर्म, ‘ दैत्य संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकितो । परंतु रोकडे काही । शीघ्र आम्हासि दाखवी ।। ’ असा शक्ती-देवतेला सवाल करतो. तो ‘ देवा बोले, भक्ता लागे । ’ हा व्यवहार साधण्यासाठी. अशा या महाराष्ट्रधर्मसंवर्धक सद्‌गुरु रामदासांना कोटी कोटी प्रणाम.

भोवतालची परिस्थिती “ पाहोन ऊर फाटतो ” एवढेच बोलून समर्थ थांबले नाहीत, तर “ भले कुळवंत म्हणावे । ते ही वेगी हजीर व्हावे । हजीर न होता कष्टावे । लागेल पुढे ।। ” असे त्यांनीच प्रथम समाजधुरीणांना बजावले. मौर्यांचे प्रचंड, बलाढ्य नि देशसंरक्षक असे साम्राज्य संस्थापून शेवटी त्यातील कशाचीही अभिलाषा न धरता तपश्चर्येसाठी हिमालयात निघून जाणारा आर्य चाणक्य विजयनगरचे वैभवशाली साम्राज्य उभारणारे आणि शेवटी ईश्वरप्राप्तीसाठी वनाचा आश्रय करणारे स्वामी विद्यारण्य ही शुद्ध भारतीय परंपरा. श्रीसमर्थ रामदास या तेजस्वी परंपरेतील एक दैदिप्यमान हिरा म्हणूनच रामदासांची गणना इतिहासाने केली आहे.

आधी तप, मग व्याप, आणि शेवटी त्याग असा समर्थ–चरित्राचा बोध आहे. त्यांची शिकवण बहुविध, व्यापक, ब्रह्मांडाला गवसणी घालणारी आहे. पण राम आपलासा करून घेतल्यावाचून राहूच नये असा तिचा बाणा आहे. “ रामाचे नाम राखशील जरी । तुज राखे तरी देवराया ।। १ ।। सुखमूर्तिराय सोडू नका कदा । तुज तो आपदा लागो नेदी ।। २ ।। लागो नेदी कष्ट आपुल्या दासासी । रामीरामदासी साह्यकारी ।।३।। ” सेवा आणि समर्पण ही भारताची राष्ट्रीय ध्येये

आहेत. प्रवाहपतित्व आणि अस्वास्थ्य यातून बाहेर पडावे तर तरुणांच्या पुढे विसंवादी ध्येये नेत्यानी ठेवू नयेत; त्यानी राष्ट्राचा एकजिनसीपणा विस्कळीत होतो. त्यामुळे सुख्यात मूल्यमापनानी सर्वांच्या आशा आकांक्षांची परिपूर्ति कशी व्हावी याविषयी प्रत्येकजण डोई खाजवू लागतो. त्याला मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य समर्थांच्या शब्दात आहेच आहे. " शीलवंत आणि समर्पणवृत्तीची मूठभर माणसे मला द्या, मी सर्व जग गदगदा हलवतो " असे स्वामी विवेकानंद म्हणत. सतराव्या शतकात समर्थांची जिद्द तीच होती.

इतिहासाचार्य राजवाडे राधामाधव-विलासचंपूचे प्रस्तावनेत म्हणतात की- " देशातील मराठयांची बहुमत संख्या यवनराजाची सेवा करण्यात प्रायः भूषणच मानीत असे. तो देशघातक ओघ बदलून देशातील सर्व मराठा तेवढा स्वराज्यासाठी एकत्र मेळवावा, हा उच्चतम राष्ट्रीयकरणाचा सल्ला रामदासाने शिवाजीस दिला. तो अशाकरता की स्वराज्य आपले आहे व त्याप्रीत्यर्थ जीव खर्ची घातला असता महाराष्ट्र-धर्म टिकावयाचा आहे अशी बुद्धि बाळगण्यात प्रत्येक मराठयाला अभिमान वाटावा. कल्पक रामदास व कर्ता शिवाजी असा महाराष्ट्र-धर्माच्या ऊर्फ राष्ट्रभावनेच्या समान धर्माचा मराठयात अवतार झाल्याने, शिवाजीच्या पश्चात् संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दीत, धनी नसताही, मराठे सरदारानी औरंगझेबास मिठ्यास आणले. महाराष्ट्र-धर्माची कल्पना शिवाजीच्याही ठिकाणी बीजरूपाने होती. ती रामदासाने उच्च स्वरूपाने पुकारल्यामुळे ती उत्कटत्वाने सफल झाली. "

समर्थांना बहुजन-समाजाची मने शिवाजी महाराजांच्या स्वराज्य-स्थापनेच्या कार्याकडे वळवावयाची होती म्हणून त्यानी आपल्या सांप्रदायात राजकारणाला स्थान दिले.

शेकडो वर्षाच्या पारतंत्र्याने व परधर्मीयांच्या आक्रमणाने महाराष्ट्रात आलेले शैथिल्य घालवून समर्थांनी कर्तव्यदक्षतेचा प्रयत्न-पुरुषार्थ शिकविला. समर्थांची चैतन्यकर शिकवण हाही समर्थांच्या कामगिरीतील एक विशेष आहे, " महात्म्य देखोनिया काळ धाके । प्रयत्ने बळे वाजवावे तडाखे ।। " ही समर्थांची परिश्रमी शिकवण काळाला पुरून उरणारीच आहे.

प्रयत्नपुरुषार्थ विवेकीच हवा हा इशाराही देण्यास समर्थ चुकले नाहीत. " जनामध्ये सार्थकता । विवेकेचि होय " असा त्यांचा घोषच होता.

समर्थांनी विवेकी प्रयत्न-पुरुषार्थाला वैराग्याची जोड द्यावयास चुकू नये असेही कर्तबगारासाठी सांगूनच टाकले आहे. रियासतकार सरदेसाई म्हणतात-- सर्व प्रचलितपंथ किंवा गुरुपरंपरा सोडून रामदासाने रामोपासना सुरू केली. स्वत: गुरु न करता श्रीरामचंद्रासच गुरुस्थानी योजिले. हेही त्याचे धोरण सहेतुक आहे. रामाची भक्ति करणे, रामाच्या नावाने प्रत्येक उद्योग करणे, सर्व यशापयश रामाला अर्पण करणे, सर्व सुखदु:खाचा भार रामावर टाकणे, हे रामभक्तीचे रहस्य. रामदास सांगतो.– "संसार क्षणभंगुर आहे, केव्हातरी मरण येणारच, ते मरण बिछान्यावर पडून येण्यापेक्षा स्वदेशसेवेत आल्याने जीवित-साफल्य होते. हे रामदासाने शिकवले. रामाची सेवा हीच."

---

# प्रार्थना

**श्रीरामास–**

श्रीरामा पुरुषोत्तमा प्रियतमा धामा समाधान द्या ।<br>
पाणी दाउनि पाणिदार करु द्या राष्ट्रास साऱ्या नद्या ॥<br>
बाणी एक गुणी अरी निपटुनी स्वातंत्र्य संस्थापुनी ।<br>
आरोपोत जयध्वजा तरुण हे काळासही दापुनी ॥१॥

**श्रीमारुतीस–**

अचपल-पविदेहा, सत्य-निर्धार-शीला ।<br>
अचपल-गुरु-जिव्हा, नीतिनैपुण्यनीला ॥<br>
गगन-गवसणीची बुद्धि नित्यप्रभावी ।<br>
वितरुनि कर दासा मारुते, कीर्ति-भावी ॥२॥

# समर्थांचा धावा

जगाया जगी लागते की मराया । मरोनी स्वये मारण्या मृत्युराया ॥
स्वकार्ये यदा मृत्युचा होय अंत । जगाया नरा येतसे तै अनंत ॥ १ ॥

जगे आणि जो का जगा जागवी तो । नरव्याघ्र विश्वामध्ये धन्य होतो ॥
समर्था अशी प्रत्ययाची सुदीक्षा । पुन्हा दे जना सत्वरी घाल लक्षा ॥ २ ॥

खरा धर्म तो मोक्ष संसार साधी । नव्हे धर्म तो जो करीना उपाधी ॥
उपाधी करी सापडे ना तयात । स्वये नि:स्पृही विश्वचिंता वहात ॥३॥

हवा राम, आराम, विश्राम धामीं । नसे एक तैं अन्य होई निकामी ॥
तपाच्या सवें खड्ग तेजाळ व्हावे । जगाया तदा विश्वि निश्चिंत फावे ॥४॥

समर्था, तुझी शीक बाणोनि अंगी । महाराष्ट्र चेतावला आत्मरंगी ॥
फकीरी स्वधर्मार्थ घे वंद्य राजा । शिरे वाहती लोक त्याच्याच काजा ॥५॥

जयश्री विरक्ती जिथे एक झाल्या । महाराष्ट्रधर्मास वृत्ती भुकेल्या ॥
महाराष्ट्रधर्मास संस्थापण्याला । पुन्हा ये समर्था, गमावी न काला ॥६॥

महाराष्ट्रधर्मा अता क्षेत्र मोठे । नसे सिंधु कोणी अडायास कोठे ॥
जगा घातले की महाराष्ट्र व्हाया । महाराष्ट्रधर्माविणे सर्व वाया ॥७॥

जगच्चालने योग्य अध्यक्ष व्हाया । असे भारती संस्कृती एक राया ॥
तिच्या हाति येताच सूत्रे जगाची । अशान्ती कुठे नाहि नांदावयाची ॥८॥

धनोन्माद वा दु:ख-दारिद्र्य-दैन्य । जना ना छळो यंत्रणा आणि सैन्य ॥
नको वर्णसत्ता, नको वर्गसत्ता । विवेकी हवी उन्नतीची इयत्ता ॥९॥

समर्था, तुझी ऐकुनी दिव्य बाणी । बघेल प्रसन्नान्तर श्री भवानी ॥
दयाळा समर्था समाधीस सोड । कृपेला तुझ्या हा महाराष्ट्र जोड ॥१०॥

• • •

## परकीयांच्या दृष्टीतून

# रे. डेमिंगासाहेब

Few Hindu religious movements have set a higher ethical standard than that of the Ramadasis and all those who have come in personal contact with earnest followers of the Swami testify to their high moral character. Ramadas himself was the example to the followers and he possessed noble character. रामदासी सप्रदायाच्या नीतिमत्तंपेक्षा अधिक श्रेष्ठ नीतिमत्तेचे उदाहरण दुसऱ्या कोणत्याही हिंदु धार्मिक संप्रदायाने घालून दिलेले नाही. स्वामींच्या आस्थेवाईक अनुयायाशी ज्यांचा वैयक्तिक संबंध आला, ते त्यां ( अनुयायां ) च्या श्रेष्ठ नीति-मत्तेची ग्वाहीच देतात. स्वतः रामदासांचेच धडा घेण्यासारखे उदाहरण त्यांच्या अनुयायापुढे होते आणि ते उदात्त शीलसंपन्नच होते.

# सूची


ॐ २, ३, १८७
अकबर ६५, १५१
अकरा मारुति ५७, ५९, ६४, १४१, १७८
अग्नि २, ३
अटक ९८
अण्णाजी दत्तो ३६, ३८
अण्णाबुवा कालगावकर ४८
अथर्वा १४४
अनंतदास २६
अनंत मौनी १०१
अनंत स्वामी ३३
अन्तरवेदी १६६
अन्नपूर्णाबाई कुलकर्णी, (दशपुत्रे) १४
अन्वयव्यतिरेक ६३
अफगाण ६५, १५१
अफझलखान ५२, १६५, १८० १८१
अमृतानुभव ७७
अयोध्या १, १५, १५३, १६६
अरणीकर कारागीर ३७
अरविंदभाई मफतलाल ४७ ते ४९
अर्थशास्त्र १४३
अल्लाउद्दीन १९, १५१
असीरिया १४४
अस्मानी सुलतानी ६७, ६८, १०५
अस्वलगड ( परळी पहा )
अंगापूर २८,४५, ४६, ५३
अंग्लाई ५३, ५४
अंजनी ३५
अंतर्भाव ११३
अंतर्वेल ६
अंताजीबुवा मेथवडेकर ३३
अंतोबा गोसावी ५९
अंबरखाने नरसोमल २५, २८, ३० ३१
अंबिकाबाई १०१
आक्का २५, २६, ३३, ३९, ४५ ५२, ५५, ५६, ६४, ९८, १०१,
आग्रा १६६, १८१
आणाप्पा १००
आत्मबोध ७९
आत्माराम ६३, ८०, ८१, ११३, ११४
आत्मारामस्वामी येवळेहाळीकर ९८, १०१
आदित्य २, ३
आदिलशाही ७५, १५७
आदिलशाही रेहान ५४
आनंद १६६
आनंदमूर्ति २३, ५९, ६०, ६४, ६७
आनंद रामायण १
आनंदवनभुवन ११५ ते ११८
आबासाहेब स्वामी ४८
आरगड- गव्हान ६
आश्वलायनगड ( सज्जनगड पहा )
आसनगाव ६, ४२
आळंद २१
आंबड ४१
इजिप्त १४४
इमारती प्रकरण ३७
इराण ५३, ६५, १५४

इलिएट ६६
इंग्रज ६६
इंदुर ६४
इंदुरबोधन ३४, ३५, ४३
इंद्र २
उडपी ३४, ३५
उत्तम पुरुष ७१, १६५
उत्तर मानस १६
उत्तरेतील मठ १६
उद्‌गीय उपासना २, ३
उद्धव १४, २२, २५, ३५, ३७, ३९, ४० ४३, ४५, ६४
उरमोडी ५२, ५३, ५५
उस्मानाबाद २५, ५९
उंब्रज २६, ३१, ४४, ९२, १८३
ऋग्वेद २, ३
ऋष्यमूक १७
एकनाथ ( भागवतोत्तम संत ) ५, १०, १२, २१, ६२, ७०, ७३, ७४, ७७, ७९, १०८
एकनाथपंत ३४,
एकनाथी भागवत १०५, १३३
एकवीस समासी ( जुना दासबोध ) ६३, ९०, ११३
एलफिन्स्टन् १५१
ओढचा पर्वत १६६
औरंगझेब १५, ५२, ५३, ६५, ९८, १५१, १५२, १६५, १६६, १८९
औरंगाबाद ४१, १५२
कण्हेरी ६४, १००, १६७
कनोज ६५
कपालेश्वर ४३
कपिलगीता १९
कबीर ४, ७६, ७७, १४७
कमलदेवी १५१
कम्बरामायण १
करणवाघेला १५१
करवीर १७, २५, १५३, १६६
करंज १७९
करुणाष्टक ७०, ७९, ८४, १०५, ११३, ११४
कर्नाटक २२, ३४, ७७, ८४, १५३, १७९
कर्मयोगी पुढारीपण १०९
कऱ्हाड २४, २५, २८, ३५, ४९, ५६, ६०, ६४, ९२, १५७, १६१
कलकत्ता ४३
कल्याण २५, २६. २८, ३३, ३५, ३८, ४० ४५, ५५, ५९, ६४, ९६, ९७, १००, ११८, १२२, १८६
कळंबे २५, ५३
कंधार २१, १५२, १५३
काऊर १५३
काटकर ३९
काणे मामा ४८
कानुकानुनाती वर्गणी ४६
कार्तिकस्वामी १७
काशी १५, १६, ४०, १५३, १५४, १६६, १८१
काशीराज स्वामी ६०
काश्मीर १५३
कास्मे उ गार्डा १५३
काळाराम ४३
किष्किधा १७
किष्किधा-काण्ड ६३
कुतुबशाही १५२
कुबडी तीर्थ १७९

कुमार वाल्मीकि ७७
कुलकर्णी गिरिधरपंत १४
„ बाजीपंत २४, २५
„ सईबाई २४,२५
कुशावर्त १५३
कृत्तिकारामायण १
कृष्णदास मुद्गल ७७
कृष्णद्वैपायन २
कृष्णा ४३ ते ४५, ६०, ६४, १८३
कृष्णाखोरे ७८
कृष्णाजी १६६
केतकर (डॉ.) श्रीधर व्यंकटेश १४३, १४४
केदारेश्वर १६, ४३
केर ६६, १५२
केशव गोसावी (स्वामी) ३९, ४०
केशवबुवा बोरगावकर १९९
केशव (दास) स्वामी भागानगरकर (हैद्राबादकर) २३, ५९, ६०, ६४, ९७, १४६, १४७
केळकर न. चिं. ९३
कैपक्षी परमार्थी १४९
कोकणपट्टी ५१
कोचीन ८६
कोटाळे ४२
कोयना ४७
कोरटी ३१
कोल्हापूर (करवीर पहा)
कोंडाणा १६२, १७८
कौसल्या १
खटाव ६०
खरे ग. ह. ५४
खंदारे पाटील ९
खानदेश ६६
खांडवा ७७
खुल्दाबाद २१
खेड ५३
गझनी ६५, १५१
गडइंग्लज ३६
गॅरिबाल्डी ९३
गंगापूर २१
गं(गा) जीकोट १५२
गंगासागर १६६
गागाभट्ट १६७
गांधी (म.) ९८, ९९,१८६
गिरगव्हान ६
गिरि-गोसावी २८, ३१
गिरिधर १०, ६४,९७, १६५
गीता २, १३, १६, ७१
गीतार्णव ८४
गुजरात ४८, ६६
गुरु गोविंदसिंग १, १६, ६०, ६७, १६०, १६१
गुरुचरित्र ६६,
गुलबर्गा २० ते २२
गोकर्ण १७, ६४, १६६
गोकुळ १५
गोदावरी १३, ३५, ४१, ४३
गोमांतक १६६
गोवळकोंडा २१, १५२
गोवा ६६
गोविंद १६६
गोविंद महादेव गोडबोले ५२
गोस्वामी १, ५
गोंदवलेकर महाराज ९९
ग्रंथसाहेब ८६
घाणगाव ४२
घोरपडे बाजीराजे ३१

घोलकर नाना ३०
चतुर्थमान ६३
चतुःसमासी ११४
चतुःसूत्री १२४
चरेगाव २५, २९, ३१, ४४
चंदावर ३७, ३९.
चंद्रगिरी २५, २७
चंद्रगुप्त १४३, १७२
चंद्रभागा ७३
चंद्रराव मोरे ३४, ५०, ५१, १६४, १७८, १७९
चाकण १७८
चाणक्य १४३, १८८
चाफळ २५ ते ३८, ४० ४१, ४४ ते ४७, ४९ ते ५१, ५३, ९२, ९८, १०१, १५९, १६२, १६७, १८०, १८३
चाफळ सज्जनगड संस्थान ५५, ५६, १८२
चांदजीराव साळुंखे ३५
चिकोडी ३४
चिपळूण ५३
चिंचवड ३५
चिंचवड–देव २३
चौदा-ओवीशते ११४
चौंडेमहाराज ९९
छांदोग्य २, ३, ७९
जगन्नाथपुरी १५, १६
जगन्नाथराय १९
जदुनाथ सरकार ६६, १५१, १५२
जनस्वभाव गोसावी ११३
जनार्दन ६४
जनार्दनस्वामी ११, १७
जय जय रघुवीर समर्थ ७७, ७८
जयपाल ६५
जयरामस्वामी २३, ५९, ६०, ६४, ९७
जयसिंग १६५
जरंडा २३
जर्मन ६६
जलालुद्दीन खिलजी १९
जहांगीर ६५, ६६
जाणती कळा ९६
जाफरखान २०
जावडेकर (आचार्य) ९३, १७७
जावळी ४५, ५१, १६४, १७८, १७९
जांब ६, ७, १०, १८, ३३, ३४, ३७, ४१, ४२, ५५, १०१
जिजाबाई १६६
जुनाट पुरूष ११३
जैतापूर ७७
जोधपूर १५१
जोशी ३९
जोशी शंकरराव ४८
जोशी स. भा. ४९
झाबऱ्या महार ४९
टॅव्हरनिऊर ६५, ६६, १५२
टाकळी १३ ते १५, १९ २२, २५, ३४, ४३, ६४, १५५
टागोर (गु.) ९९
टिळक (लो.) ५३, ९८, १०७, ११२, १२४
टोरी ६६, १५२
ठाणेश्वर ६५, १५१
ठोसर आत्माराम ६
„ कच ६
„ कृष्णाजी पंत ६

ठोसर गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ (रामी रामदास) ८, ९, ११ ते १३ १९, ३३, ३४, ३७, ४२, ५२, ५५, ९७
ठोसर त्र्यंबक सूर्याजी ४२
,, दशरथ ६, ४२
ठोसर नारायण (नारोबा) सूर्याजी (संत रामदासं तथा समर्थ, रामदास स्वामी) ४, ५, ७, ८, ९, १० ते १२, २१ ते ४३, ४५, ४८, ५० ते ५२, ५४, ५५,५७ ते ६०, ६२ ते ६४, ६७, ६९ ते ७२, ७४ ते ९४, ९६ ते १००, १०२ते १०५, १०७ ते ११४, १२४, १३०, १४१ ते १४५, १४९ ते १९०
ठोसर पार्वतीबाई ८, ९, १८,
ठोसर राघव, ६
ठोसर राणूबाई ७ ते १२, १८, ३३
ठोसर रामजी ( रामचंद्रबुवा ) ९, ३७, ४१
ठोसर शामजी ९, ३७, ४१
ठोसर वंशावळ ६
ठोसर सूर्यकांत ७ ते १९, ११, १८, ४२
ठोसर हरि ६
डच ६६
डेन्स ६६
डेसिंग ( गा ) रे. ९८, १०२, १९२
डेरवण २५
डोमगाव ३८, ५९, ९७
ढवळे गणेश रामचंद्र ५६
तंजावर २६, ३५, ५४, ५५, ६४, ७७, १७९
तानशा कुत्बशा ६०
तानसेन १७
तानाजी ९०
तारळखोरे २७
तारळेकर गोसावी ४०
तिमाजीपंत देशपांडे ३४
तिसगाव ३४
तिसवेळकर ९८
तुकाराम ( संत तुकोबा ) २१, २३, ६२, ६४, ७३ ते ७५, ७७ ते ७९, ८१, १०७, ११०, १६३, १७८,
तुळसीदास २, ५, ७६
तेजबहाद्दूरसिंग ६७
तेलंगण ४३, ६४, ८४, १६६
तैतिरीय ७९
तोडरमल १९
तोरगळ ३५, ३६
तोरणा १७८
तोरवे ७७
त्र्यंबक बाळकराम ५४
त्र्यंबकेश्वर १७
दत्तसंप्रदाय ७३
दत्तात्रेय ७२
दत्तात्रेय स्वामी ६४
दशपंचक १४
दशरथ ११, १५
दहिफळ ९, ३७, ५१
दाते वकील ४९
दादाजी २८
दादासाहेब अळतेकर ४९
दादू ४, ७६
दादोजी कोंडदेव १६१
दामाजी पंत ६६
दारा ६५

दासबोध ३३, ३८, ५०, ५८, ६२, ६३, ६८, ७१, ७३, ७९ ते ८४, ८६ ते ८८, ९०, ९३, ९७, १०५ ते १२२, १३३, १४७, १४९, १५०, १५२, १५४ ते १५६, १६४, १६८ ते १७४
दासबोध–दशकसंगति १०७ ते ११२
दासबोधपारायणरीति १३२
दास मारुति ४५
दासविश्रामधाम ८६, ९८
दाससंप्रदाय ६२
दासोपंत ८४
दिनकर गोसावी ६४, ९७, १००
दिनकरबुवा बिवलकर ४८
दिलेरखान १६५
दिल्ली १९, २०, १५३
दिवाकर गोसावी ३२, ३३, ३५, ३६, ४५, ५२, ६४, १६३
दिवाण घानतराव ३१
दीक्षित पं. ईश्वरशास्त्री ४८
देवगिरी १९, २०, ७४
देवदास ६४, १६६
देवलदेवी १५१
देव शंकर श्रीकृष्ण ४१, ९९, १०५, ११४
देशकुलकर्णी नागोजीपंत ३०
देशपांडे आनंदराव २५, २८
,, का. म. ५४
देशपांडे चिमणा ( आक्का पहा )
देशपांडे रुद्राजीपंत ३५
देशपांडे लक्ष्मण महादेव ५६
देशपांडे विष्णू रामचंद्र ५६
देशपांडे वेणाबाई (वेणाबाई पहा)
देशमुख परांजी ३०
दौलताबाद ४२, ६६
द्वारका, द्वारावती } १५, १६, १५३
धम्मपद १४६
धरणीधर ६४
धाब्याचा मारुति ५५
धुळे ४३
धृष्णेश्वर १६६
नगरकोट ९५, १५१
नरसिंह-सरस्वती ७३, १५२
नरसोबा १०१
नरहरि ७७
नर्मदा ६४
नवराममंदिर ४७
नहिसदुर्गसरकार ५३
नंदिनी १३, ४३
नंदीग्राम ४६
नंदुरबार १५२
नानक ४
नानका ५१
नामदेव ६२, ७३, ७४, ७७, ८६
नामस्मरण १३१
नारायण महाराज सासवडकर ५५
नाशिक १३, १५, २३, २७, ३१, ४३, ६०
निगडी २८, ३५, ४५, ५९
निजानंदस्वामी २८
निजाम-सरकार ४३
निजामुद्दिन अवलिया २१
नित्यनैमित्तिक प्रथा ६३
निरंजनस्वामी (जोशी) ३५
निलंगेमठ १००
निवृत्तिनाथ ७७
निवृत्तिराम ९७

निळोबा ७३
निळो सोनदेव मुजुमदार ३२, ३३, १०१
निंब ६, १७९
नृसिंहराव अधिकारी ४६
नेमाड ७७
नौरसतारा ५२
पडलोशी ४४
पण्णीकर के. एम. ६६
पदपदान्तरे ११३
पन्हाळा २६, २७, ३४, ३५
परचक्रनिरूपण १०५
परतूर ४१, ५१
परभणी ५१
परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी ५२, ५३
परशुरामभाऊ ५२
परशुरामक्षेत्र १७
परळी ३४, ४४, ५१ ते ५३, ६४ १५९, १६४
परळीजगन्नाथ १६६
पराशर ८०
परांडे ५९
पर्वतेश्वर १६
पंचमान ६३
पंचवटी १३ ते १५, १७, २३, २७, ४३, ४४, ७८
पंचसमासी ११३
पंचीकरणयोग ६३, ११४
पंचीप्यारे ६०
पंजाब ६५, १५०
पंढरपूर, पंढरी } १७, २१, ३३, ५९, ६६, ७२
पंतप्रतिनिधी ४४
पंतसचीव ४४
पद्मनाभन् ४७
पंपासरोवर १७
पाटण ३५, ४४
पाटोदे ६
पानकनरसिंह १७
पारगाव २६, ३४, ३५, ४६, १६६.
पारमाची ५१
पाली ३५
पांगारकर ल. रा. ९९
पांचाळ ३५
पांडुरंग ७४
पिसाबुर्ज ५४
पिंगळे मोरोपंत १८३
पुणे ११, २८, १६४
पुरंदर २१, १६२, १६६, १७८
पुरुषोत्तम २
पुंडलिक ७४
पृथ्वी ३
पृथ्वीराज चव्हाण १९
पेण २१
पेंडसे ( डॉ.) शं. दा. २१
पैठण ११, १७, १८, २१, ३४
पोखरी ६
पोर्तुगाल ६६
पोर्तुगीज २०, ६६, १५०, १७३
पोर्तुगीज जुलूम २०, २१
पोलादखान १६६
पोलादपूर २७
प्रणव २, ३
प्रणवाच्या मात्रा २, ३
प्रतापगड ३१, ३३, ५३, १६४, १७९
प्रताप-मारुति ४५, ५०, ७०
प्रतापसिंह १७२
प्रभाशंकरभाई सोनपुरा ४८

प्रभासपट्टण १६
प्रयाग १६६, १८१
प्रवास व पर्यटन १५९
प्राइस ६६
प्रात:स्मरण १३४
प्रार्थना श्री मारुतीस १९०
„ श्री रामास १९०
प्रासंगिक कविता ६३
प्रिक १५२
फलटण ४४
फाजलखान ५२
फेरिस्ता ६६
फ्रेंच ६६
बगदाद ६५ १५०
बत्तीस शिराळे ३५
बदरीकेदार १६
बन्याबापू (रा. ना.) गोडबोले ४८, ५०
बर्निअर ६५, १०१
बर्वे पाराजीपंत २५
बऱ्हाणपूर १५३
बल्लाळ १६६
बहामनी बेबंदशाही १५०
बहामनी राज्य ६५
बहिणाजी दिनकर पाठक ३४
बहे बोरगाव २६, ४६
बंकापूर १५३
बंगलोर २२, १६१, १६२
बंड १५०
बंदेनपाझचा दर्गा २२
बागलाण ७७
बापूसाहेब स्वामी ५६
बाबर ६५
बाबुराव गोखले ४९
बाभूळगावकर अंबाजी कृष्णाजी (कल्याण पहा)
„ दत्तात्रेय कृ. (दत्तात्रेय पहा )
बाभूळगावकर रुक्मिणीबाई २५
बालक्रीडा ७२
बालाघाट ६६
बाळकृष्ण १६६
बाळाजी आवजी चिटणीस ३२, ३३, ३८, १०१
बाळाजी मांडवगणे ४५
बिभीषण १
बीड ९७
बुक २०, १४३, १७२
बुंदेलखंड १५५
बेंदर ६, ६६, १००, १६६
ब्रह्मनाळ ५९, ६०
ब्रह्मविद्योपनिषद् ३
ब्राह्मण १४४ ते १४६, १४८
ब्राह्मण्य १४४ ते १४६
ब्रिटिश सरकार ४४
भक्तलीलामृत ९७
भक्तिरहस्य ९
भगवद् गीता (गीता पहा)
भद्रसेन १७
भरत ४, ४६, ६५
भागवत १३, ७४
भागवतधर्म ७४
भागवत वकील ४९
भागानगर ३५, ४१, ५९, ९९
भातवडीचा नृसिंह ३४
भानजी जोशी २५
भानाजीपंत गोसावी १०, १३, २९
भारत ४१, ६४

भालकी १०१
भावार्थ रामायण १, ५
भावे नागोजी नाईक ३०
भावे (डॉ.) ल. शं. ४७
भिकाजी जाधव ५२
भिकू (भीमस्वामी पहा)
भिक्षापद्धति १३६
भिंगार ३४
भीमरूपी स्तोत्रे ६३
भीमस्वामी शहापूरकर ३५, ९८
भीमाशंकर १७
भीमोपदेश ९७
भूषणगड ५३
भेंडाळे ४२
भैरव ६४, १६६
भैरवगडघळ २५
भोर ५१, ५३
भोसले शहाजीराजे १५, २२, २३, २६, ३१, ३४, ३५, ६०, ७८, ९०, १५५, १६१, १६२, १७९
भोसले (छत्रपति) शिवाजीराजे (शिवबा, शिवराय) १५, २२, २५, २७, ३१ ते ३८, ४०, ४४, ४५, ५० ते ५२, ५४, ५५, ६३, ६४, ७८, ९०, ९७, ९८, १०१, १०६, १०७, १४४, १५७, १५९, १६१ ते १६७, १७८, १८१, ते १८५
भोसले व्यंकोजी राजे ३५ ते ३७, ३९
भोळाराम ६४
मग १४४
मॅंडेल स्लो ६५
मथुरा १६, ६५, १५१, १५३, १६६, १८१
मधुरवाणी ७७
मध्ययुगीनभारत १५१
मध्वाचार्य ७७
मनपाडळे २६, ३४
मनमाड ४१
मनाचे श्लोक ६०, ६३, ८७, ८९, ९६, ११३, ११४, १४२
मनु १४५, १४६
मनूची ६५, ६६, १५१, १५२, १५४, १५५
मनोबोध (मनाचे श्लोक पहा)
मन्वारगुढीमठ १०१
मराठा ५८, १८९
मराठी सत्तेचा उत्कर्ष ९३, १७२
मलकापूर २०
मलिक रेहान (मदार उलमहारा) ५४
मल्हारराव लिंबदेव थेऊरकर ३९
मल्हारी १६६
मसूर २४, २६, २७, ४४, ९२, १५५, १६१, १६२
महंती १०९
महंमद आदिलशहा ५४
महंमद घोरी ६५, १५१
महंमद बिन कासीम ६५, १७२,
महागाव ४६
महाड ५०, ५१, १७८
महादेव गोसावी ३५
महाबळी नरसिंह १७
महाबळेश्वर १७, २२, २७, ३१, ५३
महाभारत १३, ७४, ९०
महाराष्ट्र १, ४८, ६४, ६५, ७७, ८४, १६०
महाराष्ट्रधर्म ६२, ९१, १०४, १११

महाराष्ट्रधर्माचे चैतन्यरसायन ५८
महारुद्र ६४, १६६
महालक्ष्मी १७, २५
महावाक्याचा उपदेश १९७
महिरावण ७७
मंगरूळ २१
माजगाव २६, ३१, ३२
मातापूर ३४, १५३
माधवस्वामी ९८
माधवाचार्य २०, १४३, १८८
माध्वसांप्रदाय ८५
मानपंचक ६३, ७०
मानसपूजा ११३
मानसक्षेत्र ( पश्चिम) १७
मानसिंग १९
मायले १५२
मारुति ४, १३, १६, ३७, ४४, ४५, ५०, ५३, ६४, ८४, ८७, १६०
मालगाव १००
माहुली २२ ते २४, ३१, ३६
माँझिरी ५१
मांडनदी ४४
मिरज २५, ३४, ४९, ६०, ६४, ९७, १०१
मीरजुमला १५२
मुअज्जम ६५
मुकुंद ७७
मुकुंदबुवा रामदासी ५०
मुकुंदराज ८०
मुक्ताबाई ७७
मुक्तेश्वर चिंतामणि ७७
मुर्शिदकुली १६, १५१
मुंजाबा ४२
मेथवडे ५९
मेरुस्वामी ८४, ९७, १५४
मोगल राज्यकर्ते १५४, १६२
मोरघळ ५३
मोरया देव ६४
मोक्ष ७३
मोक्षदायिका पुरी १५
यजुर्वेद २
यदुनाथ सरकार ( जदुनाथ सरकार पहा )
यवतेश्वर ५१, ५२
यहुदी १४४
युधिष्ठिर नहुषसंवाद १४६
योगींद्रभाई ४४
रघुनाथ ८४
रघुनाथ पंडित १०७
रघुनाथभट ( गोसावी ) ३५
रघुनाथस्वामी ६०, ६४
रघुनायक ७७, ८४
रघुपति १३
रघुवंश ७७
रहिमतपूर २८, ४५, ६०
रंगनाथस्वामी २३, २८, ४५, ५९, ६०, ६४, ९७
रंगो बापूजी गुप्ते ५३
राघव ७२, १४४
राघवचैतन्य २१
राघवाचा धर्म ६२
राचोटी महाभद्र १७
राजकारण- पैलू १७६
राजगड १६२, १७८
राजवाडे ( इतिहासाचार्य ) १०१, १०५, १८९
राजाराम महाराज ९८
राजस्थान ४८

राजापूर ६४
राजेंद्रप्रसाद (डॉ.) १८६
रानडे (न्या.) ९३, १७२
राम (दाशरथी) १, २, ४, ५, १४४
राम (परमेश्वर) १, ४, ५, १६, ४८, ७०, ७२, ७७, १०४, १४३, १५७, १५९, १६०, १९०
रामकृष्ण १६६
रामचरितमानस २, ५
रामचंद्र १६६
रामचंद्र दिनकर ९७
रामचंद्रपंत अमात्य ४०, ५२, १०१
रामटेक ६४
रामदास (ठोसर नारायण पहा)
रामदासकृत रामायण ६३
रामदासी बोवा ९९
रामदास्यलक्षणे ८५
रामनगर ५१
रामपूर ६४
रामपूर्वतापिनी उपनिषद् १
रामबाण १८३
रामराज्य ६९
रामवरदायिनी १६०, १८०
राम-सोहळा ९७
रामस्वामी १००
रामानंद ७६, ७७
रामायण २, ४, १३, १४, ७७, १४३, १४४
रामी रामदास (ठोसर गंगाधर पहा)
रामेश्वर १५ ते १७, ३५, ४३, ४९, १५४, १७९
रायगड २७, ३४, ३५, ३८, ५३, ७८, १६६, १८१
रावण १, १५९, १६०, १७६, १८६,
रॉस ६६
रेवणसिद्ध २२
रोकडोबाचा मारुति २२
रोमाँरोला १४५
रो सर टॉमस ६६
रोहिडेश्वर १६२
लखमाजी गवळी ६, ४२
लघुबोध ३३
लक्ष्मण ४, ३७, ४५, ४८, ५५
लंका १, १७, १५३, १६०
लाडले मशायकाचा दर्गा २२
लीकॉक १७६
वडगाव (जयराम स्वामी) ३४, ५९, ६०
वडगाव (ता. कऱ्हाड) ४६
वडगाव (पांढरी) ६, ४२
वरप्रसाद १०१
वरंबघाट ५०
वरुंबड ५१
वऱ्हाड ६४, १६६
वाई २२, ३१, ५२, ९९, १८०,
वाकेनिशी टिपण १६३
वाघापूर घळ २५
वामनपंडीत ६४, ८२
वायु ३
वायुसुत १४३
वारकरीपंथ ७४
वारणा ६०
वालीद ६५, १५०


वाल्मिकी ४, ५
वासुदेव ७४
वासुदेव गोसावी १६७
वासुदेव बुवा ६४
वासुदेवस्वामी १००
वासोटा ५२
वास्को ड गामा ६६
वाळवे मठ १०१
विजयानगर २०, ७३, १०३, १४३
विजापूर २४, २५, ३१, ६५, ७७, १५२, १६२, १८०
विठू महार ६६
विठोजी फर्जंद ३८
विठोबा ६६, ७२
विठ्ठल ७३, ७४
विठ्ठलभक्ती ७३
विद्यारण्यस्वामी ७३, १८८
विनायक पर्शुराम ५६
विनायक महाराज मसूरकर ९९
विवेकसिंधु ८०, १०५
विवेकानद १८९
विश्वनाथ १८१
विश्वामित्र ८०
वीरवाडी ५१
वीरेगव्हाण ४२
वृद्धेश्वर ३४, ९७
वृंदावन १५
वेणाबाई ( देशपांडे ) २५, ३४, ५५, ६४, ९७, १०१
वेणीमाधव १६६
वेरूळ २१
वेल्हाळ ( न्या. ) कुसुमताई ४९
वैजनाथ भागवत ५२
वैजापूर २१
वैद्य ( भारताचार्य ) चिंतामणराव १५१
वैद्य ( डॉ ) वसंतराव ४८
व्यंकोजी राजे ( भोसले व्यंकोजी राजे पहा )
व्हेनिस ६५
शत्रुघ्न ४
शमनारी ८६
शर्मा एस. आर. ६६, १५१
शहाजहान ६५, १५१
शहातुकराय १४७
शहापूर २४ ते २७, ४६, ६४, ९२
शंकर गोविंद कान्हेरे १२३
( सच्चितानंद महाराज )
शंकर देव १९
शाहू ९८
शिरगाव मठ २५, ७४
शिरोळे २६
शिलादित्य २५
शिवथरघळ ३३, ३४, ४१, ५०, १६४, १७८, १७९
शिवराय (भोसले शिवाजीराजे पहा)
शिवाजी महाराज ( भोसले शिवाजीराजे पहा )
शिवाजी व रामजी १५३
शिंगणवाडी ३२, ५०, १६३, १७९
शिंगणापूर २७, ३१,
शृंगी ८०
शेषाचल ४७
श्रीकृष्णलीला ७२
श्रीधर ६४
श्रीधर विष्णू जोशी ५६
श्रीधरस्वामी ( भगवान् ) ४१, ४३, ४८, ९९, १२४

श्रीनगर १६
श्रीमध्वाचार्य ३४
श्री रघुनाथजी ३६
श्रीराम ( शिष्य ) १६६
श्रीराम ( सर्वेश ) १, २, ७, १३, २२, २७, ३९ ते ४१, ४४ ते ४८, ५२, ५४, ५५, ६२, ७३, ७५, १३२
श्रीरामचंद्रराव यादव १९
श्रीरामदास-कथासारामृत १०
श्रीराम देवस्थान ट्रस्ट चाफळ ४८
श्रीवनभुवन ६३
श्रीशंकराचार्य ७२, ७३
श्री शैलमल्लिकार्जुन १७
श्रेष्ठ ( ठोसर गंगाधर पहा )
श्वेतमारुति १६
षड्रिपु ६३, ११४
षड्रिपु कारणी लावणे १८४
सगुणनिर्गुणध्यान ११३
सज्जन ९०
सज्जनगड ८, ३७ ते ३९, ४१, ४४, ४७, ५१ ते ५३, ५५, ९८, १०१, १६७
सदाशिव ६४
सनदपत्र १६७
सप्तसमासी ११३
सबक्तगीन ६५
समर्थ ( रामदास स्वामी ) ( ठोसर नारायण पहा )
समर्थप्रताप ८५, ९७
समर्थवांग्मय ६३
समर्थ सेवा मंडळ ४७, ४८, ५१, ९९
समर्थ संप्रदाय ६१, ६२
समालोचना १८४
सयाजीराव गायकवाड ९३, १७७
सरदेसाई १०४
संत रामदास (ठोसर नारायण पहा)
संभाजीराजे (भोसले) ३८ ते ४०, ५२, ९८, १०२, १६६, १६८
साकळगाव ६
सातारा ४४, ४७, ४८, ५१ ते ५३, ५६, १६६, १७९
सामवेद २, ३
सांगली ४८
सांप्रदायिक नित्यक्रम ८८,
सायंकालीन परिपाठी १३७
सिजविक १७६
सिद्धीरेहान ५४
सिंध ६५, १५१
सिंहगड १६६
सीता १७, ४५, ४८, ५५
सीतास्वयंवर ९७, १०१
सील सर जॉन १७६
सुकृतयोग ६३
सुगमौपाय ९
सुमित्राराणीसाहेब भोसले ४८
सुरत ६४
सुरमेगाव ६
सुलतान महंमद ६५
सुवेल ११४
सुंदरमठ (शिवथर पहा)
सूर्य २, ८७
सेतुबंध १७
सोडगाव ६
सोमनाथ ६५, १५५
सोयराबाई भोसले ३८
सोलीवसुख ११६, १२२

स्फुट अभंग ६३
स्वदेशी ५३
स्वरूपसांप्रदाय ७३, ७४
स्वानुभवदिनकर ९७
स्वामीपदग्रहण ५६
हतगाव ६
हनुमंत ७२, ७८, ९२, ९५
हरपालदेव १९, २०
हरिकृष्ण १६६
हरिगोविंदसिंग ७८
हरिद्वार ६५
हरिवंश १६६
हरिश्चंद्र १६६
हरिहर २०, १४३, १७२
हवालदार ३९
हिमालय ६५
हिरोजी फर्जंद २६
हिलोशी ५१
हिवरे ६, ४२
हिंदुस्थान ६५
हुएनसींग १५०
हुमायून ६५
हेमाद्रि १९
हेळवाक ३५, १८३
हैद्राबाद ( भागानगर पहा )
ज्ञानदेव, ज्ञानेश्वर १९, २१, ६२, ६४, ७०, ७३, ७४, ७७, ८०, १००, १०५, ११४, १८७
ज्ञानेश्वरी ७४, ७७, १३३

# शुद्धीपत्र

| पान नं. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | ३१ | कृतकत्य | कृतकृत्य |
| ४ | शेवटील | ये | मे |
| ४३ | १० | अध्यक्ष | कार्यकारी विश्वस्त |
| ४९ | १७ | १९७३ | १९७२ |
| ४९ | २५ | याप्रमाणे | -- |
| ५३ | ३ | परगण्या | परगणा |
| ६१ | १२ | तत्त्व, | तत्त्व. |
| ७८ | २७ | शक्तिमंत्रांचा | शक्तिमंतांचा |
| ८० | १५ | सस्वरूप | स्वरूप |
| ८६ | २८ | दास विश्रामधामा | दासविश्रामधामात |
| ९३ | ३३ | साकल्पनिवारण | साकल्यविवरण |
| ९९ | १३ | आठवले | आठल्ये |
| १०१ | ३० | प्रभवन्ति र्मणि | प्रभवति मणि |
| ११० | ५ | वटारून डोळे | डोळे वटारून |
| ११० | २१ | परमष्टीसुद्धा | परमेष्टीसुद्धा |
| ११० | २७ | व्यष्टीसमष्टी, विकास व | व्यष्टिसमष्टि विकास |
| १११ | २१ | वांगमयकथा | वांग्मयकथा |
| १४८ | ९ | वापप्रस्थ | वानप्रस्थ |
| १५५ | १२ | दऱ्याकुंटातून, | दऱ्यादर्कुटातून |
| १६६ | १७ | भाषा समजणाऱ्याना | भाषा समजणाऱ्यांच्या |
| १७७ | १० | केला आहेच | घ्यावा असाच आहे |
| १८६ | १२ | स्वधर्मे निधमं | स्वधर्मे निधनं |


पुणे
पुणे जिल्हा
सोलापूर जिल्हा
सोलापूर
रत्नागिरी जिल्हा
रत्नागिरी
सातारा
सांगली
कोल्हापूर.
कऱ्हाड
इस्लामपूर
जोतिबा
पन्हाळा
कृष्णा नदी
श्री समर्थ स्थापीत
११ मारुती
१ श्रीमारुती शहापूर.
२ श्रीमारुती मसूर.
३ प्रतापमारुती चाफळ.
४ दासमारुती चाफळ.
५ श्रीमारुती उंब्रज.
६ श्रीमारुती शिराळे.
७ श्रीमारुती मनपाडळे.
८ श्रीमारुती पारगाव.
९ श्रीमारुती माजगाव.
१० श्रीमारुती शिंगणवाडी.
११ श्रीमारुती बहे.



महाराष्ट्र राज्य
स्केल अंदाजे १ सें.मि. - ४० कि.मि.
समर्थ संप्रदायाची तीर्थे
राज्याची हद्द
जिल्ह्याची हद्द
जिल्ह्याचे ठिकाण
गांव
रेल्वे
नदी
मध्य प्रदेश
गुजरात
अरबी समुद्र
आंध्र प्रदेश
म्हैसूर
मनमाड
जळगाव
धुळे
नाशिक
टाकळी
पंचवटी
औरंगाबाद
पैठण
अंबड
परतुर
परभणी
नांदेड
बीड
अहमदनगर
ठाणे
मुंबई
अलिबाग
(कुलाबा)
पुणे
उस्मानाबाद
सोलापूर
सातारा
पाटण
कराड
सांगली
रत्नागिरी
पन्हाळा
कोल्हापूर
कृष्णा
बुलढाणा
अकोला
अमरावती
चांदूर
वर्धा
नागपूर
भंडारा
यवतमाळ
चंद्रपूर